श्री. अशोक कोठारे

# हिंदू कोण?

# हिंदू कोण ?

**- चौथी प्रश्नोत्तरी -**

**लेखक : अशोक कोठारे**

**ई साहित्य प्रतिष्ठान**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखकाचा ई मेल –

ashokkothare@gmail.com

दिनांक – २० डिसेंबर २०१९

## चौथ्या प्रश्नोत्तरीसाठी लेखकाचे निवेदन -

विविध हिंदूंच्या परंपरांचे वैदिक बरोबर इतर विचार प्रणाली जसे, शाक्त, तंत्र, अघोर, मार्ग, मिमांसा, योग, मंत्र, चेटुक, देवदेवस्की, पिशाच्च विद्या व इतर ह्यांनुसार विवेचन ह्या चौथ्या प्रश्नोत्तरीत केले आहे. जे सहसा आढळत नाही. एरवी फक्त वैदिक परंपरेनुसार सर्व विचार होत असतो त्यामुळे ब्राह्मणेतर हिंदूंच्या प्रश्नांची उत्तरे त्यात मिळत नाहीत. त्या सर्व प्रश्नांची उत्तरं ह्यात दिली आहेत. एकविसाव्या शतकातील हिंदूंच्या चालीरीती कशा असाव्यात ह्याबद्दल चर्चा केलेली आहे.

वाचकांच्या शंकाकुशंकांच्या समाधानार्थ ह्या पुस्तकात सुधारणा केल्या जातील. त्यानुसार आवृत्ती बदलेल. म्हणून नवीन प्रश्नोत्तरी आल्यास जुनी प्रश्नोत्तरी काढून त्या जागी नवीन घ्यावी. साधारणपणे चार वर्षापूर्वी माझ्या ईमेलवर ह्या विषयात अभ्यास होत असतांना वाचक त्यांचे प्रश्न पाठवत होते व मी विविध ग्रंथांचा अभ्यास करून त्या प्रश्नांची उत्तरं शोधून ती देत असे. अशारितीने आता चौथी प्रश्नोत्तरी मी देत आहे. त्यात इतर विद्वानांच्या अभ्यास सुद्धा घेतला आहे. आमचा उद्देश साधारण मराठी हिदूंना त्यांचा धर्म समजावा असा आहे. एक गोष्ट येथे स्पष्ट केली पाहिजे कीं, हिंदू धर्म व हिंदू संस्कृती ह्यात गोंधळ घातला जातो. सगळ्यांसाठी हिंदू धर्म एकच आहे परंतु, संस्कृती मात्र निरनिराळ्या प्रदेशांची, जमातींची वेगवेगळी असते हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे. हिंदू धर्माचा अभ्यास करतांना तीन विषयाचा अभ्यास करावा लागतो ते आहेत, नितीशास्त्र, अध्यात्मविद्या आणि कर्मकांड. हिंदू संस्कृतीचा अभ्यास करतांना त्यात त्या प्रदेशाची भाषा, चालीरिती, परंपरा, सणसूद हे पहावे लागतात. ह्यावरून हे स्पष्ट होते कीं, ते दोन वेगवेगळे विषय आहेत. ह्या चौथ्या प्रश्नोत्तरी मध्ये महाभारत, योगवासिष्ठ, आगम शास्त्र, योग वासिष्ठ त्याच प्रमाणे रामदासांचे दासबोध अशा मान्यवर ग्रंथांचे आधार घेऊन हि प्रश्नोत्तरी तयार झाली आहे. नितीशास्त्राची व्याख्या काय ते पहावी लागेल. आपण ज्या समाजात रहातो त्याच्या सदस्यांशी कसे वागावे, कसे बोलावे, एकमेकांशी व्यवहार कसे करावे ह्याच्या विविध नियमांच्या शास्त्राला नितीशास्त्र असे म्हणतात. अध्यात्म विद्येमध्ये माझ्यातील आत्म्यास मी कसे ओळखावे, त्याच्या पद्धतीचे शास्त्र समजले जाते. आता कर्मकांड म्हणजे काय ते पहावे लागेल. हिंदू मान्यतेप्रमाणे माणसाला त्याच्या गतजन्माच्या चांगल्या वाईट कर्मानुसार त्याचे भोग ह्या जन्मात भोगावे लागतात. म्हणजे आपले पुढील जन्माचे भाग्य आपणच स्वताच्या ह्या जन्माच्या कर्माने लिहीत असतो. परंतु, मनुष्याला त्यात बदल करण्याची इच्छा असेल तर काय करावे अशा प्रश्नातून एक तोडगा म्हणून अगदी प्राचीन काळापासून कांहीं करण्याची सोय आपल्या हिंदू मान्यतेत दिली आहे ती अशी कीं, ज्या अनेक

देवता सांगितल्या आहेत त्यांना प्रसन्न करून ते आपल्या सोयीनुसार बदलून घेता येते. अर्थात ते किती खरे वा खोटे कोणाला माहीत नाही पण त्यावर विश्वास ठेवून ज्या विविध विधी आगम शास्त्रात दिल्या आहेत त्या करण्याच्या कार्य पद्धतीला कर्मकांड असे म्हणतात. त्याचा अर्थ हिंदू मान्यतेत भ्रष्टाचाराला उघड मान्यता असते असे दिसते. ह्या कर्मकांडाच्या विविध पद्धतीतून पुढे त्या प्रदेशातील संस्कृती तयार झाल्या असे दिसून येते. ह्या महत्वाच्या विषयांवर चौथ्या प्रश्नोत्तरीत विचार केला आहे. त्यातून हिंदूंच्या अनेक प्रश्नांची उत्तरं मिळतात ती दिली आहेत. अभ्यास करण्याची हि प्रक्रिया अशीच होत राहील अशी मी अपेक्षा करतो. तुम्हाला कांहीं प्रश्न असे व त्याचे उत्तर ह्या प्रश्नोत्तरीत नसेल तर तो प्रश्न माझ्या ईमेववर आपण पाठवू शकता. माझा ईमेल आहे, ashokkothare@gmail.com.

अशा संशोधन कार्याला बराच पैसा लागतो, मी जरी घेत नसलो तरी माझ्या वयोमानामुळे मला अनेकांची मदत घ्यावी लागते तसेंच इतर कार्य करण्यासाठी बराच खर्च होत असतो. हल्ली मी माझी पदरमोड करतो पण जर जास्त धन उपलब्ध झाले तर जास्त मोठ्या प्रमाणात हे कार्य अधिक वेगांने पुढे नेता येईल. जर आपल्याला ह्या कार्याला अर्थ सहकार्य करण्याची इच्छा असेल तर ह्या अकौंटवर पैसे पाठवू शकता -

Satara Sahakari Bank Ltd, Chembur Branch

Account no. 010010100004835

Bank MICR Code: 400107010

Bank IFSC Code: YESBOTSSB10

Ashok S. Kothare



## लेखकाचा परिचय –

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची पंचाहत्तरी होत आहे. गेली चाळीस वर्षे मी हिंदू प्रणालीतील विविध विचार प्रवाहांचा अभ्यास करीत आहे. अध्यात्म साधक म्हणून मी अनेक हिंदू तत्त्वज्ञान शाखांचा अभ्यास करीत आहे. सामान्य माणसाला सहजपणे समजेल अशा भाषेत ते विचार मांडण्याच्या उद्देशाने मी भगवद्‌गीता, मनुस्मृती, दासबोध, ऋग्वेद, महाभारत अशा ग्रंथ रचनांची भाषांतरे केली व उत्सुक जिज्ञासूंना ती विनामुल्य दिलेली आहेत. अध्यात्म साधना सामान्य माणसास सहजपणे करता यावी म्हणून मी दासबोधाचे रसग्रहण करून लक्षणचिकीत्सा व षड्रिपू विमोचन साधना ह्या रचना केल्या व त्यासुद्धा साधकांना दिल्या व मीसुद्धा त्यांच्या मदतीने माझी अध्यात्म साधना यशस्वी केली आहे. अध्यात्म हा विषय सोपा केला तर कोणताही इसम सहजपणे त्यात प्रगती करू शकतो हे मी अनुभवले आहे. सर्व मराठी माणसांनी त्यात रस घ्यावा व स्वताची प्रगती करावी म्हणून मी नेहमी प्रयत्नशिल असतो. इतर तत्त्वज्ञानाच्या अभ्यासा बरोबर शाक्त, अघोर, तंत्र, पिशाच्च विद्या, आगम शास्त्र अशा ज्ञान शाखांचा सुद्धा अभ्यास माझा होत असतो. त्यामुळे हे "हिंदू कोण", पुस्तक लिहीणे मला शक्य झाले.

"हिंदू कोण", हे पुस्तक लिहीण्या मागील परिस्थिती समजून घेता यावी म्हणून थोडे लिहीत आहे. त्याचे असे झाले किं, मनुस्मृतीचे भाषांतर प्रसिद्ध झाल्यावर त्याचे वाचन बर्याच लोकांनी केले त्यात असा मोठा वाचक वर्ग आहे किं, जो ब्राह्मणांना मानत नाही व ब्राह्मण त्यांना मानत नाहीत. त्यांचा असा आक्षेप होता कीं, मनुस्मृतीत ब्राह्मणेतरांसाठी कांहींच मार्गदर्शन नाही तरी त्यासाठी तुम्ही कांहींतरी करावे. त्यावर मी त्यांना कशाप्रकारचे मार्गदर्शन अपेक्षीत आहे त्याबद्दलची विचारणा केली. त्यानुसार, अशा अनेक लोकांनी माझ्याकडे त्यांचे अनेक प्रश्न पाठवण्यास सुरुवात केली. त्यांतून पहिल्या प्रश्नेत्तरीची निर्मिती झाली आहे. आता ही चौथी प्रश्नोत्तरी आहे. प्रश्न विचारणार्यांचे समाधान त्याने झाले तेव्हां असा विचार केला किं, अशी मानसिकता इतर बर्याच ब्राह्मणेतर हिंदूंची असू शकते तेव्हां, माझी सर्व वाचकांना विनंती आहे किं, त्यांनी ही प्रश्नोत्तरी वाचल्यावर आपला अभिप्राय माझ्याकडे पाठवावा. त्यामुळे ह्या कार्याला मदत होईल. ह्या वेब-साईट वरून सर्वांना विनामुल्य उपलब्ध करीत आहे. त्यामुळे ह्या कार्याला मदत होईल. माझा ईमेल आधी दिला आहे.

## लेखकाचे दोन शब्द –

मनुस्मृतीचे मराठी भाषांतर उपलब्ध झाल्यानंतर त्याचे वाचन अनेक सुशिक्षित ब्राह्मणेतर हिंदूंनी केले. त्यानंतर त्यांच्या असें लक्षात आले किं, मनुस्मृती ही केवळ ब्राह्मणांना जीवनाचे मार्गदर्शन करण्यासाठी आहे. ब्राह्मणेतर हिंदूंसाठी काय मार्गदर्शन असेल असा प्रश्न त्यातून उत्पन्न झाला. प्रदीर्घ संशोधनानंतर असे आढळून येते किं, ब्राह्मणेतर हिंदूंचे जीवन अनेक परंपरांनी निश्चित केलेले आहे. त्याच्यासाठी कोणतेही एक पुस्तक नाही. तसेंच आणखीन एक गोष्ट दिसून आली ती अशी किं, हिंदू परंपरा सतत कालमानानुसार उत्क्रांत होत आहेत. म्हणजे गेल्या शतकातील हिंदू रीतीरिवाज आज प्रचारात नाहीत. तसें ब्राह्मण धर्मांत व इतर धर्मांत नसते. त्या फरकांमुळे हिंदू परंपरा इतर धर्मापेक्षा (त्यात ब्राह्मणधर्मसुद्धा आला) वेगळ्या रहातात. आता अशी परिस्थिती आहे किं, सर्व सुशिक्षित हिंदू हे समजून चुकले आहेत किं, ब्राह्मणधर्म व हिंदू धर्म एक नसून ते भिन्न आहेत व त्याप्रमाणे त्यांचा विचार झाला पाहिजे. आणखीन एक गोष्ट लक्षात येते ती अशी किं, हिंदू परंपरा जास्त करून शाक्त, तंत्र व अघोर परंपरांशी निगडीत असतात. ह्याचे कारण, बहुतेक हिंदू, जे मुख्यता क्षत्रिय, वैश्य व शुद्र वर्णांचे असतात, ह्या परंपरांशी निगडीत आहेत. फारच थोडे हिंदू जे ब्राह्मणांच्या प्रभावाखाली असतात ते वैदिक परंपरा जपतात. असें सुद्धा दिसते किं, ह्या वैदिक परंपरा व शाक्त, तंत्र आणि अघोरी परंपरा ह्यांचे विलक्षण असें मिश्रण सामान्य हिंदूंच्या जीवनात झालेले आढळते. उदाहरणार्थ, देवी पुजा हिंदूंची व ब्राह्मणांची ह्यात बराच फरक आहे. हिंदूंत गुरव देवांच्या पुजा करतात, तेथे ब्राह्मणाने पुजा करावयाची नसते पण आज आपण पहातो किं, ब्राह्मणांनी सर्व देवस्थानांचा ताबा घेतला आहे. हिंदू देवीला मांसाचा प्रसाद देतात ब्राह्मण शाकाहारी प्रसाद देतात. हिंदूंच्या परंपरांत ढवळाढवळ करणे हा ब्राह्मणांचा एक उद्योग झाला आहे. हे असें अनेक वर्षे चालू आहे. अनेक वर्षे ब्राह्मण पुरोहित वर्ग हिंदूंच्या धार्मिक व्यवहारात हस्तक्षेप करून त्याद्वारा हिंदूंवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयास करीत आहेत. आजपर्यंतचा हिंदू बहुधा अशिक्षित असल्यामुळे ते सहज शक्य होत होते, पण आता परिस्थिती बदलत आहे. सामान्य हिंदूसुद्धा आता बर्यापैकीं सुशिक्षित झाला आहे व त्यामुळे त्याच्यात त्याच्या हिंदूपरंपरांबद्दलची एक वेगळी जागृती झाली आहे. आता अशा परिस्थितीत हिंदू परंपरा त्यांच्या शुद्ध स्वरूपांत पहाण्याची गरज असल्याचे अनेक सुशिक्षित हिंदूंच्या लक्षात आले. ह्या दृष्टीने मी येथे एक प्रयत्न केला आहे किं, हिंदूंना त्यांच्या सतत उत्क्रांत होणार्या परंपरांची कांहीं माहिती मिळावी. ह्यामागील उद्देश असा किं, ह्यापुढे ब्राह्मणांचा हिंदूंच्या व्यवहारातील सुळसुळाट कमी होईल. पुढील चर्चा सुरु करण्या आधी आपण ब्राह्मण धर्म व हिंदू धर्म (परंपरा) ह्यांतील ठळक फरक पाहुया. ब्राह्मण प्रामुख्याने अर्ध शाकाहारी असतात. अर्ध शाकाहारी

अशासाठी किं, ते दूध व त्यापासून बनलेले पदार्थ नेमांने त्यांच्या आहारात ठेवतात. येथे प्रामुख्याने असे लिहीण्याचे कारण, अनेक ब्राह्मण ऋग्वेदी परंपरेनुसार मांसाहार करतात. एकंदर ब्राह्मणांतील ४५ टक्के ब्राह्मण जैनांच्या प्रभावाखाली आहेत ते आज अर्ध शाकाहारी असून ५५ टक्के ब्राह्मण उभयाहारी आहेत. उभयाहारी म्हणजे, असे जे शाकाहार व मांसाहार दोनही करतात. जरी मांसाहारी ब्राह्मणांची संख्या जास्त असली तरी शाकाहारी ब्राह्मण जास्त संघटीत असून ते शाकाहाराचा प्रचार जोमांने करीत असल्यामुळे सर्वच ब्राह्मण शाकाहारी असल्याचा व हिंदूसुद्धा शाकाहारी असल्याचा आभास त्यांनी निर्माण केलेला आहे. हिंदू प्रामुख्याने मांसाहारी असतात. शाकाहारी ब्राह्मण जैन विचाराच्या प्रभावाखाली वावरत असतात त्यासाठी ते अर्ध शाकाहार करून त्यांची नक्कल करतात असें दिसून येते. वास्तविक पहाता मनुस्मृतीच्या आदेशानुसार पाहता सर्व वैदिक ब्राह्मण गोमांसाहारीच असावयास पाहिजेत पण तसे दिसत नाही. जनक राजाच्या आदेशानुसार मिथिला नगरीत माणसे गाय, घोडा, डुक्कर असे मोठे प्राणी खात होते. यज्ञात ज्या गाई कापल्या जात होत्या त्या ब्राह्माणांनी खाण्यासाठीच होत्या. असे असतांना ते असें कां बदलले ते आपण नंतरच्या भागात पहाणार आहोत. आजचे ब्राह्मण जरी वैदिक धर्माच्या गोष्टी करीत असले तरी प्रत्यक्षात ते जैन धर्माचे अनुकरण करीत असतात. म्हणजे वस्तुतः आजचा ब्राह्मण हिंदूधर्मापासून फार दूर गेला आहे. तो छुप्या जैनधर्माचे अनुचरण करीत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे वस्तुतः त्यांना हिंदूंच्या पुजाविधी करण्याचा हक्क नाही तरी सामान्य हिंदूंच्या अज्ञानाचा गैरफायदा उठवून ते हिंदूंच्या देवतांच्या पुजा करीत आहेत. हे सर्व अतिशय चुकीचे होत आहे. हे सर्व तेव्हांच थांबेल जेव्हां खरे हिंदू सावध होतील. यजुर्वेदि ब्राह्मण यजुर्वेदाचे पालन करीत नाहीत, ऋग्वेदि ब्राह्मण ऋग्वेदाचे पालन करीत नाहीत, सामवेदी सामवेदाचे पालन करत नाही. जे शंकराचार्य आहेत ते कोणत्याही सनातन परंपरांचे पालन करीत नाहीत, हे सर्व ब्राह्मण प्रत्यक्षात फक्त आणि फक्त जैन रिवाजांची नक्कल करीत असतात. हि मोठी फसवणूक हिंदूंची होत आहे आणि हे सर्व कांहीं होत आहे कारण हिंदू त्याच्या धर्माबद्दल अनभिज्ञ आहे. ह्याबद्दल बरेच लिहीता येईल परंतु तो आपल्या ह्या पुस्तकाचा विषय नाही म्हणून एवढेच लिहीतो. आजचा ब्राह्मणधर्म उत्क्रांत होत नाही, ते स्वताला सनातन सांगतात परंतु, प्रत्यक्षात ते मागासलेला असा जैनधर्म पाळत आहेत. हिंदू परंपरा सतत उत्क्रांत होत असतात. हिंदूंच्या ह्या सतत उत्क्रांत होण्याच्या स्वभावामुळे (सनातनी) ब्राह्मण व हिंदू ह्यात बर्याच वेळा मतभेद झालेले दिसतात. हिंदूंत देवांची सर्व रुपं सारखीच आदरणीय असतात, परंतु, ब्राह्मण फक्त हिंदूस्थानातील तीसुद्धा कांहीं दैवतेंच आदरणीय मानतात व इतरांचा द्वेष करतात. जर हे दोन वेगवेगळे (धर्म) आहेत असें सर्वांच्या ध्यानात झाले तर हे मतभेद व त्यातून उत्पन्न होणारे

तणाव नाहीसे होतील, आणि ब्राह्मणांचे हिंदूंतील जीवन कारभारात ढवळाढवळ करणे व हिंदूंना खोटे मार्गदर्शन करणे बंद होईल. हिंदूसुद्धा ब्राह्मणांकडे मार्गदर्शनासाठी विचारणा करणार नाहीत. हिंदूंना त्यांच्या परंपरा व त्यांच्यातील बुजुर्ग वृद्ध व शहाणी माणसे मार्गदर्शन करण्यास समर्थ आहेत. हे साध्य होण्यास मदत म्हणून मी ब्राह्मणेतर हिंदूंना त्यांच्या परंपरांची माहिती व्हावी ह्या उद्देशाने "हिंदू कोण?" हे पुस्तक रचले आहे. हे पुस्तक म्हणजे एक प्रश्नोत्तरी आहे. कारण त्यात विचारलेल्या प्रश्नांस उत्तर असे त्याचे स्वरुप आहे. मला हे काम करतांना अनेक ब्राम्हणेतर हिंदूंनी त्याच्या कडील प्रश्न पाठवून मोठी मदत केली त्या बद्दल त्यांना धन्यवाद.

२३ सप्टेंबर २०१६, श्रावण कृष्ण षष्ठी, शके१९३८

## १. हिंदू मान्यतेतील देव व परमेश्वर ह्यां बद्दलच्या कल्पना -

**१.** इतर धर्म व आपला हिंदूधर्म ह्यात एक मोठा फरक आढळून येतो तो हा किं, इतर धर्मांत एक परमेश्वर असल्याचे मानले जाते त्याउलट आपल्या हिंदूधर्मात एक परमेश्वर व त्या बरोबर अनेक देव व देवता असल्याचे मानले जाते. अशी अनेक देवता मानण्याची प्रथा कां प्रचारात आली ते सुद्धा आपल्याला समजून घ्यावयाचे आहे. त्यासाठी प्रथम आपल्याला परमेश्वर व देव-देवता ह्यांतील भेद समजून घ्यावा लागतो. असा संकेत आहे किं, हे विश्व परमेश्वराने त्याच्या विचारांतून उत्पन्न केले आहे. कांहीं म्हणतात किं, हे विश्व हे ह्या परमेश्वराचे एक स्वप्न आहे. विशेष म्हणजे हा समज हिंदू व इतर सर्वच धर्मांत सर्वमान्य असा आहे, असो. वस्तुतः हिंदू हा धर्म नाही जसा इस्लाम अथवा ख्रिस्ती आहेत. कारण हिंदू ही एक परंपरा आहे व त्यात अनेक धर्म आहेत. ब्राह्मण धर्म, जैन धर्म, बुद्ध धर्म, शिख धर्म असे अनेक धर्म त्यात असून त्याशिवाय अनेक पंथ जसें नाथ पंथ, भक्तीपंथ, वारकरी पंथ, अघोरी पंथ, वैष्णव पंथ, शाक्तपंथ व आणखीन कितीतरी पंथ हिंदूस्तानात निरनिराळ्या भागात आहेत. त्यांबरोबर आणखीन नवनवीन पंथ उत्पन्न होत आहेत. त्यामुळे इस्लाम अथवा ख्रिस्ती धर्मांशी त्याची तुलना करणे सर्वथा चुकीचे होईल. इस्लामची अथवा ख्रिस्ती धर्माची तुलना ब्राह्मणधर्माशी अथवा जैन धर्माशी, शिख धर्माशी, बुद्धधर्माशी करता येईल पण हिंदू परंपरेशी करता येत नाही. जेव्हां मी हिंदूंच्या धर्म विषयक अभ्यास करू लागलो तेव्हां समजले कीं महाभारत, योगवासिष्ठ, आगम शास्त्रे ह्यांच्या मदतीने त्याचे विवेचन करणे योग्य होईल. हिंदू धर्मशास्त्राच्या अभ्यासात तीन विभाग आढळतात. ते असे, नितीशास्त्र, अध्यात्मविद्या आणि कर्मकांड असे ते आहेत. अशा विभागणीमुळें अभ्यास अधिक चांगला करता येतो.

**२.** मी ह्या लेखांत हिंदू मान्यता, हिंदू परंपरा, हिंदू विचार असा उल्लेख केला आहे. हिंदू हा शब्दसुद्धा आपला नाही. तो अरबांनी आपला उल्लेख करण्यासाठी वापरला व तो तसांच आपण आज वापरत आहोत. असें होण्याचे कारण, अनेक वर्षे आपल्यावर इस्लामी राजवट होती त्याचा हा परिणाम आहे. प्राचीन उल्लेख पाहता ह्याचा (हिंदू) उल्लेख "मानव प्रणाली" असा केलेला आढळून येतो. ह्याकारणांने प्रत्येक गोष्टीत हिंदू परंपरांची तुलना इतर धर्मांशी करणे उचीत होणार नाही. इस्लाम मध्ये असे आहे तर हिंदूंत काय? असे प्रश्न विचारणे त्यासाठी सर्वथाने अयोग्य होईल. येथे हिंदू विचाराबद्दल बोलतांना इतर धर्मांना कमी लेखण्याचा सुद्धा विचार नाही कारण, त्यांची तुलना न करतां आपल्याला सर्व गोष्टी पहावयाच्या आहेत. हिंदूंतील वैविध्यसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. पंजाबातील हिंदू रीती महाराष्ट्रापेक्षा कितीतरी वेगळ्या आहेत तरीसुद्धा दोघेही हिंदूच असतात. तसे वैविध्य इतर धर्मांतील रितीरिवाजांत

आढळत नाही. इतर धर्मांशी तुलना न करतां हिंदूंची वैशिष्ट्ये कोणती हे समजून घेणे असा हा प्रयत्न आहे. तरीसुद्धा शेवटी इस्लाम व ख्रिस्ती धर्मांच्या विचारसरणीचा उहापोह मी करत आहे कारण, तो आवश्यक आहे. इतर धर्मांत विविध रितीभातींचे प्रमाणिकरण केलेले असतें तसे हिंदूंत करता येत नाही. कारण हिंदूंतील रीतीरिवाज त्या त्या प्रदेशाच्या गरजेनुरुप असतात. महाराष्ट्राचे रितीरिवाज गुजरातपेक्षा वेगळे असणार त्यामुळे तेथे प्रमाणिकरण शक्य नसते. बळजबरीने जर कोणी असें प्रमाणिकरण करण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळे इतरांवर अन्याय होईल, ते योग्य नाही म्हणून असें प्रामाणिकरण करण्याचा कोणीही प्रयत्नसुद्धा करू नये असा एकंदर विचारप्रवाह आहे. हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती ह्या भिन्न असतात. सगळ्या हिंदूंचा धर्म जरी एक असला तरी संस्कृत्या विविध असतीत त्याचा उल्लेख मी आधी केला आहे जेव्हां मराठी संस्कृती, पंजाबी संस्कृती असे सांगितले जाते. बर्याच वेळा हा फरक लक्षात न घेता बोलले जाते ते योग्य नाही. त्यामुळे गैरसमज होत असतो.

**३.** परमेश्वराच्या आधी काय? असा प्रश्न इतर धर्मांत कोणीही विचारलेला आढळत नाही परंतु, हिंदू विचारांत हा प्रश्न उपनिषदांत विचारलेला आढळतो. त्याला उत्तर म्हणून नेती...नेती... नेती असें उत्तर दिलेले आढळते. नेती, ह्याचा अर्थ "माहीत नाही", असा आहे. म्हणजे परमेश्वर ही माणसाच्या ज्ञानाची अंतिम मर्यादा ठरते. परमेश्वर हा शब्द परम् व ईश्वर अशा दोन शब्दांपासून बनलेला आहे. म्हणजे ईश्वराच्याही पलिकडील असा त्याचा अर्थ होतो. इतर धर्मांत ईश्वर व परमेश्वर हे एकच असें धरलेले आढळते. ख्रिस्ती धर्मात गॉड हा एकच शब्द सर्व प्रकारच्या देवांसाठी वापरला जातो. हिंदू विचारात मात्र ईश्वर ह्या पातळीवर ब्रह्मदेव, विष्णू व शंकर असे तीन असल्याचे मानले जाते. जो ह्या तिनाहूनही पलिकडला तो परमेश्वर असे समजतात. हिंदूंत दोन प्रमुख विभाग आहेत त्यातील एकास वैदिक विभाग व दुसर्याला शाक्त विभाग असे मानले जाते. शाक्तांमध्ये अघोर, तंत्र, मार्ग असें इतर विचार प्रवाह समाविष्ट केले जातात. शाक्त मान्यतेनुसार शक्ति परमेश्वराच्या बरोबरीची असें मानले जाते. मनुस्मृतीत परमेश्वराला स्वयंभु असे म्हंटले आहे. स्वयंभु म्हणजे स्वतःच्या प्रेरणेने स्वतःच उत्पन्न होणारे हि व्याख्या शाक्तातील शक्तिलासुद्धा लागू होते. म्हणजे शक्ति हा शब्दसुद्धा स्वयंभुला पर्यायी आहे म्हणून ती ईश्वरापेक्षा उच्च आहे.

**४.** मनुस्मृतीत पहिल्या भागांत विश्व कसे उत्पन्न झाले ते सांगितले आहे. तरीसुद्धा परमेश्वराने ही सृष्टी त्याच्या प्रेरणेने उत्पन्न केली असे समजून त्या नंतर पुढच्या गोष्टींचा विचार इतर धर्मांत केलेला आढळून येतो. म्हणजे परमेश्वराने त्याच्या पासून थेट सृष्टी उत्पन्न केली असे साधारणपणे समजले जाते.

त्यांच्यात जास्त खोलात जाणे आवश्यक समजले जात नाही परंतु, हिंदू विचारानुसार तसें मानले जात नाही. हिंदू विचारांत परमेश्वरांने सुरुवातीस कांहीं देवता प्रथम उत्पन्न केल्या व त्यांना सृष्टी उत्पन्न करण्याचे काम सोपवले असें समजले जाते. ह्या देवतां अनेक आहेत जसें, एकाद्या कंपनीत मालका खालोखाल अनेक अधिकारी असतात तसेंच साधारणपणे आहे, असें हिंदूंत समजले जाते. त्यामुळे एक परमेश्वर व अनेक देवता अशी रचना असल्याचे मानले जाते जसें एक मालक व अनेक अधिकारी. कांहीं ठिकाणी देवतांना ऋषी असा शब्द वापरलेला आहे. ऋषी म्हणजे द्रष्टा अथवा असा, जो सर्वकांही पाहू शकतो.

**५.** आता सवाल येतो तो ह्या देवतांच्या पुजनाबद्दलचा. मुळात त्यांना कां पुजावयाचे हा प्रश्न उपस्थित होतो. असा विश्वास सर्वमान्य आहे किं, त्यांच्याकडे माणसाचे जीवन सुखी व समृद्ध करण्याच्या सिद्धी असतात. कांहीं हिंदू तसें मानत नाहीत त्याना नास्तिक हिंदू समजले जाते. ते नास्तिक ह्या देवतांची पुजा करीत नाहीत. हिंदूंच्या विचार करण्याच्या पद्धतीनुसार माणूस दोन प्रकारचे असल्याचे मानले जाते. एक असा माणूस ज्याला परमेश्वराला पहावयाचे, त्याच्यात एकरूप होण्याची इच्छा असलेला असा आहे त्याला मोक्षार्थी असें म्हणतात व दुसरा असा माणूस, ज्याला जीवनातील सुख, समृद्धि, यश, किर्ति, सन्मान, सत्ता, सामर्थ्य, वैभव अशा वास्तविक गोष्टींचा भोग घेणे हे परमेश्वर प्राप्तिपेक्षा जास्त महत्वाचे वाटते अशा माणसास प्रापंचिक असें समजतात. ज्याला परमेश्वर प्राप्ति महत्वाची वाटते त्याने परमेश्वराची अथवा ईश्वराची आराधना करावी व ज्याला सुख, समृद्धि अशा वास्तविक गोष्टी परमेश्वरापेक्षा जास्त महत्वाच्या वाटतात त्यांने देवतांची आराधना करावी असे साधारणपणे समजले जाते. ह्या ठिकाणी हे स्पष्टपणे दिसून येते किं, इतर धर्मांत माणसांने फक्त मोक्षार्थी असावे अशी अपेक्षा धरलेली असते व हिंदूंत मोक्षार्थी व प्रापंचिक अशा दोनही प्रकारच्या भक्तांचा विचार केलेला आहे असें दिसते. ब्राह्मणांच्या धर्मात सुद्धा माणूस फक्त मोक्षार्थी असावा अशी भूमिका आहे. सर्व हिंदू चार गोष्टी मानतात आणि जर मानत नसेल तर तो इसम हिंदू समजला जात नाही. त्या चार गोष्टी अशा, तो पुनर्जन्म मानतो, तो अद्वैत सिद्धांत मानतो, तो कर्मविपाकाचा सिद्धांत मानतो व तो शक्तिसातत्याचा सिद्धांत मानतो. ह्या चार मुलभूत सिद्धांताबद्दल अधिक माहिती आपण पुढे करून घेणार आहोत. बहुतेक हिंदू आज जन्माने हिंदू आहेत त्यांना कदाचित हे चार मुलभूत सिद्धांत माहीत नसतील तर ते त्याने समजून घ्यावेत म्हणजे तो त्याच्या हिंदू मान्यता विशेष जागरुकपणे आचरणात आणू शकेल. ह्या विवेचनातून हे स्पष्ट होते किं, देव मानणे अथवा न मानणे हिंदू ठरण्यासाठी आवश्यक नसते. वरील चार

सिद्धांत जो मानतो तो तत्त्वतः हिंदू असतो मग तो स्वताला हिंदू मानो अगर न मानो.

**६.** हिंदूंतील परमेश्वर व ईश्वर हे दोन प्रकार पाहिले, त्याशिवाय आणखीन दोन उपप्रकारसुद्धा हिंदू पुजतात ते, पितर व पिशाच्च असें आहेत. मनुस्मृतीत पितरांच्या पुजेचे महत्व स्वीकारलेले आढळते परंतु पिशाच्च पुजेचा विचार केलेला दिसत नाही. ह्यांचे कारण, पिशाच्च पुजा विशेष करून क्षत्रिय, वैश्य व शुद्र वर्णांतील माणसे करतात. मनुस्मृतीत केवळ ब्राह्मण वर्णाच्या लोकांचा विशेष करून विचार केलेला आहे. तसेंच वैदिक काळांत पितरांच्या पुजेत पिशाच्च पुजा गृहीत धरलेली होती. येथे आपण पाहतो किं, ही विविध दैवते एकाच योग्यतेची नाहीत, परमेश्वर सर्वोच्च योग्यतेचा असून पिशाच्च दैवते सर्वात खालच्या योग्यतेची आहेत. त्या प्रत्येकांचे विशेष अधिकार (सिद्धी) व मर्यादा निश्चित असतात. भाविकांने आपल्या लायकीच्या योग्यतेच्या देवतेची आराधना करावी अशी अपेक्षा असते. अदृष्य निसर्गातील देवता गणांची माहिती आपण नंतर पहाणार आहोत. इतर धर्मांत एकाच देवाची आराधना करण्याचा आग्रह असतो. परंतु, जर योग्यता नसेल तर त्या अतिउच्च देवाची (अल्लाह, गॉड, परमेश्वर) आराधना व्यर्थ जाते हे लक्षात घेतलेले दिसत नाही. फारच थोडे लोक सात्त्विक असतात, सर्वसाधारण माणूस रजो अथवा तमो अवस्थेतील असतो व त्यांने कितीही प्रार्थना त्या अतिउच्च देवाची केली तरी ती त्याच्यापर्यंत न पोहोचल्यामुळे ती प्रार्थना फुकट जाते. ह्याचा अर्थ हे धर्म सामान्य माणसांस मदत करीत नाहीत. हिंदूंमध्ये सर्व योग्यतेची दैवते उपासनासाठी उपलब्ध असल्याने तो सर्व योग्यतेच्या माणसांस उपयोगी ठरतो. ह्याकारणांने हिंदू विचार सामान्य माणसासाठी, इतर धर्मांपेक्षा जास्त हितकारक ठरतो.

**७.** शेवटी आपण ह्या चार प्रकारात येणार्या विविध देवतांची हल्ली माहीत असलेली नांवे उदाहरणा करतां पाहूया. वैदिक काळात जी नांवे प्रचलित होती ती आज प्रचारात नाहीत. ईश्वर वर्गात येणारी दैवते अशी, ब्रह्मदेव, सत्यनारायण, काली व तिची अनेक रुपे, शीव व त्याची अनेक रुपे, गणपती (विनायक), मारुती, अल्लाह आहेत. म्हणजे मोक्षार्थी हिंदूनी परमेश्वराच्या रुपांची किंवा ईश्वरांची आराधना करावी, असें गृहीत धरलेले आहे आणि प्रापंचिकांनी पितर व पिशाच्च प्रकारातील देव पुजावेत. पितर अगदी पहिला जन्मलेले व म्हणून प्रथम मेलेले. त्यांना आदिदैवते असेंसुद्धा म्हणतात. इतर धर्मांत एकच आदिमानव असल्याचा दावा (Adam) केला आहे परंतु, हिंदूंत अनेक पितर असल्याचा दावा केलेला आहे. पितर व पिशाच्च ह्यांतील फरक असा, पितर सर्व मनुष्य जातीचे पूर्वज आहेत तर पिशाच्च हल्लीच

जन्मून मेलेले लोक असतात. उदाहरणार्थ, सर्व भारतीयांचे पितर एकच असतात पण पूर्वज मात्र निरनिराळ्या माणसांचे निरनिराळे असतात. ह्या पितरांना दैविक शक्ती असतात व म्हणून त्यांची पुजा करण्याचा प्रघात हिंदूंत आहे. अघोर विचाराप्रमाणे पिशाच्च जसें जास्त जुने होते तसें त्यांना दैविक अथवा दानवी (सैतानी) सामर्थ्य प्राप्त होत असते. तूर्त आपण फक्त दैविक शक्तिचा विचार करत आहोत पण दानवी शक्तिचा विचार केल्याशिवाय कोणत्याही धर्मांचा अभ्यास पूर्ण होत नसतो. प्रत्येक धर्मात दैवी व दानवी (आसुरी) शक्तिंचे संतुलन कसे राखावयाचे त्याबद्दलचे मार्गदर्शन असते. मनुष्याला त्याचे जीवन सुखी करण्यासाठी ह्या दोनही शक्ति निरनिराळ्या प्रकारे सहाय्य अथवा विरोध करीत असतात. गीतेत सोळाव्या भागात दैवी व आसुरी संपदाची चर्चा केलेली आहे.

वैदिक काळातील पितरांची नांवे वेगळी आहेत येथे कलियुगातील नांवे दिली आहेत. पितर वर्गात येणारी दैवते अशी, राम, कृष्ण, दत्त, नवनाथ, पांडुरंग, महावीर, गौतम बुद्ध, साईबाबा, अक्कलकोट बाबा, यक्षिणींची अनेक रुपे, येशुदेव, मुसादेव, मोहम्मद, अलि, अजमेर चीस्ती, हाजी मलंग, गजानन महाराज व तत्सम अनेक अवतारी व इतर साधुपुरुष आहेत. अल्लाहचे अनेक गण आहेत त्यांना देवदूत म्हणतात ते सुद्धा पितरांत गणले जातात. ह्याचा अर्थ संसारी हिंदूंनी ह्यांची आराधना करावी असें गृहीत धरलेले आहे. त्यातसुद्धा कांहीं पितर देव विशेषकरून संन्याशांसाठी पुजनासाठी योग्य समजली जातात ती, दत्त, नवनाथ, पांडुरंग, अक्कलकोट बाबा, मोहम्मद अशी आहेत. म्हणजे प्रापंचिकांनी त्यांची आराधना करू नये कारण, तसें केल्यांने तो प्रापंचिक त्याच्या संसारी जीवनांत अनेकविध सतत येणार्या अडचणींमुळे त्रासून जातो व अखेरीस संन्यासाकडे वळतो. मोक्षार्थीने राम, कृष्ण, गौतम बुद्ध, महावीर, अल्लाह हे पुजावेत. केवळ प्रपंचात रमण्याची इच्छा असणार्यांनी संतोषी देवी, महालक्ष्मी, अशी कालीची अनेक रुप, साईबाबा, यक्षिणी व तिची अनेक रुपें, येशुदेव, मुसादेव, अलि, अजमेर चिस्ती, हाजी मलंग, गजानन महाराज, अल्लाहचे देवदूत (Angel) वगैरे पुजावेत. याचकांनी एक पितर पुजतांना इतर पितर व पिशाच्च देवांची जरी पुजा नाही केली तरी अनादर मात्र करू नये असा संकेत आहे. प्रापंचिक प्रश्नांसाठी सामान्य भाविकांने ईश्वराकडे याचना केली तर ओघांने त्यांचे देवदूत मदत करावयांस येतील अशी अपेक्षा करणे अयोग्य असते. त्यासाठी याचकांने, "तुझ्या देवदूतांस मला मदत करावयांस सांग", अशी प्रार्थना करावयाची असते, जर तसें केले नाही तर बहुधा ती प्रार्थना वाया जाते.

८. वेदांत दिलेल्या माहितीनुसार ब्रह्माने सात ऋषी कल्पनेने उत्पन्न केले त्यांना सप्तऋषी असें म्हणतात. त्या सप्तऋषींनी अनेक दुसर्या पातळीचे ऋषी त्यांच्या कल्पनेने उत्पन्न केले, हे ऋषी सुरुवातीचे पितर

असें मानले जाते. कल्पनेने त्यांना उत्पन्न केले म्हणून त्यांना मानस पुत्र असें समजले जाते. असें समजतात किं, ह्या अनेक दुसर्या पातळीतील ऋषींनी पृथ्वीवरील सर्व मानव वंशांला उत्पन्न केले आहे. ब्रह्माने ह्या ऋषींना कांहीं विशेष सिद्धी (अधिकार) दिल्या त्यांच्या द्वारा ते ही सृष्टी चालवू शकतात. आणि म्हणून ते माणसासाठी पुजनीय ठरले. त्या ऋषींना व विशेष सिद्धी असणार्या सर्वच अदृष्य शक्तिंना आपण दैवते असे समजतो. दुसर्या पातळीचे ऋषी देहधारी होते व त्यानंतर सर्व वाढ देहधारी मानवांची होत गेली. म्हणजे मायेची उत्पत्ति त्याच सुमारास झाली असें समजावे. वेदातील पितरांची नांवे आज प्रचारात नाहीत. आज आपण ज्या नांवांने त्यांना ओळखतो ती नांवे येथे वर दिली आहेत. ह्या ठिकाणी इतर धर्मांत पुजल्या जाणार्या पितरांची नांवेसुद्धा घातली आहेत कारण, हिंदू सर्वच पितरांची याचना करण्यास मोकळे आहेत. हिंदूंतील ब्राह्मण जातीचे लोक व त्यांच्या प्रभावाखालील हिंदू फक्त हिंदूस्थानातीलच पितर पुजतात. दुर्दैवाची गोष्ट अशी किं, ते भारताबाहेरील पितरांचा विनाकारण द्वेष करतात व इतरांना सुद्धा तसें करण्यास सांगतात. हे वागणे मुळ हिंदू विचारसरणीच्या विरुद्ध आहे. द्वेष हा एक षड्रीपु असल्याने अशा वागण्यामुळे त्याच्या प्रार्थना बहुधा व्यर्थ जातात, ते पापमय ठरतात. निरनिराळ्या दैवतांची तुलना करणे, त्यांच्या बद्दल द्वेष, संशय बाळगणे अशी वागणूक याचकांची असेल तर त्या याचकांस कोणतेही दैवत मदत करीत नाही हे नेहमी लक्षात ठेवावे.

**९.** पिशाच्च वर्गातील दैवते अशी, वेताळ, भैरव, म्हसोबा, मल्ल्हारी, खंडोबो, त्या माणसाचें पुर्वज, वास्तुदेव, ग्रामदेव, ब्रह्मराक्षस, ब्राह्मणदेव, विश्वदेव, समंध, देवचार, मुंजा, खविस, गिर्या, झोटींग इत्यादि, एकंदर भरकटणारी अनेक भुते ह्यांत येतात. हिंदूंतील तंत्र विज्ञानानुसार (मंत्रशास्त्र) संसारी हिंदूंनी ह्या पिशाच्चांची मनधरणी करावी ह्यांचे कारण ह्यांची मनधरणी करणे इतर देवताच्या आराधना करण्यापेक्षा कितीतरी सोपी व सहजसाध्य असतें. ईश्वर, पितर अशा दैवतांची पुजा करणारा सात्त्विक असावा लागतो ती अट पिशाच्च पुजेत नाही. अशा ह्या तीन प्रकारात मोडणार्या देवतांच्या पुजा करण्याचे फायदे व तोटे काय ते आपण नंतर पहाणार आहोत. हिंदूंतील अघोर तंत्रात विशेष करून पिशाच्च देवतांची आराधना कशी करावयाची ह्याची शिकवण दिली जाते. अघोर तंत्र हा हिंदू विचारांतील एक मोठा व अति महत्वाचा असा भाग आहे पण वैदिकतेचा वारसा सांगणारे ब्राह्मण त्या महान तंत्राचासुद्धा द्वेष करतात असे आढळते. त्या कारणांने ते अघोर तंत्राबद्दल अनेक चुकीच्या गोष्टी, खोटी माहिती असणारी पुस्तके लिहून पसरवतात. अशारितीने अघोर पंथाला ते नाहक बदनाम करीत असतात. पिशाच्च साधना करणार्यांनी मात्र एक गोष्ट चांगली ध्यानात ठेवावयाची असतें किं, ही सर्व पिशाच्च स्वतः असंतुष्ट

अवस्थेत असतात त्यामुळे त्यांच्या मदतीने मिळालेले सुख-समाधान चिरकाल टिकणारे नसतें. पितर देव संतुष्ट अवस्थेत असतात म्हणून त्यांच्या मदतीने मिळणारे सुख-समाधान चिरकाल टिकणारे असू शकते. आणखीन कांहीं गोष्टी सांगावयाच्या त्या अशा, एका पितरांस याचना केली तर ती सर्वच पितरांना केल्यासारखे असते परंतु, एका पिशाच्च्यास याचना केली तर ती फक्त त्याच पिशाच्चापुरती असते. ह्यासाठी जेव्हां याचना करण्यासाठी पितर निवडावयाचा तेव्हां तो असा निवडांवा किं, ज्याची आराधना करतांना नेहमी आनंद वाटेल. त्याच प्रमाणें अधून मधून इतर पितरांनासुद्धा अर्ध्य द्यावे. अर्ध्य देण्याची सोपी पद्धत अशी, शुचिर्भूत होऊन व शुचिर्भूत अशा जागी उभे राहून एका कलशात शुद्ध पाणी घेऊन तो कलश दोनही हातात धरून सावकाशपणे ते पाणी उंचावरून जमिनीवर सोडावे. पाणी सोडतांना एकेका पितराचे नांव आदरपूर्वकपणे घेऊन मग म्हणावें, "माझ्यावर तुम्ही कृपादृष्टी ठेवावी". उदाहरणार्थ, समजा तुम्ही रामास प्रमुख आराध्य दैवत म्हणून स्वीकारले आहे अशा परिस्थितीत इतर पितरांसाठी महिन्यातून एकदा (शुक्ल त्रयोदशीचा दिवस उत्तम असतो) वर दिलेला अर्ध्य विधी करावा. त्यात इतर म्हणजे ज्यांना आराध्य देवतेचा मान नाही अशांची एकेक करून नांवे घेऊन अर्ध्य करावे. उदाहरणार्थ, म्हणावें, मुसादेवा, माझ्यावर तुम्ही कृपादृष्टी ठेवावी, कृष्णदेवा, माझ्यावर तुम्ही कृपादृष्टी ठेवावी, येशुदेवा, माझ्यावर तुम्ही कृपादृष्टी ठेवावी, अहो अल्लाह माझ्यावर तुम्ही कृपादृष्टी ठेवावी, अशा प्रकारे सर्व इतर पितरांना विनंती करावी. म्हणजे उत्तम प्रतिसाद सर्व पितरांकडून मिळून हिंदू माणसाची कार्यसिद्धी निश्चत होईल. खर्या हिंदूंस हे करणे शक्य आहे पण हिंदूंतील ब्राह्मणांना व त्यांच्या प्रभावाखाली असलेल्यांना मात्र, हे करणे सहज नाही कारण ते भारताबाहेरील इतर पितरांचा द्वेष करतांत. शक्य असल्यास अर्ध्य दिल्यानंतर त्यांना प्रसाद द्यावा. तो खिरीचा असावा. आराध्य दैवत व इतर सर्व पितर अशा सर्वांसाठी एक एक पिंड (घास) तयार करून त्यातील आराध्य दैवताचा स्वतः खावा व इतर पितरांचा कावळ्याला द्यावा. हिंदूंमध्ये निरनिराळ्या समाजांत वेगवेगळ्या पद्धतीने पितरांना नैवेद्य (प्रसाद) दिला जातो. एका पद्धतीत, नैवेद्याचे पिंड खाऊ शकणार्या फार लहान बालकांस भरवला जातो. त्याचे कारण असें सांगतात किं, असा बालक एकाद्या पवित्र आध्यात्मिक साधकापेक्षाही जास्त पवित्र असतो. असें बालक नंतर त्याच्या सभोवारच्या संस्कारामुळे बिघडत जाते त्याकारणांने नंतर तो सामान्य माणसात रुपांतरीत होतो. अशारितीने पितरांस पिंडदान केले तर ते अतिप्रसंन्न होतात असें समजले जाते. अशा लहान बालकाची हरप्रकारे सेवा करणे हे प्रत्यक्ष परमेश्वराची सेवा करण्या सारखे असते. कांहीं सांगतात किं, इतर पितरांचे घास (पिंड) कावळ्याला द्यावयाचा असतो कारण, कावळा हा गेल्या जन्मीचा ब्राह्मण असतो. कांहीं हिंदू गाईला देतात. कांहीं गरीब माणसांस देणे योग्य समजतात.

अशा विविध परंपरा हिंदूंत आढळून येतात. अशा सर्व परंपरा सारख्याच योग्यतेच्या आहेत असें मानले जाते. ह्या सर्वांत, पितरांच्या नांवाने देणे हे महत्वाचे असते बाकीच्या गोष्टी दुय्यम असतात.

**१०.** निरनिराळ्या देवतांना जे नैवेद्य दिले जातात ते खाण्याबद्दल कांहीं संकेत आहेत ते असें, परमेश्वर व पितर ह्याना दिलेला नैवेद्य-प्रसाद यजमानाने आणि कोण्या योग्य व्यक्तिस खाण्यास द्यावा. पिशाच्चांना दिलेला नैवेद्य मात्र दहाही (दहा दिशा अशा, पूर्व, ईशान्य, उत्तर, वायव्य, पश्चिम, नैऋत्य, दक्षिण, आग्नेय, वर, खाली) दिशांना थोडाथोडा फेकून द्यावयाचा असतो. भरकटणार्या भुतांस दिलेला नैवेद्य चार रस्त्यांच्या मधोमध ठेवावयाचा असतो अथवा उकीरड्यावर ठेवावयाचा असतो. ह्याचे मोठे शास्त्र असून तो विषय ह्या लेखाच्या आवाक्या बाहेरचा आहे म्हणून त्यावर जास्त लिहीत नाही.

**११.** इतर धर्म व हिंदू मान्यता ह्यांतील फरकाची कारणे काय ते पहावे लागेल. ह्या ठिकाणी इतर धर्मांत प्रामुख्याने ख्रिस्ती धर्म व इस्लाम ह्यांचाच विचार केलेला आहे कारण, त्यांच्याच अनुयायांना बहुतेक करून आपल्याला सामोरी जावे लागते. इतर धर्मांत परमेश्वरा कडे थेट विनवणी (त्याचे प्रापंचिक प्रश्न सोडविण्यासाठी) करण्याची प्रथा असतें. हिंदूंत तसें नसते कारण असें समजले जाते किं, अशारितीने माणसांचे संसारातील काम होण्यास विलंब लागतो. परस्पर संबंधित देवाकडे याचना करण्यामुळे माणसाचे काम तुलनेने लवकर होत असतें. त्यातसुद्धा त्या कामे होण्याच्या विलंबात निरनिराळ्या प्रकारच्या देवतांत फरक असतो. तो असा, परमेश्वराला याचना केली किं ती तो पहात नाही तर ती विनंती त्या याचनेशी संबंधित प्रमुख देवतेकडे पाठवली जाते. तेथून ती याचना त्या खालील देवतेकडे व तेथून आणखीन खाली अशारितीने शेवटी प्रत्यक्ष संबंधित देवतेकडे येते व नंतर ती विनंती योग्य आहे कीं नाही त्याचा विचार होतो व जर योग्य आहे असें असेल तर ती मान्य होते. याचनेची यथायोग्यता ती याचना करणार्याच्या अध्यात्मिक योग्यतेनुसार ठरवली जाते. ह्या लांबवणार्या प्रक्रीयेमुळे परमेश्वराकडे केलेला अर्ज मंजूर होण्यास नेहमीच फार वेळ लागत असतो. त्याशिवाय परमेश्वराकडे अर्जी करण्यासाठी याचकाला त्या योग्यतेचे असावे लागते. जर तो त्या उच्च अध्यात्मिक अवस्थेचा नसेल तर त्याच्या प्रार्थनेची (अर्जाची) साधी दखलसुद्धा घेतली जात नाही. ही अडचण पितरांच्या अथवा पिशाच्चांच्या बाबत नसते. हे सर्व आपल्या हिंदू पूर्वजांना समजले होते व म्हणून त्यांनी परमेश्वराच्या प्रार्थनेहून जास्त महत्व पितर व पिशाच्च ह्यांच्या पुजनांकडे दिले असावें. कारण, साधारण माणूस तितक्या उच्च पातळीचा असूंच शकत नाही. म्हणजे ह्याचा अर्थ असा होतो किं, अध्यात्मिक लायकी नसलेल्या

माणसांने परमेश्वराची अथवा ईश्वराची याचना केली तर ती बहुतेक करून फुकट जाते. अशा कारणांनी इतर धर्मातील लोकांच्या बर्याच याचना व्यर्थ जातात व हिंदूंच्या याचना योग्य पातळीच्या देवतेकडे असतील तर फुकट जात नाही. ह्यावर तोडगा म्हणून पुरोहितांनी याचकासाठी त्याचा प्रतिनिधी बनून देवतेकडे याचना करण्याचा धंदा सुरू केला व तो आज चांगल्यापैकी चालत असल्याचे दिसते. ह्या तोडग्याच्या प्रभावामुळे ब्राह्मण पुरोहितांनी सामान्य हिंदूंचा ताबा घेतला. येथे प्रश्न असे येतात, काय हे पुरोहित खरोखरच आध्यात्मिक दृष्ट्या श्रेष्ठ असतात कां? अशा दलालाने केलेली अर्जी देवता खरोखरच स्वीकारतात कां? हे प्रश्न जरी अजून अनुत्तरित असले तरीसुद्धा, हा धंदा सर्वच धर्मांत तेजीत चालतोय.

ईश्वरा खालील म्हणजे पितर वर्गातील देवतेकडे याचना केली तर तुलनेने त्याहून बराच कमी काळ लागतो. त्याही पेक्षा खालील म्हणजे पिशाच्च वर्गातील देवांकडे याचना केली तर वेगळ्या पद्धतीने याचनेची दखल घेतली जाते. आपण ज्याला लाच देऊन काम करणे (ह्याला आपण अध्यात्मिक भ्रष्टाचार) असें म्हणतो त्या प्रकारे ह्या देवता काम करतात. म्हणजे फारच लवकर काम होते. परंतु, त्यासाठी प्रसंगी याचना करणार्याला त्याची भारी किंमत सुद्धा मोजावी लागते. ईश्वर वर्गातील काली, गणपती, अल्लाह व मारुती ह्या देवता पितर वर्गातील देवतांप्रमाणे कामे लवकर करतात पण इतर मात्र फारच जास्त वेळ घेतात व बर्याच वेळा असा अनुभव येतो किं, काम होतच नाही. ह्यांचे कारण असें सांगितले जातें किं, त्या देवता संसारी प्रश्न विचारण्यासाठी नसतात. म्हणजे हे असे होते किं, जर चुकीच्या विभागाकडे आपण आपला अर्ज पाठवला तर तो अर्ज बाद ठरतो असेंच कांहींसे होत असते. काली, गणपती, अल्लाह व मारुती हे अध्यात्मिक लायकी नसलेल्यालासुद्धा ऐकतात ह्यांचे कारण असें किं, त्यांच्याकडे असंख्य गण (त्यांचे सहाय्यक देवदूत वगैरे) असतात व ते गण, जे कांहीं पितर योग्यतेचे व कांहीं पिशाच्च योग्यतेचे असतात, भक्ताला मदत करतात. असा समज आहे किं, हे गण वस्तुतः शीवाचे आहेत परंतु त्यांचे व्यवस्थापन काली, गणपती, अल्लाह व मारुती करीत असतात, म्हणूनच त्याला गणपती असें नांव आहे. पितर पातळीतील गणपतीची नांवे वेगळी आहेत. विघ्नहर्ता, सिद्धिविनायक, अरिहंत अशी नांवे पितर पातळीची आहेत. कालीची सुद्धा अनेक नांवे असून ती कुलदैवते म्हणून ओळखली जातात. गणपतीची पिशाच्च पातळीची नांवे आहेत, वक्रतुंड, गजानन, एकदंत इत्यादि. म्हणजे ह्या देवतेची आराधना करतांना तिच्या कोणत्या रुपाची आराधना करावयची ते ठरवून त्या नांवाने बोलवून मगच आराधना केली तर ती फळणे जास्त शक्य होते. ह्यासाठी हि सर्व नांवे असलेली आरती त्या देवापुढे गायली जाते म्हणजे कांहीं राहून जाऊ नये. हिंदूंत सर्वच पितर व

पिशाच्चांकडे आराधना करता येते ही सोय इतर धर्मांत नाही म्हणून हिंदू असणे नेहमीच जास्त फायद्याचे ठरते. इतर धर्माच्या लोकांना एकाच देवाची पुजा करण्याचे बंधन असल्यामुळे ते नेहमीच तोट्यात असतात. फक्त हे त्यांना कधीच समजत नाही. आणखीन एक संकेत आहे तो असा किं, याचक जर स्वतःसाठी याचना, नवस करील तर तो पूर्ण होण्यास विलंब लागतो पण जर तो इतरासाठी याचना, नवस करील तर ते लवकर फळतात. म्हणून एकमेकांसाठी याचना, नवस करणे जास्त चांगले समजले जाते. म्हणजे ते असें, तू माझ्यासाठी प्रार्थना करावी व मी तुझ्यासाठी करावी, ह्यारीतीने याचना केली तर तिची दखल लवकर घेतली जाते असा अनुभव आहे. ह्या पाठील कारण असे आहे किं, हे जग अद्वैत तत्त्वानुसार काम करीत असते. अद्वैत म्हणजे, तू व मी दोन नसून एकच आहोत. दुसर्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, ह्या विश्वाचा उगम स्त्रोत एकच आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, जर तुम्ही एकाद्याचे चांगले व्हावे अशी याचना केली तर त्याचा अर्थ असा होतो किं, तुम्ही स्वताचे चांगले व्हावे अशी याचना केली आहे. त्याच प्रमाणे, जर तुम्ही दुसर्याचे वाईट व्हावे अशी याचना केली तर त्याचा अर्थ तुम्ही स्वताचे वाईट व्हावे अशी याचना केली असा होतो. म्हणून, देवतांकडे करण्याची एकच प्रार्थना दिली आहे ती अशी,

सर्वे (सज्जन) सुखिनासंतु, सर्वे (सज्जन) भद्राणि पश्यंतू, न कश्चित् (सज्जन) दुःखमाप्नुयात् ।
म्हणजे, सर्व सुखी होवोत, सर्वांचे भले होवो, कोणालाही दुःख न मिळो, अशी हि प्रार्थना आहे. आपल्याबरोबर इतरांचेसुद्धा हित इच्छावे कारण जग अद्वैतात आहे. खर्या हिंदूंनी देवतेकडे जे मागायचे ते मागितल्या नंतर शेवटी ही वर दिलेली प्रार्थना करावी, हे नेहमी चांगले लक्षात ठेवावे. येथे मी सज्जन हा शब्द मूळ वचनात घातला आहे कारण जर दुर्जनांचे भले झाले तर अनर्थ होईल.

**१२.** हा विषय समजण्यासाठी एक उदाहरण एका मोठ्या उद्योगाचे घेऊया. मोठ्या उद्योगात मुख्य मालकाच्या हाताखाली अनेक अधिकारी असतात. त्यांच्या हाताखाली आणखीन बरेच उपअधिकारी असतात व शेवटी कामगार असतो. समजा, एका कामगाराला कांहीं याचना करावयाची आहे. तर तो एकतर थेट मालकाला अर्ज करू शकतो किंवा त्याच्या ताबडतोब वरच्या अधिकार्याला अर्ज करू शकतो. त्यापैकीं कोणत्या अर्जाची लवकर दखल घेतली जाईल त्यानुसार त्याचे काम होणार असते. मालकाला पाठवलेला अर्ज शेवटी त्या कामगाराच्या ताबडतोब वरच्याच अधिकार्याकडेच जाणार असतो व त्यामुळे असा अर्ज जास्त वेळ घेईल हे उघडच आहे. त्यासाठी ताबडतोब वरच्या अधिकार्याकडे अर्ज करणे हेंच श्रेयस्कर ठरते. अगदी असेंच देवाकडे केल्या जाणार्या याचनेचे असते. परमेश्वराकडे केलेली

याचना, आराधना तडीस जाण्यासाठी बराच काळ लागतो हे जसें आपल्या पूर्वजांना समजले तसें त्यांनी पितर देवांकडे याचना करणे जास्त चांगले असे समजून थेट पितरांना विनवणी करण्याचे धोरण प्रचारात आणले व त्यामुळे पितर पुजा हिंदूंत प्रचलित झाली. कार्यालयाच्या कामांत एक अर्ज वरील अधिकार्याकडे करतांना त्याची एक प्रत मालकाकडे पाठवली जाते, अगदी त्याच प्रमाणे पितरांची आराधना करतांना त्यात शेवटी ईश्वराची आरती करावयाची असते. हिंदूंच्या पुजापद्धतीत हे दिसून येते. पितरांचे वेळोवेळी श्राद्ध (श्राद्ध म्हणजे श्रद्धा व्यक्त करण्याची पद्धती, विधी) करण्याची प्रथा त्यामुळे सुरू झाली. ह्या श्राद्धविधीतून पुढे आजची पुजा करण्याची प्रथा तयार झाली. सर्वच धर्मांत श्राद्ध, त्यांच्या त्यांच्या पद्धतीने केले जात असते.

**१३.** परमेश्वराची अथवा ईश्वराची आराधना करण्याची योग्यता प्राप्त होण्यासाठी माणसाने काय केले पाहिजे ते आता पहावयाचे आहे. परमेश्वराची अथवा ईश्वराची आराधना करण्यासाठी याचकाला मनांने व शरीरांने शुद्ध व्हावे लागते. त्यासाठी त्या माणसात पूर्ण सात्त्विक प्रवृत्ति असावी लागते. म्हणूनच मुसलमानांत हाज करण्यास जाणार्याला अनेक नियमांचे पालन आयुष्यभर करावे लागते कारण, तो मक्केला हाज करतो म्हणजे अल्लाहला म्हणजे परमेश्वराला अथवा ईश्वराला भेटण्यास जात असतो. ते नियम असें आहेत, खोटे न बोलणे, प्रामाणिकपणा, कोणालाही त्रास न देणे, ब्रह्मचर्य पाळणे, विवाहीतांने बायकोच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर दबाव न आणणे, मनांने कोणाचेही वाईट न चिंतणे, दया, सहानुभूती, खादाडपणा न करणे, वाईट काम करणार्यास मदत न करणे तसेंच शक्य असल्यास विरोध करणे इत्यादि नियमांचे पालन करावे लागते तसेंच तो सतत परमेश्वराचे चिंतन करील. मुसलमान अल्लाहला परमेश्वर मानतात पण हिंदूंच्या दैवतांच्या रचनेनुसार तो पितरसुद्धा आहे. म्हणून धर्म हिंदू असो अथवा इस्लाम असो, परमेश्वराची अथवा ईश्वराची आराधना करण्याची पूर्व अट एकच असते हे लक्षात घ्यावे लागेल. ह्या विवेचनाने हे स्पष्ट होते किं, धर्म कोणताही असो, परमेश्वराची अथवा ईश्वराची आराधना करण्यासाठी त्याला मनांने व शरीराने शुचिर्भूत असावे लागते एरवी ती आराधना व्यर्थ ठरते. शरीराच्या शुद्धतेबाबत विवेचन ह्या पुस्तकात पुढे दिले आहे. मनुस्मृतीत भोग इंद्रियांचे संयमन करावयास सांगितले आहे. पितरांची आराधना करणार्यांस जरा कमी अटी आहेत त्या अशा, प्रामाणिकपणा, कोणालाही त्रास न देणे, मनांने कोणाचेही वाईट न चिंतणे, भूतदया, सहानुभूती, ह्याचा अर्थ असा होतो किं, परमेश्वराला याचना करणारा पूर्णतया सात्त्विक असावा लागतो पण पितरांना याचना करणारा रजोगुणी असला तरी चालते. पिशाच्चांकडे याचना करणारा तामसी (वरीलपैकी कोणतेही नियम न पाळणारा) असला तरी

चालते. ह्यावरून हे लक्षात येईल किं, सत्त्व, रजस व तमस अशा तिनही प्रकारच्या माणसांस सहाय्य करण्याची व्यवस्था हिंदूंत आहे तशी व्यवस्था इतर धर्मांत नाही. इतर धर्मांत याचक मनांने शुचिर्भूत आहे असें गृहीत धरलेले असते. परंतु, वस्तुतः ते तसें नसतात, त्यामुळे त्यांच्या प्रार्थना बहुधा व्यर्थ जातात. हिंदूंत आणखीन एक देवांचा प्रकार पुजला जातो जो कोठल्याच इतर धर्मांत साधा विचारातसुद्धा घेतला जात नाही तो आहे, मानवी दैवते. मानवी दैवतांत आई, पिता, गुरु अथवा जीवंत असलेले सत्पुरुष ही प्रमुख असतात त्याशिवाय आज मालक, संबंधित शासकीय अधिकारी येतात. आपली संसारी कामे ज्याच्या मदतीने होऊ शकतात अशा कोणालाही देव मानण्यास साधारण हिंदू तयार असतो असा अनुभव आहे. इतर धर्मांत असें समजण्यास सुद्धा मनाई असते. मानवी दैवताची पुजा त्याना संतुष्ट करणारी असावी लागते. येथे सर्वच हिंदूंसाठी परमेश्वर म्हणजे स्वयंभू आणि ईश्वर म्हणजे त्रिमूर्ती (ब्रह्मा, विष्णू, महेश) असे समजावे. त्यानंतर असंख्य देवता येतात. शाक्तात त्रिमूर्ती ऐवजी महेश्वरी तिच्या असंख्य नांवानी असते.

## २. देवांच्या अस्तित्वा बाबत –

**१४.** वरील विवेचन करतांना एक गोष्ट आपण गृहीत धरली आहे ती ही किं, देव म्हणून कांहींतरी अस्तित्वांत आहे. आता आपण देवाच्या अस्तित्वा बद्दल काय समज आहेत ते पहावयाचे आहे.

इस्लाम मध्ये ह्यावर प्रश्न विचारणे हेंच पाप सांगितले आहे व त्याप्रकारे त्यावर बोलण्यास बंदी घातलेली आहे. ख्रिस्तांत व ज्यु (यहुदी) धर्मात ह्यावर थोडीफार चर्चा अधुनमधून होत असते पण कॅथोलिक पंथातसुद्धा ह्या विषयावर चर्चा करण्यास बंदी आहे. हिंदूंत मात्र ह्या विषयावर मोकळ्या मनांने चर्चा करण्यास कोणतीही आडकाठी नसते. ह्याचा अर्थ इतर धर्मांत विचार स्वातंत्र्य नाही. पाश्चात्य देशातील विद्वान त्यासाठी ख्रिस्ती अथवा यहुदी धर्माचे पालन न करतां स्वतःला अनिश्वरवादी (Atheist) म्हणवून घेतात. कारण जर त्यानी तसें स्वतःला जाहिर केले नाही तर ते त्या धर्माच्या श्रेष्ठींकडून बहिष्कृत ठरून त्या समाजाकडून त्यांना त्रास होऊ शकतो. प्रसंगी त्यांना ठार मारले जाण्याची शक्यता असते. असें अनेक ईस्लामी विचारवंत ह्याकारणांनी मारले गेले आहेत व आजही मारले जात आहेत आणि उद्याही मारले जाणार आहेत. आपल्याकडील अनिश्वरवादी (अश्रद्ध) जेव्हां मला भेटले तेव्हां मी त्यांना विचारले किं, ते कोणत्या देवांबद्दल बोलतात, जेव्हां तुम्ही देव मानत नाही असें सांगता? ते बोलले, आकाशातील व्यक्तीस्वरुप देव ही कल्पना त्यांना पटत नाही. हिंदूंतील देव आकाशातील व्यक्तीस्वरुप नसून निसर्गरुपी आहे, तोसुद्धा तुम्हाला पटत नाही कां? त्यावर ते निसर्गरुपी देवाच्या अभिव्यक्तीस

स्वीकारतात असें म्हणाले.
विश्वाचा विचार करतांना मनुस्मृतीत परमेश्वराच्याही अगोदरचा म्हणून स्वयंभु मानला आहे व त्यांने त्याच्या विचारांनी ही सृष्टी उत्पन्न केली असें मानले आहे. असें असले तरी त्याची रचना कशी आहे ते जर नीटपणे पाहिले तर बर्याच गोष्टी अधिक स्पष्ट होतात म्हणून ती माहिती आता पाहुया.

**१५.** वेदांत व नंतर विकसित झालेल्या शाक्त प्रणालितील मार्ग विचारांना जेव्हा आपण पहातो तेव्हां असें दिसते किं, आपल्या पूर्वजांनी निसर्ग हींच परमेश्वराची अभिव्यक्ती आहे असें मानले आहे. निसर्गाच्या अभ्यासानें परमेश्वराच्या गुणांची माहिती समजून घेता येते. निसर्ग आहे कां? असा सवाल कोणी विचारणार नाही कारण असा सवाल उत्पन्न होत नाही, निसर्गाचे अस्तित्व निःसंशय आहे हे कोणीही मान्य करतो. ह्या युक्तिवादांने परमेश्वराच्या अस्तित्वांबद्दल कोणताही वाद हिंदूंमध्ये उरत नाही. आता प्रश्न येतो तो परमेश्वराच्या स्वभावाबद्दलचा. सर्वच धर्मातील पुरोहित, ह्यांत ब्राह्मणधर्माचे पुरोहितसुद्धा आले, परमेश्वर दयाळू, क्षमाशिल, कृपाळु असा असल्याचा निर्वाळा देतात पण जर निसर्ग हेंच परमेश्वराचे वास्तविक रुप आहे असे एकदा मान्य केले तर निसर्गाच्या स्वभावावरून परमेश्वराचा स्वभाव समजून घेता येईल हेही मान्य करावे लागेल ह्यांत कोणाला शंका वाटायचे कारण नसावे. आता प्रश्न असा किं, निसर्ग दयाळू, क्षमाशिल, कृपाळु असा खरोखरीच आहे काय? दुर्दैवाने असे समजते किं, निसर्ग तसा नसतो. तो अनेक शास्त्रांच्या नियमांने शिस्तबद्ध, कठोर असतो पण जर त्याच्या नियमांचे पालन काटेकोरपणे केले तर तो पावतो (म्हणजे बक्षिस देतो) व न पाळले तर पावत नाही अथवा शिक्षा करतो. म्हणजे मधील अवस्था, क्षमा करणे ही, निसर्गाला मान्य नाही. ते असें, समजा तुम्ही विमान उडवले पण विमानविद्येचे नियम पाळले नाहीत तर तुमचे विमान उडणार नाही, ते कोसळेल. मग तुम्ही कितीही प्रार्थना करा, पुजा करा, उपास तापास करा त्याचा कांहींही उपयोग होणार नाही. अनेक उदाहरणांनी हे वेळोवेळी दिसून येते. मग असा प्रश्न उत्पन्न होतो किं, हा जो प्रचार केला आहे किं, परमेश्वर दयाळू, क्षमाशिल, कृपाळु आहे तो कोणी केला व कां केला? असें देवांबद्दल खोटे सांगण्यामागील उद्देश कोणता?

**१६.** जेव्हा ह्याचा तपास केला जातो तेव्हां असे दिसून येते किं, सर्व धर्मांचे आणखीन एक रुप असते. त्या रुपाला आपण पुरोहितांचा धर्म असे नांव देऊया. म्हणजे खरा हिंदूधर्म व पुरोहितांनी प्रचार केलेला ब्राह्मणी हिंदूधर्म अशी हिंदूधर्माची दोन रुपे दृष्टोत्पत्तिस येतात. तेंच इस्लाम व ख्रिस्ती धर्माबाबत असल्याचे आढळते. असें सांगण्याचे कारण परमेश्वर दयाळू, क्षमाशिल, कृपाळु आहे असा प्रचार त्या त्या

धर्माचे पुरोहित करीत असतात. अशारितीने हे पुरोहित लोक, भक्तांची दिशाभुल कां करतात? हे समजले पाहिजे. ते समजण्यासाठी आपल्याला ह्या पुरोहित वर्गाच्या लोकांच्या कामाचा अभ्यास करावा लागेल. त्यासाठी हा पुरोहित वर्ग एकाद्या धर्मांत कसा तयार होतो ते पहावे लागेल. इस्लामच्या प्रेषीतांनेसुद्धा असे सांगितले आहे किं, अल्लाह क्षमाशिल आहे. म्हणजे इस्लामचा देव निसर्ग नाही तर दुसरा कोणी आहे. अल्लाहाला सिद्ध कसें करणार? त्यामुळे इस्लाम मधील देवाची संकल्पना केवळ काल्पनिक आहे व त्याच्या भरवशावर रहाणे योग्य नाही. कदाचित् इस्लामचा प्रेषीत त्याच्या काल्पनिक देवाचा प्रचार करत होता कारण, तो एक पुरोहित (हनिफ) होता, असें नाईलाजाने म्हणावे लागते.

**१७.** माणसाला कांहीं अडले का तो मदतीसाठी अज्ञात शक्तीकडे आळवणी करतो. त्यावेळी ती अज्ञात शक्ति खरोखरच अस्तित्वात आहे कां नाही ह्याचा विचार करण्याच्या मनस्थितीत तो नसतो. त्यातूनच खरे तर देवाची संकल्पना विकसित झाली. पुरोहितांच्या धर्मातील देव व हा काल्पनिक देव ह्यांत बरेच साम्य असते. माणसाच्या कल्पनेतून हा देव निर्माण झालेला असल्याने तो माणसाच्या सोईनुसार असतो. म्हणजे असा देव माणसांने कांहींही गैरकृत्य केले तरी तो देव माणसाला क्षमा करतो असे समजले जाते. ह्याचा अर्थ, देवाच्या दोन संकल्पना समाजात प्रचलित असतात. एक विज्ञानाला मंजूर असलेला व वैदिक काळापासून प्रचलित असलेला निसर्गसिद्ध देव आणि हा माणसाच्या कल्पनेतून निर्माण झालेला ब्राह्मणी देव. माणसाच्या कल्पकतेतून आणखीन बर्याच गोष्टी उत्पन्न झालेल्या आहेत जसें, कायदा, शासन, विविध नियम इत्यादि, ह्यांना वास्तविक जगात अस्तित्व नसते पण माणसाच्या जीवनात मोठे महत्व असते. म्हणून आपण म्हणतो, कायदा मानला तर आहे, नाही तर नाही, शासन मानले तर आहे, नाही तर नाही, नियम मानले तर आहेत, नाही तर नाहीत, तसेंच हा काल्पनिक देवसुद्धा मानला तर आहे, नाही तर नाही! निसर्गसिद्ध दैवतांचे तसे नसते, तुम्ही माना अगर न माना ते आहेत व नेहमी असणार हा काल्पनिक देव व हिंदूंचा निसर्गसिद्ध देव ह्यातील फरक आहे. माणूस एका काल्पनिक विश्वात नेहमी वावरत असतो. वास्तविक विश्व आणि त्याचे काल्पनिक विश्व ह्यांचे संयोजन माणसाला करावे लागते.

**१८.** अगदी प्राचीन काळांपासून असें होत असल्याचे दिसून येते किं, बर्याच पितर व पिशाच्च देवता आणि अदृष्य निसर्गामधील देवता गणातील शक्ती, माणसा कडून कांहीं अपेक्षा करीत तो केव्हां अडचणीत येतो व आपण त्याला मदत करतो अशा प्रसंगाची वाट पहात असतात. कारण, ह्या देवतांना सुद्धा भक्तांची आवश्यकता असते. अशी अनेक उदाहरणे नोंदली गेली आहेत किं, ही दैवते माणसाला

दृष्टांत देऊन अमुक गोष्ट कर म्हणजे तुझे काम होईल असा सल्ला देतात. त्याप्रमाणे कामे झाल्यानंतर उतराई म्हणून तो उपकृत माणूस त्या देवतेला ठरलेला कांहीं प्रसाद देतो. अशा गोष्टी वेळोवेळी होत गेल्यामुळे त्या विषयाचा माणसांने विचार करण्यास सुरुवात केली असावी व त्यातूनच पुढे देव व त्याची आराधना करण्याच्या विविध रीती निर्माण झाल्या आणि त्यातून धर्म ही संकल्पना विकसित झाली. धर्म शब्दाचा एक अर्थ आहे कर्तव्य (दुसरा अर्थ, स्वभाव गुण). त्यातून देवांची आराधना करणे हेंच कर्तव्य असा अर्थ प्रचलित झाला असावा. अशाप्रकारची आराधना सकाम असते म्हणजे त्यात कांहीं मतलब असतो. एकप्रकारचा तो धंदा ठरतो. असें असले तरी माणूस ते करीत असतो. कारण, सामान्य माणूस निष्काम आराधना करू शकत नाही. सामान्य माणसाची भक्तिसुद्धा अशीच स्वार्थप्रेरीत असते. अशा भक्तिने परमेश्वर जरी मिळणार नसला तरी इतर दैवते मात्र प्रसन्न होत असतात असा अनुभव आहे. हिंदूंच्या बहुतेक प्रार्थना सकाम आराधना ह्या प्रकारात मोडतात. निष्काम आराधना फक्त मोक्षार्थी साधक करतात व त्याची विशेष चर्चा होत नाही.

**१९.** फार प्राचीन काळी कदाचित ही दैवते माणसाला प्रत्यक्ष दर्शन देत होती तो कदाचित सत्ययुगाचा काळ होता व त्यातून अनेक दंतकथा जगाच्या पाठीवरील सर्वच मानव समाजांत रुढ झाल्याचे आढळते. अघोर तंत्रात असें दिले आहे किं, आपल्याला जशी भुक लागते व आपण खाद्य पदार्थ खातो त्याप्रमाणे, ह्या विविध दैवतांनासुद्धा भुक लागते पण ती खाद्य पदार्थांची नसते तर ती असतें भक्तिची. माणसाची दैवताबद्दलची भक्ति हेंच त्यांचे खाद्य असतें. म्हणूनच अशी म्हण आहे, "देव भावाचा भुकेला". असें सांगतात कीं, देवाकडे दोन गोष्टी नाहीत व त्या तो माणसाकडून अपेक्षित असतो. एक आहे भक्ति व दुसरी आहे दानत (देण्याची इच्छा). त्यासाठी देवाला प्रसन्न करावयाचे असेल तर माणसांने देवाला भक्ति द्यावी व प्रसाद देऊन देण्याची दानत सिद्ध करावी. प्रसाद म्हणून जे भक्त देतो ते सर्व देवानेच उत्पन्न केलेले असते मग ते देवाचेच देवाला देण्यात काय हशिल? असा प्रश्न विचारला जातो. येथे देण्याची दानत देव पहात असतो असे समजले जाते. गीतेत भगवान श्रीकृष्ण सांगतात किं, त्याला फळ, फुल अथवा कांहींच नसेल तर पाणी देऊन पुजा करावी, ह्याचा अर्थ, काय दिले ते महत्वाचे नसते तर देण्याची दानत सिद्ध करणे महत्वाची असते.

**२०.** सुरुवातीच्या काळांत माणूस साधी याचना करीत होता पण कालांतराने त्यात दैवतांची स्तुती इत्यादि गोष्टींचा समावेश होत गेला. त्यामुळे ही याचना करण्याची पद्धत अधिक गुंतागुंतीची व व्यापक होत गेली. ही व्यापक व गुंतागुंतीची आराधना करणे सामान्य माणसांस जेव्हां जमेनासे झाले तेव्हां ती

गुंतागुंतीची पुजा करण्यासाठी त्यातील तज्ज्ञ आवश्यक झाले, आणि ते करणारा तज्ज्ञ असा पुरोहित वर्ग समाजात तयार झाला. हे असें पृथ्वीवरील सर्वच मानव समाजांत होत होते व त्यानुसार निरनिराळे धर्म व त्या त्या धर्मांचे पुरोहित तयार झाले. पौरोहित्य हा एक व्यवसाय म्हणून यथावकाश विकसित होत गेला. इतिहासात जर आपण पाहिले तर निरनिराळ्या समाजांत हे पुरोहित कशाप्रकारे आपले अधिराज्य स्थापून राहिले आहेत ते दिसते. ह्या पुरोहित लोकांने म्हणजे हल्लीच्या ब्राह्मण लोकांनी धर्माचा धंदा करून सर्व समाजावर स्वतःची सत्ता प्रस्थापित केली. वस्तुतः ह्या पुरोहितांनासुद्धा परमेश्वराची खरी माहिती नसतांना ते साध्याभोळ्या लोकांना आपल्या कल्पनेचा देव सांगून वेळ मारून नेत असतात. सामान्य माणूस सुद्धा कांहीसा भावुक असतो तसांच तो थोडा आळशीसुद्धा असतो, त्याला त्याचे काम व्हावे ह्याची घाई झालेली असते, त्याचा गैरफायदा ब्राह्मणांनी घेण्यास सुरुवात केली व देवाची पुजा करावयाची म्हणजे ती पुजार्याकडूनच झाली पाहिजे असें नियम करून त्या सामान्य माणसांस पुरते ताब्यात घेतले. हे सर्व आपण सगळे जाणून आहोतच. माणसाच्या जीवनांत अडीअडचणी येतच असतात त्यामुळे हा धर्माचा धंदा जगांतील सर्वच धर्मांत फोफावलेला दिसत आहे. त्याला हिंदू धर्म (कां ब्राह्मण धर्म) कसा अपवाद असणार?

देव दयाळु, कृपाळु, क्षमाशिल असतो, त्याला आळवणी करून आपली कामे करावीत असा अपप्रचार ह्या धंदेवाईक ब्राह्मणांनी त्यांचा धंदा चांगला चालावा म्हणून वाढवत नेलेला आपण पहातो आहोत. जर देव दयाळु, कृपाळु, क्षमाशिल नसून तो कठोर शिस्त पाळणारा व प्रसंगी शिक्षा करणारा आहे असें सांगितले तर आपला धंदा बंद होईल ह्या भितीपोटी हे धंदेवाईक पुजारी, लोकांना परमेश्वराची अथवा ईश्वराची चुकीची प्रतिमा दाखवत राहिले. येशुदेवांने मात्र त्याच्या शिकवणीत परमेश्वर शिक्षा करतो असें सांगितले होते पण ते त्या धर्माच्या पुरोहित वर्गाने दुर्लक्षून, देव माफ करतो, असा अपप्रचार करणे चालूच ठेवले हे कॅथोलिक पंथाच्या इतिहासाच्या अभ्यासात दिसून येते. ख्रिस्ती धर्मात येशुची शिकवणूक व चर्चची शिकवणूक ह्यातील फरक पहाता एकाद्या धर्माचा पुरोहितवर्ग त्या धर्माच्या मुळ शिकवणूकीत कसा ढवळाढवळ करतो व मुळ शिकवणूक कशी बाजूला करतो ते समजते. हेंच इस्लाम बाबतसुद्धा झाल्याचे आढळून येते. हिंदूतील ब्राह्मण त्याला अपवाद नाहीत. त्याबद्दलची चर्चा पुढे पहाणार आहोत.

**२१.** वैदिक हिंदू धर्माचा इतिहास पाहिला तर असें दिसते किं, ऋग्वेदाच्या काळात देवतांच्या (पितरांच्या) पुजा अगदी साध्या व सोप्या होत्या परंतु, पुढे शुक्ल यजुर्वेदाच्या काळात त्या बर्याच मोठ्या

व व्यापक झाल्याचे आढळते. विशेष करून याज्ञवल्क्याच्या काळात हे जास्त वाढल्याचे आढळते. याज्ञवल्क्याने यजुर्वेदातील शुक्ल हा भाग लिहीलेला आहे. ह्याचे कारण, त्या काळात पौरोहित्याचा धंदा फार मोठ्या प्रमाणात वाढला होता. तो एवढा वाढला होता किं, त्याला कर्मकांड (कर्मकांड हा शब्द यज्ञयागांबद्दलची तुच्छता दाखवणारी संज्ञा आहे) म्हणण्याची पाळी आली. दोन मिनीटांत उरकता येणार्या विधींचा पसारा ह्या ब्राह्मणांनी एवढा वाढवला किं, अशा पुजा दिवसभर होत राहिल्या. ह्याचे कारण उघड आहे, जेवढी मोठी पुजा तेवढी दक्षिणा जास्त. इतक्या ब्राह्मणांना जेवण द्या, एवढे दान करा अशा मागण्या पुरोहितांनी करून हा ब्राह्मणी धंदा भरपूर वाढवला आहे. सामान्य भक्तांचे ह्या विषयाचे ज्ञान जुजबी असल्याने हे सर्व विनासायास होत आहे, आणि हे असें आजतागायत चालू आहे.

एकदा एकाद्या गोष्टीचा धंदा झाला किं, त्याचे स्वरूप सर्वभक्षक होते तसेंच ब्राह्मणकाळात झालेले दिसते. अशारीतीने ब्राह्मणांनी हिंदूधर्माचे धंदेवाईक स्वरूप उभे केले ते आज आपण पहात आहोत. मनुस्मृतीतून ब्राह्मणांनी स्वतःचे महत्व कसें वाढवले होते ते समजते. ब्राह्मणांच्या ह्या सर्वभक्षक कारभारावर समर्थ रामदास स्वामींनी लक्ष वेधून ब्राह्मणांना ताकीद दिली होती किं, त्यांनी हे व्यवहार आटोपते घ्यावेत नाहीतर त्याचा नाश होईल. तरीसुद्धा ब्राह्मणांचा सर्वभक्षक कारभार तसांच चालू राहिला आहे. त्यापुढे जाऊन ब्राह्मणांनी स्वताला भूदेव म्हणून घेण्यास सुरुवात केली व देव म्हणजे जणुकाय त्याच्या दारात बांधलेले कुत्रे आहे किं काय अशी शंका येऊ लागेल. अशारितीने हे ब्राह्मण त्यांच्या काल्पनिक देवापेक्षा मोठे झाले. ते इतके किं, कांहीं प्रसंगी पुरोहित देवाची भिती दाखवून भित्र्या अनुयायांना लुबाडतात असें सुद्धा आढळते.

**२२.** आज परिस्थिती पहाता, आता विज्ञानकाळ सुरु झाला व ब्राह्मण काळ (अथवा पुरोहित काळ) संपुष्टात येण्याची वेळ आली आहे हे स्पष्टपणे दिसत आहे. हे केवळ हिंदूंमध्ये होत आहे असे नसून सर्वच धर्मांतील पुरोहितांना त्या त्या धर्मातील अनुयायी विविध प्रश्न विचारू लागले आहेत. विज्ञान काळात प्रश्न विचारणे हे एक मुलभूत कार्य झाले आहे. सर्वच धर्मातील जिज्ञासु मंडळी जेव्हा कळीचे प्रश्न विचारू लागले तेव्हां हा सत्ताधारी पुरोहित वर्ग संतापून प्रश्न विचारणार्यांस हरप्रकारे त्रास देऊ लागला. जाती बाहेर काढणे, बहिष्कार टाकणे, मारून टाकणे, खोटेनाटे आरोप करणे, छळ करणे असे अनेकविध उद्योग सुरु झाले, रोमन कॅथोलिक चर्च व शंकराचार्यानी विरोधकांना जीवंत जाळल्याची उदाहरणे आहेत. येशूला क्रुसावर त्याच कारणांनी चढवले यहुदी पुरोहितांनी. प्रश्न विचारणार्यांच्या मुस्कटदाबीचा कहर झाला पण कोंबडे झाकले म्हणून सूर्य उगवायचा थांबत नाही, तसेंच प्रश्न विचारणे चालूच राहिले.

कालांतराने प्रश्न विचारणार्यांची जीत झाली व पुरोहित वर्ग बाजूला झाला. विज्ञानाचा विजय झाला. आता ह्या सुधारलेल्या परिस्थितीत आपण धर्माचा शास्त्रशुद्ध अभ्यास करीत आहोत त्यामुळे परमेश्वर कृपाळु, दयाळु, क्षमाशिल नसल्याचे लक्षात आले आहे. जेव्हां वैज्ञानिक दृष्टीने धर्माच्या संकल्पनांचा अभ्यास सुरु झाला तेव्हां इस्लाम व पोपचा (म्हणजे चर्चचा, म्हणजे त्या पुरोहितांचा) ख्रिस्तीधर्म भ्रामक कल्पनांवर आधारीत असल्याचे स्पष्ट झाले. खरा हिंदू विचार मात्र त्या परीक्षेतून सहीसलामत पार झाला.

**२३.** देवाला समजणे म्हणजे निसर्गाला समजणे हे लक्षात आले. म्हणून आता आपण निसर्गाचे स्वरुप पाहुया. हिंदूतील अघोर तंत्रात जी माहिती सांगितली आहे त्यानुसार निसर्ग दोन भागांत वाटलेला आहे. एक भाग दृष्य असतो व दुसरा अदृष्य असतो. दृष्य निसर्ग जो आपण आपल्या ज्ञानेंद्रियानी जाणू शकतो परंतु, अदृष्य निसर्ग तसा आपण जाणू शकत नाही, फक्त मनाच्या विचारांनी जाणवू शकतो.
दृष्य निसर्ग अदृष्य निसर्गाच्या तुलनेने खुपच लहान असतो व त्याचे नियंत्रण फार मोठा व्याप असलेला अदृष्य निसर्ग करतो. आपण ज्या आणखीन देवतांचा येथे विचार करणार आहोत त्या सर्व ह्या अदृष्य निसर्गाचा भाग असतात. विज्ञानाचे सर्व नियम दोनही भागांस सारखेच लागू होतात. अदृष्य निसर्गाबद्दल थोडी आणखीन माहिती करून घेतली पाहिजे. दृष्य निसर्गात ज्याप्रमाणे अनेक प्राण्याच्या जाती-प्रजाती आढळतात त्या प्रमाणे अदृष्य निसर्गातसुद्धा अदृष्य अशा चेतनामय (म्हणजे विचार करू शकणारी) शक्तींच्या जाती व प्रजाती असतात. दृष्य निसर्गातील प्राणी जसें जन्मतात व मरतात त्या प्रमाणे ह्या चेतनामय शक्तीसुद्धा जन्मतात व मरतात किंवा सुप्तावस्थेत जातात. प्रसंगी त्या दृष्य निसर्गात माणसाच्या पोटीसुद्धा जन्म घेऊ शकतात. कारण, माणूससुद्धा एक चेतनामय शक्तीचेच रुप आहे. प्रसंगी सात्त्विक माणूस त्याच्या मृत्युनंतर, अशा अदृष्य निसर्गात जन्म घेत असतो. ह्या चैतन्यमय शक्तींकडे कांहीं विलक्षण सिद्धी असतात असें आपल्या पूर्वजांना समजले होते व त्याप्रमाणे ते त्या चेतनामय शक्तींना अनुकूल करून निसर्गातील पंचमहाभुतांना नियंत्रित करण्याची विद्या प्राप्त करीत होते. ही माहिती शाक्त, अघोर व तंत्राच्या अभ्यासांने मिळते. पाऊस पाणी, वादळे, पूर, दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, महालाटा (सुनामी) अति थंडी अथवा अति उष्मा, वातावरणांत कमी दाबाचा पट्टा अथवा जास्त दाबाचा पट्टा उत्पन्न करणे व त्या द्वारा पावसाचे नियंत्रण करणे, रोगराईचे नियंत्रण अशा अनेक गोष्टींचे व्यवस्थापन त्यामुळे शक्य करतां येते असा दावा केला जातो. ह्या चेतनामय शक्तींचा उल्लेख देवतां असा साधारणपणे होतो. दृष्य निसर्गातील ऊर्जा (प्रकाश, वीज, उष्णता, ध्वनी, जोर,

गुरुत्वाकर्षण, चुंबकीय जोर इत्यादि) सचेतन नसतात, त्यासाठी त्यांचे व्यवस्थापन कोणत्या तरी सचेतन प्रेरणेस करावे लागते. दृष्य निसर्गाचे अशारितीने अदृष्य निसर्गातील सचेतन शक्तींच्या सहाय्याने नियमन होत असते. म्हणून ह्या शक्तींना प्रसन्न करावे लागते व त्यासाठी कांहीं तपस्या करावी लागते हेसुद्धा आपल्या पूर्वजांना माहीत होते. ह्या शक्तींना माणसाच्या भक्तीची (त्यांचे खाद्य म्हणून, जेवढे जास्त भक्त तेवढी त्यांची ताकद मोठी अशी व्यवस्था असते.) आवश्यकता असते व त्याचा माणूस चतुराईने उपयोग करू शकतो. अदृष्य निसर्गाला समजणे हे एक विज्ञान आहे व आज आपल्याला ह्या विलक्षण विज्ञानाची नितांत गरज आहे कारण, आज पंचमहाभुते अनियमितपणे काम करीत आहेत. ह्या अदृष्य निसर्गातील चैतन्यमय शक्ति पंचमहाभुतांचे नियमन करू शकतात हे आपल्या पूर्वजांना समजले. हे ज्ञान होण्याचे कारण, अशा चेतनामय शक्ती, जसें त्यांना माणसाच्या भक्तीची भूक लागते तसें त्या कोण्या एका, त्यांच्या दृष्टीने योग्य अशा, माणसास त्यांच्या पद्धतीने जाणीव देतात व त्यानुसार तो इसम त्याची भक्ती करू लागतो व त्यांने संतुष्ट झालेली ती देवता त्या भक्ताची इच्छा पूर्ण करते. अशाप्रकारचा अनुभव वेळोवेळी येत गेल्यामुळे त्यातून त्या देवतांना प्रसंन्न करण्याचे तंत्र विकसित होत गेले. त्यातून आजच्या अघोर तंत्राचा विकास झाला आहे. ह्याला कोणी अंधश्रद्धा म्हणून दुर्लक्षिल पण हे एक विज्ञान आहे असे हिंदू मानतात व त्याप्रमाणे ते त्या देवतांची भक्ती करीत असतात. आधुनिक विज्ञानाला आत्ता आत्ता असा अदृष्य निसर्ग असल्याचा सुगाव लागला आहे. हल्ली पश्चिमेकडील वैज्ञानिक ह्या अदृश्य शक्तिंना एलियन (Alien) म्हणून सांगतात. कारण ते असें समजतात किं, हे एलियन परग्रहावरून येतात. वस्तुतः ते येथीलच आहेत हे आपण जाणतो. हे मोठे शास्त्र असून ह्या लेखाच्या आवाक्या बाहेरचे असल्याने ह्यावर जास्त चर्चा मी करीत नाही. तंत्रात दिलेली अशा देवतांच्या जाती प्रजातींची नांवे अशी, देव, दैत्य, दानव, यक्ष, गंधर्व, नागदेवता, राक्षस, सूपर्ण आणि किन्नर आहेत. येथे त्यांची नांवे त्यांच्या सामर्थ्याच्या उतरत्या क्रमाने दिली आहेत. ह्या "देवता गण", म्हणून ओळखल्या जातात. ह्यांशिवाय आणखीन एक प्रकार देवतांचा आहे तो, गणदेव अथवा चांगली भूते, हि चांगल्या माणसांची भूतं असतात. असें लोक, जे आयुष्यभर निष्पाप जीवन जगले व सात्त्विक प्रवृत्तीने परिपूर्ण होते. असें लोक, जे दुसर्यास निष्काम (कांहीं अपेक्षा न ठेवता) मदत करीत होते. असें लोक, ज्यांच्या आत्म्याने त्यांच्या जीवाच्या दैहिक कारभारात कधीही ढवळाढवळ केली नाही. असें लोक, जेव्हां मरतात तेव्हां ते लोक अदृष्य निसर्गातील ह्या लोकांत जातात जसे चंद्र लोक, इंद्र लोक, सूर्य लोक इत्यादि. भगवद्गीतेत श्रीकृष्ण सांगतात किं, जर ते एकाद्या वरील श्रेणीच्या देवतेचे भक्त असतील तर ते त्या देवतेच्या गणांत समाविष्ट होतात. जर असा इसम देव न मानणारा असेल तर तो तसांच स्वतंत्रपणे तेथे रहातो. गणदेव

ही चांगली पिशाच्च असतात व ती सर्वच प्राणिमात्रांना त्यांचे जीवन सुखरुप करण्यात मदत करण्याची भूमिका बजावतात. जे गणदेव उच्च स्थराच्या देवतेचे गण असतात त्यांना त्यांच्या ह्या चांगल्या कामात ती उच्चस्थरीय देवता मदत करते. त्यांना त्या देवतेचे इतर गणदेवसुद्धा मदत करतात व त्यांची शक्ति मोठी होत असते. हा फायदा देव न मानणार्या माणसाच्या गणदेवांस होत नाही. असें असले तरी बरेच पितर अशावेळी त्यांना सहाय्य करतात व त्यांचे चांगले काम तडीस जाते. गणदेव संतुष्ट असतात म्हणून त्याच्यामुळे जे फळ प्राप्त होते त्या बदल्यात ते कांहींही अपेक्षा करीत नसतात. आपल्या पूर्वजात जर कोणी असा गणदेव असेल तर तो त्या कुटूंबाला संरक्षण देत असतो. त्यासाठी त्याला पितृपक्षात पिंडदान करणे चांगले असते. जर कोणी अशारितीने आपल्या पूर्वज गणदेवांस पिंडदान करीत असेल तर इतर गणदेवसुद्धा तेथे जमतात म्हणून त्यांनासुद्धा पिंडदान करावे असा संकेत आहे. असे होण्याचे कारण, असें सांगतात किं, ह्या गणदेवांना अशा पिंडाची भूक असते. अशा सेवेमुळे हे गणदेव माणसांस त्याच्या जीवनात मदत करीत रहातात असे समजले जाते.

इस्लाममध्ये त्यांचा उल्लेख जीन म्हणून केला जातो. हे गण शीव, काली, गणपती व मारुती ह्याच्या आधिपत्याखाली काम करीत असतात असें मानले जाते. इतर धर्मांत ही व्यवस्था आढळत नाही. आपण आधी पाहिलेले ईश्वर, पितर आणि पिशाच्च ह्यांहून ही आणखीन वेगळी दैवते आहेत. इतर धर्मांत दैविक शक्तिंची एवढी पद्धतशीर रचना केलेली आढळत नाही. हिंदूंतील ही दैवतांची सुंदर रचना पहाता इतर धर्म त्या बाबत मागासलेले आहेत हे स्पष्ट होते. ह्याठिकाणी आपण पाहिले असेल किं, देव हा शब्द वेगवेगळ्या प्रसंगी निरनिराळ्या अर्थाने योजला जात आहे. कधी तो परमेश्वर ह्या अर्थी तर कधी तो ईश्वर ह्या अर्थी तर कधी तो देव म्हणून असा वापरला जातो जसें इंग्रजीतील गॉड हा शब्द वापरला जातो. त्यामुळे गोंधळ उडू शकतो. त्यासाठी तो वाचतांना त्याचा संदर्भ पाहून कोणता अर्थ अभिप्रेत आहे ते पाहून तो अर्थ समजावा. पुराणातील कथांमधून देव, दैत्य, यक्ष, राक्षस असें सर्व आपण वाचत असतो. बुद्धाच्या जातक कथांमध्ये गंधर्व, यक्ष ह्यांचा उल्लेख आढळतो. त्यामुळे साधारण हिंदू माणसास त्यांचा बर्यापैकी परिचय असतो. विविध देवतांच्या स्वरुपाबद्दल थोडी आणखीन माहिती पाहूया.

**२४.** प्रत्येक देवतेला दोन अंग असतात. एक अंग असते, नरवाचक व दुसरे असतें, स्त्रीवाचक. त्याचा उल्लेख नरनारी असा केला जातो. ही दोन रुपं दोन भिन्न वर्तणूकी व्यक्त करता. नर स्वरूप पुरुषी स्वभाव दाखवतो व स्त्री स्वरूप स्त्रीचा स्वभाव दाखवतो. आपण म्हणतो पुरुषात स्त्री असते व बाईत

पुरुष असतो तसेंच हे असते. तें असें, पुरुषी स्वभाव थोडा बेपर्वा, उद्धट, घमेंडखोर, कमी दयाळू, अस्वस्थ, शंकाखोर, आगाऊ आणि आळशी असा असतो त्या प्रमाणे, देवतेचे नरस्वरुप काम करते. देवतेचे स्त्री स्वरुप स्त्रीचा स्वभाव व्यक्त करते. तो आहे, काळजीपूर्वक, नीटनेटके, ममतापूर्वक, नम्र, प्रेमळ, शांत, सावध, मेहनतू. अशा भिन्न वागणूकीमुळे देवतेचे स्त्री स्वरुप भक्तासाठी जास्त भावत असते. जर साधकांनी नर स्वरुप भक्ती करण्यासाठी निवडले तर त्याला त्या पुरुषी स्वरुपाकडून सहकार्य मिळत नाही. ते भक्ताची सतत परीक्षा घेत रहाते. पण जर देवतेचे स्त्री स्वरुप भक्तीसाठी निवडले तर त्या देवतेकडून भक्तास चांगले सहकर्य मिळते. आपण पहातो किं, आई ही वडीलांपेक्षा जास्त जवळची मुलांना वाटते तसें हे असते. म्हणजे, शंकरापेक्षा अंबेची पुजा करणे नेहमीच जास्त श्रेयस्कर असते. पांडुरंगापेक्षा रखुमाई जास्त लवकर पावते असे हे असल्याने प्रापंचिक याचकांनी नेहमी देवतेच्या स्त्री रुपाचीच भक्ति करणे चांगले असते असें समजले जाते. देवतेचे नर रुप भक्ताची जरा जास्तच परीक्षा घेत असते तसें देवतेचे मायरुप करीत नाही. थोडक्यात असे सुचवावयाचे आहे कीं, प्रापंचिक हिंदूंनी सहसा नररुपाची भक्ती न करतां माय रुपाचीच भक्ती करावी. विशेषकरून जर ती भक्ती सकाम असेंल तर ते जास्त आवश्यक ठरते. मोक्षार्थीनी नररुपाची भक्ती करावी. आपण पहातो किं, पंढरीचे वारकरी प्रापंचिक असून विठ्ठलाची भक्ती करतात ते ह्या प्रमाणे चुकीचे ठरते, त्यांनी रखुमाईची भक्ती केली तर ती लवकर फळेल. महाराष्ट्रातील संत संन्याशी प्रवृतीचे होते म्हणून ते विठ्ठलाची पुजा करीत होते ते बरोबर होते पण त्यांचे अंधानुकरण प्रापंचिक वारकर्यांनी करणे चुकीचे आहे.

सर्वच देवतांची अशी दोन स्वरुप नसतात. कांहीं देवतांचे फक्त एकच रुप असते. उदाहरणार्थ, शक्ती, चंडिका, संतोषी, जिवदानी इत्यादि. काहीं उग्र देवता असतात त्यांची फक्त नर रुप असतात. त्यात शनी, केतु, राहु, मंगळ अशा देवता येतात. ह्यांना कांहीं ग्रह समजतात पण त्या प्रथम देवता असतात व ज्या ग्रहांच्या नांवांने त्या ओळखल्या जातात ते ग्रह त्याची चिन्हे असतात. नारीरुप नसलेल्या देवतां माणसास शिक्षा करण्याचे काम करण्यासाठी असतात, त्या कारणांने त्यांना नारीरुप नसते. महेश, विष्णू, गणपती ह्या देवतांची स्त्री रुपे आहेत पार्वती व तीची असंख्य रुपं आणि विष्णूचे स्त्री रुप आहे लक्ष्मी, गणपतीचे सरस्वती. ब्राह्मण ह्याचे पतीपत्नी अशी नाती सांगतात पण हे अतिशय चुकीचे असते कारण पती–पत्नी असे नाते फक्त माणसातच शक्य असते. कारण माणसात वासना असते आणि त्याचे प्रजनन लैंगिक संबंधाने होत असते. दैवतांमध्ये लैंगिक प्रजनन होत नाही आणि त्यांना लैंगिक वासनासुद्धा नसते. त्यांचे माणसाप्रमाणे प्रजनन होत नसल्यामुळे त्याचे असें नाते सांगणे हे केवळ ह्या विषयाचे अज्ञान सिद्ध करते. महादेवाचे जे अर्धनारी स्वरूप आपल्या पूर्वजांनी दाखवले आहे तेंच खरे हे

स्वरुप आहे. म्हणजे, महेश व पार्वती हे एकच असतात हे हिंदू साधकांनी समजले पाहिजे. हिंदूंच्या ह्या देवता ह्या दोनही रुपात पुजल्या जातात. त्या दोन वेगवेगळ्या देवता आहेत असे समजू नये. म्हणजे शंकराची आराधना करणे व अंबेची आराधना करणे हे एकच असते. पुराणांमध्ये अनेक कथा आहेत त्यांमुळे ह्या देवतांच्या रुपांबद्दल बरेच गैरसमज पसरतात, त्यासाठी त्या पुराणातील कथांना पुराणातील वांगी असें समजून दुर्लक्ष करावे हेंच श्रेयस्कर ठरेल. प्रत्येक देवतेचे चिन्ह म्हणून कांहीं प्राणी योजले आहेत जसें, मारुतीचे चिन्ह माकड, गणपतीचे हत्ती, आश्विनीकुमारांचे घोडा, विष्णूचे सिंह, दत्ताची गाय व कुत्री वगैरे. पुढे पुराण काळी, कोणी त्या देवतेला त्या प्राण्याचे तोंड लावले अशारितीने बदल होत गेले. माझ्यामते ह्यात बदल व्हायला पाहिजे. तो असा किं, त्या प्राण्याचे तोंड त्या देवतेला न लावता ते चिन्ह देवतेच्या मुकुटात, हातातील राजदंडात अथवा कमरपट्ट्यात योजावे म्हणजे, जे गैरसमज होतात ते होणार नाहीत. किंवा त्या देवाच्या बाजूस दत्तामागे जशी गाय व कुत्री दाखवतात तसें गणपतीच्या बाजूस हत्ती, मारुती भोवती माकडे असें दाखवून ती चिन्हे व्यक्त करता येतील.

माणसाची अनेक रुपं असतात म्हणजेच अवतार असतात. जसें, तो बाप असतो, तो भाऊ असतो, तो पती असतो व कधी तो मित्र असतो तर कधी शत्रूसुद्धा असू शकतो. तसेंच हे असते असें समजावे.

**२५.** अदृश्य निसर्गातील देवता गणांना माणसांप्रमाणे कांहीं इतर वासना (लैंगिक सोडून) असतात. क्रोध, सहानुभूती, तटस्थता (परकेपणा), निद्रा, पक्षपातीपणा, मत्सर, मोह अशा त्या विविध वासना आहेत, मात्र त्यांना लैंगिक वासना नसते कारण, त्याच्यात प्रजनन होत नाही. त्यासाठी, याचकांनी भक्ती करतांना त्याचे चांगले भान ठेवून आपली भक्ती व्यक्त करावयाची असते. त्यांच्यात एकमेकांबद्दल चढाओढ करण्याची प्रवृत्ती तीव्र असू शकते. एकादा हिंदू जर दोन अमित्र देवतांची भक्ती एकाच वेळी करीत असेल तर त्यामुळे ह्या चढाओढीचा वाईट अनुभव त्याला येतो, विशेषकरून जर तो भक्त सात्त्विक असेल तर त्याला ते विशेष जाणवते. ह्या देवता गणांतील देवता त्या चांगल्या भक्ताला आपल्याकडे खेचण्यासाठी अशी चढाओढ त्यांच्यात करतात. अशा चढाओढीचा त्या भक्तांला फार त्रास होण्याची शक्यता असते. ह्याचे कारण असे सांगतात कीं, देवता गणांचे पोषण त्यांची आराधना किती चांगले भक्त करतात त्यावर असते. जेवढे जास्त चांगले भक्त तेवढी त्या देवतेची शक्ती मोठी असे साधारणपणे असते. ज्या देवता गणाची कोणीही भक्ति करीत नाही ती देवता कालांतराने सुप्तावस्थेत जाते म्हणजे एकापरीने मरून जाते. ह्यासाठी हिंदूंनी देवता गणांतील देवतेची आराधना करतांना आपण एकापेक्षा जास्त देवतांची पुजा करीत नाही हे पहावे. आणि जर जास्त देवतांची पुजा करावयाची असेल

तर त्या मित्र देवता आहेत कां ते पहाणे जरुरीचे असते. देवता गणातील देवता कधीही वृद्ध होत नाहीत परंतु त्यांचा कार्यकाळ संपला किं, त्या सुप्तावस्थेत जातात असे समजले जाते. शाक्तांच्या तंत्र विज्ञानात ह्याबद्दल बरीच माहिती मिळते. आजच्या परिस्थितीत ह्या विषयावर पुस्तके नाहीत त्यासाठी ह्या तंत्राचा अभ्यास करण्यासाठी गुरु करावा लागतो, तो जर शिष्याची योग्यता असेल तर ही विद्या त्याला शिकवतो. ह्या विद्येला हिंदूंचे गुप्त विज्ञान असे समजतात. पश्चिमी शिक्षणात तयार झालेले लोक ह्या गोष्टी मानत नाहीत व त्याचा द्वेष करतात व ह्या गोष्टींचे हंसे उडवतात. असा साधारण अनुभव आहे. हे सर्व अव्यक्त स्वरुपात असल्यामुळे ह्या विषयात भोंदू लोकांचा मोठा सुळसुळाट असतो व त्याच्या खोट्या कारवायांमुळे दुर्दैवाने अनेक गैरसमज ह्या तंत्राबाबत पसरलेले आहेत.

**२६.** ह्याबद्दल विशेष माहितीसाठी आपल्याला विज्ञानाच्या दोन प्रयोग पद्धती समजून घेणे जरुरीचे आहे. आपण जी माहिती मिळवतो ती ह्या दोन पद्धतींने मिळवित असतो. एका पद्धतीला प्रयोगसिद्ध पद्धत असे म्हणतात व दुसर्या पद्धतीला अनुभवसिद्ध पद्धत असें म्हणता. ह्याचा अभ्यास झाला किं, श्रद्धा व अंधश्रद्धा ह्यांतील फरक स्पष्ट होईल. प्रयोगानी जी माहिती सिद्ध होते म्हणजे ज्याला पुरावा आहे त्यावरील विश्वासाला श्रद्धा असें म्हणतात. जी अनुभवानी सिद्ध होते तिच्यावर विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा असें कांहीं समजतात. म्हणजे, पुराव्याशिवाय विश्वास ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा. एक उदाहरण घेऊन हे समजून घेऊया. समजा एकाद्याने साखर खाल्लेली नाही असें आहे, त्याला साखर गोड असते असें सांगून साखर गोड आहे म्हणजे काय ते कितीही समजावून सांगितले तरी समजणार नाही परंतु, त्याला साखर खावयास दिली किं, ती गोड आहे म्हणजे काय ते चटकन समजते. म्हणजे हे ज्ञान अनुभव सिद्ध झाले. अशा ज्ञानाचा पुरावा देता येत नाही. दुसरे उदाहरण घेऊया. स्त्री व पुरुष संभोग घेतात त्यापासून पुरुषाला काय सुख मिळाले ते बाईला कधीच समजत नाही व बाईला काय सुख मिळाले ते पुरुषाला कधीच उमगत नाही. असें बरेच ज्ञान आहे जे फक्त अनुभवानेच प्राप्त होऊ शकते. असें ज्ञान प्रयोगांने दुसर्याला समजावून देता येत नाही कारण, त्यात पुरावा नसतो. असे ज्ञान जेव्हां दुसर्याला द्यावयाचे असते तेव्हां ते ज्ञान घेणारा, त्या ज्ञानाचा अनुभवी नसल्यामुळे ते सांगणार्यावर अंधश्रद्धेने विश्वास ठेवून शिकू शकतो. असे बरेच कांहीं ज्ञान, माहिती असते जी प्रत्यक्ष प्रयोग करून प्राप्त करता येत नाही. असे ज्ञान अंधश्रद्धेनेच दुसर्या कडून शिकू शकतो. दररोजचा अनुभव आहे किं, आपण वर्तमानपत्र वाचतो व त्यातील बातम्यांवर आपण कोठलीही शंका न घेता विश्वास ठेवून त्या स्वीकारतो, हे दररोजचे अंधश्रद्धेचे उदाहरण आहे. आपल्याकडे जी माहिती, ज्ञान आहे त्यातील ९५

टक्के आपण केवळ अंधश्रद्धेने मिळवत असतो. म्हणजे अंधश्रद्धा हा आपल्या ज्ञानाचा मुख्य स्त्रोत असतो. अंधश्रद्धेने जेव्हां आपण विश्वास ठेवतो तेव्हां दोन प्रश्न आपण विचारून अशा अंधश्रद्धेचे समर्थन करीत असतो, ते असें, तो कशाला खोटे बोलेल? त्याचा त्यात काय फायदा? व म्हणून आपण त्या गोष्टींवर विश्वास ठेवतो व अंधश्रद्धा सिद्ध करत असतो.

**२७.** विज्ञानाच्या निकसातून निसर्गाला म्हणजे देवाला पाहिले तर फक्त खरी हिंदू विचारसरणी शास्त्रशुद्ध असल्याचे आढळून येते व इतर धर्म निरर्थक ठरतात. कारण इतर धर्मांत देव कोणीतरी व्यक्ती असावी व वर कोठेतरी आकाशात रहाणारी, प्रेम करणारी, दयाळु, कृपाळु, क्षमाशिल, भक्तांच्या सर्व चुकांना माफ करणारी अशी आहे असें सांगितले जाते, तसें कांहींही नसल्याचे आढळून येते. त्यामुळे ते पुरोहितांनी पसरवलेले धर्म (ख्रिस्ती, ईस्लाम व ब्राह्मण धर्म हे तीनही त्यात येतात.) माणसाची फसवणूक करतात असे नाइलाजांने मान्य करावे लागते. त्यात हिंदूंतील ब्राह्मणांचा हिंदूधर्म सुद्धा आला. मी येथे "खरी हिंदू विचारसरणी", असें लिहीले आहे त्याचा अर्थ, ब्राह्मण विचारांने प्रभावित न झालेला हिंदू, असें समजावे. ब्राह्मण विचारात फक्त वैदिक परंपरांचा संदर्भ असतो कारण, इतर हिंदू परंपरांचा ते तिरस्कार करतात.

**२८.** आतापर्यंत आपण देवांचा विचार केला आहे. देव ही चांगली शक्ती समजली जाते, त्याशिवाय धर्मांत बर्याच वाईट शक्तींचासुद्धा उल्लेख असतो. त्यात इतर धर्मांत सैतान म्हणजेच दानव, राक्षस, हा एक महत्वाचा समजला जातो. त्याचा विचार जर आपण केला नाही तर विषय अपुरा राहतो. अदृष्य निसर्गातील दैत्य, दानव, राक्षस हे वाईट शक्तिची रुपे आहेत असें समजले जाते. देव, यक्ष, गंधर्व, नागदेवता, राक्षस, सूपर्ण आणि किन्नर हे माणसास मदत करणारे असे समजतात. ह्यांत राक्षस दोनही जागी आहे हे विषेश आहे. कारण, राक्षस कधी यक्ष बनतो असे समजले जाते.

## ३. हिंदूंतील पुजा करण्याच्या पद्धती –

**२९.** देवांची पुजा करणे हे सर्वच धर्मांत असते. हिंदूसुद्धा आपल्या देवांची विविध प्रकारे पुजा करतात. वेदांतील माहितीनुसार प्रथम श्राद्ध करण्याची पद्धत होती. वेदांत आदिदैवतांचे म्हणजे पितरांचे श्राद्ध दररोज करण्याचा प्रघात होता. ह्या श्राद्धाचे सामान्य पुजेत रुपांतर कालांतराने झाले त्याचे कारण, श्राद्धविधी करण्यासाठी वेदशास्त्र संपन्न (श्रोत्री) असा ब्राह्मण आवश्यक असें. जसें कालांतराने असें ब्राह्मण मिळणे दुरापास्त झाले तसें श्राद्धाची जागा साध्या पुजेने घेतली कारण, अशी पुजा करण्यास

वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणाची गरज नसते. देवाबद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठी माणूस पुजा करतो. श्राद्ध व पुजा ह्यातील मोठा फरक असा असतो किं, श्राद्ध करतांना देवतेची प्रतिमा अथवा मूर्ति (अभिव्यक्ति) आवश्यक नसते. पुजा करण्यासाठी मात्र अशी कांही अभिव्यक्ति आवश्यक असते. त्या अभिव्यक्ति पुढे भक्त, पुजाविधी करत असतो. सुरुवातीला माणसांने साधा दगड, देवाची अभिव्यक्ति म्हणून वापरावयास प्रारंभ केला. त्याला पाषाणपुजा असें म्हणतात. शिवलिंग हे पाषाणपुजेचे उदाहरण आहे. त्याशिवाय आपण अनेक पाषाण त्याला शेंदूर फासून लाल किंवा चुना फासून सफेद रंग देऊन पुजण्यासाठी वापरण्यात असल्याचे पाहतो. असा दगड आजुबाजूच्या इतर दगडांपेक्षा वेगळा असावा ह्यासाठी असे करावे लागत असें. लिंग ह्या शब्दाचा मूळ अर्थ आहे चिन्ह. म्हणजे शिवलिंग म्हणजे शिवाचे चिन्ह असा आहे, पुलिंग म्हणजे पुरुषाचे चिन्ह, स्त्रीलिंग म्हणजे स्त्रीचे चिन्ह अशाप्रकारे. आज मात्र लिंग ह्या शब्दाचा दुसरा अर्थ, प्रजनन इंद्रिय, हा जास्त प्रचारात असल्यामुळे शिवलिंग ह्या शब्दाबद्दल अनेक गैरसमज पसरले आहेत. शाळुंखी स्त्रीच्या योनी सारखी दिसते म्हणून शिवलिंग हे स्त्री-पुरुष संभोगाचे द्योतक असा व्यभिचारी अर्थ भ्रष्ट अज्ञानी ब्राह्मणांनी काढून पाश्चात्य पंडितांची, हिंदू विचारांची खिल्ली उडवण्याच्या कामात मदत केली. निर्बुद्ध ब्राह्मणांच्या अशा कारवायांमुळे हिंदू विचारांची जगात नाहक नाचक्की झाली, आणि अल्पमती व अशिक्षित हिंदू सभ्रमात गेला.

श्राद्धात अर्घ्य देत त्याची जागा अभिषेकाने घेतली. पुजा करतांना त्या देवाची अभिव्यक्ति असलेल्या पाषाणावर पाणी सोडले जाते. ते त्या पाषाणावरून वाहत खाली जमिनीवर सर्वत्र पसरल्याने ती जागा अस्वस्थ होत असें. ते होऊ नये म्हणून तो पाषाण जमिनीवर जेथे बसवला आहे त्या ठिकाणी, अभिषेकाचे पाणी गोळा करण्यासाठी त्या पाषाणाभोवती एक कालवा तयार केला गेला, त्या कालव्याला शेवटी एक वाट काढलेली असते. अशा व्यवस्थेमुळे अभिषेकाचे पाणी त्या वाटेने एका जागी गोळा करता येऊ लागले व जागा अस्वच्छ होण्याचे बंद झाले. ह्या व्यवस्थेला आज आपण शाळुंखी असें म्हणतो, शाळुंखीत बसवलेल्या पाषाणाला बाण असें म्हणतात. बाण व शाळुंखी मिळून पिंडी बनते. अशारितीने पाषाण पुजेतून शिवलिंगाची पुजा सुरु झाली. असे अनेक पाषाण आज ठिकठिकाणी पुजले जात आहेत. मुसलमान लोक मक्केत जो काबा पुजतात तो असाच एक पाषाण आहे. शिंगणापुरात जो शनिचा पाषाण पुजला जात आहे तोसुद्धा असांच एक प्राचीन पाषाण पुजेचा प्रकार आहे. अनेक पाषाण लाल रंग लावून देवीची मूर्ति म्हणून आज पुजले जात आहेत. ही झाली पाषाणपुजेची उदाहरणे. म्हणजे मूर्तिपुजेची सुरुवात पाषाणपुजेतून झाली. हे पाषाण म्हणजे तो देव असं हिंदू कधीच समजत नाहीत. हे दगड अथवा मूर्ति हे केवळ चिन्हात्मक असतात. त्यात देव पहाण्याचा प्रयत्न भाविक करीत असतो एवढेंच. आपल्या

घरांत आपल्या प्रियजनांचे फोटो तसबीरीत घालून भिंतीवर टांगतो ते सुद्धा असेंच चिन्हात्मक असते. त्या फोटोत आपले प्रियजन आहेत असें समजण्याचा मूर्खपणा कधींच कोणीही करीत नाही.

**३०.** ह्याबाबत एक सत्य घटना १९५६च्या सुमारास घडली ती सांगण्यासारखी आहे असें वाटते म्हणून ती येथे देतो. मुंबई जवळील अलिबाग नांवाच्या गांवात एक संन्यासी रहाण्यास आला. तीन वर्षापेक्षा जास्त काळ तो संन्यासी एका ठिकाणी रहात नसें. एक खोली तो भाड्याने घेतो, त्या खोलीत एक जुनी दिनदर्शिका भिंतीवर टांगलेली होती. त्या दिनदर्शिकेत दत्तगुरुंचे चित्र होते, ती थोडी फाटलेली होती. दत्तगुरु हे सर्व संन्याशांचे आराध्य दैवत असते त्यामुळे ते पाहिल्यावर तो संन्यासी प्रसन्न झाला. पुढे तो त्या चित्रावर त्राटक (त्राटकची माहिती पुढे दिली आहे) करून आपली तपस्या करू लागला. प्रसंगी फुलं, पान वाहून तो तिची पुजासुद्धा करीत असे. अशारितीने त्यांनी तेथे तीन वर्षे तपस्या त्या चित्रापुढे केली. तीन वर्षे झाल्यावर तो ती जागा सोडून निघून गेला. ते चित्र तसेंच जास्त फाटलेल्या अवस्थेत तेथे भिंतीवर टांगलेलेच राहिले. घरमालकांने नवीन भाडोत्र्यासाठी त्या खोलीचा रंग काढला. ते करीत असतांना ते काम करणार्या मजूरांने ते फाटलेले चित्र काढून बाजूला टाकले व जसें त्या खोलीची साफसफाई झाली तसें ते फाटलेले चित्र आणखीन फाडून बारीक तुकडे करून तेथे काम करणार्या नोकरांने उकिरड्यात फेकून दिले. ही कथा दाखवून देते किं, देवाच्या चिन्हात्मक गोष्टींचे एकंदर साधनेत किती महत्व असते. असें असले तरी अश्रद्ध लोक मूर्तिपुजेची व त्या संबंधित गोष्टींची टिंगल टवाळी करून हिंदू परंपरेची निर्भत्सना करतात असें नेहमी पहातो. हे त्यांचे अज्ञान असते.

**३१.** पाषाण पुजेनंतर त्या पाषाणाची जागा पाषाणाच्या मूर्तिने घेतली. भाविकांना पाषाणापेक्षा माणसाचा आकार असलेली मूर्ति जास्त चांगली वाटली असावी. त्याचवेळी कोणी पाषाणाला डोळे लावून तो अधिक जीवंत केला व डोळे असलेले पाषाण पुजले जाऊ लागले. पुढे तेवढ्याने समाधान न झाल्यांने भक्तांनी त्या पाषाणाला नाक, तोंड असे लावण्यास सुरुवात केली. त्यातूनच पुढे मूर्ति बनवण्यास प्रारंभ झाला. अशारितीने हिंदूंत मूर्तिपुजा प्रचारात आली. मूर्तिपुजेचे आणखीन एक स्पष्टीकरण मिळते त्याचासुद्धा आपण विचार केला पाहिजे. हे स्पष्टीकरण योगशास्त्राशी निगडीत आहे. योगशास्त्रात ध्यान करण्यासाठी एकाद्या गोष्टीवर एकटक नजर ठेवून त्या गोष्टीवर एकचित्त करण्याची एक पद्धत आहे. त्या कृतीस त्राटक करणे असें म्हणतात. त्राटक करण्यासाठी पाषाणापेक्षा अशी देवाची मूर्ति जास्त श्रेयस्कर असल्यामुळे देवांच्या मूर्ति त्राटक करण्यासाठी वापरण्याचा प्रघात पडला. साधारणपणे माणसाचा चेहरा असलेल्या मुर्त्या जरी जास्त प्रचारात आल्या तरी कांहीं मुर्त्या इतर प्राण्याच्या चेहरा असलेल्या सुद्धा

प्रचारात आल्या त्यांत गणपती, मारुती, नृसिंह अशी उदाहरणे पहावयांस मिळतात. त्राटक करण्यासाठी सुपारी, नारळ, दिव्याची ज्योत अशा विविध चीजांचा उपयोगसुद्धा केला जातो. गौतम बुद्धानी देवतेच्या मूर्तिवर त्राटक करण्या ऐवजी श्वासोंश्वासावर त्राटक करण्याची पद्धत प्रचारात आणली, तिला विपश्यना असें म्हणतात, हिंदू तिलाच सोऽहम् साधना असें म्हणतात. सो म्हणजे श्वास आंत घेणे व हंम् म्हणजे श्वास बाहेर टाकणे. ह्यात ह्या श्वासावर विचारशुन्य अवस्थेत डोळे मिटून असें त्राटक करावयाचें असते. म्हणचे एकचित्ताने लक्ष द्यावयाचे असते. अशारितीने अव्यक्त देवतांचे श्राद्ध जाऊन त्याची जागा पाषाण अथवा मूर्तीतून व्यक्त होणार्या देवतांची पुजा अर्चना करण्यास हिंदूंनी सुरुवात केली. सोऽहम् साधना देव न मानणारा हिंदू करू शकतो.

**३२.** पुजा साधारणपणे तीन प्रकारच्या असतात. त्यांची विभागणी भक्ताच्या गुणानुसार होत असते. सात्त्विक भक्ताची पुजा, रजोगुणी भक्ताची पुजा व तमोगुणी भक्ताची पुजा असे ते तीन प्रकार असल्याचे आढळते. सात्त्विक भक्ताची पुजा सुक्ष्म स्वरुपाची असते. विशेष करून ती मनातल्या मनात केली जाते. मन शांत ठेवून एकाग्रपणे भक्त त्याच्या आराध्य दैवताचे स्मरण करतो, किंवा त्यावर त्राटक करतो. त्याचा फारसा गाजावाजा होत नाही. कोणालाही तो पुजा करतोय हे समजतसुद्धा नाही. अशा पुजेला स्थळ, वेळ व सामुग्री ह्याची आवश्यकता नसते. अशा पुजेत त्राटक क्रियेचा मोठा अंतर्भाव असू शकतो. अशी पुजा सर्वात जास्त प्रभावी असते असे समजले जाते. अशा पुजेला मानस पुजा असेंसुद्धा म्हणतात. अशी पुजा केवळ देवतेशी निगडीत असते. अशी पुजा वैयक्तिक स्वरुपाची असते. अशी पुजा सकाम किंवा निष्काम कशीही असू शकते. बौद्धांमध्ये त्राटकाची जागा विपश्यना ह्या क्रियेने घेतली. विपश्यना म्हणजे आपल्या श्वासोंश्वासावर त्राटक करणे. असे होण्याचे कारण, बुद्ध विचारांत दैवतांची पुजा मान्य नसते. असे असले तरी शेवटी बुद्धधर्मी लोक गौतमबुद्धाची मूर्ति व तारका नांवाच्या देवतेची पुजा करतांना आढळतात. ह्याचा अर्थ असा होतो किं, बहुतेक करून सामान्य मनुष्यांस कांहींतरी चिन्ह आवश्यक असते कीं, ज्यावर तो त्याचे मन एकाग्र करू शकेल. मूर्तिपुजा न मानणार्या इस्लामचे अनुयायी सुद्धा अल्लाह लिहीलेले पदक अथवा एकाद्या दर्ग्याचे चित्र पुजतांना आपण पहातोच. हिंदू असा खोटेपणा न बाळगता सरळपणे माणसाच्या नैसर्गिक गरजेनुसार मूर्तिपुजा करणे योग्य समजतात. येशु सात्विक पुजा प्रमाण मानतो. चर्चमध्ये होणारी सामुहीक प्रार्थना त्याला मान्य नव्हती. कारण ती रजोगुणी असते. आज प्रचलित असेलेला ख्रिस्ती धर्म येशूने सांगितलेला नाही हे बर्याच लोकांना माहीत नाही. येशू सामुहीक प्रार्थने विरुद्ध होता, असो.

रजोगुणी पुजेत स्थळ, वेळ (मुहूर्त) व सामुग्री ह्यांचे महत्व असते. तीत मूर्तिपुढे आरास, मुर्तिभोवती सजावट अशी उत्तम प्रकारे सुंदर अशी दिमाखदार असते. सर्व समाजाला समजेल अशा रीतींने ती केली जात असते. अशी पुजा देवते बरोबर इतर म्हणजे समाज वगैरेना दिसावी असा उद्देश असतो. ती पुजा सामाजिक प्रतिष्ठा, मानमरातब, प्रसिद्धी अशा बर्याच इतर गोष्टींशी निगडीत असते. प्रसंगी देवतेपेक्षा ह्या गोष्टी जास्त महत्वाच्या असतात. देवता निमित्तमात्र असते. पुजाविधी जास्त मोठा व कर्मकांडाने गुतागुंतीचा असतो. अशा पुजेत भक्त (यजमान) त्याच्या बरोबर इतर लोकांनासुद्धा सामील करून घेत असतो. पुरोहिताकडून ती केली जाते व त्यात त्यामुळे खर्च फार होत असतो. पुरोहितांना दक्षिणा मिळते त्यासाठी अशा रजोगुणी पुजांचे महत्व ब्राह्मणांनी वाढवले. अशा पुजा खाजगी स्वरुपाच्या असतात. रजोगुणी पुजा नेहमीच सकाम असतात. रजोगुणी लोक बहुधा परमेश्वर, पितर, देवता गण ह्यात कुलदैवते येतात अशांची पुजा करतात. समाज संवर्धनार्थ अशा पुजा उपयोगाच्या असतात.
तामसी पुजेत रजोगुणीची बहुतेक लक्षणे आढळतात, त्याशिवाय कर्मकांड जास्त भडक असते. आरत्या व मंत्रोच्चारण ओरडून इतरांना विशेष लक्षात राहील असे असते. नांचणे, गांणे असे त्यात असल्याने अशी पुजा बिभत्स व गोंधळ करणारी वाटते. त्यामुळे बर्याच वेळा अशा पुजा वाह्यात असल्याचा समज होत असतो. सार्वजनिक पुजा ह्या प्रकारात येतात. असा बराच फरक असला तरी त्या पुजा करणार्या भक्ताची भक्ती निसंशय असू शकते, फक्त अभिव्यक्तीत फरक असतो. तामसी लोक इतर दैवतांपेक्षा पिशाच्चांची पुजा करणे जास्त श्रेयस्कर समजतात. अघोर शास्त्रात सात्त्विक व तामसी अशा दोन शाखा आहेत त्यातील तामसी शाखा ह्या प्रकारच्या पुजांबद्दल विशेष चर्चेत असतात. अघोर म्हंटलं किं, तामसी असा एक गैरसमज ब्राह्मणांनी पसरवला आहे. अघोर साधनेतील ख्यातनाम संत किनाराम सात्त्विक साधना करीत असतं. रजोगुणी व तामसी पुजांमुळे दैवत सोडून बाकी सर्व संतुष्ट होऊ शकतात. इस्लाम धर्मात रजोगुणी व तामसी पुजा करण्यास विरोध आहे. असे असले तरी ते मशिदीत नमाज करतात, तो एक सार्वजनिक पुजेचाच प्रकार ठरतो हा एक विरोधाभास आहे.

**३३.** पुजेत प्रसाद द्यावयाचा असतो. पुजेचा प्रसाद चाखून पाहू नये. शाकाहारी प्रसाद तसांच द्यावयाचा असतो. मांसाहारी प्रसाद देण्याची पद्धत थोडी वेगळी असते, त्यात मांस प्रथम मीठाच्या पाण्याने धुवावयाचे असते त्यामुळे त्यावरील दोष निघून जातात असे समजले जाते. खरेतर समुद्राच्या पाण्याने असे करावयाचा संकेत आहे पण ते नेहमीच शक्य नसते. म्हणून मीठाचे पाणी वापरावे लागते. समुद्राचे पाणी सर्व पाप धुऊन टाकण्यासाठी समर्थ असते म्हणून हिंदूंनी समुद्रात स्नान करावयाची पद्धत आहे.

जमिनीचे किनारे समुद्र सतत धूत असतो व असे समजले जाते किं, त्यामुळे जमिनीवरील पाप धुतले जात असते. अशारितीने शुद्ध झालेले मांस नंतर शिजवून प्रसाद तयार केला जावा. आधुनिक विज्ञानाप्रमाणे मीठाच्या पाण्यामुळे मांस जंतु विरहीत होत असते. पूर्वीच्या काळी मांसासाठी प्राणी यजमान (पुजा करणारा) स्वतः मारत असें त्याला बळी असें म्हणत असत. मनुस्मृतीत ह्याचा उल्लेख ठिकठीकाणी सांपडतो. मनुस्मृतीत ब्राह्मणांनी श्राद्धासाठी बळी म्हणून स्वतः गाय कापावी असें सांगितलेले आहे. पण हे शाक्तांच्या नियमांनुसार योग्य नसते कारण, प्राण्याची हत्या विनावेदना करावी लागते व ते सामान्य माणसास शक्य नसते. सवेदना हत्या झाली तर ते मांस देवतेच्या प्रसादासाठी वापरता येत नाही. कारण, असे मांस राक्षस खातात असा समज आहे. अशारितीने (विनावेदना) हत्या करण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या खाटीकानेच ते काम करावयाचे असते. त्यामुळे खाटीक वर्ग तयार झाला. दुर्दैवाने हा खाटीक विनावेदना प्राणी मारत नाही. त्यासाठी त्याचे खास प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी लागेल. मांसाहारासाठी प्राण्याची हत्त्या करून मगच तो खाण्यासाठी घ्यावा असा संकेत आहे त्यापाठील कारण काय ते पहावे लागेल. त्यासाठी बुद्धाने एक उदाहरण सांगितले आहे ते येथे उपयोगी येईल, उदाहरण फळाचे होते, फळ प्रथम कच्चे असते ते सावकाशपणे पिकते व त्या अवस्थेत ते असतांना खावयाचे असते, जर ते आणखीन पिकले तर ते नांसू लागण्याची शक्यता असते व असें खराब होण्याच्या अवस्थेत गेलेले फळ खाणे आरोग्यास हानिकारक ठरते. त्याच प्रमाणें मृत प्राणी खराब होण्याच्या अवस्थेत ताबडतोब जात असतो व तसें मांस खाणे आरोग्यास हानिकारक असते, म्हणून प्राणी मारूनच खावयाचा असतो. तसेंच मेलेला प्राणी कां मेला, कसा मेला, त्याला कांहीं रोग वगैरे होते कां? असे प्रश्न उत्पन्न होतात ते टाळण्यासाठी मृत प्राणी खाणे हिंदूंना वर्ज आहे. त्यासाठी त्यांनी प्राणी मारूनच खाल्ला पाहिजे.

जैनांच्या प्रभावाखाली ब्राह्मण, आदि शंकराचार्यांच्या काळात, आले व त्यामुळे ते अर्ध शाकाहारी झाले. एवढेच नव्हे तर हिंदूंनासुद्धा निरनिराळ्या वारी शाकाहार करण्याचा आग्रह करू लागले. वस्तुतः एकाद्या वारी कां शाकाहार करावयाचा ह्याचे कोणतेही पटण्यासारखे कारण मात्र सापडत नाही. परंतु अशिक्षित हिंदू समाज ब्राह्मणांच्या चुकीच्या व खोडसाळ मार्गदर्शनाखाली तसें विनातक्रार करीत असतो. आता परिस्थिती बदलत आहे. हिंदू प्रश्न विचारू लागले आहेत. त्यांना अशा अनेक निरर्थक चालींचा पुनर्विचार करावा लागणार आहे. वस्तुतः हिंदूंच्या सर्व देवता मांसाहारी आहेत म्हणूनच वेदांत व शाक्तांच्या आणि अघोर तंत्रात सर्वत्र मांसाचाच प्रसाद देण्याचे संकेत आहेत. वेदांत ब्रह्मण यज्ञात बळी दिलेले गाईचे मांस खात होते. आणि आता ते जनावर माता कशी झाली? त्याचे उत्तर नाही. मनुस्मृतीत पितरांच्या नैवेद्यात

शाकाहारी प्रसाद निकृष्ट ठरवलेला आहे व मांस आणि मांसळीचे प्रसाद उत्तम म्हणून सांगितलेले आहेत. आपल्या येथील शाकाहारी, अर्ध शाकाहारी आहेत असे म्हणण्याचे कारण, ते सर्व लोक दुध व त्यापासून बनणारे अनेक खाद्य पदार्थ त्याच्या आहारात ठेवतात. दुध हे गाईपासून तिच्या रक्तातून बनत असल्याने तो गोमांसाहार ठरतो. एक लिटर दूध हे दोनशे ग्राम गोमांसा इतके असते. म्हणजे त्यावरून हे शाकाहारी लोक दिवसाला किती गोमांस खातात ते समजू शकते. ह्यांत जैन धर्माचे लोकसुद्धा येतात. त्यामुळे शाकाहार हा केवळ मिथ्याचार ठरतो. मनुस्मृतीच्या आदेशानुसार ब्राह्मणांनी गोमांस खाणे शिष्टसंमत आहे असे असले तरी आज हे लोक शाकाहाराची भलामण करतांना दिसतात व मांसाहाराचा द्वेष करतात. हे वागणे पवित्र नियमांविरुद्ध आहे. त्यामुळे मनुस्मृतीच्या आदेशानुसार पाहिले तर आजचे ब्राह्मण शूद्र ठरतात. हिंदूंतील सनातन ब्राह्मणाच्या धर्माची व्याख्या अशी आहे किं, मनुस्मृतीच्या पवित्र नियमानुसार वागणारा तो सनातनी. हे पहातां आजचे ब्राह्मण सनातनी नाहीत, आणि वैदिकही राहीलेले नाहीत. तरी ते सनातन धर्माच्या व वैदिकतेच्या गोष्टी करीत असतात. एकापरीने पाहिले तर असे दिसते किं, हे ब्राह्मण जैन धर्माचेच छुप्या रीतीने पालन करतात.

**३४.** पुजा करण्याच्या पद्धतीत जे मुख्य सुत्र असते ते आपण पहावयाचे आहे. पुजा करण्याचे साम्य असते त्या विधीशी, जेव्हा आपण एकाद्या सन्माननीय पाहुण्याचे घरात स्वागत करतो. त्या स्वागत सोहळ्यात ज्या कांहीं मुलभूत गोष्टी केल्या जातात त्यासर्व देवाच्या पुजेत होत असतात. पुजा करण्याचा कांहीं उद्देश असतो. सामान्य माणसाच्या पुजा सकाम असतात. त्याबद्दल विनवणी करणे हे महत्वाचे काम देवतेला प्रसाद दिल्यानंतर करावयाचे असते. पुजाविधीचा क्रम असा असतो. कांही चुक झाली, कांहीं राहून गेले असल्याल त्या बद्दल माफी मागणे हे शेवटच्या विधीत करावयांस विसरता कामा नये. पुजेतील आठ विधी येथे दिल्या आहेत तशा असतात -

१, आमंत्रण,

२. स्वागत,

३. बसण्यास आसन देणे,

४. स्तुती करणे,

५. प्रसाद देणे,

६. प्रसाद सेवन करत असतांना त्या देवतेच्या कार्याचे कौतुक, वहाव्हा करणे,

७. आराम म्हणजे थोडावेळ शांतता पाळणे, पुजेत जे मागावयाचे ते मागणे.

८. शेवटचा विधी पाहुण्याचे प्रस्थान अथवा निघून जाणे. शेवटची आरती करणे.

अशा आठ गोष्टींनी ही क्रिया होत असते. कोणत्याही देवतेची पुजा करतांना ह्याच सर्व गोष्टी कराव्या लागतात. ह्यांतील १, २, ३, ४, ५ क्रियांत देवतेची विविध प्रकारे स्तुती केली जाते. ३ मध्ये देवतेला बसण्याचे आवाहन केते जाते त्यात त्या देवतेच्या सामर्थ्याचा उल्लेख करावयाचा असतो. ६ मध्ये शांतता पाळली जाते. ७ व ८ मध्ये आरती ओवाळली जाते. ह्या क्रिया किती वाढवायच्या ते पुरोहित ठरवत असतो. ऋग्वेदात ह्या सर्व विधी थोडक्यात उरकण्याचा प्रघात होता, त्यात मोठा बदल शुक्ल यजुर्वेदाच्या काळात झाला आणि पुजाविधी खूपच लांबलचक केला गेला. त्याचा फायदा पुरोहित वर्गास झाला. पुजाविधी सुंदर व्हावा म्हणून आसनाची जागा सुशोभित करणे, त्यासाठी आरास व सजावट असें बरेच कांहीं करण्याची प्रथा सुरू झाली. कांहीं देवता एकट्या येत नाहीत त्यांच्या बरोबर त्यांचा सहकार्यांचा (त्यांना गण असें म्हणतात) लवाजमा येत असतो. त्यासाठी अशा देवतेची पुजा करतांना त्या सर्व उपदेवतांचीसुद्धा व्यवस्था करावी लागते. अशाकरणांने पुजाविधी अधिक व्यापक होतो. मुख्यदेवतेसाठी समजा, मूर्ति, कलश अथवा तसबीर ठेवली असेल तर उपदेवतांसाठी बहुधा सुपारी चिन्हात्मक म्हणून योजली जाते. अशा सुपार्या ठेवण्यासाठी नागवेलीचे (विड्याचे) पान त्यांचे आसन म्हणून बहुधा वापरतात. पाहुण्यास घरात प्रवेश देतांना आपण त्याच्या कपाळाला कुंकुम तिलक करतो व हार घालतो तसेंच देवतेच्या मूर्तिस, कलश अथवा तसबीरीस गंध, कुंकू, इत्यादि लावावयाचे असते व फुले, गजरा, माळा इत्यादि घालावयाचे असतात. पाहुणा मोठा आसामी असेल तर धुपारती, अत्तर शिंपणे, थाळी वाजवून व शंखनाद करून आनंद व्यक्त करणे असे अनेक प्रकार पुरोहिताच्या सांगण्यानुसार होत असतात. उपदेवतांच्या करतां ज्या सुपार्या ठेवलेल्या असतात त्यांनासुद्धा गंध, कुंकू, इत्यादि लावले जाते. त्यानंतर प्रत्येक उपदेवतेचीसुद्धा स्तुती करून त्यांचे स्वागत करावयाचे असते. अशारितीने हा पुजा करण्याचा कार्यक्रम पाहिजे तेवढा फुगवता येतो. तेंच शुक्ल यजुर्वेदाच्या काळात झाले. देवतेचे सर्वच उपदेवतास्वरूप सेवक बोलवता येत नाहीत म्हणून उरलेल्यांची क्षमायाचना त्या पुजेच्या विधीत अंतर्भूत केली जाते. किंवा त्याच्या चिन्हात्मक म्हणून एक नारळ योजला जातो. निरनिराळ्या देवतांच्या स्वभावगुणांनुसार ह्या पुजांचे स्वरूप वेगवेगळे ठरत असते. ही पुजेची पद्धत पाहिजे तेवढी पुरोहित वाढवून जास्त दक्षिणा यजमानाकडून मिळवत असें. अशा पुजा करणे सामान्य हिंदूस शक्य नसते म्हणून पुजारी बोलवावा लागतो. अशा पुजा बहुधा राजस् व तमस् प्रकारात मोडतात. पुजेचा मुख्य उद्देश त्या देवतेस शांत व संतुष्ट करण्याचाच असतो. शांत झालेली देवता प्रसन्न होते असें समजले जाते. ब्राह्मण पुरोहितांना त्या बद्दल मार्गदर्शन करण्यासाठी अनेक पोथ्या लिहील्या गेल्या

आहेत.  त्या मध्ये धर्मसिंधू महत्वाचा आहे. हा काशीनाथ शास्त्री उपाध्यायानी लिहीला आहे.

**३५.** सात्त्विक पुजा साधी असते त्याचा एक नमुना उदाहरण म्हणून आपण येथे पहाणार आहेत. सात्त्विक पुजा यजमानाने स्वतःच करावयाची असते. सात्त्विक पुजा करतांना कोणासही आमंत्रण देऊन बोलवायचे नसते. अशा पुजेत फक्त देवता व तिचा भक्त एवढेच हजर असतात. शांतता पाळावयाची असते. आराध्य देवतेची मूर्ती अथवा तसबीर समोर ठेवून पुजेचा आरंभ होतो. भाविक मनातल्या मनात देवतेला येण्याचे आवाहन करतो. त्यावेळी तो (ती) मनातल्या मनातच देवतेची आळवणी करीत असतो. कांहींवेळ आळवणी झाल्यावर दैवत आले असें समजून तो पुढील विधी (३) सुरु करतो. सर्व स्तुती, कौतुक, इत्यादि आळवणीत येतात ते सर्व मनातल्या मनातच करावयाचे असते. कोणी पाहिलं तर त्याला कांहीं पुजा होत आहे ते समजणार सुद्धा नाही असे सर्व असते. त्यात फुलं, फळं, हार वाहणे हे सर्व तो (ती) त्या मुर्ति पुढे करतो. कांहींच नसेल तर निदान पाणी वाहणे आवश्यक समजले जाते. ह्यासाठी एक प्राचीन कथा आहे ती अशी, एक ऋषी पुजा करण्यासाठी तयारी करतो पण त्यांच्याकडे कांहीं योग्य प्रसाद देण्यासाठी नव्हता. तेव्हां तो बाजूला असलेले दगड उचलून तेंच भक्तिभावाने पहातो. तेव्हढ्याने ती देवता प्रसन्न होते. ह्यात देण्याची दानत महत्वाची असते काय दिले ते महत्वाचे नसते. अशावरून कोणी दानत असून खोटे देईल तर त्यामुळे दैवत नाराज होण्याची शक्यता असते. कारण दैवतं फार धूर्त असतात त्यांना मूर्ख समजू नये. त्यांना कोणी फसवू शकत नाही. प्रसाद दिल्यानंतर तो (ती) शांतपणे (७) ध्यानस्थ राहून देवतेचे स्मरण करतो, हे स्मरण, पुजेतील फारच महत्वाचे असते. देवतेच्या मुर्तिवर अथवा तसबीरीकडे त्राटक करणे सात्त्विक पुजेत महत्वाचे असते. पुजेसाठी जो समय लागतो त्यातील अर्ध्याहून जास्त समय अशा त्राटकांत दिला पाहिजे. सात्त्विक पुजा कोणालाही दिसणार नाही अशा बेतांने करावयाच्या असतात. जर राजसी अथवा तामस् पुजा सकाळी केली तर संध्याकाळ पर्यंत अथवा दुसर्या दिवशी सकाळ पर्यंत ती पुजा तशीच ठेवून नंतर सर्व आवरावयाचे असते. त्यासाठी पुरोहित विशेष विधीचे (उत्तर पुजा) आयोजन करतात. पण सात्त्विक पुजेत असे कांहीं न करता त्या देवतेचा जप करीत आवरण्याचे काम करावे. सात्त्विक पुजा दहा ते पंधरा मिनीटात उरकणे चांगले पण जर त्राटक करण्याचे असेल तर त्यासाठी जो जास्तचा समय लागेल तो द्यावा. पूर्वी पुजाविधी संस्कृत भाषेतील ऋचा, साम, श्लोक अशांनी पुरोहित करत असत पण साधारण हिंदू संस्कृत भाषा जाणत नसल्यामुळे त्यांनी त्याच्या नेहमीच्या भाषेतच तो करावा. पुजाविधीतील मुख्य भाग असतो, भक्तिचा. जर खरी भक्ति असेल तर ती पुजा सिद्ध होतेच. हिंदू साधारणपणे पितर व गण वर्गातील दैवते पुजेत

आळवतात, ती सर्व समजूतदार असतात असे समजले जाते. जर भाविकाला देवतेची स्तुतीपर आळवणी जमत नसेल तर त्यांनी केवळ त्या देवतेच्या नांवाचा जप करीत पुजाविधी संपन्न केला तरी चालते. समजा गणपतीची पुजा करावयाची आहे पण मंत्र माहीत नाहीत तर "नमो गणपती", असा जप करीत पुजा करावी. आता आपण जी सात्त्विक पुजा पाहिली ती तुलनेने स्थुल स्वरुपाची होती. त्याशिवाय एक आणखीन पुजा सांगितली आहे. ती अतिसुक्ष्म स्वरुपाची असते. अतिसुक्ष्म पुजा अध्यात्म साधना करणारा मोक्षार्थी हिंदू करतो. त्यात सोऽहम् साधना, विपश्यना अशा काही येतात. सामान्य हिंदूसुद्धा ती करू शकतो. गौतमबुद्धाने ही सुक्ष्म साधना त्याच्या अनुयायांना प्रथम शिकवली असे समजले जाते. अतिसुक्ष्म पुजेसाठी दैवत असण्याची आवश्यकता नसते. कारण अशा अतिसुक्ष्म पुजेत आत्माराम म्हणजे आपल्यात असलेल्या परमेश्वराला (खुदा) स्मरण्याची विधी असते. वस्तुतः ही सर्वश्रेष्ठ पुजा पद्धती आहे. सुफी पंथातील साधकसुद्धा हि पद्धत वापरतात. अशी सुक्ष्म पुजा कोठेही व केव्हांही करता येते, जसे प्रवासात आसनावर बसल्या बसल्या अथवा उभ्या सुद्धा डोळे मिटून करावी. रात्री निजण्याच्या वेळी ती केल्यास ती जास्त प्रभावी असते.

**३६.** इतर पुजांमध्ये देवळातील पुजा येते. हिंदूंनी स्वताच्या घरातील आराध्य दैवताची पुजा करणे नेहमी श्रेयस्कर असते. शक्यतर देवळात जाऊन पुजा करणे टाळावे. कारण, देऊळ कोणी उभारले, त्यातील दैवतांची स्थापना कोणी केली, प्रतिस्थापना करतांना कोणत्या अटी घालून दैवत बसवले, देवळातील मूर्तितील दैवत व प्रतिस्थापित दैवत एकच आहे कां, तेथे कांहीं इतर पापकारक शक्तिंचा वास आहे कां, अशा अनेक बाबी लक्षात घ्याव्या लागतात. म्हणून ज्या देवळाची पुरेशी माहिती नाही अशा देवळात जाऊन पुजा करणे श्रेयस्कर नसते. दुसर्याच्या घरातील देवसुद्धा पुजू नये. कांहीं हिंदूंना कोणत्याही देवळात जाऊन पुजा करण्याची हौस असते त्यामुळे कदाचित नुकसान होण्याची शक्यता असते. बर्याच देवळांत कांहीं वाईट शक्तींचा संचार असतो अशा देवळात (रस्यावरीत, झाडाखालील, स्मशानातील इत्यादि) जाऊन पुजा करण्याने त्या वाईट शक्तिंचा विपरीत प्रभाव पडण्याची शक्यता असते. ज्या देवस्थानाची माहिती आहे व खात्री आहे अशा देवस्थानी पुजा करण्यास हरकत नसते. एक गोष्ट सर्व हिंदूंनी चांगली लक्षात ठेवली पाहिजे किं, पुजा कोठे केली हे महत्वाचे नसते तर पुजा करणार्याची भक्ति किती थोर व प्रामाणिक आहे हे महत्वाचे असते. घरातील देव आपणच बसवलेला असतो त्यामुळे त्या बद्दल विशेष काळजी घेण्याची आवश्यकता नसते. घरातील देवाची प्रतिस्थापना करण्यासाठी ब्राह्मण पुरोहित बोलवू नये. कारण, अशा पुरोहिताची मनस्थिती कोणालाही माहीत नसते.

गृहस्थ व गृहिणी ह्यांनी मिळून ती प्रतिस्थापना साधेपणे (सात्विक) व प्रामाणिक भक्तिने घरच्या घरापुरती अशी करावी म्हणजे ते देवघर जास्तीत जास्त शुद्ध स्वरुपात राहील. म्हणून प्रथम सांगितल्याप्रमाणे घरीच पुजा कराव्यात. कारण, दैवते सर्वत्र असतात, ती एका ठिकाणी बांधलेली नसतात. ती फक्त देवळात अथवा तीर्थक्षेत्रीच असतात असा समज करून घेणे अज्ञानाचे लक्षण आहे. हल्ली महाजालाचा (इंटरनेटचा) काळ आहे, ज्याप्रमाणे त्यातील सुचना सर्वत्र उपलब्ध असतात त्याप्रमाणेच दैवते सर्वत्र उपलब्ध असतात. संगणकाच्या मदतीने आपण महाजालातील सुचना जागृत करतो तसेंच भक्तिने माणूस दैवतांना जागृत करू शकत असतो. पिशाच्च पुजेबाबतचे नियम मात्र थोडे वेगळे असतात कारण ती सर्वत्र उपलब्ध नसतात. मानवी दैवतांची पुजा पिशाच्च पुजेसारखी असते.

**३७.** अघोर शास्त्राप्रमाणे मंत्रसिद्धीने कोणतेही दैवत कशातही सिद्ध करता येते, त्यामुळे गणपतीचे मंदिर आहे म्हणजे त्या मूर्तीत गणपतीचीच स्थापना झाली आहे असे समजणे चुकीचे ठरू शकते. इतिहासात अशी नोंद आहे किं, माधवराव पेशवे ज्या गणपतीच्या मूर्तिची पुजा नित्यनेमांने करीत होते त्यात एका राक्षसाची स्थापना ती मूर्ती देणार्या कानडी ब्राह्मणांनी केली होती व म्हणून त्याचा अकाली मृत्यू झाला व पेशवाई बुडाली. अनेक देवळांच्या बाबत असे होऊ शकते म्हणून सावधानतेसाठी घरातच जी काय पुजा करावयाची ती करावी. हिंदूंच्या देवळात ती पहाण्यासाठी फक्त जावे पण तेथील पुजा महत्वाची मानू नये. कांहीं हिंदूंना निरनिराळ्या देवळांत जाऊन पुजा करण्याचे जणू व्यसन असते, ते प्रसंगी नुकसारकारक ठरू शकते ह्याची जाणीव ठेवावी. फक्त तेथील दैवताला नमस्कार करून अभिवादन करावे, त्याच्याकडे कांहीं मागू नये. त्यापेक्षा जास्त कांहीं करू नये. कांहीं लोकांना हा माझा सल्ला रुचणार नाही परंतु, तो अनुभवांवर व शास्त्रावर आधारीत आहे हे लक्षात घ्यावे. गजानन महाराजांनी एकदा सांगितले किं, जर भक्ति असेल तर घरातच हरद्वार, काशी, रामेश्वर सर्वकांहीं असते. हे आपणा सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

## ४. हिंदूंतील शुद्धते बाबतच्या कल्पना –

**३८.** शुद्धता दोन प्रकारच्या आहेत, एक देहाची व दुसरी मनाची. देवाची पुजा करतांना देहाची शुद्धता बाळगण्याची आवश्यकता विशेष महत्वाची समजली जाते. सामान्य शुद्धता केवळ हात, पाय व तोंड धुवून साध्या होते परंतु, अभ्यंग स्नान देहाची पूर्ण शुद्धता करते. ह्यात ब्राह्मणांच्या शुद्धतेच्या कल्पना विशेष काटेकोर किंवा फाजिल असतात. मनाची शुद्धता बहुधा गृहीत धरूनच वागतात. इतर हिंदूंत

साधारण देहाची बाहेरून शुद्धता असली किं, ते त्यांना पुरेसे असते. स्त्रीच्या शुद्धतेचा बराच बागुलबोवा ब्राह्मणांत केला जातो. स्त्रीस मासिकपाळी असते त्या काळात तिने देवांना स्पर्श करू नये असें संकेत आहेत. त्याबद्दल थोडे पाहावे लागेल. एवढ्याने पुरुषवर्गाचे समाधान झाले नाही म्हणून किं काय विधवेला कायम अपवित्र ठरवण्या इतपत ब्राह्मणांची मजल गेली. जर विधूर अपवित्र होत नाही तर विधवा कशी अपवित्र ठरते? उत्क्रांत हिंदूनी विधवेला अपवित्र मानू नये. विधवेने देवांची स्वताच्या हातांनी पुजा करावी कारण त्यात कांहींही गैर नाही. तसेंच सर्व धार्मिक विधींत सहभाग करावा. लोकांनी तिला त्यात उत्तेजन द्यावे.

हल्ली, स्त्रीने तिच्या मासिकपाळीच्या काळात देवाची पुजा करावी का नाही ह्या प्रश्नावर बरीच चर्चा होत आहे. त्यांत तिने पुजा करू नये असे आग्रहाने बोलणारे आहेत व इतर कांहीं त्यावर कारणमिमांसा पहाण्याचा आग्रह धरतात. त्याशिवाय सुयेर व सुतक असें आणखीन दोन प्रकार शुद्धतेच्या दृष्टीने विचारात घ्यावे लागतील. मासिकपाळीच्या काळात स्त्री अशुद्ध असते असे ब्राह्मण धर्मातील लोक समजतात. म्हणून तिने देवांची पुजा करू नये असे सांगितले जाते. मनुस्मृतीत मात्र ह्यांवर कांहींही मार्गदर्शन केलेले नाही. दुसरे कारण असें सांगतात किं, त्या काळात तिला विश्रांतीची सक्त गरज असतें व म्हणून तिने पुजा व इतर गृहकृत्यात भाग घ्यावयाचा नसतो. विश्रांतीचे जर कारण असेल तर त्यासाठी धर्मांत नियम करण्याची काय गरज? म्हणजे, हे दुसरे कारण स्त्रीला अशा गोष्टींपासून दूर ठेवण्याचे असू शकत नाही. निदान धर्मशास्त्रात तरी विश्रांतीसाठी स्त्रीस अशुद्ध ठरवणे कसे योग्य असेल ते पटत नाही. तिला विश्रांतीची गरज असते असें कारण सांगणे शक्य असतांना अशुद्धतेचा खोटा हेत्वारोप करण्याचे काय कारण? ह्याचा अर्थ, स्त्रीस पुजाविधी करण्यास विरोध करण्यामागील उद्देश ती अशुद्ध असते हे ठरवणे हांच असू शकतो. मासिकपाळीच्या काळात ती अशुद्ध कशी ठरते ते पहावे लागेल. ह्या सर्व गोष्टी फार प्राचीन (अज्ञान) काळात ठरवल्या गेल्या होत्या, आज विज्ञान काळात त्या घेऊन बसणे कितपत शहाणपणाचे होईल हा प्रश्न आहे. मासिकपाळीत जे द्रव्य स्त्रीच्या शरीरातून स्त्रवते ते खरोखरच अशुद्ध द्रव्य असतें का? तत्त्वतः ते द्रव्य अतिशय शुद्ध स्वरुपाचे असते. जर त्या काळात गर्भधारणा झाली असती तर त्या द्रव्यातून एक नवीन जीव पोसला गेला असता, असें द्रव्य अशुद्ध कसे असेल? उद्या माणसाचे रक्त अशुद्ध आहे असे जर म्हंटले तर ते कितपत मान्य केले जाईल? बर्याच लोकांना माहीत नसेल पण हे सत्य आहे किं, कोंबडीचे अंडे हे त्या कोंबडीची पाळी असते. कोणत्याही प्राण्याचे असे द्रव्य अशुद्ध कसे असेल? कोंबडीचे अंडे एक उत्तम अन्न असते. म्हणजे स्त्रीचा मासिकपाळीचा काळ अशुद्धतेचा निश्चित नसतो. केवळ स्त्रीस अपमानीत, जलील करणे, तिचा अभिमान

दुखवणे एवढाच पुरुषी उद्देश असावा असे वाटते. ह्या मागे पुरुषाचा अहंकार हेंच कारण असू शकते. पुरुषी समाज व्यवस्थेचा हा परिणाम आहे असें म्हणावे लागेल. सनातनी (म्हणजे मागांसलेल्या) ब्राह्मणांत अजूनही हा स्त्रीचा अवमान करणे चालूच आहे. हे सनातनी म्हणजे मागांसलेले ब्राह्मण स्वतः हे करतात व इतर हिंदूंनासुद्धा तसे करण्याचा आग्रह करीत असतात. एकविसाव्या शतकातील उत्क्रांत होणार्या हिंदूंने ते मान्य करण्याची आवश्यकता नाही. म्हणजे ऋतुच्या काळात खर्या हिंदू बायकांनी देवाची पुजा स्वताच्या हाताने करण्यास हरकत नसावी. उत्क्रांत होणारा हिंदू धर्म म्हणजे जो सनातन, मागासलेला नाही असा हिंदू धर्म असे समजावे.

**३९.** आता आपल्याला खरोखर काय अशुद्ध असू शकते ते पहावे लागेल. प्रत्येक माणसाच्या मग तो पुरुष असो अथवा स्त्री असो, शरीरात आतड्यात मळ असतो. असे समजतात किं, तो निदान दोनशे ग्राम असतो. तसेंच निदान शंभर मि.ली. मुत्र असते. माणूस कितीही शुचिर्भुत बाहेरून झाला तरी तो त्याच्या शरीरातील ही अशुद्ध द्रव्ये कधीच काढू शकत नाही. म्हणजे तत्वतः कोणतीही व्यक्ति अंतर्यामी खर्या अर्थाने शरीराने शुद्ध असू शकत नाही. केवळ पितांबर वा असे कोणतेही "पवित्र", वस्त्र नेसल्याने कोणी शुद्ध ठरत नाही. थोडक्यात एवढेच म्हणता येईल किं, एकवीसाव्या शतकात अशा प्रकारच्या शुद्ध अशुद्धतेच्या कालबाह्य विचारांना उत्तेजन देणे बंद केले पाहिजे. उत्क्रांत होणार्या हिंदू परंपरांत अशा मागांसलेपणाला उत्तेजन देता येणार नाही. उपलब्ध ज्ञानानुसार आपण सर्व नेहमीच अशुद्ध असतो व तसेंच रहाणार. शुद्धतेच्या गप्पा मारणारा तुमचा पुरोहित सुद्धा सदैव अशुद्धतच असतो! अशा शुद्धतेच्या गोष्टी करणार्यांनी हे लक्षात घ्यावयास पाहिजे किं, ते देवाची पुजा करण्यास बसतात ते हा सर्व मळ व मुत्र पोटात असतांना बसतात! पुरुष पुरोहिताबाबत आणखीन कांहीं दोष दिसतात त्याबद्दल नंतर पहावयाचे आहे.

**४०.** दुसर्या अशुद्धतेच्या गोष्टी आहेत, सुयेर व सुतक बाबतच्या. सुयेर हे घरात बाळ जन्मले की पाळतात. सुतक घरातील इसम मृत झाला तर पाळतात. ह्या दोनही प्रसंगी अशुद्धता पाळण्याचे कारण काय? त्यावर निदान मला तरी कोठेही पटण्यासारखे कारण आढळलेले नाही. बाळाला जन्म देण्यामुळे ती स्त्री अशुद्ध कशी होते? बाळंतीणीला बाळाबरोबर रहाणे आवश्यक असतें पण तेवढ्यासाठी तिला अशुद्ध ठरवणे कोणत्या तर्कांत बसतें? कोणी मेला म्हणून घरातील माणसे अशुद्ध कशी होतात? अशा प्रश्नांना ब्राह्मणांकडे स्पष्टीकरण नाही. अशुद्धतेच्या ह्या कल्पना अतिरंजित स्वरुपाच्या आहेत. हिंदूंनी मासिकपाळी, सुयेर व सुतक ही अशुद्धतेची कारणे निखालस चुकीची असल्यामुळे पाळणे बंद करावीत.

मनुस्मृतीत कोठेही ह्या सुयेर व सुतकचा उल्लेख नाही. म्हणजे ह्या दोन गोष्टी पवित्र नियमांचा भाग नाहीत. विशेष असें किं, श्राद्ध विधीवर मात्र बरेच पवित्र नियम दिलेले आहेत. मग सुयेर व सुतक बद्दल असें कांहीं नियम कां नाहीत? ह्याचा अर्थ, हे दोन रिवाज नंतर कोणीतरी तयार केले आहेत. जीवदानी देवीची पुजा करतांना ह्या अशुद्धता न पाळण्याचे संकेत आहेत ते इतर सर्व देवांसाठी लागू केले पाहिजेत. बाळ जन्मले म्हणून त्याकाळात उलट, मुद्दाम देवींची (सटवी, संतोषीमाता, लेकुरवाळी वगैरे) पुजा करून त्या बाळाच्या स्वास्थ्यासाठी प्रार्थना केली पाहिजे. त्यात त्या बाळाची आई सामील झाली पाहिजे. तसेंच घरातील माणूस देवाघरी गेले म्हणून त्या काळात मुद्दाम पितरांचे श्रांद्ध करावयावे व त्यांना मृतात्म्यास शांति देण्याची प्रार्थना करावयांस पाहिजे. मृतात्म्यास मदत व्हावी म्हणून त्याकाळात कुलदैवताची सुद्धा पुजा घरच्या देवघरात नित्य करावयांस पाहिजे.

**४१.** ह्या मुद्याच्या अखेरीस आपण पुरुष व स्त्री ह्यांमध्ये खर्या अर्थाने कोण अशुद्ध असू शकतो ते पहायला पाहिजे कारण एरव्ही ही चर्चा अपूरी राहील. पुरुषांना अनेक व्यसने असतात, पुरोहित वर्गांत असे व्यसनी ब्राह्मण बरेच असतात. त्यांना दैहिक व्यसने जास्त असतात. दैहिक व्यसनांत, दारु, वीडी सिगरेट, गांजा, अफु, तंबाखू, सुपारी, जुगार खेळणे, वेश्यागमन इत्यादि येतात. अशा व्यसनांमुळे ते पुरुष अशुद्ध ठरतात. स्त्रीस ही दैहिक व्यसने बहुधा नसतात. त्या ह्याबाबत त्या शुद्ध असतात. मानसिक व्यसनांत मात्र पुरुषांपेक्षा स्त्री जास्त अडकलेली असल्याचे आढळून येते. मानसिक व्यसने अशी, सतत काळजी करीत रहाणे, दुःखी रहाणे, संशय घेत रहाणे, काल्पनिक चिंतेत रमणे, रडणे, मत्सर करणे, भांडखोरपणा. जर स्त्री ह्या मानसिक व्यसनापासून मुक्त असेल तर ती योगशास्त्रातसुद्धा शुद्ध समजली जाते. अशा निर्व्यसनी स्त्रीस पौरोहित्य करण्यास कांहींही हरकत नसावी. शरीराच्या शुद्धते बाबतसुद्धा पुरुषापेक्षा स्त्री जास्त शुद्ध समजली पाहिजे. हे केवळ माणसापुरते आहे असें नाही तर सर्वच प्राण्यांत नरापेक्षा मादी जास्त शुद्ध समजली जाते. उदाहरणार्थ, गोमुत्र पाहिले तर ते गाईचेच असावे लागते बैलाचे मुत्र कोणीही प्राशन करणार नाही कारण ते अशुद्ध असते. दुसरे उदाहरण, शेळीचे घेता येईल. क्षयरोग बरा करण्यासाठी शेळीचे मुत्र पिण्याचा संकेत आहे पण बोकडाचे मुत्र पिता येत नाही. तिसरे उदाहरण माणसांचे घेऊ, मुत्र चिकित्सेमध्ये पुरुषाच्या मुत्रापेक्षा स्त्रीचे मुत्र प्राशनासाठी योग्य समजले जाते. त्याशिवाय पुरुष जर प्रजनन क्षमतेच्या वयाचा असेल तर त्याचे वीर्य गळत असते, त्याकारणांनी तो पुरुष अशुद्ध होत असतो. मनुस्मृतीत वीर्य स्खलन होणार्या पुरुषांस प्रायश्चित्य करण्याचे आदेश दिले आहेत. बैल व बोकड हेसुद्धा ह्याच कारणांनी वर्ज ठरत असतात. ह्यावरून तत्त्वतः पुरुषापेक्षा स्त्री

नेहमीच जास्त शुद्ध असते हे मान्य करावे लागते. असे असतांना खोटीनाटी कारणे पुढे करून तिला अशुद्ध ठरवून स्त्रीचा धर्मपिठाच्या पातळीवर अपमान करणे कितपत श्रेयस्कर ठरते? भक्ति, श्रद्धा व प्रेम ह्यामध्येसुद्धा बाई पुरुषापेक्षा अधिक तीव्र व प्रामाणिक असते म्हणून योग्य असते. पुरुषाच्या भक्तित, प्रेमांत मतलब असतो पण स्त्री निरलस, निष्काम प्रेम करू शकते हे पहाता मंदिरांतून बायकांनांच पौरोहित्य करण्याची परवानगी मिळाली पाहिजे व म्हणून बायकांवरील हे अन्याय थांबले पाहिजेत. ही शास्त्रसुद्ध चर्चा केल्यानंतर असे सुचवावेसे वाटते किं, सर्व देवळांतील पौरोहित्य पुरुषांपेक्षा बायकांनी करणे जास्त श्रेयस्कर ठरते. त्या पुढे जाऊन मी असें सुचवू इच्छितो किं, विधवांनी पौरोहित्याचे शिक्षण घेऊन तो व्यवसाच करावा.

## ५. हिंदूंतील पाप - पुण्य विचार –

**४२.** पाप म्हणजे काय? पुण्य म्हणजे काय? ह्याचा प्रथम विचार करावा लागेल. इतर धर्मांत त्या धर्माचे नियम न पाळणे हे पाप समजले जाते आणि त्यांचे पालन करणे म्हणजे पुण्य समजले जाते. हिंदूंत असे कांहीं खास बंधनकारक नियम नसल्यामुळे पापाची व्याख्या अध्यात्म शास्त्राशी निगडीत अशी समजली जाते. येथे थोडक्यात आपण हिंदूंच्या पाप कशाला समजावयाचे त्याबद्दलच्या ज्या कांहीं संकल्पना आहेत त्या पहाव्या लागतील. थोडक्यात व्याख्या अशी,
ज्या प्रकारे विचार व त्यानुसार कृती केल्यामुळे माणसाचा अध्यात्मिक र्हास होतो ते पाप व ज्यामुळे अध्यात्मिक उद्धार होतो ते पुण्य, असें समजावयाचे असते. म्हणजे, पाप पुण्याचा संबंध अध्यात्मिकतेशी आहे हे लक्षात ठेवावे. इतर धर्मात तसें नसते. आगम शास्त्राप्रमाणे आत्म्याची अध्यात्मिक उर्जा असते. त्या प्रमाणे त्याचा जन्म त्या योग्यतेच्या योनीत होत असतो. त्यात कमी होत विशिष्ट मर्यादे पेक्षा कमी झाली तर त्यांचा मृत्यू होतो. जास्त झाली तरी सुद्धा मृत्यू होतो. प्रत्येक योनीची ती अध्यात्मिक अवस्था ठरलेली आहे. पुण्य केल्याने त्या आत्म्याची अध्यात्मिक अवस्था योग्य पातळीवर राखली जाते. खूप जास्त अध्यात्मिक उर्जा झाली तर त्या आत्म्याचा जन्म वरच्या योग्यतेच्या योनीत होतो आणि खूप कमी झाल्यामुळे मृत्यू झाला तर त्याचा जन्म खालच्या योनीत होतो. म्हणून माणसाने त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवत ठेवावयाची असते.

षड्रीपुंच्या अतिआहारी गेल्यामुळे जे गैरकृत्य होते त्या कृत्याला पाप असे समजले जाते. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर अशा सहा विकारांच्या अतिआहारी जाणे म्हणजे पाप. त्या उलट अर्थात्

पुण्य म्हणजे, ह्या सहा विकारांच्यापासून आत्मारामाने मुक्त रहाणे. ही झाली तात्त्विक व्याख्या पण साधारण माणसास समजण्यासाठी जास्त विवरणाची आवश्यकता असते. ह्या सहा प्रवृत्तिंची अधिक माहिती पहावी लागेल. ह्या सहा विकारांपैकी काम, लोभ व मोह हे माणसाच्या जीवास काम करण्यास उद्युक्त करतात म्हणून ते योग्य मर्यादेत माणसास (जीवांस) जगण्यासाठी आवश्यक असतात. फक्त जेव्हां ते सुरक्षित मर्यादा ओलांडतात तेव्हांच ते दोष अथवा रिपु (रिपु म्हणजे शत्रु) म्हणजे पापकारक ठरतात. क्रोध, मद  व मत्सर हे तीन माणसास स्वसंरक्षणासाठी आवश्यक असतात. परंतु जेव्हां ते स्वसंरक्षणा ऐवजी इतर कारणांसाठी उत्तेजित होतात तेव्हां ते दोष अथवा रिपु म्हणजे पापकारक ठरतात. म्हणजे, सुरक्षित मर्यादेत जर ते कार्यरत असतील तर त्यांच्यामुळे पाप होत नाही. क्रोध विकाराचा दुसरा आविष्कार दुःख आहे. म्हणजे जेव्हां माणूस कमजोर असतो तेव्हां तो क्रोधी होत नाही तर दुखी होतो. तसेंच मद व मत्सर ह्यांचा दुसरा आविष्कार आहे, स्वामित्वाची तीव्र भावना, जी प्रेमात, मित्रत्वाच्या नात्यांत जाणवते. ज्याला इंग्रजीत पझेसिवनेस (possessiveness) असें म्हणतात. म्हणजे, जेव्हां माणूस बलवान असतो तेव्हां तो स्वामित्व गाजवण्याचा प्रयत्न करतो व कमजोर असतो तेव्हां मत्सर करतो. ह्याचा अर्थ माणसाच्या अंगिभूत सामर्थ्यानुसार प्रतिक्रिया व्यक्त होत असते. अतिदुःखी अथवा अतिक्रोधी होणे अथवा स्वामित्वाची भावना (हे माझे, ते माझे अशी विचारसरणी) बाळगणे पापकारक असते.

एका उपनिषदात ह्या सहा विकारांना सहा साखळदंड सांगून त्याच्यामुळे आत्म्याला लिंगदेह जखडला गेला आहे आणि साधक त्याच्या साधनेने हे सहा साखळदंड एक एक करून तोडून टाकतो व जेव्हां सर्व साखळदंड तुटून पडतात तेव्हां तो आत्मा ह्या जन्म मरणाच्या बंधनातून कायमचा मुक्त होते असे वर्णन केले आहे. हे सहा विकार जरी वस्तुतः जीवाला सहाय्य करण्यासाठी असले तरी आत्मा त्यांत गुंतल्यामुळे सर्व गुंतागुंत वाढत असते. खर्या हिंदूंनी आपला आत्माराम, देहाच्या व्यवहारांपासून दूर ठेवण्यात यश मिळवले पाहिजे अशी अपेक्षा असते. म्हणजे प्रत्येक हिंदू एकापरीने साधकच असला पाहिजे अशी अपेक्षा असते. देह, जीव, लिंगदेह व आत्मा ह्याच्या संबंधा बाबतची माहिती पुढे दिली आहे ती पहावी. पापाचे आणखीन एक कारण सांगितले आहे ते हिंसेशी संबंधित असते. हिंसा म्हणजे दुख, वेदना निर्माण करणे, वेदना देणे. तीन प्रकारच्या हिंसा सांगितल्या आहेत. शरीराचे दुःख, मनाचे दुःख व तिसरे आहे, हितद्वेषाचे दुःख. हितद्वेषांत आर्थिक फसवणूक, विश्वासघात, खोटी आश्वासने देणे वगैरे तत्सम कृती येतात. शरीराचे दुःख ह्यात शारिरीक त्रास, वेदना देणे (स्वताला अथवा दुसर्याला) अशी कृत्ये पापकारक समजली आहेत. अपमान करणे, खिजवणे, टोमणे मारणे, दुर्लक्ष करणे, खोटे

आरोप करणे, ज्या गोष्टींमुळे एकाद्याच्या मनांस वेदना होतात अशी सर्व कृत्ये पापकारक समजली जातात. जैन धर्मात हिंसा हे मोठे पापकृत्य समजले आहे.

**४३.** हिंसा व हत्या ह्यांत नेहमी गोंधळ केला जातो त्यासाठी त्यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. हत्या करणे म्हणजे, ठार मारणे. ठार मारण्याच्या क्रियेत वेदनेचा समावेश असेलच असें नाही. हत्या विनावेदना होऊ शकते. जर विनावेदना हत्या केली तर ते पाप ठरत नाही. ही एक महत्वाची माहिती आहे, कारण गीतेत श्री कृष्णाने अर्जुनास कौरवांना ठार मारण्याचा आदेश दिला होता. जर हत्या करणे पापकारक असते तर निश्चितच श्री कृष्णाने अर्जुनांस हत्या करण्याचा आदेश दिला नसता. ह्या ठिकाणी पाप करण्या मागील उद्देश महत्वाचा असतो. प्रत्यक्ष कृतीपेक्षा त्या मागील उद्देश त्यात पाप आहे कां नाही ते ठरवत असतो. उद्देश नसतांना जर पाप सदृष्य कृत्य झाले तर ते पाप समजले जात नाही. पापकारक कृत्ये कोणती त्या बद्दल गीतेत सोळाव्या अध्यायात दैवी संपदा (पुण्यकारक संपदा) व आसुरी संपदा (पापकारक संपदा) सांगितल्या आहेत. त्या पाहाव्या लागतील. त्याशिवाय, मनुस्मृतीत सांगितलेला, "जीवोजीवस्य जीवनम्", ह्या नियमानुसार खाण्यासाठी प्राणी मारण्याची परवानगी हिंदूंना आहे. तसेंच स्वसंरक्षणासाठी, उपद्रवकारक असेल तर (उंदीर, डांस, रोगजंतु वगैरे) मारण्याची मुभा असते त्यामुळे पाप लागत नाही. मजेसाठी अथवा खाण्याव्यतिरीक्त इतर कारणांसाठी जसें, शिकार करणे पापकारक असते.

**४४.** गीतेतील सोळाव्या अध्यायाचे मराठी भाषांतर येथे दिले आहे ते पहावे.
श्री भगवान सांगतात, निर्भयता, पूर्ण सात्त्विक प्रवृत्ति, ज्ञान व कर्मयोग या दोहोंविषयी तारतम्यानें व्यवस्था, दान, इंद्रिय निग्रह, यज्ञ (नेमून दिलेले कार्य), स्वधर्माप्रमाणे आचरण, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, क्रोध नसणे, त्याग, शांति, मनांत दुष्टबुद्धि नसणे, प्राणिमात्रांविषयी दया, निर्लोभता, नम्रता, वाईट कृत्याविषयी जनलज्जा, नको ते उद्योग न करणे, तेजस्विता, क्षमा, मनाची शुचिर्भूतता, कोणाचाही द्रोह न करणे, असें हे सद्गुण हे अर्जुना, दैवी संपत्ति घेऊन जन्माला आलेल्या सत्पुरुषांस प्राप्त होतात. *टीपः अशा माणसास पुण्यवान माणूस असें म्हणतात. ह्याठिकाणी पुरुष हा शब्द लैंगिक अर्थाने वापरलेला नसून व्यक्ति ह्या अर्थानें योजलेला आहे. म्हणून तो स्त्री व पुरुष अशा दोनही अर्थाने समजावा. ही लक्षणे सज्जन माणसाची समजता येतील.*

हे अर्जुना,  आसुरी संपत्ति घेऊन जन्मलेल्याच्या अंगी दांभिकपणा, दर्प, दुराभिमान, क्रोध, निष्ठुरता आणि परमेश्वराबद्दलचे अज्ञान हे दुर्गुण आढळून येतात.

दैवी सद्गुण मोक्षप्राप्तीला आणि आसुरी दुर्गुण (कर्म) बंधनाला कारणीभूत असतात. तूं दैवी संपत्तिसाठी जन्मलेला आहेस, म्हणून तूं (पांण्डवा) हा शोक टाकून दे.

हे अर्जुना, ह्या लोकी दैवी आणि आसुरी असें दोन प्रकारांचें प्राणी उत्पन्न होतात. त्यातल्या दैवी प्रकाराचे वर्णन मी तुला सविस्तरपणे सांगितले. आतां आसुरी प्रकाराचे वर्णन ऐक.

आसुरी स्वभावाच्या लोकांना, प्रवृत्ति म्हणजे काय करावे व निवृत्ति म्हणजे काय करू नये, हे समजत नाही. त्यांच्या ठिकाणी शुचिर्भूतपणा, सदाचार आणि सत्य ही नसतात. *टीपः ह्याचा अर्थ, आसुरी स्वभावाची माणसे तामसी असतात; व त्याच्याही खालच्या थरातील म्हणजे दुर्गुणी असतात. सत्त्व, रजस् व तमस् ह्या त्रिगुणांशिवाय सत्त्व गुणापेक्षा वरचा असा संत गुण व तमस् गुणापेक्षा खालचा असा दुर्गुण असे एकंदर पांच गुण, मार्ग तत्त्वज्ञानात दिले आहेत.*

आसुरी स्वभावाचे लोक म्हणतात किं, हे जग असत्य, निराधार, ईश्वररहित, एकमेकांपासूनही न निर्माण झालेले (द्वैतवाद), म्हणून (मनुष्याच्या) उपभोगासाठी उत्पन्न झालेले व त्या खेरीज त्याचा दुसरा कांहीं हेतू नाही.

अशाप्रकारच्या विचारसरणीचा आश्रय करून हे नष्टात्मे, अल्पबुद्धि, क्रूर, घातकी, जगाच्या नाशासाठी उत्पन्न होतात.

अहंमन्यता व उन्मत्तपणा यानीं पछाडलेले व अशुद्ध आचार–विचार अंगिकारलेले ते आसुरी लोक, मोहामुळे भलतेंच वेडेपणाचे बेत मनांत योजून पापकारक कामें करण्यास प्रवृत्त होतात.

इंद्रियांच्या इच्छातृप्ति एवढाच काय तो जीवनाचा उद्देश आहे असें मनाशी पक्के समजून (आत्म्याला विसरलेले, फक्त जीव आहे असे मानणारे) वागणारे हे आसुरी लोक जगांत प्राप्तव्य काय ते हेंच असें मानून, शेकडों इच्छांच्या पाशांत अडकलेले, कामक्रोधांनी व्यस्त झालेले असें ते आसुरी लोक आपल्या कामोपभोगांसाठी अन्याय न्याय ह्यांची तमा न बाळगतां अनेक मार्गांने धन संपत्ती मिळवण्याची हांव धरतात.

आज मी हे मिळविले, उद्या माझा तो मनोरथ प्राप्त करून घेईन, इतके द्रव्य मजपाशी आज आहे, पुनः तेही माझे होईल, हा शत्रु मी आज लोळवला, दुसरा शत्रुसुद्धा मी ठार मारीन, मी सत्ताधीश, मी सुखे भोगणारा, मींच सिद्ध, मींच बलाढ्य, म्हणून सुखी, मी श्रीमंत व म्हणून कुलवंत, माझ्यासारखा दुसरा कोण आहे? मी यज्ञ (माझे काम मींच ठरवीन) करीन, मींच दाने करीन, मींच चैन करीन अशा अज्ञानांत

मोहित झालेले, अशा नाना प्रकारच्या भ्रमांनी ग्रासलेला, मोहाच्या (अज्ञानाच्या) जाळ्यात पूर्णपणे अडकलेला आणि इंद्रियांच्या विषयभोगांत लंपट झालेला, आसुरी स्वभावाचा मनुष्य अखेरीस अमंगळ अशा नरकांत पडतो.

स्वःची बढाई मारणारे, गर्वांने ताठरलेले, संपत्ति व मान यांनी मदोंमत्त झालेले हे आसुरी वृत्तीचे लोक केवळ ढोंगीपणांनें शास्त्रविधी सोडून केवळ नांवापुरते यज्ञ करतात. असे लोक आसुरी दैवतांची (दैत्य, दानव, राक्षस इत्यादि) आराधना करतात व परमेश्वराला विसरतात. प्रसंगी ते स्वतःलाच देव समजतात. मी भूदेव, अशी वल्गना करण्यास धजतात.

अहंकार, शक्तिचा गर्व, उन्मत्तपणा, विषयवासना, रागीटपणा, ह्या दुर्गुणांनी भरलेले मत्सरी स्वभावाचे हे लोक आपल्या व इतरांच्या देहांत वास करणार्या माझा (परमेश्वराचा) द्वेष करणारे व माझे निंदक होतात. द्वेष व अहंकार ह्यांने उन्मत्त झालेले हे नराधम शेवटी नरकांत जातात.

त्या ईश्वरद्रोही, क्रुरकर्मा, घातकी नराधमांना मी संसारातील आसुरी म्हणजे, पापयोनींत टाकून देतो.

हे कुंतीपुत्रा , याप्रमाणे जन्मोजन्मी आसुरी कोटीला प्राप्त झालेले ते मुर्ख लोक माझी प्राप्ती कधींच न करतां अखेरीस अधोगतीच्या नरकांत जातात.

अतिकाम, अतिक्रोध व अतिलोभ असें तीन प्रकारचें नरकाचे द्वार असून ते आत्मविघातक असते म्हणून, या तिघांचा त्याग करावा.

अरे कौंतेया, या तीन नरकद्वारांपासून विमुक्त झालेला मनुष्य स्वतःचे कल्याण ज्यात आहे तेंच आचरतो व त्याद्वारा तो श्रेष्ठ गतीला जातो.

जो शास्त्रोक्त विधि सोडून मनसोक्त वर्तन करतो त्याला सिद्धि, सुख, उत्तमगती हे प्राप्त होत नाहीत.

म्हणून कर्तव्य व अकर्तव्य ह्यातील फरक समजण्यासाठी तुला शास्त्राभ्यास हेंच प्रमाण मानले पाहिजे. तुला या लोकी शास्त्राभ्यास करणे आवश्यक आहे.

अशारितीने श्री भगवान कृष्ण, दैवी व आसुरी संपदा म्हणजे प्रवृत्ती कशा असतात ते सांगतात. सुरुवातीच्या भागात पुण्यकर्मी कसे वागतात ते दिले आहे व नंतरच्या भागात पापी लोक कसे वागतात ते दिले आहे. पापकारक हिंसेबद्दलची अधिक माहिती पुढे आहाराच्या भागात आलेली आहे ती पहावी. येथे श्रीकृष्णानी शास्त्राभ्यास करण्यास सांगितले आहे. हा शास्त्राभ्यास आहे पाप–पूण्य विचाराचा व त्याबद्दल आपण येथे थोडक्यात माहिती पाहिली आहे.

**४५.** निसर्गाच्या नियमानुसार न वागणे हेसुद्धा पाप समजले जाते हे एक आणखीन पापाचे कारण आहे.

अनैसर्गिक लैंगिक संबंध पापकारक असतात. समलिंगी व्यवहार दोन पुरुषांतील असेल तर तो पापकारक असतो, परंतु, दोन स्त्रीयांतील असेल तर तो पापकारक ठरत नाही. सर्व प्रकारची व्यसने, मानसिक आणि दैहिक पापकारक असतात. ह्या व्यसनाबद्दलची चर्चा पुढे आली आहे. मदभाव (superiority complex) आणि मत्सरभाव (inferiority complex) व त्यामुळे जे कृत्य केले जाते ते पापकारक असू शकते. म्हणजे, स्वताला अति उच्च अथवा अतिनीच समजणे पापकारक असते. अशी कांहीं पापाबद्दलची कारणे दिली आहेत. ती सर्व टाळणे म्हणजे पुण्यमय जीवन असें समजता येईल. त्याशिवाय, मनुस्मृतीत तिचे पवित्र नियम न पाळणे हे ब्राह्मणांसाठी पापकृत्य आहे असें सांगितलेले आहे. कारण, सनातनी म्हणजे मनुस्मृतीतील पवित्र नियमांचे पालन करणारा असा अर्थ आहे. अर्थात् हे ब्राह्मणेतर हिंदूंना लागू नाही. पुण्य कशात असते ते शेवटी सामोपचाराच्या भागात दिले आहे. थोडक्यात सांगावयाच तर चांगुलपणाच्या, माणूसकीच्या आणि भूतदयेच्या अशा सर्व गोष्टी पुण्यकारक असतात.

## ६. चार वर्णांची माहिती –

**४६.** हिंदू समाजाच्या इतिहासानुसार हिंदू समाजाचे वर्णव्यवस्थेनुसार दोन प्रकार आढळून येतात. पहिला प्रकार वैदिक काळातील असून त्यानुसार वर्ण व्यवस्था माणसाच्या गुण कर्मानुसार ठरवली होती. त्यानंतरचा काळ आहे ज्याला ब्राह्मण काळ म्हणतात, त्यात ही वर्ण व्यवस्था जन्मानुसार ठरवली जाऊ लागली.

भगवद्‌गीता वैदिक काळातील असल्यामुळे तीत वर्णव्यवस्था गुणकर्मानुसार धरून भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला निरुपण केले आहे असें दिसते. मनुस्मृतीचा काळ, हा ब्राह्मण काळ असावा कारण त्यात वर्ण व्यवस्था जन्मानुसार धरलेली आढळून येते. असे साधारणपणे समजतात किं, वैदिक काळ सत्य युगापासून द्वापारयुगाच्या शेवटच्या सत्रापर्यंत असून नंतर कलीयुगात ब्राह्मण काल सुरू होतो. म्हणजे, मनुस्मृती कलीयुगाच्या प्रारंभ काळातील आहे असे दिसते. मनुस्मृतीत ब्रह्मदेवाच्या शरीरातील निरनिराळ्या भागांतून हे चार पुरुष (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र) उत्पन्न झाले असे जे दिले आहे ती ब्राह्मणकाळातील संकल्पना, ब्राह्मणांचे वर्चस्व दाखवण्यासाठी आहे हे स्पष्ट दिसून येते. तिला खर्या हिंदूंनी (असें हिंदू, जे ब्राह्मणधर्माला मानत नाहीत) फारसे महत्व देण्याची आवश्यकता नाही. खर्या हिंदूधर्मानुसार दलित हा शब्द वापरणे गैर आहे कारण खरा हिंदूधर्म गीतेतील गुणकर्मशः असे जे चार वर्ण दिले आहेत ते मानतो, ब्राह्मणधर्माचे जन्मानुसार ठरणारे चार वर्ण मानत नाही.

**४७.** असें असले तरी फलज्योतिष शास्त्रानुसार माणसाचा वर्ण अजूनही वैदिक काळानुसारच म्हणजे, गुणकर्मानुसार सांगितला जातो. म्हणून जन्मपत्रिकेत **अबकहडा चक्रा** च्या तक्त्यात वर्ण त्यानुसार दिलेला आढळतो. तो तुमचा खरा वर्ण आहे असें समजावे. जर तुमचा वर्ण विप्र किंवा ब्राह्मण असेल तर तुम्ही बुद्धिची कामे व अध्यात्मविद्येत काम करण्यास योग्य असे समजले जाते. क्षत्रिय वर्ण असेल तर तुम्ही व्यवस्थापकीय कामं व त्यासंबंधित निर्णय घेण्यास योग्य आहात, पुढाकार घेण्यात समर्थ आहात असे समजावे. वैश्य वर्ण असेल तर तुम्ही व्यापारउदीम, शेती, कारकुनी इत्यादि कामं करण्यास व त्यासंबंधित निर्णय करण्यास योग्य आहात आणि जर तुमचा वर्ण शुद्र असेल तर त्याचा अर्थ तुम्ही कष्टाची व ज्याला पुढाकार (ज्या कामांत निर्णय घ्यावे लागत नाहीत अशी कामे) लागत नाही अशी कामं करण्यास योग्य आहात असे समजावे. फलज्योतिष शास्त्राप्रमाणे पाहिले तर एकाच मातेच्या पोटी असे विविध वर्ण असलेले चार मुलगे जन्मू शकतात.

**४८.** मनुस्मृतीत हे चार वर्ण असें दिलेले आहेत ते असें, पहिला वर्ण आहे ब्राह्मण वर्ण, ह्याचा कर्ता अर्थातच ब्रह्मदेव म्हणजे प्रजापति असे समजतात. ह्या वर्णातील पुरुष बुद्धिजीवी समजला जातो. सर्व प्रकारच्या ज्ञानाच्या शाखांत तो प्रवीण होणारा असावा अशी अपेक्षा असते. त्याशिवाय अध्यात्म साधनेत तो प्रवीण असावा लागतो. असें समजतात किं, वेद अशा ब्राह्मणांनी दिले आहेत. ही झाली मनुस्मृतीच्या काळातील परिस्थिती. कलीयुगात मात्र परिस्थिती तशी राहीलेली नाही. कलीयुगातील ब्राह्मण जातीचा माणूस बुद्धिजीवी असेलच असें नाही. बहुधा तो वैश्यप्रवृत्तिचा असल्याचे आढळते. वैश्य वर्णातील पुरुष व्यवहार चतुर व त्याप्रकारच्या बुद्धिचा (स्मार्ट) असतो तसेंच आजचे ब्राह्मण आहेत. ते तरीसुद्धा स्वताला ब्राह्मण जातीचे म्हणून सर्वोच्च असे समजतात. थोडक्यात कलीयुगातील ब्राह्मण वस्तुतः वैश्य असतो. ह्याचा दुसरा अर्थ असा होतो किं, कलीयुगात वैदिक योग्यतेचे ब्राह्मण नसतात. म्हणजे वस्तुतः कलीयुगात वैदिक योग्यतेचा ब्राह्मण वर्ण उरलेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजे कलीयुगात फक्त तीन वर्ण आहेत व जे स्वताला ब्राह्मण म्हणून सांगतात ते खोटे ब्राह्मण असतात हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे. पौरोहित्य हा एक व्यवसायच आहे असें समजले पाहिजे. म्हणजे पौरोहित्याचा धंदा करणारे ब्राह्मण वैश्य समजले गेले पाहिजेत.
हल्ली मात्र पौरोहित्याचे प्रशिक्षण घेऊन कोणीही स्त्री किंवा पुरुष ज्यांचे शब्दोच्चार स्वच्छ आहेत ते पुरोहित होऊ शकतात आणि ह्यावरून हिंदू परंपरा कशा उत्क्रांत होत आहेत ते समजते. गेल्या हजार वर्षांत अनेक वैश्य जातीच्या लोकांनी स्वतःला ब्राह्मण सांगण्यास सुरुवात केल्याची उदाहरणे

आढळतात. ब्राह्मण सांगण्याचे अनेक फायदे असल्यामुळे हे झाले असावे. काही क्षत्रिय जातीचे लोकसुद्धा स्वतःला ब्राह्मण सांगू लागले अशारितीने सर्व समाजव्यवस्था अस्ताव्यस्त झाली. त्यामुळे खोट्या ब्राह्मणांचा सुळसुळाट वाढला. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात, अशी आज परिस्थिती झाली आहे.

दुसरा वर्ण आहे क्षत्रियवर्ण. ह्याचा कर्ता विष्णू समजतात. ह्या वर्णाचा पुरुष लढावू प्रवृत्तिचा असावा लागतो. त्याशिवाय तो ब्राह्मणासारखा बुद्धिमान व वैश्यांप्रमाणे चतुर (स्मार्ट) असावा लागतो. शासन व्यवस्था सांभाळणे व प्रसंगी स्वसंरक्षणासाठी युद्ध करणे अशी कामे त्याने करावी अशी अपेक्षा असते. क्षत्रियाची स्वाभाविक लक्षणे अशी सांगितलेली आहेत, तो आगाऊ प्रवृत्तिचा असतो. जर जमले तर मुद्दा धरून आपली बाजू मांडतो कारण, त्याच्याकडे चांगली बुद्धिमत्ता असते, पण जर परिस्थिती उलटली तर तो मुद्द्यावरून गुद्द्यावर जाऊन शेवटी जिंकण्याचा प्रयास करतो. जिंकणे हे क्षत्रियाचे अंतिम ध्येय असते. बर्याच वेळा अशा वागण्यामुळे क्षत्रिय पुरुष, समाजातील शांतताप्रेमी लोकांना त्रासदायक वाटतात. मानवधर्म शास्त्रानुसार (गौतमीपुत्र सातवाहनाने तो लिहीला असें मानतात) क्षत्रियांचे दोन प्रकार दिले आहेत. एका प्रकाराला कुलीन क्षत्रिय व दुसर्या प्रकाराला भ्रष्ट क्षत्रिय असें दिले आहेत. कांहीं तज्ज्ञ भ्रष्ट क्षत्रियांना शुद्रांमध्ये पकडतात. कुलीन क्षत्रिय मर्यादा पुरुष असतात व ते कधीही अयोग्य ठिकाणी आगाऊपणा करीत नाहीत. ते आदर्श क्षत्रिय असतात व समाजाला त्यांचा आधार वाटतो. त्यांच्या सहवासात कमजोर, वृद्ध, स्त्रिया, लहान मुलं आणि शरणागत लोक स्वताला सुरक्षित समजतात. ते गीतेत सांगितलेल्या दैवी संपदाचे उदाहरण असतात. त्या ग्रंथातील नोंदीनुसार राज्यकारभार पहाण्याचा अधिकार फक्त कुलीन क्षत्रियांना आहे. युद्धावर जाणार्या सैनिकांत मात्र भ्रष्ट क्षत्रियांचा समावेश अभिप्रेत असतो.

त्या उलट भ्रष्ट क्षत्रियांचे असते. ते क्षत्रिय गीतेत दिलेल्या आसुरी संपदाचे प्रतिनिधि स्वरूप असतात असे म्हणावे. आपल्या ताकदीचा गैरवापर करणे, अत्याचार करणे अशी त्यांची तर्हा असते. कमजोर, वृद्ध, स्त्रिया, लहान मुलं आणि शरणागत लोक स्वतःला त्यांच्या सहवासात असुरक्षित समजतात. भ्रष्ट क्षत्रियाची लक्षणे अशी दिली आहेत, अर्वाच्य वाचा, अभक्ष्यपान आणि व्रात्य क्रिडा हे दोष असणार्यां क्षत्रियांस, भ्रष्ट क्षत्रिय समजावे. अर्वाच्य वाचा, म्हणजे, अपशब्दांनी भरलेली बोलण्याची पद्धत, अभक्ष्यपान म्हणजे, दुर्व्यसनी आणि व्रात्यक्रिडा म्हणजे, उनाडकी करणे. ह्याच्या उलट म्हणजे, कुलीन क्षत्रियांत हे दोष अजिबात नसतात.

थोडक्यात हल्ली जे लोक आज मवाली, गुंड, म्हणून ओळखले जातात ते सर्व भ्रष्ट क्षत्रिय प्रकारातील

असतात. वैदिक काळातील व ब्राह्मण काळातील सर्व क्षत्रिय तसेंच आहेत म्हणजे वैदिक काळातील ब्राह्मण जसा नष्ट झाला त्याप्रमाणे क्षत्रिय नष्ट झाला नाही, त्यांत फरक झालेला नाही. कांहीं क्षत्रिय समाजातील लोकांनी स्वताला ब्राह्मण सांगण्यास सुरुवात केली व आज ते ब्राह्मण म्हणून ओळखले जात आहेत. उदाहरणार्थ, कोंकणातील चित्तपावन ब्राह्मण लोक. असें होण्याचे कारण असें सांगितले जाते किं, वैदिक ब्राह्मणांचा तुटवडा जाणवू लागल्यामुळे त्याची कमी भरून काढण्यासाठी कांहीं राजांनीच वैश्य व क्षत्रियास ब्राह्मणांचे काम करण्यास उद्युक्त केले. कारण, ह्या तिनही वर्णांना द्विज असे सांगितले आहे. म्हणजे जर एक द्विज नसेल तर त्याची जागा दुसर्या प्रकारचा द्विज घेऊ शकतो असा संकेत आहे. म्हणजे जर ब्राह्मणांचा तुटवडा झाला तर त्या जागी क्षत्रिय अथवा वैश्य काम करू शकतो. कारण, ह्या तिघानाही वेदांचे शिक्षण दिलेले असते. असा उल्लेख दक्षिण भारतातील नायक राजांच्या बाबत सांपडतो.

तिसरा वर्ण आहे वैश्यवर्ण. वैश्यवर्णाचा पुरुष व्यवसाय, धंदा, शेती अशी कामे करून जगतो समाजाची अर्थ व्यवस्था ते सांभाळतात. वैदिक काळातील व ब्राह्मण काळातील वैश्यांत कांहींही फरक आढळत नाही. आपली कामे करण्यासाठी जेवढी बुद्धि आवश्यक असते तेवढी बुद्धि त्यांच्याकडे असते. व्यवहार चातुर्य ज्याला हल्ली स्मार्टपणा म्हणतात तो ह्या वैश्यात भरपूर असतो. चतुराई (स्मार्टपणा) हा वैश्याचा मुख्य गुण असतो. नेहमी फायद्यात रहाणे हा वैश्याचा अतिम उद्देश असावा लागतो. कलीयुगातील वैश्य समाजातील बरेच लोक स्वताला ब्राह्मण सांगतात व त्याचा व्यावसायिक फायदा उचलतात. गौडसारस्वत (शेणवी), दैवज्ञ, कुडाळदेशकर अशी कांहीं महाराष्ट्रातील उदाहरणे आहेत.

ह्या तीन वर्णांना द्विज म्हणून एकत्र सांगितले जाते. म्हणजे ते प्रसंगी एकमेकांची कामे करू शकतात.

शेवटचा वर्ण आहे शुद्रवर्ण. ज्याला वर दिलेली कोणतीही कामे स्वतःच्या हुशारीने करता येत नाहीत असा पुरुष शुद्र समजला जातो. तो निर्णय घेण्यास असमर्थ असतो, त्याला आत्मविश्वास कमी असतो. शुद्र पुरुष त्यामुळे सेवकांचे काम करतो. वैदिक काळात असें जरी प्रथमदर्शनी सांगितले जात असले तरी ब्राह्मणकाळात स्वतःला ब्राह्मण म्हणून उच्च समजणारे समाजातील श्रेष्ठी व महाजन मंडळी ह्यांच्या रोषाला बळी पडलेले त्यांचे विरोधी असें अनेक लोक, जे वस्तुतः जन्माने ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य होते, तरी ते श्रेष्ठींच्या आज्ञेने शुद्र ठरवले गेले. त्यांच्यावर बहिष्कार, देशाबाहेर हकलवणे असें अनेक अत्याचार झाले. असे खोटे शुद्र, खोटे म्हणण्याचे कारण, ते लोक कर्तृत्ववान असूनही शुद्र ठरवले गेल्यामुळे, आपल्या हक्कास मुकलेले होते. ब्राह्मण काळात हे फार झाले व समाज व्यवस्था बिघडली आणि हिंदू समाजव्यवस्था उध्वस्थ झाली. जसें कर्तृत्ववान लोक शुद्र ठरवले गेले तसेंच

कांहीं नालायक लोक केवळ वशिल्याने लायकी नसतांना ब्राह्मण व क्षत्रिय जातीत गणले जाऊ लागले. आज हिंदूस्थानातील अनेक शुद्र जाती मुळचे क्षत्रिय असल्याचे संशोधनानंतर सिद्ध झाले आहे. दोन हजार वर्षापेक्षा जास्त काळ होत असलेल्या अशा गैरव्यवहारामुळे हिंदू समाज आज विषण्णावस्थेत गेला आहे. खर्या हिंदूंना ब्राह्मणाच्या जोखंडातून मुक्त होण्याची आज नितात गरज आहे असे दिसते. मूळ क्षत्रिय असलेले महारथ आज महार समजले जात आहेत, गुजरातमध्ये असलेले भंगी व धेड मुळचे भाटिया आणि लोहाणा क्षत्रिय आहेत. तसेंच उत्तरेकडील शुद्र मुळचे जाट (हूण) आहेत. युद्धात हरले कीं त्या हरणार्या क्षत्रियांना शुद्र ठरवण्याचा सपाटा ब्राह्मणांनी लावला होता त्यामुळे हिंदू क्षत्रिय नामशेष झाले व त्यामुळे यवनी आक्रमाणाला तोंड देण्यासाठी कोणी उरले नाही. कारण शुद्र ठरवल्यानंतर त्या क्षत्रियांना शस्त्र हाताळण्यास ब्राह्मण श्रेष्ठींनी बंदी घातली. त्यानी उंची वस्त्र नेसावयाची नाहीत, वेदादी शिक्षण घ्यावयाचे नाही, घोड्यावर बसावयाचे नाही अशा अनेक अपमानकारक बंधनानी त्या हरलेल्या क्षत्रियांचा पुरता मोड केला गेल्यानंतर हिंदूस्तानात यवनांचे आक्रमाणाला तोंड देण्यास कोणी क्षत्रिय राहिले नाहीत. सर्व हिंदूंचा सतत अपमान करणे व पायाखाली दाबून ठेवण्याचा प्रयत्न करणे अशा ब्राह्मणी धोरणानी हिंदू पारतंत्रात गेले. अजूनसुद्धा ब्राह्मणाचे तेंच धोरण आहे असें आपण पहात आहोत.

**४९.** अशारितीने क्षत्रियांचा केवळ आकसांने ब्राह्मण जातीतील लोकांनी नाश केल्यामुळे जेव्हां मुसलमान आक्रमण झाले तेव्हां क्षत्रिय लोक लढण्यासाठी नसल्यामुळे हिंदूस्थान पराजित झाला व मुसुलमानांच्या गुलामगिरीत अडकला. सिकंदराच्या वेळी क्षत्रिय होते म्हणून तेव्हा सिकंदर भारतात येऊ शकला नाही हा इतिहास आहे. बहिष्कार टाकलेले अनेक क्षत्रिय समाज, नंतर मुसलमान झाले. असें बाटलेले क्षत्रिय ब्राह्मणप्रणित हिंदू समाजावर राग काढू लागल्याची अनेक उदाहरणे इतिहासात पहावयास मिळतात. वर्ण व्यवस्था जन्माने केल्यामुळे असें बरेच तोटे झाल्याचे आपण पहातो. हिंदूंच्या नाशांस हे ब्राह्मण धर्मी जबाबदार आहेत हे मान्य करावे लागते.

**५०.** वर्ण व्यवस्था जन्माने केल्यामुळे कांहीं फायदेसुद्धा झाले ते सुद्धा पहावे लागतील. जन्माने वर्ण म्हणजे जात ठरविल्यामुळे गुणी लोकांच्यात "निवडक प्रजनन" होऊ लागले. त्यामुळे अतिशय प्रखर बुद्धिमत्ता असलेले, उत्कृष्ट कसब असलेले, सौंदर्यवान अशा जाती वरच्या वर्गांत तयार झाल्या त्यामुळे त्या हिंदू समाजाची गुणवत्ता सुधारली. हे असें होत असतांना त्याचवेळी निकृष्ट बुद्धिमत्ता असलेला, कोणतीही गुणवत्ता नसलेला, विद्रुप असा एक वर्गसुद्धा वाढत गेला. आज हिंदूंत एकतर उत्तम गुण

असलेले मिळतात व त्यांची संख्या कमी असते व दुसर्या बाजूस गुणहीन असा संख्येने जास्त असलेला समाज वाढत असलेला दिसतो आहे. ह्याचे कारण उत्तम गुणी स्वाभाविकपणे कुटुंब नियोजन करतात व गुणहीन मात्र तसे करीत नाहीत. "निवडक प्रजनन" ही पद्धत उत्तम दूध देणार्या गाई, जास्त अंडी देणार्या कोंबड्या, चवदार मांस देणार्या व लवकर वाढणार्या शेळ्या, उत्तम लोकर देणार्या मेंढ्या तयार करण्यासाठी हल्ली वापरली जाते. माणसांत ती जातीव्यवस्थेमुळे आपण कार्यरत असल्याचे पहातो.

**५१.** स्त्री हा समाजातील अर्धा भाग ह्या वर्ण व्यवस्थेत सुरुवातीपासून दुर्लक्षिला गेला आहे. वैदिक काळात स्त्रीस विशेष स्थान होते असे सांगतात पण ब्राह्मण काळात तिची परवड झालेली आपण पहात आहोत. चार वर्ण, पुरुष प्रधान समाज व्यवस्थेचे द्योतक आहे अर्थात् त्यात स्त्रीकडे दुर्लक्ष होणे अपेक्षित आहे. वस्तुतः स्त्री ह्यात कोठेही बसत नाही म्हणून तिला मनुस्मृतीत शुद्राचा दर्जा देऊन तिचा घोर अपमान केलेला आहे. विज्ञान युगात हिंदू विचारात सुधारणा करून स्त्रीचा वेगळा वर्ण समाजाने मान्य केला पाहिजे. मी त्याला मातृवर्ण असें नांव दिले आहे. जर असा बदल हिंदूधर्माच्या व्यवस्थेत केला गेला तर आणि तरच स्त्रीयांवरील अन्याय दूर होईल, केवळ कायदे करून हे साध्य होईल असे वाटत नाही, असो. फलज्योतिष्यात, जातक स्त्री असली तरी अबकहडा चक्रात तिचा वर्ण दिलेला असतो. निदान तोच स्वीकारून त्या प्रमाणे तिचा वर्ण ठरवला गेला पाहिजे मग तिची जात कांहीही असो, असे ठरवले तरी स्त्रीवरील अन्याय कमी होईल. त्यासाठी जन्मणार्या प्रत्येक बालकाची जन्मपत्रिका तयार करण्याची कायदेशीर तरतुद प्रसुती गृहात असावी तसा, नियम करावा लागेल. त्यातून वैदिक काळातील गुणकर्मविभागशः वर्ण व्यवस्था पुनः प्रचारात आणता येईल.
महाभारतात समाज उच्च कीं नीच हे ठरवण्यासाठी त्या समाजातील पुरूष त्यांच्या स्त्रियांशी कसे वागतात ते पहावयास सांगितले आहे. ज्या समाजातील पुरूष त्यांच्या बायकांशी गैरवर्तन करतात, बडवतात, धाकात ठेवतात ते पुरूष व ते समाज नीच असे सांगितले आहे. त्याच प्रमाणे ज्या समाजातील पुरूष त्यांच्या स्त्रियांशी गैरवर्तन करत नाहीत, त्याना त्यांचा मान देतात बरोबरीने वागवतात ते पुरूष व त्यांचे समाज उच्च असे सांगितले आहे. त्या प्रमाणे पाहिले तर आपल्या महाराष्ट्रातील ब्राह्मण, मराठा आणि महार हे समाज नीच ठरतात कारण त्या समाजातील बायका पुरूषाला घाबरून दबलेल्या मनस्थितीत असलेले दिसते. त्या उलट कोळी, कुणबी, आग्री, भंडारी, सारस्वत, गौड सारस्वत, कायस्थ, क्षत्रिय, प्रभू, दैवज्ञ, असे अनेक समाज उच्च प्रकारात येतात.

## ७. हिंदूंतील पुनर्जन्माच्या विचाराची माहिती –

**५२.** पाप–पुण्याच्या विचारांशी ही पुनर्जन्माची संकल्पना निगडीत आहे. भगवद्गीतेत चौथ्या अध्यायात, श्री कृष्णानी पुनर्जन्माचा उल्लेख केला आहे.

श्री भगवान उवाच

बहुनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।

तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ।। ५ ।। ४

अरे शत्रुतापना अर्जुना, माझे आणि तुझे पुष्कळ जन्म होऊन गेले आहेत. ते सर्व मी जाणतो, जरी तू जाणत नाहीस.

पुनर्जन्मा मागील कारण असे सांगतात किं, माणसाचा जन्म त्याच्यातील आत्म्याच्या उद्धारासाठी असतो. जोवर आत्म्याचा उद्धार होऊन तो स्वयंभू (परमेश्वर) मध्ये विलीन होत नाही तोवर तो पुन्हा पुनः जन्म घेतच रहातो. ह्या विवरणाचा अर्थ असा होतो किं, माणसाचा जन्म उपभोग घेण्यासाठी नसून स्वतः मधील परमेश्वराला ओळखण्यासाठी होत असतो. उपभोग शरीराचे असतात व ते जीवांने शरीरधर्मानुसार भोगावयाचे असतात. शरीरातील आत्म्याने त्यात भाग घ्यावयाचा नसतो. परंतु, अज्ञानामुळे तसें होत नाही व शरीरातील आत्मा त्या भोगांत अडकत जातो व त्याचे अज्ञान वाढत रहाते. अशा परिस्थितीत जेव्हां शरीर निसर्गनियमानुसार जास्त जगण्यास योग्य रहात नाही तेव्हां तो आत्मा ते शरीर सोडून देतो व यथावकाश नवीन जन्म घेऊन दुसरा देह मिळवतो, अशारितीने एका जन्मा नंतर दुसरा, त्या नंतर तिसरा अशा क्रमांने तो अज्ञानी आत्मा पुन्हा पुनः जन्म घेत रहातो. गीतेच्या शब्दांत सांगावयाचे,

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।

तथा शरीराणि विहाय जीर्णाऽन्यन्यानि संयति नवानि देही ।। २२ ।। २

ज्याप्रमाणे एकादा मनुष्य जुनी वस्त्रे टाकून देऊन नवी वस्त्रे परीधान करतो, त्याप्रमाणे देही, म्हणजे आत्मा, जुना देह टाकून नवीन देहाशी संगम पावतो.

हे असें, जोवर तो आत्मा उद्धरला जात नाही तोवर होत रहाते. हेंच माणसाच्या पुनर्जन्माचे कारण असते असें समजले जाते. हिंदूंमध्ये पुनर्जन्माचे कारण हेंच समजले जाते. इतर धर्मांत आत्म्याचे अस्तित्व मानले जात नाही त्यामुळे, शरीरात तो असतो व त्याच्या उद्धारासाठी हें सर्वकांहीं होत आहे असें समजले जात नाही. हिंदूंत देह, जीव, आत्मा व लिंगदेह असें चार घटक माणसाचे असतात असे समजले जाते तसें इतर धर्मात मानत नाहीत, त्यांत फक्त शरीर, जीव असें दोनच घटक आहेत असें

मानतात. बर्याच ठिकाणी जीव व आत्मा ह्यांत गल्लत होत असलेली दिसते. एकंदर सर्वच तर्क विसंगत असते. हे धर्म निसर्गाला ईश्वर मानत नाहीत, त्यांचा देव काल्पनिक असतो व त्याप्रमाणे त्या अनुषंगाने इतर तर्कसुद्धा तसेंच तर्कविसंगत अथवा काल्पनिक असतात. जगाच्या अंती न्याय परमेश्वर देतो, वगैरे काल्पनिक गोष्टींची त्यात भर असते. त्या सर्व धर्मांत माणसाला एकच जन्म असतो असेंच समजले जाते. हिंदूंत मात्र सर्व विचार निसर्गातील ईश्वराला मध्य मानून त्यानुसार असतात व म्हणून तर्कसुसंगत ठरतात. हिंदू विचारानुसार देहाचा, जीव हा एक अविभाज्य हिस्सा असतो व जसें देह मरतो तसें त्या बरोबर त्यातील जीवसुद्धा नष्ट होतो असें समजले जाते. हिंदूंमधील बुद्धधर्मात बुद्धाच्या अनेक जातक कथा प्रचलित आहेत त्यातून बुद्धाने कसा त्याचा आत्मा विकसित केला त्याची माहिती मिळते. फलज्योतिष शास्त्राप्रमाणे गेल्या जन्मांतील कर्मानुसार ह्या जन्मात कोणते भोग आपल्याला भोगावे लागतात ते दिलेले असते त्यालाच आपण नशीब समजतो. त्यात प्रत्येक जन्माला जातक असें म्हणतात म्हणून बुद्धाच्या पुनर्जन्माच्या कथांनी जातक कथा असें म्हणतात. हस्तसामुद्रिक प्रमाणे आपण आपले प्राक्तन आपल्या हातात घेऊन आलेलो असतो.

**५३.** कांहीं शहाणे सांगतात किं, ते, हे सर्व मानत नाहीत. मुद्दा येथे असा आहे कीं, हे जग कोणाच्या मानण्यानुसार चालते ते आपल्याला विचारात घ्यावयाचे असते. जर तुमच्या मानण्यानुसार हे जग चालत असते म्हणजे तुम्हीच देव असतां तर तुमच्या मानण्या न मानण्याचा विचार करणे उचीत ठरले असते पण हे जग तुमच्या मानण्या न मानण्यानुसार चालत नसल्याने तुम्ही काय मानता अथवा मानत नाही ह्याला बिलकूत महत्व रहात नाही. म्हणून कोण माणूस काय मानतो अथवा नाही मानत ह्याचा विचार करण्याला किंमत खरे हिंदू देत नाहीत. हिंदू माणसें निसर्गाला अथवा निसर्गरुपी ईश्वराला काय मंजूर आहे त्याचा अंदाज घेणे उचीत समजतात. ह्यासाठी, कोण (माणूस) काय मानतो अथवा नाही मानत ह्याची चर्चा शहाणे हिंदू करीत नाहीत. गेल्या अनेक पिढ्यांच्या एकत्रित अनुभवानुसार जे ज्ञानानुभव हिंदूंच्या परंपरांत स्वीकारले गेले आहे, तेंच आपण मार्गदर्शक तत्त्व म्हणून स्वीकारत असतो. त्यानुसार पुनर्जन्म माणसाचा होतो हे हिंदू स्वीकारतात. आधुनिक विज्ञानाने जीव ही देहाची रासायनिक चेतना (chemical intelligence) आहे हे जनुकद्रव्य डिएने (DNA) वरील संशोधनाने सिद्ध केले आहे. ह्यावरून  हिंदू विचार किती शास्त्रशुद्ध प्रमाणांवर आधारीत आहे हे स्पष्ट होते. इतर धर्माप्रमाणे हिंदू, केवळ कल्पनारम्य गोष्टींत रहात नाही हे समजून घ्यावे लागेल.

शेवटी एक गोष्ट सर्व हिंदूंनी समजून घेतली पाहिजे ती अशी किं, आपण जे जन्मलो आहोत ते

आपल्यातील परमेश्वराला म्हणजे आत्मारामाला, ओळखण्यासाठी आहे, देहाचे भोग घेण्यात रमण्यासाठी (वेळ फुकट घालवण्यासाठी) नाही. जर ही जाणीव ओळखून हिंदू आपले जीवन जगतील तर त्या हिंदूचे कल्याण होईल. खरा हिंदू तो, जो ही जाणीव ठेवून सावधपणे आपले जीवन व्यतीत करतो.

**५४.** पुनर्जन्मावरून लिंगदेहाचे प्रयोजन काय ते समजते, ते थोडे पहाणे योग्य वाटते, ते असें, आपल्या आयुष्यात आपण षड्रिपुंच्या (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर) आहारी जाऊन बर्याच चांगल्या वाईट गोष्टी करीत असतो. त्यांचा लेखाजोखा म्हणजे लिंगदेह. माणूस जो जन्मतो तो हा लेखाजोखा, नशीब रुपांने बरोबर घेऊनच. प्रत्येक माणसाचे पूर्वजन्माचे हिशोब त्याच्या कर्मानुसार भिन्न असणार, त्याप्रमाणे त्यांचे नशीबसुद्धा वेगवेगळे असणार. म्हणून प्रत्येक माणसाचे आयुष्य वेगवेगळे असते. कोणी श्रीमंत जन्मतो तर कोणी गरीब, कोणी सुंदर असतो तर कोणी कुरुप असतो. सगळी माणसे कधीच एकसारखी नसतात, दोन माणसे कधीच एकसारखी दिसतसुद्धा नाहीत ह्याचे कारण, त्यांचे लिंगदेह वेगवेगळे असतात. इतर प्राण्यांच्या बाबत तसें नसते. ते सर्व सारखेच दिसतात. कारण त्यांच्यात फक्त देह व जीव क्रियाशिल असतात, आत्मा व त्याबरोबर लिंगदेह तेथे असतात परंतु, ते सुप्तावस्थेत असतात. त्याना भोग योनी समजले जाते. फक्त माणसाच्या बाबत हा कर्माचा लेखाजोखा (लिंगदेह) आत्म्याला चिकटून असण्याचे कारण, निसर्गात कर्मविपाकाचा सिद्धांत कार्यरत आहे असे मानतात. कर्मविपाकाच्या नियमानुसार, माणसाच्या प्रत्येक कृतीची समसमान प्रतिक्रिया तिच्या तीव्रतेनुसार उत्पन्न होणे क्रमप्राप्त असते. चांगल्या कामाची चांगली व वाईट कामाची वाईट प्रतिक्रिया उत्पन्न होणे स्वाभाविक असते. गेल्या जन्मातील कर्मांच्या प्रतिक्रिया ह्या जन्मात उमटत असतात. हे असें त्याच जन्मात उमटणे ताबडतोब शक्य नसते कारण, त्यासाठी बरेच हिशोब शक्तिसातत्याच्या नियमांनुसार व्हावे लागतात. त्यामुळे ती प्रतिक्रिया पुढच्या जन्मीच उमटणे शक्य होते. ते शक्य होण्यासाठी हा लेखाजोखा आत्म्याबरोबर येणे जरुरीचे असते. तसेंच त्यासाठी आत्म्याला पुनः जन्म घेणे सुद्धा बंधनकारक ठरते. जो माणूस आपल्या जीवनात कांहीं चांगले अथवा वाईट काम करतो त्याचा परिणाम स्वरूप त्याच्या लिंगदेहातील नोंदणींमध्ये बदल होऊन त्याप्रमाणे दुरुस्त्या होत असतात. शेवटी मरतांना जे अंतिम रुप लिंगदेहाचे असते ते घेऊन तो आत्मा तो देह सोडून बाहेर पडतो. म्हणजे एकाद्या माणसाचा लिंगदेह तो जन्मला तेव्हां जसा होता तसा तो मरतांना नसतो. अशारितीने आत्म्याचा लिंगदेह सतत उत्क्रांत होत असतो. आधुनिक विज्ञानाप्रमाणे माणसाचा डिएनेसुद्धा अशाच प्रकारे बदलत असतो

व माणसाचा डिएने तो जन्मला तेव्हां जसा होता तसा मरतांना नसतो. कदाचित् असे असेल किं, ह्या डिएनेमध्ये लिंगदेहाची सुद्धा नोंद होत असावी. ह्यावरून हिंदू शास्त्रे विज्ञानानुसार जास्त योग्य ठरतात. असें इतर धर्मांबाबत आढळत नाही. आपला आत्ताचा जन्म गेल्या जन्माच्या कर्मविपाकाप्रमाणे असतो त्यात फेरबदल करता येत नाही. म्हणजे आपण आपले नशीब बदलू शकत नाही. गेल्या जन्मी केलेल्या पापकर्मामुळे जर अंधत्व ह्या जन्मी प्राप्त झाले असेल तर त्यात कोणताही बदल आपणहून स्वतः आपण करू शकत नाही. परंतु, दैविक शक्तींच्या मदतीने ते कदाचित् शक्य असते. शाक्तांच्या शिकवणूकीत हे सांगितले आहे. आत्म्याला लिंग नसते परंतु, ह्या लिंगदेहामुळे तो जन्मतो तो त्याच्या लिंगदेहाचे लिंग घेऊन येतो. म्हणून ह्याला लिंगदेह असे म्हणतात. जेव्हां आत्म्याला मोक्ष प्राप्त होतो तेव्हां हा लिंगदेह, म्हणजेच कर्मविपाकाचा हिशोब, शक्तिसातत्याच्या नियमानुसार संपुष्टात आल्यामुळे नाहीसा झालेला असतो. हिशोबाच्या भाषेत बोलावयाचे तर असें म्हणता येईल किं, कर्मविपाकाची निव्वळ बाकी शुन्य झाल्याने तो आत्मा मोक्षपदाला जातो. गौतम बुद्धानेसुद्धा हा कर्मविपाकाचा सिद्धांत मान्य केलेला आहे. एवढी माहिती पुनर्जन्माचे प्रयोजन समजण्यासाठी पुरेशी आहे असें मला वाटते, त्यापेक्षा जास्त माहितीसाठी वाचकांनी शाक्तांतील तंत्रविद्येचा सविस्तर अभ्यास करावा. ह्या माहिती वरून हिंदू आपला पुढचा जन्म कसा असावा ते ठरवू शकतो. संपूर्ण जीवन पापविरहीत जगल्यांने अतिशय चांगला पुनर्जन्म आपण मिळवू शकतो असे हिंदूंच्या शिकवणूकीत दिले आहे. उत्तर आयुष्यासाठी, म्हातारपणासाठी, जसें आपण बचत करतो तसेंच कांहींसे हे आहे. कर्मविपाकाची परतफेड शक्तिसातत्याच्या सिद्धांतानुसार (जेवढ्यास तेवढी) होत असते व म्हणून जगात निसर्गाकडून कधीही अन्याय होत नाही सर्व हिशोबाने होत असते.

आपण पहातो किं, कांहीं माणसे आयुष्यभर सचोटीने जगत असतात परंतु, त्यांच्या जीवनात केवळ दुःख लिहीलेले असते. असे होण्याचे कारण, आज जरी तो इसम सचोटीने जगत असला तरी गेल्या जन्मी त्याने बरेच खोटे काम केले असले पाहिजे व तो ते आज भोगत आहे. तसेंच ह्या जन्मातील चांगल्या कामामुळे पुढील जन्मी मात्र तो सुखात रहाणार आहे हे निश्चित. ह्या उलट असेसुद्धा दिसते किं, एकादा माणूस सदोदित वाईट कामात गर्क असतो तरीसुद्धा तो अगदी मजेत असतो, त्याचे कारण कर्मविपाकाच्या ह्या नियमानुसार त्यांने मागील जन्मी चांगले काम केले होते ते तो भोगत आहे व आता जे कुकर्म करीत आहे ते तो पुढील जन्मी भोगणार आहे. कांही माणसे असे समजतात किं, ह्या जन्मीच्या कर्माची फळे ह्याच जन्मी भोगावी लागतात परंतु, ह्या समजाला हिंदूंच्या शिकवणुकीत आधार नाही, ते त्या त्या माणसांचे त्याचे सोईस्कर असें गैरसमज असतात. म्हणून मी त्या वादात जाणार नाही.

५५. पुनर्जन्माचा संबंध अशारितीने लिंगदेहाशी म्हणजे पर्यायाने नशिबाशी निगडीत आहे म्हणून नशीबाच्या व्यवहाराबाबत जी माहिती आहे ती येथे देत आहे. माणसाचे नशीब व त्याचे व्यवहार पैशाच्या व्यवहारासारखे असतात. जसें पैशाच्या व्यवहारात माणूस पैसे नसतील तर कर्ज काढतो तसें नशीबसुद्धा पुण्याचे कर्ज काढून सुधारता येते, त्याबद्दलचा हिशेब कसा असतो ते पाहूया. देवता गणांकडे मोठा पुण्यसंच असतो. त्यातून कर्ज काढता येते असा समज आहे. त्यासाठी विशिष्ट पद्धतीने पुजा होत असते त्या पुजेत याचक देवतेला आश्वासन देतो किं, तो आवश्यक तेवढा पुण्यसंचय करून ते कर्ज फेडेल. जर ती देवता प्रसन्न झाली तर ती आपले पुण्य कर्जरुपांने भक्तांस देते असे समजले जाते. अर्थात् ते कर्ज असते म्हणजे त्याची परतफेड भक्ताला करावी लागते हे उघड असते. ती परतफेड पापमुक्त व पुण्यकारक जीवन जगून फेडता येते, असे समजले जाते. नवसात जे तो बोलतो जसें, खणा नारळानी ओटी भरीन वगैरे, तर तेवढे करून तो याचक समजतो किं, त्यांने नवस फेडला. परंतु, तो भाग नवसाचा बाह्य भाग असतो, आतील भाग जो अशा नवसांत गृहीत समजला जातो, ज्यात त्यांने पुण्य संच करण्याचे आश्वासन दिलेले असतें ते तसेंच राहून जाते. दुर्दैवाची गोष्ट अशी किं, कोणताही भक्त हा पवित्र नियम पाळत नाही व त्यामुळे तो मृत्युनंतर मोठ्या अडचणीत जातो. ह्यासाठी जर कोणत्याही देवतेकडे नवस करावयाचा असेल तर केवळ (बाह्य) नवस फेडण्याने त्याची सुटका होत नाही हे त्या भक्ताने लक्षात ठेवले पाहिजे. आपल्या ह्या जन्मात कोणते काम केल्यामुळे पुढच्या जन्मी कोणते चांगले अथवा वाईट भोग भोगावे लागतील हे पहाता असें सांगता येईल कीं, हिंदू इसम, ह्या जन्मातील कामाच्या मदतीने त्याच्या पुढच्या जन्माचे भोग ठरवू शकतो. नवसाबद्दल आणखीन थोडे पाहूया. दोन याचक एका देवतेकडे नवस करतात, त्यातील एकाचा नवस पुरा होतो व दुसर्याचा होत नाही. असें होण्याचे कारण, दुसर्याचा पुण्यसंचय कमी आहे असें समजावयाचे असते. त्यासाठी खर्या हिंदूंनी पापमुक्त जीवन जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत जावे. आपली खरी लक्ष्मी आपला पुण्यसंच आहे, पैसे नाहीत. हे हिंदूंनी लक्षात ठेवावे. कारण, पुण्यसंचय ही शाश्वत संपत्ती असते. पैशाची देवता कुबेर अथवा गणपती आहे व ती संपत्ती अशाश्वत असते. सत्कृत्यापेक्षा ध्यान साधना जसें, विपश्यना साधना, सोऽहम् साधना करण्यामुळे पुण्यसंच जास्त होत असतो म्हणून हिंदूंनी अशा साधना मध्ये आपला फावला काळ व्यतित करावा अशी अपेक्षा असते. ह्या आणि अशा अनेक गोष्टींसाठी खर्या हिंदूंनी ब्राह्मण पुरोहितांकडून मार्गदर्शन घेऊ नये कारण, तो नेहमी खोटा सल्ला देतो असा अनुभव आहे. कदाचित् त्यालासुद्धा खरे काय ते माहीत नसते. हिंदूंतील कर्मकांड देवतांना संतुष्ट करून त्याच्याकडून पुण्याचे कर्ज मिळवण्यासाठी असतात. साधारणपणे चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या त्रिसुत्रीने

मनुष्य पुण्य कमवू शकतो. म्हणून हिंदूने ते तीन आपल्या जीवनात आचरण्यात ठेवावे असे सांगितले आहे, ते न पाळण्यामुळे तो पाप करत असतो.

## ८. सत्य, असत्य व हित, अहित ह्याचा पाप–पुण्य संबंधातील विचार –

**५६.** सत्य काय व असत्य काय ह्यावर हिंदूंच्या परंपरेत कोणती माहिती आहे ते पहावयाचे आहे. सत्य म्हणजे काय? एकदा हिंदू तत्त्वज्ञानात हे जग माया म्हणजे भ्रम आहे असें सांगितले जाते व माया म्हणजेच भ्रम म्हणजे खोटे अथवा असत्य आहे असें समजत असतांना दुसर्या वेळी त्यात सत्य पहाण्याचा प्रयत्न करणे कितपत योग्य होईल असा प्रश्न उभा रहातो. ह्याचा अर्थ जे सत्य ह्या जगात असते ते असत्यातील सत्य अथवा सापेक्ष सत्य असते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ज्याला आपण सत्य समजतो ते फक्त कोणत्या तरी एका दृष्टीने सत्य असू शकते व इतर दृष्टीने तेंच असत्य असू शकते. ते कधीही पूर्ण सत्य नसते हे लक्षात घेतले पाहिजे. सांख्य तत्त्वज्ञानाचा हा गाभा आहे. असे असले तरी सर्वच धर्मांत, सत्य बोला असें सांगतात. हिंदूंतील अनेक ग्रंथांतसुद्धा सत्याचा आग्रह धरा असे सुचवलेले असते. असें असले तरी आपण आपल्या आयुष्यात बहुतेक प्रसंगी खरे बोलण्यापेक्षा खोटेच बोलणे जास्त पसंद करतो असा सर्वांचा अनुभव आहे. अशारितीने खोटे बोलण्यामुळे पाप लागते कां? हे बघावे लागेल. असा अनुभव आहे किं माणूस कोणाच्या तरी हितासाठी खोटे बोलत असतो. येथे हिताचा विचार महत्वाचा असतो. आता प्रश्न उत्पन्न होतो किं, कोणाचे हित?

आदिशंकराचार्यांनी त्यांच्या टीकांत "ब्रह्म सत् जगन् मिथ्या", असें लिहीले आहे. येथे ब्रह्म म्हणजे परमेश्वर असा अर्थ घ्यावयाचा आहे. त्याप्रमाणे, परमेश्वर हेंच केवळ सत्य आहे व हे जग म्हणजे निसर्ग खोटा आहे. असे त्यांनी सांगितले आहे. परंतु, आपल्या दैनंदिन व्यवहारात मात्र सत्य वेगळे असते. ते सत्य व शंकराचार्यांचे सत्य ह्यांत कांहींच संबंध नाही. त्यामुळे वरील विधान प्रथम दर्शनी अग्राह्य ठरते. येथे मुद्दा असतो काय केल्याने पाप लागणार नाही. कारण, पापमुक्त जीवन हा माणसाच्या जीवनातील महत्वाचा मुद्दा असतो. जर व्यवहारात आपण सत्य सांगितले व त्यामुळे जर पाप होणार असेल तर ते सत्य पापकारक असल्यानें अग्राह्य ठरते. म्हणजे येथे सत्य कीं असत्य हे कमी महत्वाचे असते, पापकारक कीं, पुण्यकारक, हे महत्वाचे असते. येथे हित व अहित हे सत्य व असत्याशी संबंधित आहेत व ते कसे ते पहावे लागेल. त्यासाठी एक रुपक कथा उपनिषदात दिले आहे ती पाहूया.

**५७.** एक सज्जन एका चार रस्त्यांच्या नाक्यावर उभा आहे व अशा परिस्थितीत तो, एक स्त्री समोरून धांवत येतांना पहातो. ती स्त्री लगबगीने उजव्या फाट्याने पुढे निघून जाते. त्यानंतर थोड्याच अवधींनी दोन धटींगण पुरुष समोरून येतांना तो पहातो. तो समजतो किं, हे दोघे त्या स्त्रीचा पाठलाग करीत आहेत. नाक्यावर आल्यावर ते आजुबाजूस पहातात परंतु, त्यांना ती बाई कोठेही दिसत नाही. त्यानंतर ते ह्या सज्जनास विचारतात, ती बाई कोठे गेली?

आता सज्जनांस प्रश्न पडतो, सत्य बोलावे कीं, असत्य? जर सत्य सांगितले तर ती स्त्री मोठ्या अडचणीत पडणार व त्याचे पातक ह्या सज्जनांस लागणार व जर असत्य सांगितले तर असत्य बोलण्याचे दुषण लागणार. येथे आड व तेथे विहीर अशी परिस्थिती झाली आहे, अशा प्रसंगी काय सांगणे जास्त श्रेयस्कर हे पहावयाचे आहे. ह्या ठिकाणी त्या सज्जनांने ती स्त्री डावी कडे गेली, असे मानेने दाखवून, असत्य सांगून त्या स्त्रीचे संरक्षण केले. ह्याला आपद्धर्म असें म्हणतात.

ह्या कथेत जे घटक गुंतलेले आहेत ते नीटपणे पहावे लागतील. असत्य सांगूनही तो सत्य सांगत होता असे समजावे लागते कारण, ते असत्य चांगुलपणाचे समर्थन करणारे होते. ह्याचा अर्थ हिंदूंच्या विचारसरणी नुसार चांगुलपणा म्हणजेच सत्य असे मानले जाते. कारण, त्यामुळे परमेश्वर त्याच्याकडे अनुकूल होतो. म्हणजे चांगुलपणा परमेश्वराचे द्योतक आहे तर, चांगुलपणा कोणाशी? किती? असें प्रश्न उपस्थित होतात. त्यासाठी चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्यांच्या व्याख्या पहाव्या वागतील त्या अशा आहेत,

- कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरूद्ध जे वागणे त्याला अमानुषपणा असे म्हणतात.*
- मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. चांगुलपणा अद्वैत तत्त्वाशी निगडीत आहे. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला वाईटपणा असे म्हणतात.*
- सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात. *जे त्या विरुद्ध वागतात ते दुष्ट समजले जातात.*

जो हे तीन नियम पाळून त्याचे जीवन जगतो तो पुण्यवंत समजला जातो. पुण्य कमावण्याची ही तीन धोरणं सांगितले आहेत.

ह्या उदाहरणात दोन हित उद्धेश दिसतात. एक त्या स्त्रीचे हित व दुसरे त्या दोन धटिंगणांचे हित.

धटिंगणांचा उद्देश स्पष्टपणे आसुरीसंपदेचा आहे हे उघड दिसते त्यामुळे त्या हितात असत्य (परमेश्वर नाही) आहे म्हणून ते सत्याचे (परमेश्वराशी) अहित ठरते म्हणून त्यज्य ठरते. त्या स्त्रीचा उद्देश स्पष्टपणे दैवीसंपदेशी निगडीत आहे म्हणून तिचे हित सत्याचे (परमेश्वराशी) ठरते व म्हणून योग्य ठरते.

ह्या उदाहरणात दोन पापकृत्ये पर्यायी असल्याचे दिसते, एक पर्याय त्या स्त्रीच्या हिता विरुद्ध वागल्याने होणारे जास्त वाईट पाप व दुसरे त्या धटिंगणांना खोटी माहिती देऊन होणारे कमी वाईट पाप. ह्या दोन पापकृत्यात कोणते जास्त वाईट ते पहावे लागेल. जेव्हां दोन पापांतून निवड करण्याची वेळ येते तेव्हां कमी वाईट पाप करावे व जास्त वाईट पाप टाळावयाचे असते.

अशारितीने सत्य–असत्य, हित–अहित, पाप व पुण्य ह्यांचे परस्पर संबंध कसे असतात हे लक्षात येते. जो हिंदू हे ओळखून ह्याची निवड करून आपली वर्तणूक ठरवतो तो नेहमी पुण्यवान राहिल असे समजले जाते. आपल्या दैनंदिन जीवनात हे ठरवण्याचे अनेक प्रसंग उद्भवत असतात. त्याकरतां ह्याची चर्चा येथे केली आहे.

**५८.** शेवटी वास्तविक सत्य व अध्यात्मातील सत्य ह्यातील फरक समजून घ्यावा लागेल. वरील उदाहरणांत आपण अध्यात्मातील सत्य काय ते पाहिले आहे. जीवनात वास्तविक सत्यापेक्षा अध्यात्मातील सत्य जास्त महत्वाचे आहे असे हिंदू विचार सांगतो. असे असले तरी, वास्तविक सत्याचे काय महत्व जीवनात आहे ते सुद्धा पहावे लागेल. न्यायालयात साक्ष देतांना काय बोलावे असा प्रश्न उपस्थित होतो. कांहीं सांगतील तेथेसुद्धा अध्यात्मातील सत्यच सांगावे परंतु, न्यायालय मात्र तेथे वास्तविक सत्याची अपेक्षा करीत असते. कारण, तेथे हित कोणाचे पहावयाचे, पाप कोणाला लागणार, अध्यात्मातील सत्य व वास्तविक सत्य ह्यांतील तडजोड कशी करावयाची हे सर्व ठरविणे निरनिराळ्या परिस्थितीवर अवलंबून असते. आपली न्याय व्यवस्था वास्तविक सत्यावर निर्धारीत असावी कीं, अध्यात्मातील सत्यावर असावी हे धोरण शासनाला ठरवावे लागेल. सांप्रत जी न्याय व्यवस्था आपल्याकडे अमलात आहे ती पापपुण्यावर आधारीत नाही, ती पाश्चात्य कायद्यांवर आधारीत आहे. कायद्यातील योग्य व अयोग्य ह्यांचा संबंध पापपुण्याशी नसतो. म्हणून जे कायदेशीर आहे ते पुण्यकारक असेलच असें नाही व जे बेकायदेशीर आहे ते पापकारक असेलच असे नाही. असें असल्यामुळे, व्यावहारीक जगात आणखीन एक सत्य ढवळाढवळ करतांना आढळते, त्याला आर्थिक सत्य म्हणूया. पैसे देऊन न्यायालयात सत्य बदलण्याचे प्रकार सदोदित होत असतात ते एक विशेष सत्य न्यायालयात आढळते. त्यामुळे हा मुद्दा विवाद्य असून त्यावर चर्चा करणे ह्या लिखाणाच्या आवाक्या बाहेरचे आहे

म्हणून, ह्या ठिकाणी मला तरी जास्त लिहीण्याची आवश्यकता वाटत नाही. बर्याच प्रसंगी न्यायालयातील सत्य अध्यात्मिक दृष्ट्या असत्य असले तरी ते माणसाला स्वीकारावे लागते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, सत्य व असत्य ह्यांचा संबंध समाजातील भ्रष्टाचाराशी असल्याचे दिसते. बर्याच निवाड्यात न्यायलयाने वास्तविक सत्य ग्राह्य धरल्यामुळे अध्यात्मिक अन्याय होतो असें दिसते.

## ९. हिंदूंचे आहार, विहार व विचार ह्याबद्दलचे मार्गदर्शन –

**५९.** प्रथम आपण हिंदूंच्या आहारा बाबत काय मार्गदर्शन आहे ते पहाणार आहोत. निसर्गाच्या रचनेवरून मनुष्य प्राणी उभय आहारी आहे असे दिसते. हे कसे ठरते ते पहावे लागेल. प्राण्याचा आहार त्याची दातांची रचना व पचनसंस्था कशी काम करते ह्यावर विसंबून असतो. माणसाच्या दातांची रचना त्यातील सुळे व दाढा पहाता, तसेंच त्याची पचन संस्था ज्या प्रकारे काम करते ते पहाता तो मांस व शाक असें दोनही खाणारा प्राणी आहे असें समजते. माणसाच्या आतड्यात जी जीवाणू संपदा (फ्लौरा फौना) असते तीसुद्धा विचारात घ्यावी लागते. माणसाचा शाकाहार व जनावरांचा शाकाहार ह्यांत एक फरक असतो, माणसाला बराचसा शाकाहारसुद्धा शिजवूनच करावा लागतो म्हणून तो पच्य शाकाहार ठरतो. न शिजवलेला कच्चा शाकाहार कमी असतो. इतर प्राणी कच्चा शाकाहार करीत असतात. ह्याचे कारण असें सांगतात किं, माणसाच्या आतड्यातील जीवाणू संपदा शाकाहारी प्राण्याच्या जीवाणू संपदेपेक्षा वेगळी असते. हिंदूनी निसर्गाच्या ह्या आदेशाचे पालन करावयाचे असते, म्हणजे उभय आहार केला पाहिजे. केवळ शाकाहार करणे म्हणजे निसर्गाचे आदेश मोडण्यासारखे, म्हणजे पाप ठरते. आज अज्ञानी माणूस भावनाविवशतेंने काल्पनिक तत्त्वज्ञानाच्या आहारी जाऊन हा निसर्गाचा उभय आहारी राहाण्याचा आदेश मोडीत काढतांना दिसतो. निसर्गाचे नियम न पाळणे हे पाप असें समजले तर निव्वळ शाकाहार करणे हेसुद्धा पापकर्म ठरते. आपण पृथ्वीच्या समशितोष्ण कटीबंधात असल्यामुळे आयुर्वेदा प्रमाणे आहार उभय रहाण्यासाठी पच्य शाकाहाराचा भाग ७० ते ८० टक्के ठेवावा व उरलेला मांसाहार असावा असें आहे. असे धोरण आहाराबाबत ठेवले तर माणसाची प्रकृती उत्तम रहाते असें समजले जाते. परंतु, शीत कटीबंधातील लोकांनी आहार ५० टक्के प्रती ठेवावा. आपल्या पचन क्रियेत आतड्यातील जैविक संपदा ज्याला इंग्रजीत फ्लौरा फौना म्हणतात, त्याचे संवर्धन होण्यासाठी आयुर्वेदात पंचामृताचा किंवा पंचारिष्टाचा उपयोग करण्याची शिफारस आहे. म्हणून खर्या हिंदूंनी दिवसातून एकदा तरी पंचामृताचे चाटण करावे. किंवा पंचारिष्टाची एक मात्रा आठवड्यातून दोनदा घ्यावी. त्यामुळे आतड्यातील जैविक संपदा संमृद्ध होते. आज काल अन्टीबायोटीकचा उपयोग फार

होत आहे, त्यामुळे ही जैविक संपदा नष्ट होत असते त्यासाठी अशा प्रसंगी पंचामृताचे सेवन विशेष महत्वाचे ठरते. अशा बर्याच तरतुदी धर्माच्या पवित्र नियमांत केल्या जातात कारण, त्या धर्मात करण्याचे सांगितले किं, त्यांचे पालन इमाने इतबारे होत असते. एरवी माणसे त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. ह्यासाठी धर्मातील विविध तरतुदीं मागील उद्देश समजून काम करणे चांगले असते. अनेक पुजाविधीत पंचामृताचे चाटण करण्याचे सांगितले आहे ते कां, ते समजू शकतो. दूध, दही, मध, तूप व साखर हे पांच घटक समप्रमाणात मिळून पंचामृत बनवले जाते. पंचारिष्ट बाजारत तयार मिळते ते घ्यावे. अशारितीने विज्ञानाने समृद्ध असा हिंदू विचार आम्हाला अभिप्रेत आहे.

**६०.** शाकाहाराचे खुळ प्रथम जुनाट जैन प्रणालीत सुरु झाले. जैन प्रणाली अहंकारावर अवलंबून आहे. मांसाहारास विरोध सुरु झाला कारण, असा एक गैरसमज पसरवण्यात आला किं, मांसाहार करण्यासाठी प्रथम त्या प्राण्याची जी हत्या करावी लागते त्या हत्येत हिंसा असतें. जैन तत्त्वज्ञाना प्रमाणे, हिंसा करणे पाप समजले जाते. जैन तत्त्वज्ञानात कोठेही हत्या करू नये असे सांगितलेले नाही फक्त हिंसा न करण्याचा संकल्प असतो. तसेंच मांस खाऊ नये असेही सांगितलेले नाही. परंतु, हिंसा केल्याशिवाय हत्या होत नाही असा एक गैरसमज होता व हिंसा आणि हत्या ह्यातील फरक लक्षात घेतला गेला नाही. एका दृष्टीने ते बरोबर होते कारण, त्या काळात विनावेदना हत्या करणे आजच्या सारखे शक्य नव्हते. त्याकारणांने हत्या व हिंसा हे समान समजले गेले. बदलत्या काळात व विज्ञानाच्या प्रगतीमुळे विनावेदना हत्या करणे शक्य झाले आहे. म्हणजे, एकविसाव्या शतकांत हत्या व हिंसा हे एकच राहिलेले नाहीत. म्हणजे अगदी जैन विचारांनुसारसुद्धा विनावेदना हत्या पाप ठरत नाही. हिंदू सर्व प्रकारच्या हिंसांना पाप समजत नाहीत हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. कारण, हिंदूंच्या विचारानुसार जर हिंसा अध्यात्मिक र्हासास कारण होत नसेल तर ती हिंसा पाप ठरत नाही व म्हणून ती हिंसा करण्यास हरकत नसते. हिंसा करण्याची इच्छा नसतांना इतर कारणांमुळे हिंसा झाली तर ती हिंसासुद्धा पाप ठरत नाही. उदाहरणार्थ, खाटीक हिंसा करतो पण ती हिंसा त्याला करण्याची इच्छा नसते केवळ एक कर्तव्य म्हणून तो ती नाईलाजाने करीत असतो म्हणून अशा हिंसेला पाप समजले जात नाही. दुसरे उदाहरण युद्धात लढणार्या योद्ध्याचे घेता येईल. तो युद्धात अनेकांना ठार मारतो पण त्या सर्व हिंसा करण्याचा त्याचा उद्देश नसतो. गीतेत श्री कृष्णानी त्याच कारणांने अर्जुनांस युद्ध करण्याचा आदेश दिला आहे. रस्त्याने चालतांना अनेक छोटे प्राणी मारले जातात, श्वासोंश्वास करतांना असंख्य सुक्ष्म जीव मारले जातात, त्यांत हिंसा करण्याचा उद्देश नसतो म्हणून त्यांमुळे पाप लागत नाही. आजारी माणसास बरे करण्यासाठी शरीरातील लक्षावधी रोगजंतु मारावे लागतात त्यांत हिंसा करण्याचा उद्देश नसतांना जर

हिंसात्मक हत्या झाली तरी ती पाप ठरत नाही. विशेष म्हणजे, हिंसा करण्याचा उद्देश आहे व मनांने ती हिंसा केलीसुद्धा परंतु, प्रत्यक्ष हिंसा जरी झाली नसली तरी ते पाप ठरते. पापाचा उद्देश हा प्रमुख मुद्दा असतो हे पहाता, जर पाप होत नसेल तर अगदी सवेदना हत्या सुद्धा झाली तरी हरकत नसते. निसर्ग सतत हिंसात्मक हत्त्या करीत असतो कारण हत्या झाल्याशिवाय जीवनक्रम चालू रहात नाही. पण त्याचा उद्देश हिंसा करण्याचा नसल्यामुळे त्या हिंसा वैध ठरतात. हा जैन व हिंदू विचारांतील महत्वाचा फरक आहे. गीतेतील विवेचनानुसार माणूस कधीही कोणाचीही हत्या करू शकत नाही. तो केवळ कारणमात्र असतो. एकादी गोष्ट पापकारक आहे कीं नाही ते ठरवण्यासाठी, हिंदूंत उद्देश काय आहे, ते महत्वाचे समजतात परंतु, जैन कृती (उद्देश असो अगर नसो) महत्वाची समजतात. अशा कारणांने जैन विचार हिंदूंच्या मानाने निकृष्ट ठरतो. शेवटी हिंसा अथवा अहिंसा ह्याचा संबंध पाप पुण्याशी आहे व जर पाप होत नसेल तर ती हिंसा वैध ठरते हे लक्षात घेतले पाहिजे. ह्यांत आणखीन एक प्रश्न पुढे येतो तो असा की, हिंसात्मक हत्या जीव करतो किं, आत्मा करतो? जर त्या क्रियेत जीवाबरोबर आत्मा सामील असेल तरच ते कृत्य आत्म्यास बाधते, एरवी नाही कारण, जीवाला पाप व पुण्य दोन्हीही लागू होत नाहीत कारण देह व त्याचा जीव हे एक रासायनिक तत्त्व आहे. ह्याच कारणांसाठी इतर मांसाहारी प्राणी जी हिंसात्मक हत्त्या करतात त्यामुळे त्यांत पाप नसते कारण त्या प्राण्यातील आत्मा सुप्त असतो, तो क्रियाशिल नसतो. ह्या वरून खाटीक व योद्धा हिंसात्मक हत्त्या करूनही निष्पाप रहातात त्याचे कारण समजते तें असें, त्यांचे जीव ते करीत असतात व त्यांचा आत्मा त्या हिंसाचरात गुंतलेला नसतो. दुसर्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, श्रीकृष्णाने गीतेत अर्जुनास म्हणजे त्याच्या जीवांस युद्ध करण्यास सांगितले व त्याच्या आत्म्यास मात्र त्या पासून विमुक्त रहावे असें सांगितले आहे. गीतेत श्रीकृष्ण कोणता सल्ला अर्जुनाच्या जीवाला देतो व कोणता त्याच्या आत्म्याला देतो हे तपासले तर एक वेगळी गीता दृष्टोत्पत्तीस येते. त्या दृष्टीने गीता अजून वाचली जात नाही.

खाटीकांत प्राण्याला जीवे मारणारा व नंतरची कामे करणारा असें दोन असतात. त्यातील जीवे मारणारा विनावेदना मारण्याच्या तंत्रात प्रशिक्षित असावा म्हणजे हिंसा टाळता येईल. इस्लाम मध्येसुद्धा जीवे मारणारा मौलवी असावा लागतो कारण त्या धर्मातसुद्धा प्राण्याचा मृत्यू विनावेदना झाला पाहिजे असा दंडक आहे. तो मौलवी मारतांना अल्लाह कडे क्षमा मागणारी आयता बोलतो व नंतर ती हत्त्या त्याच्या कुवतीनुसार करतो पण आज तंत्रज्ञान इतके प्रगत झाले आहे किं, हे कार्य पूर्णपणे विनावेदना करणे शक्य झाले आहे. त्यामुळे तो प्रश्न आता रहात नाही. मनुस्मृतीतसुद्धा वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणांनी बळी द्यावेत असें सांगितले आहे ते ह्यांच कारणांने असावे असें वाटते. व्याधगीतेत एक तपस्वी ब्राह्मण,

कौशिक, खाटकाचे काम करणार्या ज्ञानी ऋषीस विचारतो, "हे प्राणी मारण्याचे काम तुम्ही कां करता"? त्यावर तो ऋषी सांगतो, "मी हे प्राणी विनावेदना मारतो, जर ते मी नाही केले तर कोणी अज्ञानी ह्या प्राण्यांना सवेदना मारील ते होऊ नये म्हणून मी हे काम करीत आहे. निसर्गाने माणसाला उभयाहारी केले असल्याने मांसाहार करणे माणसांस बंधनकारक आहे तसें न करणे पापकारक आहे".

**६१.** निसर्गाचा गाडा सुरळीतपणे चालण्यासाठी आधी जन्मलेले जीव मरणे क्रमप्राप्त असते. त्यासाठी संत पीटरला एक साक्षात्कार झाला होता त्याची गोष्ट पहावी लागेल. येशुच्या नांवाने स्वताचे संदेश पसरवण्याचे काम करतांना संत पीटर गांवेगांवी भटकत होता. त्याला लोक प्राणी मारून खातात हे अयोग्य वाटल्याने त्याने त्याच्या अनुयायांना मांसाहार न करण्यास सांगितले. असेंच एकदा तो एका गांवी दुपारी ध्यानस्थ बसला असतां, त्याला साक्षात्कार झाला. त्याला त्यात एक सफेद चादर आकाशातून खाली जमिनीवर येतांना दिसली. त्या चादरीवर सर्वप्रकारचे खाद्य प्राणी फिरत होते. पीटरला त्या साक्षात्काराचा अर्थ समजला नाही. तो परमेश्वराला विचारतो, "हे काय प्रभू", त्यावर आकाशातून आवाज आला किं,

"हे सर्व प्राणी माणसांने खावयाचे असा आदेश आहे कारण, मनुष्य हा देवांने उत्पन्न केलेला एक मोठा भक्षक प्राणी असून त्याचे काम हे प्राणी खाऊन त्यांची भरमसाटपणे वाढणारी संख्या नियंत्रित करावयाची असें असते. निसर्गातील प्रत्येक प्राण्यास कांहीं काम नेमून दिले आहे व माणसांस जी अनेक कामे दिली आहेत त्यातील हे एक आहे. अर्थात्, खाण्याशिवाय इतर कारणांने जर त्यांने प्राणी मारले तर ते मात्र पाप ठरेत. खाण्यासाठी मारले तर ते पाप ठरत नाही म्हणून तू व तुझे अनुयायी ह्यापुढे मांसाहार करतील".

त्या साक्षात्कारा नंतर  पीटरने त्याच्या अनुयायांस मांसाहार करण्यास सांगितले.

**६२.** मनुस्मृतीतसुद्धा तशाच स्वरुपाचा आदेश दिला आहे. कोणी कोणाला खावयाचे ह्याबद्दल तेथे सुचना आहेत. जीवो जीवस्य जीवनम्, हे तत्त्व हिंदूंनी स्वीकारलेले आहे. येथे मी संत पीटरची गोष्ट सांगितली कारण आपण हिंदू, जगातील सर्वच संतांचा आदर करतो व त्यांची शिकवण विचारात घेण्यास मोकळे आहोत. अनेक विविध विचार आत्मसात करणे हा हिंदूंचा हक्क आहे. केवळ भारतीयच सूत्रातून विचार आला तर तो स्वीकारावयाचा एरवी नाही असें हिंदू मानत नाहीत. म्हणूनच अल्लाह व येशू ह्यांना आपण उत्क्रांतवादी हिंदू सन्मानाने वागवतो. ब्राह्मणांना ते शक्य नसते. त्यांच्यातील मांगासलेपणा त्यांना ते करू देत नाही. अशा गोष्टी ते प्रतिष्ठेच्या करतात. आतापर्यंत अनेक पंथ व धर्म, हिंदूंनी

आत्मसात करून हिंदू परंपरेत समाविष्ट केलेले आहेत. असेंच एक दिवस येईल, जेव्हां ईस्लाम व ख्रिस्ती, हिंदूंत विरघळून समाविष्ट झालेले दिसतील तेव्हां आश्चर्य वाटावयाचे कारण नाही. कारण, हिंदू परंपरा मुलतः सर्वग्राही आणि अनंत आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी किं, ब्राह्मणांच्या हस्तक्षेपामुळे हिंदूंची ही शक्ति आज काम होत आहे.

मनुस्मृतीच्या पांचवा भागांत ब्राह्मणांनी मांसाहार करण्याबाबतची जी माहिती आहे ती अशी,

अशारितीने द्विजांनी कोणते व कसें खावे ते सविस्तरपणे पाहिले. आता खाण्याचे नियम व मांस खाणे केव्हां टाळावे ते पहावयाचे आहे. २६: ५

मांस पाण्याने शिंपून शुद्ध केल्यावर खाण्यास योग्य होते. ते करतांना मंत्राने तो विधी संपन्न करावा. तसेंच जेव्हां ब्राह्मणाला मांस खाण्याची इच्छा होईल, मंत्रविधीपूर्वक यज्ञ करतांना व प्रकृती सुधारण्यासाठी त्यांने मांसाहार करावा. २७ : ५

ह्या ब्रह्माच्या निर्मात्याने, प्रजापतीने हे सर्व जे उत्पन्न केले आहे ते ब्रह्मतत्त्वाच्या उपजिविकेसाठी, असें मनु सांगतो. म्हणजे सर्व चर व अचर गोष्टी ह्या ब्रह्मतत्त्वाच्या उपजिविकेसाठीच असतात. २८ : ५, टीपः संत पीटरच्या साक्षात्कारात हेंच सांगितले आहे.

अचर गोष्टी (वनस्पती) चरांच्या उदरनिर्वाहासाठी असतात. दांत नसलेले दांत असलेल्यांचे भक्ष असतात. ज्यांना हात नाहीत ते हात असलेल्यांचे भक्ष असतात. जे भित्रे असतात ते धीटांचे भक्ष असतात. २९ : ५ टीपः पहिल्या कारणांनी शाकाहारी प्राण्यांना मांसाहारी खाणार व दुसर्या कारणांनी मनुष्य (हात असलेला) सर्व प्राण्यांना खाऊ शकतो.

खाणारा रोज त्याच्या भक्षास खातो त्यामुळे त्यांस पाप लागत नाही. कारण, विश्व निर्मात्यानी खाणारा व खाल्ले जाणारे असें दोनही त्या प्रकारेच उत्पन्न केले आहेत. थोडक्यात असे म्हणता येईल किं, जीव जीवांवर जगतो. ही निसर्गाची रचना आहे तेव्हां त्यांत दोष काढण्याचा प्रयास करणे उचीत नसते. उलट ह्या व्यवस्थेला विरोध करणे म्हणजे निसर्गाला विरोध करण्यासारखे, म्हणून पाप ठरते. ३० : ५

यज्ञात मांसाहार करणे उचीत आहे. हे देवांनी दिलेल्या नियमांनुसार आहे. त्याशिवाय (खाण्याव्यतिरिक्त) उगाचच प्राणी मारणे हे राक्षसी कृत्य व म्हणून पाप ठरते. ते निक्षून टाळावे. ३१ : ५

जेव्हां पितरांच्या, देवांच्या नांवाने ब्राह्मण मांस खातो तेव्हां ते पाप ठरत नाही. मग ते मांस त्यांने विकत आणले कां कोणी त्याला भेट दिले हे सर्व महत्वाचे नसते. ३२ : ५

द्विज जो हे पवित्र नियम जाणतो त्यानी कधीही ह्या नियमांविरुद्ध जाऊ नये. जर त्यांने असें केले तर, त्याच्या मृत्यू नंतर त्याचे शत्रू त्याला खातील. ३३ : ५

फायद्यासाठी हरीण मारणारा व नियमबाह्य मांस खाणारा (चोरलेले) हे दोघेही सारखेच ठरतात. ३४ : ५

त्याच प्रमाणे जो द्विज श्राद्धाच्या जेवणांत वाढलेले मांस खाण्यास विरोध करतो तो त्याच्या मृत्यूनंतर एकवीस वेळा बळीचा प्राणी म्हणून जन्म घेतो. ३५ : ५

द्विजांनी मंत्राने पुनीत केलेले मांस खावे. तसेंच सनातन रिवाजानुसार तो वेदमंत्रानी पुनीत केलेले मांस खाऊ शकतो. ३६ : ५ टीपः मंत्रानी पुनीत करणे म्हणजे, ते मांस प्रथम परमेश्वराला अर्पण करावयाचा मंत्र बोलावयाचा असतो. हिंदूंनी सर्वच खाद्य पदार्थ खाण्या आधी ते मनानें परमेश्वराला प्रथम अर्पून मग खावे असा संकेत आहे. ह्या बद्दल आगम शास्त्रात बरीच चर्या केली आहे.

स्वयंभूने स्वतः हे सर्व प्राणी यज्ञासाठी निर्माण केले आहेत. यज्ञ विधी सर्व जगाच्या भल्यासाठी असतात म्हणून यज्ञात बळी देणे व एरव्ही मारणे ह्यात फरक असतो. ३९ : ५ टीपः देवतांना प्रसन्न करण्यासाठी यज्ञ केले जात.

वनस्पती, गुरं, पक्षी व इतर प्राणी यज्ञात बळी दिले जातात त्यामुळे त्यांचा उद्धार होत असतो. ४० : ५

पितरांच्या सन्मानार्थ व श्राद्धात मध–लोणी यज्ञात देतात तेव्हां जनावरांचा बळी देणे हे शिष्टसंमत आहे. असें मनु जाहीर करतो. ४१ : ५

वेदांतील आदेशांनुसार बळी देणारा व त्यांने मारलेला प्राणी असें दोघेही स्वर्गात जातात. ४२ : ५

घरात जणूकाय पांच खाटीकखाने आहेत असें म्हणावेसे वाटते. कारण, त्यात शेगडी, पाटावरवंटा, झाडू, खलबत्ता व पाण्याचे पातेले येतात, ह्यांत शाक पदार्थांना शिजवण्यासाठी तयार केले जाते. मनुस्मृती ६८–३

ह्या पांच पापकरक वस्तूंमुळे जे पाप दररोज होते त्याचे निवारण करण्यासाठी पांच विधी सांगितल्या आहेत. त्या विधि त्या गृहस्थाने करावयाच्या असतात. मनुस्मृती ६९–३

मनुस्मृतीच्या तिसर्या भागात वरील पांच खाटीकखान्यांचा उल्लेख आहे. त्यांना खाटीकखाने असें म्हणण्याचे कारण, त्यात शाक पदार्थ खाण्यासाठी तयार केले जातात. ह्याचा अर्थ मनुस्मृतीच्या काळी शाक पदार्थांत जीव असतो हे माहीत होते असें मानावे लागेल. खाटीकखाने म्हणण्याचे कारण, ह्या साधनांचा वापर करून स्वयंपाक करतांना शाक पदार्थांतील जीव वेदनामय रीत्या मारला जातो. जर विनावेदना हे जीव मारले गेले तर त्यांना खाटीकखाने असें म्हंटले नसते. मांसाहारात प्राणी विनावेदना

मारता येतात तसें शाकाहारात करता येत नाही म्हणून, शाकाहार जास्त हिंसक ठरतो. असें असले तरी शाकाहाराचा विशेष प्रचार केला जातो कारण माणसांचे ह्या विषयातील अज्ञान असेंच म्हणावे लागेल.

निसर्गाने माणसास उभय भक्षी केले आहे त्याचा अर्थ माणसांने मांसाहार करणे निसर्ग नियमानुसार उचीत आहे. उलट तसें न खाणे हेंच आक्षेपार्ह असते. निसर्गांने म्हणजेंच परमेश्वराने घालून दिलेले पवित्र नियम पाळणे माणसाचे कर्तव्य असते. शक्यतर हत्या विनावेदना करावयाची असली तरी, हिंसा हत्या अशा अयोग्य सबबी पुढे करून मांसाहारास विरोध करणे हे निसर्गाच्या आदेशाची पायमल्ली करण्यासारखे ठरते. जैन विचार अशारितीने निसर्गाच्या आदेशांविरूद्ध असतात म्हणून ते पापकारक ठरतात. जैन म्हणतात मी मारतो, हेंचमुळी गीतेच्या आदेशानुसार चुकीचे आहे. जैन विचार कसा दिशाभूल करणारा आहे ते इतरत्र आपण पहाणार आहोत. म्हणून जैन विचाराची दखल कोणीही हिंदूंनी घेता कामा नये. ह्याला अपवाद असा आहे किं, जर एकाद्याला मांसाहार आवडत नसेल तर तो त्यांने करू नये कारण, श्रीकृष्णाच्या सांगण्यानुसार जे खाद्य आवडत नाही ते खाऊ नये.

**६३.** हिंदूंना खाण्याबाबत पांच नियम आयुर्वेदात सांगितले आहेत ते असें,

- जे आवडते ते खावे,
- जे पचेल ते खावे,
- पोटापुरते खावे,
- जे आरोग्यास घातक ते खाऊ नये.
- दुसर्यास खाण्याचा आग्रह करू नये.

ह्यांत मांसाहार, शाकाहार वगैरे बद्दल कांहींही उल्लेख नाही हे लक्षात घेतले पाहिजे. ह्यातील पहिले चार नियम स्वतः पाळावयाचे असतात. पांचवा नियम सामाजिक शिष्टाचाराबाबतचा आहे. त्यांत पहिल्या नियमावर दुसरा व त्यावर तिसरा महत्वाचा असतो आणि त्यावर चौथा महत्वाचा असतो. ते असें, आवडणारा पदार्थ पचत नसेल तर तो खाऊ नये, जर आवडणारा पदार्थ पचतो तरी पोटापेक्षा जास्त खावयाचा नाही. तसेंच जर तो आरोग्यास घातक असेल तर खावयाचा नाही. उदाहरणार्थ, साखर आवडते म्हणून गोड खावेसे वाटले तरी जर मधुमेह असेंल तर गोड खावयाचे नाही. अशा प्रकारे खाण्याबद्दल हिंदूंना आयुर्वेदाच्या नियमानुसार मार्गदर्शन दिले आहे. त्याचे पालन हिंदूंनी करावे.

**६४.** हल्ली हिंदू बर्याच कारणांने उपवास करतात. त्यात अनेक वार येतात व कांहीं तिथी येतात.

आयुर्वेदात तसेंच इतर अधिकृत साहित्यातून (योगशास्त्र, वैदिक मार्गदर्शन, मनुस्मृती वगैरे) असें उपवास करण्यास सांगितलेले नाही मग आजचे हिंदू असें उपवास कां करतात? असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचे कारण पहावे लागेल.

हिंदू साधारणपणे पुरोहितांच्या सल्ल्याने आपली धार्मिक कामे करीत असतात. त्याचा असा विश्वास असतो किं, भटजी त्याला योग्यतोच सल्ला देत आहे. परंतु, वस्तुतः भटजी त्याच्या स्वताच्या सोयीचा सल्ला देत असतो. हे सर्व उपवास विनाकारण असतात. आयुर्वेदांत आरोग्यासाठी अधून मधून पोटाला आराम देण्यासाठी उपवास करण्याचा सल्ला दिला आहे पण आज जे अनेक वारांचे शाकाहार, तिथींना उपवास करण्यास भटजी लोक सांगतात त्याला कोठेही आधार नाही. मुख्य म्हणजे, हिंदूंचे सर्व देव मांसाहारी असतांना त्यांचा नैवेद्य शाकाहारी कां? ह्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळत नाही. तरीसुद्धा ह्याला ब्राह्मणांचा सल्ला हेंच कारण आहे. कांहीं लोक शाकाहार केला म्हणजे धर्माचे पालन केले असे उगाचच समजतात तत्त्वतः आहाराचा धर्मपालनाशी कांहीही संबंध नसतो. हिंदूधर्म पालनाचा संबंध फक्त पाप–पुण्य व्यवस्थापनाशीच असतो बाकीच्या गोष्टी ऐच्छीक असतात. ह्या निरर्थक उपास तापासाचे एकमेव कारण ब्राह्मणधर्म हा जैनधर्माचे अनुकरण करीत असतो व भाबड्या अज्ञानी हिंदूंनासुद्धा ते सर्व करावयास भाग पाडत असतो. उदाहरणार्थ, श्रावण महिन्यातील सर्व उपास तापास जैनांच्या पर्युषण काळाची नक्कल असते. आता आपण पहावयाचे आहे किं, वेदकाळांत गोमांसाहार करणारे हे ब्राह्मण आज शाकाहारी कां झाले?

ब्राह्मणांत शाकाहाराची सुरुवात शंकराचार्याच्या काळी झाली. त्या मागील इतिहास पहावा लागेल. तो असा, आदि शंकर समस्त भारतात अद्वैत विचाराचा प्रचार करतांना अनेक इतर विद्वानांना वादासाठी बोलवत असत. वादात जर तो विद्वान पराजित झाला तर शंकर त्याला जीवंत जाळत (ह्याला "अग्निकाष्ठ भक्षण करणे", असं म्हणत) असे. अशारितीने अनेक बुद्ध धर्मिय, जैन धर्मिय विद्वानांचा नाश करून उन्मत्त झालेल्या आदि शंकराचार्यानी गुजरात मधील मंडण मिश्र नांवाच्या जैन विद्वानास वादासाठी आव्हान दिले. वादाची जागा मंडण मिश्राचे घर ठरले. वाद आठ दिवस चालला व अखेरीस मंडण मिश्र हरला. आता त्याला जाळण्यासाठी शंकराचे अनुयायी पुढे सरसावले. त्यावेळी घरातून मंडण मिश्राच्या अर्धांगिनीनी आवाज दिला किं, शंकराने फक्त अर्धा मंडण मिश्र हरवलेला आहे, अजून अर्धा मंडण मिश्र, अर्थात् त्याची पत्नी हरलेली नाही. हे ऐकून शंकारांने तिचे आव्हान स्वीकारले. त्या वादाच्या अटी अशा ठरल्या किं, जर शंकर हरला तर तो व त्याचे अनुयायी जैन धर्म स्वीकारतील व जैनांचे प्रभुत्व व शाकाहार स्वीकारतील व मांसाहाराचा संपूर्ण त्याग करतील व इतर हिंदू जे त्याचे ऐकतात त्यानांसुद्धा

शाकाहार करावयास ह्या ना त्या कारणांनी भाग पाडतील. दुसरी अट अशी किं, वादाचा विषय मंडण मिश्राची पत्नी निवडेल. तिसरी अट अशी किं, वादांत शंकर एकटे भाग घेतील व त्यांना त्यांचा कोणीही सहकारी मदत करणार नाही. चौथी अट अशी कीं, आधीच्या फेरीत जो सरशी करील तोंच पुढच्या फेरीचा प्रश्न विचारेल. ह्या सर्व अटी शंकराने मान्य केल्या कारण त्याचा आत्मविश्वास त्याला सांगत होता कीं, तो कधीच हरू शकत नाही, वादास सुरुवात होणार होती. शंकराला आत्मविश्वास होता किं इतर वेळेप्रमाणे ह्यातसुद्धा तो त्या गृहीणींस सहजपणे हरवेल. आता वाद अद्वैतापुरता मर्यादीत राहीला नव्हता हे शंकराच्या लक्षात आले नव्हते. त्याचा अहंकार एवढा वाढला होता किं, आतापर्यंत एवढे रथी महारथी विद्वान मी हरवले त्यापुढे ही गृहीणी काय टिकणार, अशा उन्मादात तो राहीला होता. त्यातच तो मस्त झाला होता. अशा परिस्थितीत वादांस सुरुवात झाली. मंडण मिश्राची पत्नी शंकरापुढे येऊन बसली व तिने पहिलाच प्रश्न स्त्री-पुरुष संबंधाबाबतचा विचारला. शंकर ब्रह्मचारी व पूर्ण संन्यासी, त्याला त्यात कांहीही समजत नव्हते. तो उत्तर देऊ शकला नाही. त्याच्या भोवती इतर विवाहीत व वेश्यागमनी ब्राह्मण अनुयायी होते पण अटीनुसार तो त्यांची मदत घेऊ शकला नाही. अशारितीने पहिल्या फेरीत शंकर प्रथमच हरला. त्यानंतर आणखीन चार फेर्या झाल्या त्यातसुद्धा तो हरला. वादाच्या अटींतील चौथ्या अटीमुळे शंकरास मंडण मिश्राच्या पत्नीस प्रश्न विचारण्याची संधीच मिळाली नव्हती. शेवटी शंकर हरल्याचे अधिकृतरित्या मान्य झाले व शंकराला ठरल्याप्रमाणे सर्व अटी मान्य करण्याची नामुष्की स्वीकारावी लागली. अशारितीने शंकराला मुख्य मानणारे सर्व ब्राह्मण शाकाहारी झाले व जैनांचे स्वामित्व स्वीकारले. हा शंकाराचा पराभव एक छळ कपट होता पण ब्राह्मणांनी तो मान्य केलेला दिसतोय. त्यानंतर ब्राह्मणांनी अनेक धर्मग्रंथांत आणि पोथ्यांत फेरफार करून देवदेवताच्या नैवेद्यात मांसाहारा ऐवजी शाकाहार सुचवण्यास सुरुवात केली. गाय बदलून तेथे गौ म्हणजे गहू असें बदल केले व मुळच्या मांसाहारी ब्राह्मणधर्माचे शाकाहारीकरण केले. सर्व यज्ञ विधींमध्ये सुद्धा बदल केले गेले व त्यांचेसुद्धा शाकाहारीकरण करण्यात आले. त्यामुळे ते सर्व यज्ञ निरर्थक झाले. कारण सगळ्या वैदिक यज्ञाच्या देवता मांसाहारी आहेत! ब्राह्मण व जैन ह्यांच्यातील साटें लोटें विविध प्रसंगी दिसून येतात. जैनांच्या विविध विधींची नक्कल करण्यात आली जसें, पर्युषण काळात ऋषीपंचमी साजरी होऊ लागली. गणपतीचा जन्म माघातला पण जैनांच्या पर्युषणाबरोबर त्याला भाद्रपदात आणले. अशा कितीतरी गोष्टी ब्राह्मणाच्या जैन असण्याचे पुरावा म्हणून देता येतील. आजही ब्राह्मण जैनांच्यापुढे नतमस्तक होऊनच छुपे जैन झाले आहेत असें दिसते. हिंदूंच्या कोणत्याही धार्मिक विधीत पौरोहित्य करण्याचा हक्क ब्राह्मणांना उरलेला नाही. अशा परिस्थितीत हिंदूंच्या अज्ञानाचा ब्राह्मण फायदा घेऊन

हिंदूंच्या देवतांच्या पुजा करण्याचा धंदा करीत आहेत. हे पाहिल्यानंतर हे ब्राह्मण पुरोहित हिंदू लोकांना विविध वारी व तिथ्यांना शाकाहार करावयांस कां सांगतात ते समजते. असें सांगतात किं, मंडणमिश्राच्या पत्नीच्या अप्रतिम नखशिखांत लावण्याच्या दर्शनाने तरूण वयातील शंकर पाघळून गेला व शरणागती स्वीकारून ती घालील त्या अटी त्यांने मान्य केल्या. शेवटी सांगावयाचे किं, हिंदूंनी आधी दिल्याप्रमाणे आहाराचे पांच नियम पाळावेत बाकी सर्व गोष्टी (वार, तिथ्या इत्यादि) निरर्थक समजाव्यात. कांहीं हौस म्हणून वार, उपवास इत्यादि पाळतात, जर त्यामुळे त्यांना आनंद मिळत असेल तर तसें करण्यास हरकत नसावी. त्यांना धर्माचा किंवा संस्कृतीचा भाग समजण्याची आवश्यकता नाही.

मिथिला नगरीचा राजा जनक ह्यानी चार वर्णाच्या लोकाचे आहार कसे असावेत त्याबद्दल आदेश दिले आहेत ते पाहू.

कोसलचा राजा जनकांना विचारतो कोणत्या वर्णाने कोणता आहार करावा व तसा कां करावा ते सांगा. जनक राजा सांगतो, त्याच्या विदेहात जे नियम आहेत ते ऐक, ब्राह्मणांना बुद्धीचे काम करावे लागते त्यात पांच प्रकारच्या प्रज्ञा आहेत. त्या अशा विचार करण्याची, स्मरण करण्याची, विश्लेषण करणारी, निर्णय घेणारी, नवीन कल्पना करणारी. त्यासाठी ब्राह्मणांना गाईच्या मांसाचा आहार करण्याचे सांगितले आहे. कारण त्या मांसांत ते सगळे आहे जे माणसाला त्या पांचही बुद्धी विकसित करण्यात मदत करतात. लहान प्राण्याच्या मांसात (शेळी, मेंढी, ससा इत्यादि) ते फार कमी प्रमाणात असते म्हणून मोठे प्राणी जसे गोवंश, वृषभ (डुक्कर), घोडा, उंट आहेत ते खावयास सांगितले आहे. क्षत्रियांना बुद्धीप्रमाणे शारीरीक कष्ट करावे लागतात म्हणून त्यांच्या आहारात शाकाहार समाविष्ट करावा असे सांगितले आहे. वैश्यांना क्षत्रियांप्रमाणे मांसाहार व शाकाहार करण्याचे सांगितले आहे. शुद्रांना जास्त अंगमेहनत करावी लागते म्हणून त्यांना जास्त करून शाकाहार करावयास सांगितले आहे. त्या प्रमाणे चार वर्णांचे लोक त्यांचा आहार ठेवतात व त्यामुळे ते आपापली कामं उत्तम प्रकारे करत असतात. मल्लयोद्धे, तलवार चालवणारे, धनुर्धर, अशा क्षत्रियाना शुद्रा प्रमाणे जास्त शाकाहार सांगितला आहे. जे वैश्य दुकारदारी करतात त्यांना बुद्धी जास्त चालवावी लागते म्हणून ते जास्त मांसाहार करतात. म्हणजे कोणाला कसे काम करावे लागते त्याप्रमाणे त्यांचे आहार सांगितले आहेत. शुद्र बुद्धीचा वापर कमीत कमी करतात म्हणून त्यांना जास्त शाकाहार सांगितला आहे. शाकाहार माणसाचे शरीर कणखर व शक्तीमान करते म्हणून तो आहार त्यांना सांगितला आहे. ब्राह्मणांना जास्तीत जास्त बुद्धीची कामं करावी लागतात म्हणून ते जास्त मांसाहार करतात. त्यांच्या आहारात शाकाहार कमी असतो. परंतु, कलीयुगात ब्राह्मण शुद्र होतात म्हणून ते जास्त शाकाहार करतील असे जनक राजा सांगतो.

युधिष्ठीर विचारतो, त्यांची प्रमाणं कशी असावीत ते सांगा. जनक राजा सांगतो, ब्राह्मण आठ भाग मासाहार व दोन भाग शाकाहार करतील. त्यात गाईचे मांस विशेष असेल. क्षत्रियांच्या आहारात चार भाग मांसाहार व सहा भाग शाकाहार असेल. वैश्यांच्या आहारात जे फिरून धंदा करतात अथवा कृषीची कामं करतात ते तीन भाग मांसाहार व सात भाग शाकाहार करतील. जे बसून हिशोबांची कामं करतात ते क्षत्रियांप्रमाणेच त्याचा आहार ठेवतील. शुद्र व सैनिक आठ भाग शाकाहार व दोन भाग मांसाहार करतील.

ब्राह्मणांच्या शाकाहारात फळं आणि उकडलेली कंदमुळं असतील. क्षत्रियांच्या शाकाहारात फळं, हिरव्या पालेभाज्या, धान्याचे पदार्थ जसे चपाती, कडधान्याच्या उसळ वगैरे असतील. वैश्यांच्या आहारात तसाच भाग असेल. शुद्रांच्या आहारात भाज्या, फळं, चपात्या, भात, डाळींची वरणं, असे विविध शरीराला ताकद देणारे शाकाहार असतील.

विद्यार्थी जे गुरूकडे शिकतात ते ब्राह्मणांचाच आहार ठेवतील. महिला त्यांच्या पुरूषांचाच आहार ठेवतील. लहान मुलांना ब्राह्मणांचा आहार द्यावयाचा असतो मग तो कोणत्याही वर्णाचा असो. रुचीनुसार कोणीही त्याचा आहार निवडण्याचे स्वातंत्र्य लोकांना असते मिथिला नगरीत असे जनक राजा कोसलच्या राजाला सांगतो.

## १०. आहारा नंतर विहाराबद्दलचे मार्गदर्शन -

**६५.** विहार म्हणजे शरीराचे विविध व्यवहार जे मनुष्य त्याचे जीवन जगतांना करीत असतो. त्याबद्दल मार्गदर्शन घेण्यासाठी आपल्याला माणसाच्या शरीराबद्दलची माहिती जी योगशास्त्रात दिली आहे ती पहावी लागेल. हिंदू योगशास्त्रात असे समजतात किं, माणूस चार घटकांचा बनला आहे. त्यात देह, जीव, आत्मा व लिंगदेह असे ते आहेत. देह पांच ज्ञानेंद्रिये, पांच भोगेंद्रिये व मन असा बनलेला आहे, त्या बद्दल जास्त लिहीण्याची आवश्यकता वाटत नाही. जीव हि देहाची चेतना आहे मन ही जीवाची अभिव्यक्ति असतें. ज्याला हल्ली आपण जनुकद्रव्य अथवा डिएने (DNA) असे म्हणतो त्यातील कार्यकारी व्यवस्था म्हणजे जीव. जीव देहाबरोबर जन्मतो व देहाबरोबर मरतो. हल्लीच्या काळात संगणक तंत्रात हार्डवेअर व सॉफ्टवेअर असे दोन भाग असतात त्याप्रमाणे देह हार्डवेअर असते व जीव सॉफ्टवेअर असते.
देहाच्या ज्या मुलभूत अशा चार गरजा आहेत त्यांचे व्यवस्थापन जीव पहात असतो. ह्या चार गरजा अशा, पोषण, संरक्षण, प्रजनन व विश्राम आहेत. तिसरा घटक अतिमहत्वाचा व तो म्हणजे आत्माराम

म्हणजे आपण स्वतः आणि चौथा आहे लिंगदेह. लिंगदेह म्हणजे आत्म्याच्या असंख्य पूर्वजन्मांत जे कांहीं घडले त्याचा लेखाजोखा. त्याला लिंगदेह असें म्हणण्याचे कारण, त्याला लिंग म्हणजे, पुःलिंग अथवा स्त्रीलिंग असते व त्याप्रमाणे त्या आत्म्याच्या देहास ते लिंग प्रदान होत असते. म्हणजे, पुःलिंग असल्यास तो आत्मा पुरुष देह धारण करतो व स्त्रीलिंग असल्यास तो आत्मा स्त्रीचा देह धारण करतो. आत्म्याला स्वतःचे लिंग नसते. अशारितीने माणसाचे लिंग ठरत असते. गर्भधारणा झाल्यानंतर कांहीं काळानंतर हृदयाची धडकन सुरु होते. साधारणपणे त्याच सुमारास आत्मा त्याच्या बरोबर असणार्या लिंगदेहासह त्या गर्भात प्रवेश करतो. तेव्हांच त्या देहाचे लिंग निश्चित होत असते. आपण ह्यात फार खोल न जाता फक्त विहारापुरता ह्यां चारांचा विचार करणार आहोत कारण हा विषय फार गहन आहे व ह्या लेखाच्या आवाक्या बाहेरचा आहे. तरीसुद्धा कांहीं माहिती पहावीच लागते, ती दिली आहे.
देहाच्या चार मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी जे कांहीं जीव करतो ते सर्व, विहार ह्या प्रकारात येते.
हिंदूंच्या निरनिराळ्या विचारानुसार येथे मर्यादा तत्त्वाचा उल्लेख करावा लागेल. प्रभु रामचंद्राचा उल्लेख मर्यादा पुरुषोत्तम असा केला आहे हे सर्व जाणतात. म्हणजे विहार माणसांने मर्यादा तत्त्वानुसार करावयाचा असतो. ही मर्यादा त्याने ओलांडली कां त्याचे नुकसान होऊ लागते.

**६६.** एक उदाहरण घेऊन ह्या चार मुलभूत घटकांचे एकमेकांशी असलेले संबंध समजून घेण्याचा प्रयत्न करू या. समजा, एक मोटारगाडी आहे, तिचा चालक आहे व त्यात एक प्रवासी बसला आहे त्याशिवाय त्या प्रवाशाबरोबर त्याची पत्नी आहे. ह्यांत गाडी म्हणजे देह, चालक म्हणजे जीव, एक प्रवासी म्हणजे आत्माराम म्हणजे आपण स्वतः आणि त्याची पत्नी म्हणजे लिंगदेह.
आपले जीवन म्हणजे त्या गाडीचा प्रवास, जोवर चालक गाडी स्वतःच्या उपजत बुद्धिने चालवत असतो तोवर सर्वकांहीं व्यवस्थितपणे होत असते. परंतु, जेव्हां प्रवासी चालकाला त्याचे काम त्यांने कसें करावे ह्यावर सुचना देऊ लागतो तेव्हां गाडीच्या प्रवासांत गोंधळ सुरु होतो. असे होण्याचे कारण, प्रवाशा बरोबर जी पत्नी (लिंगदेह) असते ती प्रवाशाला वेळोवेळी कांहीं सल्ला देऊ लागते. त्या सल्ल्यानुसार आत्मा जीवाला सुचना देऊ लागतो. निसर्ग नियमानुसार प्रवाशाने गुपचुप बसावयाचे असते व चालकाला त्याचे काम त्याच्या उपजत बुद्धिनुसार करू द्यावयाचे असते. पण प्रत्यक्ष जीवनात तसे होत नाही व सर्व प्रकारचे प्रश्न जीवनात उपस्थित होत जातात. आता आपण ह्या उदाहरणातून प्रत्यक्ष परिस्थितीत येऊया. कथोपनिषदात नचिकेता यमास प्रश्न विचारतो त्यात रथाची रुपक कथा आहे त्यात असाच दृष्टांत दिला आहे.

माणसाचे जीवनक्रम हे ह्या गाडीच्या प्रवासा सारखे असते. देहाचे व्यवहार जीव त्याच्या उपजत बुद्धिनुसार न चुकता करण्यास सक्षम असतो पण त्याच्या कामात आत्मा ढवळाढवळ करू लागतो व ते लिंगदेहाच्या सल्ल्याने होत असते. लिंगदेहाकडे त्या आत्म्याच्या पूर्वजन्माच्या अनेक बर्यावाईट आठवणी साठवलेल्या असतात त्यातून हे सल्ला देण्याचे काम आपसुकपणे तो करू लागतो. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे व त्याचे नियंत्रण करणे ह्यालाच योगसाधना असें म्हणतात. खरे योगी जीवाच्या कामांत कधीही हस्तक्षेप करीत नाहीत. पण सामान्य माणसाचा आत्मा ते करण्याची चूक सहसा करीत रहातो व त्यातून जीवनातील गुंतागुंती उत्पन्न होत जातात. हा हिंदू तत्त्वज्ञानाचा मूळ गाभा आहे. देहाच्या चार गरजा (पोषण, संरक्षण, प्रजनन व विश्राम) पूर्ण करण्याच्या कामाला गीतेत योगक्षेम असें म्हंटलेले आहे. आत्म्याने जर त्यात ढवळाढवळ न करता ते सर्व चालू दिले तर माणसाचे जीवन सुखी होऊ शकते परंतु, गोष्टी तितक्या सहज सोप्या नसतात, कारण, गतजन्माच्या भोगवट्यानुसार तो लिंगदेह आत्म्याच्या माध्यमातून जीव व देहाच्या व्यवहारात हस्तक्षेप करतोच! योगसाधना म्हणजे, लिंगदेहाचे ह्या जीव व देहाच्या कामात लुडबुड करणे थांबवणे. कांही प्रकारची लिंगदेहाची लुडबुड हितकारक असते व कांही प्रकारची घातक असते. त्याचा योग्य निर्णय घेणे साधकांस जेव्हां जमते तेव्हां तो साधक योगसाधनेत यशस्वी ठरतो. आता आपण चार मुलभूत गरजांचा व्याप किती आहे ते पहावयाचे आहे. लिंगदेहाचे व्यवहार हा एक मोठा विषय आहे व त्यात आपण शिरणार नाही. योगशास्त्र शिकणार्यांना मात्र तो विषय सविस्तरपणे शिकावा लागतो. चांगला गुरु मिळाला तर तो ते शिकवतो, असो. जीव देहाच्या संवर्दनसाठी ज्या चार गोष्टींवर विचार करतो ते येथे दिले आहेत. शहाण्या हिंदूच्या आत्म्याने त्यांत (म्हणजे जीवाच्या कामात) ढवळाढवळ करावयाची नसते.

**पोषण** – ह्यात जीवनातील बहुतेक व्यवहार येतात. शिकणे, शिकवणे, पैसे कमावणे, काम करणे, उद्योग करणे, खाणे, पिणे, शरीराचे संवर्धन, वगैरे, असे कित्येक येतात. त्यांच्या कमाल व किमान मर्यादा सांभाळून ते व्यवहार करणे हिंदूंसाठी हितकारक समजले आहे. म्हणून त्या मर्यादा समजून आपले जीवन त्यांने व्यतीत केले पाहिजे असे अपेक्षिलेले आहे. ह्या सर्वांत लिंगदेहाचा हस्तक्षेप सतत होत असतो त्याचे योग्य नियमन करणे ह्यालाच जगण्याची कला असे थोडक्यात म्हणता येईल.

**संरक्षण** – जगात माणसाला अनेक प्रकारच्या धोक्यांना सामोरी जावे लागत असते. त्यात स्वतःचे संरक्षण करणे हे एक महत्वाचे काम असते. जीवाला ह्या संरक्षणासाठीच्या ज्या काही गोष्टी कराव्या लागतात त्या ह्यामध्ये येतात. शत्रुपासून संरक्षण हे एक महत्वाचे असते. रोगराई पासून संरक्षण, अपघातापासून संरक्षण, अशी अनेक संरक्षणे जीवाला हाताळावयाची असतात. सद्सदबुद्धी, म्हणजे

योग्य अयोग्य हे समजण्याची बुद्धी, ही संरक्षणाचे काम करण्यात मार्गदर्शन करीत असते.

**प्रजनन** – देहापासून त्याच्या सारख्या देहाची निर्मिती होणे म्हणजे प्रजनन. ते जननेंद्रियांच्या व्यवहारातून जीव करून घेत असतो. ह्या प्रजनन क्रियेचा संबंध लैंगिक कामक्रिडांशी असतो व तेथे हा लिंगदेह मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करून माणसात जरुरीपेक्षा जास्त कामवासना वाढवण्याचे काम करीत असतो. लिंगदेहामुळे जीव व त्याचा देह प्रजनन क्रियेशिवाय एरव्ही लैंगिक क्रियांत देहाला गुंतवून ठेवतो व त्यामुळे अनेक इतर गुंतागुंतीच्या गोष्टी माणसाला अनुभवाव्या लागतात. हे सर्व त्या आत्म्याच्या पूर्वजन्माच्या भोगवट्यानुसार होत असते. हिंदूंमधील खरे योगी प्रजनना व्यतिरीक्त इतर कारणांसाठी लैंगिक क्रियांत स्वताला गुंतवून घेत नाहीत. ह्याबाबतचे मार्गदर्शन बहुधा हिंदूंना त्यांच्या पारंपारीक विचारांतून मिळत असते.

**विश्राम** – देहाला विश्रांतीची नितांत गरज असते. त्यात इतर गोष्टी जशा, विरंगुळा, करमणूक इत्यादि येतात. थकणे हे शरीराचे लक्षण असते. त्यासाठी वेळोवेळी शरीराला आराम देणे आवश्यक असते. जीव हा शरीराचाच एक हिस्सा असल्याने जीवाचे मनसुद्धा थकत असते. एका प्रकारच्या कामात कंटाळा आला तर दुसरे काम करणे हे एकप्रकारचे आराम करणे असते. संपूर्ण विश्रांती केवळ झोपण्यामुळे मिळते. मनाला आनंद देणार्या गोष्टी करण्यानेसुद्धा एकप्रकारचा आराम मिळतो. अशा विविध प्रकारच्या विश्रामाची व्यवस्था करणे हे जीवाचे काम असते. विश्रामाच्या बर्याच कामांत जीवाच्या इतर पोषण, संरक्षण, प्रजनन कामातील गोष्टींचा समावेश होत असतो. विशेषकरून प्रजनन कामातील लैंगिक व्यवहाराचा येथे उल्लेख करावा लागेल. अशाप्रसंगी मर्यादा तत्त्वाचा विशेष विचार हिंदूंने करावयाचा असतो. नाहीतर पापकर्म होण्याची शक्यता असते.

## ११. विचार करण्या बाबतचे मार्गदर्शन –

**६७.** आहार विहार झाल्यानंतर विचार हिंदूंनी कशाप्रकारे करावेत हे पहावे लागेल. माणसाच्या डोक्यात सतत विचार येत असतात. त्यांचे नियंत्रण करणे आवश्यक असते. कारण, ह्या विचारांतूनच आपण पाप, पुण्य करीत असतो आणि ही पाप व पुण्य आपल्या ह्या व नंतरच्या जन्माची दिशा ठरवित असतात. जर विचार सुनियंत्रित असतील तर माणसाचे जीवन सुखी होत असते व जर ते अनियंत्रित असतील तर त्याचे जीवन दुःखमय होऊ शकते. आपल्या डोक्यात दोन प्रकारचे विचार येत असतात. एका प्रकारच्या विचारांना मनाचे विचार व दुसर्या प्रकारच्या विचारांना बुद्धीचे विचार असें समजले जाते. मनाचे विचार भावना व्यक्त करतात व बुद्धीचे विचार तर्कशुद्ध दृष्टीकोन व्यक्त करतात. मनाच्या विचारांत

तर्कशुद्धता नसल्यामुळे ते अनियमित व कल्पनारम्य असतात. आपल्याला अशा दोनही प्रकारच्या विचारांची जगण्यासाठी आवश्यकता असते. तरी जर मनाला आवर घातला नाही तर त्याचे विचार माणसाला मार्गभ्रष्ट करू शकतात. त्यासाठी मनाच्या विचारांना नियंत्रित करण्यासाठी बुद्धीच्या विचारांची गरज असते. देहाच्या विविध गरजा पुरवण्यासाठी जीवाला विविध प्रकारचे विचार करावे लागतात. त्यात कांहीं मनाचे असतात  व कांहीं बुद्धीचे असतात. मनांची माहिती ह्या भागात मनांचे प्रकार सांगितले आहेत त्यानुसार लिंगदेहाचे मन जीवाच्या मनावर दबाव आणण्याचा सतत प्रयत्न करीत असते. ह्या दोनही मनांचे विचार प्रामुख्याने भावनामय व बहुधा कल्पनारम्य असतात.

आत्म्याची बुद्धि ह्या दोन मनांना नियंत्रित करीत असते. अशारितीने विचारांच्या ह्या गुंतागुंतीतून आपले डोके विविध विचार सोडत असते. सामान्य माणूस हे विचार नियंत्रित करण्याचा सहसा प्रयत्न करीत नाही तर तो उलट अशा अनेक विचारात स्वताला गुंतून घेत असतो. जर कोणी हिंदू ह्या विचारांचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न करील तर त्याला त्यात सुरुवातीला फार त्रास होतो. परंतु, सुसंस्कृत हिंदू तो जो आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवतो. असें नियंत्रण ठेवण्यासाठी प्रथम त्याला त्याच्या मनांत येणार्या विचारांचे निरीक्षण करावे लागते. ह्या नियंत्रण करणार्या विचारांना शिपाई बुद्धि असें समजतात कारण, ती अयोग्य विचारांना पायबंद घालत असते. आपल्या डोक्यात पापकारक विचार येऊ नयेत म्हणून ती तसें विचार करण्यापासून मनांला विरोध करते. एकाच वेळी परस्पर विरोधी विचार येण्याचे कारण, जीवाचे मन व लिंगदेहाचे मन अशा दोन मनांतील विचार एकाच विषयावर उत्पन्न होत असतात. आत्म्याच्या बुद्धीला त्यात निवड करावयाची असते व त्याप्रमाणे नंतर आपला देह काम करीत असतो. हिंदूंत अध्यात्म साधना करणे ही एक महत्वाची परंपरा आहे. त्यासाठी थोडे पहावे लागेल. अध्यात्म साधकाला त्याच्या विचारांचे नियमन व नियंत्रण करणे अत्यावश्यक असते. त्यासाठी प्रथम त्यांने आपल्या सर्व मने व बुद्धि विशिष्ट शिस्तीने काबूत ठेवावे लागतात. त्यासाठी तो प्रथम डोक्यातून सर्व विचार काढून टाकतो व पूर्णतया विचारहीन अशा अवस्थेत मेंदू नेतो. बर्याच प्रयत्नाने हें साध्य करता येते. अशारितीने हिंदू साधकाची अध्यात्म साधना सुरु होते. मेंदू विचारहीन अवस्थेत ठेवणे (ह्याला ध्यानसाधना असें समजतात) ही अध्यात्म साधनेची पहिली पायरी आहे. विचारहीन अवस्थेत मेंदू ठेवण्यामुळे आत्म्याची अध्यात्मिक उर्जा सुरक्षित रहाते व त्याचे शक्ति संवर्धन होते त्यामुळे पुण्यसंच वाढतो. म्हणजे पुण्यसंच करण्यासाठी ध्यानसाधना करणे हा एक चांगला मार्ग असतो. सतत विनाकारण विचार करण्यामुळे पुण्यक्षय होतो

म्हणून बिनकामाचे विचार करणे टाळावे.

विचारांबाबत कांहीं गोष्टी विशेष लक्षात घ्यावयाच्या असतात त्या अशा, जेव्हां आपण एकाद्या ज्ञानेंद्रियावर आपले लक्ष एकचित्ताने केंद्रीत करतो त्यावेळी आपण कोणताही इतर विचार करू शकत नाही. म्हणजे समजा तुम्ही एकादे गाणे एकचित्ताने ऐकत असाल तर त्या क्षणी तुम्ही इतर कोणताही विचार करू शकत नाही. म्हणजे जर विचार करणे बंद करावयाचे असेल तर कोणत्याही एका ज्ञानेंद्रियावर आपले लक्ष केंद्रित करावयाचे असते. ते ज्ञानेंद्रिय कान असेल अथवा डोळा असेल, त्वचा असेल, किंवा नाक असेल, जीभ असेल, किंवा तुमचा श्वासोंश्वास असेल.

दुसरा विचार प्रक्रियेचा गुण असा किं, एका वेळी एकच विचार मनांत असतो. जसें समजा तुम्ही जप करत आहात, त्यावर एकचित्त झाले आहे असें झाले असेल तर त्यावेळी बाकी सर्व विचार बंद झालेले असतात.

तिसरा गुण असा किं. विचार प्रक्रिया सवय प्रधान असते. म्हणजे एका प्रकारे विचार करण्याची जर तुम्हाला सवय झाली तर तुमच्या मेंदूत आपसूकपणे तेंच तेंच विचार येत रहातात. योग्य विचारांची सवय करण्याने चांगल्या सवयी आपण स्वताला लावू शकतो. समजा तुम्ही लैंगिक विचार करण्याची सवय लावली तर तेंच तेंच विचार येत रहातात व तुम्ही त्या वासनेत अडकत जाता. समजा तुम्ही तुमच्या आराध्य दैवतेचा जप करण्याची सवय मेंदूला लावली तर तुमचा मेंदू सतत जप करीत राहील व इतर विचार येणे बंद होईल. हिंदूंच्या अध्यात्म साधनेत विचारांचे हे तीन गुण हुशारीने वापरून साधक चांगली प्रगती करू शकतो. माणसाचे विचार प्रथम परा वाणीत व्यक्त होत असतात. नंतर ते इतर वाणींत येतात. हे असें जरी असले तरी जीव त्याच्या देह संवर्धनार्थ जे आवश्यक विचार उत्पन्न करतो ते विचार नेहमीच प्राथमिकतेने मेंदूत येत असतात. आपण नेहमी अनुभवतो किं, विचारशुन्य अवस्थेत असतांना अचानक भलतेंच विचार उसळी मारून मेंदूत येतात. ते साधकाला मोठे आव्हान असते. उदाहरणार्थ, समजा तुम्ही विचारशुन्य अवस्थेत आहात व तुम्हाला भूक लागली तर मेंदूत खाण्याचे विचार उसळी मारून येतात.

हिंदूंना आपले जीवन सुखी व्हावे असें वाटत असेल तर त्यांने त्याच्या विचारांचे सुयोग्य नियमन व नियंत्रण करण्याची सवय स्वताला लावावी लागेल. त्यासाठी कांहीं प्रश्न त्यांनी त्याच्या मेंदूत येणार्या विचारांबद्दल विचारावयाचे असतात. ते असें, हा विचार माझ्या डोक्यात कां आला? कोठून आला? कसा आला? अशारितीने जर बिनकामाचे विचार येत असतील तर असें प्रश्न विचारू लागल्यास ते वाह्यात विचार येणे सवयीने बंद होते. आपल्या डोक्यात बिनकामाच्या विचारांची संख्या जास्त असेल

तर त्यांचे नियंत्रण करणे जरुरीचे असते. बिनकामाच्या विचारांमुळे मानसिक व्यसने लागतात. तसेंच अशा विचारांमुळे कांहीं दैहीक व्यसनेसुद्धा लागतात.
विचार हे सर्वच गोष्टींचे मूळ असल्याकारणांने हिंदूंना त्यांच्या विचाराचे चांगले व्यवस्थापन करता आले पाहिजे. अधिक चर्चा मनाचे विचार मध्ये आहे ती पहावी.

## १२. शुभ मुहूर्ता बाबत –

६८. हिंदूंच्या बर्याच गोष्टी शुभ व अशुभ मुहूर्तावर अवलंबून असतात. कोणतेही काम करावयाचे म्हणजे त्यासाठी सुमुहूर्त पहाणे हि एक हिंदूंसाठी नित्याची बाब असते. त्यासाठी भटाला बोलावून त्याच्या कडून पंचांग पाहून शुभ मुहूर्त शोधून त्या वेळी ते काम करण्याचा प्रघात आहे. नियोजित काम यशस्वी व्हावे म्हणून हे सर्व करतात. एवढे करूनही बर्याच वेळी काम बिघडते असा अनुभव आहे. मुहूर्त पहाण्या मागील उद्देश असा असतो किं, आपल्या सर्व कामांवर ग्रहांचा प्रभाव असतो व योग्य मुहूर्त पाहून काम केले किं, ग्रह अनुकूल होतात असा समज आहे.
ह्या संदर्भात एक गोष्ट साईबाबांची सांगतात ती अशी किं, एकदा त्या गांवाचा पाटील आपल्या मुलाचे लग्न काढतो. त्यासाठी सुमुहूर्त पहाण्या आधी तो बाबांस भेटतो व आपला मानस त्यांना सांगतो. बाबा त्याला सांगतात किं, मुहूर्त कशासाठी पहावयाचा? करून टाक लग्न लवकर, त्यावर पाटील ते मानत नाही व भटाकडून मुहूर्त काढून मुलाचे लग्न उरकतो. एक वर्षात त्याचा मुलगा मरतो, त्यावर बाबांकडे तो दुःखी अंतःकरणांने जाऊन तक्रार करतो तेव्हां बाबा त्याला सांगतात किं, तू जर मी सांगितल्याप्रमाणे पटकन लग्न केले असतेस तर हे झाले नसते पण तू माझे ऐकले नाही. त्यानंतर बाबांनी जे प्रबोधन केले ते असे कीं, देवाच्या खर्या भक्तांने मुहूर्तासारख्या गोष्टी आपल्या देवावर सोडाव्यात. माणूस जर मुहूर्त पाहून काम करील तर त्यात चुका होतातच. त्याला अनेक कारणे असू शकतात, पंचांग चुकीचे असणे, भटाचे ज्ञान कमी असणे, घडाळ्यातील वेळ चुकीची असणे अशी कितीतरी कारणे असू शकतात. तात्पर्य असें किं, हिंदूंनी आपले काम करीत जावे. जशी वेळ येईल तसे काम करीत जावे. काम प्रामाणिकपणे व बिनचुक करण्यावर भर असावा व बाकीच्या गोष्टी आपल्या देवावर सोडाव्यात म्हणजे अशी वेळ आली नसती. भगवत गीतेत कृष्ण सांगतात, "कर्मण्ये वाधिकारस्ते मां फलेषू कदाचन," म्हणजे तू काम बरोबर कर व फलाची गोष्ट माझ्यावर सोड. बाबांच्या मते सर्ववेळा चांगल्याच असतात पण आपले प्राक्तन जर खोटे असेल तर कितीही चांगला मुहूर्त काढून ते काम केले तरी ते फसण्याची

शक्यता असते. परंतु, जर देवाची कृपा असेल तर मुहूर्त चुकीचा घेतला तरी कांहीं बिघडत नाही. त्यावर तो पाटील बोलला, तुम्ही आमचे देव, तरी असे कसें झाले? त्यावर बाबा बोलले, अरे वेड्या, मी तुला पटकन लग्न उरकण्यास सांगितले होते पण तू ते (देवाचे) ऐकलेस कां? मी तुला तोच मुहूर्त दिला होता त्यावर तू मुलाचे लग्न केलं नाहीस त्याला मी काय करणार?

तात्पर्य असें किं, आपले काम करीत जा, वेळ देवावर सोडून त्याला स्मरून प्रामाणिकपणे काम करीत जाणे हेंच माणसांचे काम असते. साईबाबांचा हा संदेश हिंदूंनी लक्षात ठेवून आपली कामे करावीत. शुभ मुहूर्त शोधण्यात वेळ घालवू नये.

## १३. अध्यात्म साधनेच्या विविध पद्धतींबद्दल –

**६९.** ह्यात आपण "प्रापंचिकाची अध्यात्म साधना", ह्या विषयाची माहिती करून घ्यावयाची आहे. प्रापंचिकाची अध्यात्म साधना व मोक्षार्थीची अध्यात्म साधना ह्यातील मोठा फरक असां किं, प्रापंचिक इसम संसारात गुंतलेल्या अवस्थेत ती साधना करीत असतो व मोक्षार्थी बहुधा प्रपंचापासून मुक्त असे जीवन जगत असतो, त्याला प्रपंचाच्या विवंचना नसतात. प्रापंचिकाच्या अध्यात्म साधनेचा मुळ उद्देश असा असतों किं, जीवाच्या कामापासून आत्म्याने दूर रहावे. ते समजण्यासाठी जीवाचे षड्विकार व आत्म्याचे, ह्यातील फरक प्रथम समजून घ्यावे लागतील. म्हणजे, जीवाचे काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर अशा सहा प्रेरणा व आत्म्याचे तेंच सहा विकार ह्यातील फरक काय ते लक्षात घ्यावयाचे असते. जेव्हां ते आत्म्याला असतात तेव्हां त्यांना षड्रिपू (सहा शत्रू) असे सांगतात पण जेव्हां ते जीवाचे असतात तेव्हां त्याना सहा शत्रू असें सांगितले जात नाही उलट सहाय्यक समजले जाते. ह्याचे कारण आपल्याला समजून घ्यावे लागेल. क्रोध, मद व मत्सर जीवाच्या संरक्षणासाठी असतात व काम, लोभ आणि मोह देहाच्या संवर्धनासाठी असतात. म्हणजे, प्रापंचिक हिंदूंच्या अध्यात्म साधनेत ह्यांचे व्यवस्थापन हांच मुख्य विषय असतो. देव वगैरे गोष्टी तेवढ्या महत्वाच्या नसतात. कारण, हिंदूमध्ये देव मानणारे व न मानणारे असें दोन प्रकारचे असतात. अशा दोघांनाही आचरणात आणता येईल अशी साधना असावी लागते. ह्यासाठी आपण प्रथम ह्या सहांची सविस्तर माहिती पहावयाची आहे.

### सहा दोषांची माहिती –

**इच्छा (काम)** – आपण प्रथम पाहिले आहे कीं, ह्या सृष्टीची निर्मिती स्वयंभूला इच्छा झाल्यामुळे होत आहे. त्यामुळे इच्छा ही एक प्राथमिक प्रेरणा आहे जी आपण नाकारू शकत नाही. आपल्या सगळ्या विचारामागे व कृती मागे कोणती तरी इच्छा असते. प्रश्न असतो त्या इच्छेचे नियमन कसे करावे म्हणजे

ती आत्म्याच्या उद्धारास पोषक असेल. कांहीं योगी इच्छा नष्ट करण्याच्या गोष्टी करतात पण ते शक्य नसते. कारण, इच्छा म्हणजे काम हा अंतिम असतो व तो मोक्षप्राप्ती नंतरसुद्धा आत्म्याबरोबर रहातो फक्त त्याचे स्वरुप वेगळे असते. म्हणून काम ह्या प्रेरणेची विशेष माहीती करून घेऊ. आत्म्याला जन्म घेण्याची इच्छा होते व त्यातून सगळी प्रक्रिया पुढे वाढत असते. कामाचे नियंत्रण म्हणजे त्याला किमान पातळीवर ठेवणे. त्या पूर्णतया संपवणे शक्य नसते. कामाच्या चार अवस्था असतात. प्राथमिक काम, आवश्यक काम, अनावश्यक काम आणि वाह्यात काम. शरीराच्या संवर्धनासाठी आवश्यक काम असतो जसे भूक, झोप, विश्रांती, मनोरंजन, सूत्र, शौंच विसर्जन इत्यादि आवश्यक काम ह्या प्रकारात असतात. कामाची सुरूवात जीवाच्या गरजेतून होत असते. जो शरीराचा नियंत्रक व संयोजक असतो. जीव ते कार्य आत्म्याच्या हस्तक्षेपा शिवाय करत असतो. प्रश्न तेव्हां उपस्थित होतात जेव्हां आत्मा त्यांत हस्तक्षेप करू लागतो. त्यातून अनावश्यक आणि वाह्यात इच्छा सुरू होतात ज्या शरीराच्या नसतात. लिंगदेहाच्या प्रभावाखाली तो अज्ञानी आत्मा तसे करण्यास उद्युक्त होत असतो.

त्याच्यासाठी प्रथम आपल्याला समजले पाहिजे इच्छा कशी उत्पन्न होते. ती प्रक्रिया समजली तर इच्छा नियंत्रण करणे शक्य होते. अज्ञानी त्या प्राथमिक प्रक्रियांनासुद्धा इच्छा समजतात ते योग्य नसते. त्या विचाराच्या अवस्था असतात. त्या विचारांच्या अवस्था पाहू काय असतात.

पहिली अवस्था असते कीं, कांही गोष्टीचा संपर्क येतो कांहीं कारणांने. ते समजण्यासाठी लहान मुलाचे उदाहरण घेऊ, लहान मुलगा एक लाल रंगाचा चेंडू पहातो.

दुसरी अवस्था **कुतूहल**, त्याच्या मनात त्या चेंडूबद्दल कुतूहल उत्पन्न होते. त्यामुळे त्याच्या मनात अनेक प्रश्न येतात, ते असे, हे काय आहे? हे कसे आले? कोठून आले? हे कसे झाले? ते का आले? त्याचे नांव काय? मला मिळेल का? त्याचा मला फायदा होईल कां? त्यामुळे मला त्रास होईल कां? त्यामुळे मला अडचण होईल कां? ते कां आले येथे? ते कोठे जाणार आहे कां? ते केव्हां जाणार कां येथेच असणार? असे तेरा प्रश्न त्याच्या मेंदूत येतात. ते विचार म्हणजे कुतूहल असे समजतो. हे कुतूहलाचे प्रश्न असतात. ते प्रश्न जीवाचे असतात कारण त्याला त्याच्या शरीराचे संरक्षण करावयाचे असतात. जीव ते प्रश्न त्रिकुटाला विचारत असतो. त्रिकूट म्हणजे जीव, आत्मा आणि लिंगदेह. हे तिघे एकत्रितपणे त्या देहाची जोपासना करत असतात. जर त्याची उत्तरं त्या तिघांकडून सोयिस्कर असतील तर पुढची विचाराची अवस्था तयार होते व जर सोयिस्कर नसतील तर ते मुल चेंडूला विसरते व विचारांच्या पुढच्या क्रिया ज्यामुळे शेवटी इच्छा होणार त्या होत नाहीत व ते तेथेंच थांबते. परंतु, जर सोयिस्कर

असतील तर पुढची अवस्था जिला आकर्षण ती सुरू होते. जर त्यामुळे त्रास होईल असे वाटले तर त्याला चेंडूबद्दल तिरस्काराची इच्छा (विरुद्ध इच्छा) सुरू होते. अध्यात्म साधना करणार्याला त्या अवस्था समजणे आवश्यक असते त्यामुळे तो त्याचे विचार आणि त्यातून उत्पन्न होणार्या इच्छांचे नियंत्रण चांगले करू शकतो. समजा, आकर्षणाचे विचार आले तर काय होते ते पाहू.

**आकर्षण** – हि कुतूहलाची दुसरी अवस्था असते. त्यात अनेक तीव्रतेच्या प्रेरणा आढळतात. त्यात लिंगदहाच्या जुन्या (गेल्या जन्माच्या कदाचित) आठवणी काम करत असतात. लिंगदेहाला तो ओळखीचा वाटू लागतो. ती आकर्षणाची प्रक्रीया कांहीं काळ होत असते. त्यानंतर तो चेंडू योग्य आहे घेण्यासाठी असे जर ठरले तर कुतूहलाची तिसरी अवस्था सुरू होते. कांहीं वेळा त्या ऐवजी तिरस्काराची प्रेरणा होऊ शकते व पुन्हा तो बाळ त्याला नाकारून पुढच्या इच्छेच्या क्रिया बंद होऊ शकतात. समजा ह्या अवस्थेत आकर्षण वाढले तर कुतूहलाची चौथी अवस्था सुरू होते. तिला परिचय म्हणतात.

**परिचय** – ते मुल त्या चेंडूला हातात घेते. आता कुतूहल संपून आकर्षणाची परिचय हि अवस्था सुरू झालेली असते. ते त्या चेंडूचे निरिक्षण करू लागते. ते तेरा प्रश्न नव्या रुपात पुन्हा सुरु होतात. जर जीवाला कांहीं कारणाने तो चेंडू आवडला नाही तर तेथे पुन्हा तिरस्काराची प्रतिक्रीया सुरू होऊन ते बाळ तो चेंडू दूर फोकून देते. तेथे त्याबद्दलची इच्छा संपते. ते झाल्यावर त्या बाळाची इतर गोष्टी पहाण्याची प्रेरणा सुरू होते. कांहीं नाही मिळाले तर कदाचित तो पुन्हा त्या चेंडूकडे आकर्शित होतो. येथे परिचय हि अवस्था संपते व पुढची पांचवी अवस्था मैत्री अथवा लगाव त्या चेंडूबद्दल सुरू होते.

**लगाव** – ही कुतूहलाची पांचवी अवस्था आहे. परंतु अजून इच्छा सुरू झालेली नाही. ह्या अवस्थेला प्राथमिक इच्छा असे समजले जाते. ती प्राथमिक इच्छा कांहीं काळ असते ते लगावाचे किंवा मैत्रीचे रुप असते. पण ती इच्छा नसते कारण अजून तुटातूट होऊ शकते. प्रेम विवाहात ह्या अवस्थांचे स्वरुप नेहमी आढळते. पहिले कांहीं महिने प्रेम रहाते व नंतर ते संपते त्याची इच्छा नष्ट होते व मग घटस्फोट होतो हे त्याचे कारण असते.

लगावाचा काळ संपताना तरी मैत्री जोरात असेल तर त्याचे सहाव्या अवस्थेत, आवडीत रुपांतर होते. ही इच्छेची खरी अवस्था असते. म्हणजे त्या बाळाला त्या चेंडूची इच्छा झाली असे समजू शकतो.

आवड – ही सहावी अवस्था असते. प्रेम करणार्यांच्या बाबत असे सगळे घडतांना आढळते. आवडीच्या अवस्था अधिकाधिक तीव्र होत जातात. तसे झाले तर त्यातून सुटका नसते. तो त्यात पुरता अडकलेला असतो. ही इच्छेची अवस्था त्याच्यात त्या गोष्टीबद्दलच्या मालकीची आणखीन एक इच्छा सुरू करत असतो. अशी अवस्था अनेक मोठ्या संकटाना आवहन करणारी असते. प्रेम विवाहात जेव्हां एकाला दुसर्याबद्दल मालकीची इच्छा होते तेव्हां त्या दुसर्याला जर तेवढा लगाव नको असेल तर पुन्हा तिरस्कार आणि काडीमोड होत असते.

सवय - समजा कोणीही मालकी न सांगता एकमेकांना बरोबरीच्या नात्याने सांभाळण्याची तयारी असेल तर त्या इच्छेचे सवयीत रुपांतर होत असते. ती इच्छेची अंतिम व सातवी अवस्था असते त्यातून सुटका नसते. प्रेम विवाह जेव्हां ह्या अवस्थेला पोहोचतात तेव्हां तो प्रेमविवाह यशस्वी झाला असे समजले जाते.

त्यासाठी इच्छा न होण्यासाठी कोणतेही संबंध परिचय ह्या अवस्थेपुढे जाऊ द्यावयाचे नसतात. म्हणजे काम नियंत्रित करता येतो.

काम दोषाचे नियंत्रण औदासिन्याने करता येते. शरीराच्या गरजांच्या पेक्षा जास्त कोणत्याही गोष्टीला उत्तेजन न देण्याने हा दोष नियंत्रित करता येतो त्यामुळे पुढील नुकसान होत नसते. अशा नियंत्रित कामाला योगक्षेम असे सांगतात. त्या योगाला मर्यादा असे समजतात. ज्याला त्याच्या मर्यादा समजल्या तो कधीच वाह्यात इच्छा धरत नाही. शरीराच्या पांच ज्ञानेंद्रीयांचे पांच काम असतात ते पाहू.

नेत्र काम – सुंदर पहाण्याची इच्छा असे त्याचे स्वरुप आहे. परंतु, अशा इच्छेतून जर दुसर्या व्यक्तीबद्दल नऊ पैकी एक किंवा जास्त प्रतिक्रीया तुमच्यात सुरू झाल्या तर मात्र तो नेत्रसुखाचा काम पापकारक नसला तरी त्रासदायक होण्याची शक्यता असते. त्या नऊ पापकारक प्रतिक्रीया अशा आहेत, प्रेम, द्वेष, क्रोध, दुःख, दुर्दैव, सुख, तिरस्कार, भीती, गर्व त्याशिवाय आणखीन कांहीं त्या संदर्भात असतील तर त्या. म्हणून ह्या नऊ प्रतिक्रीयांपासून सावध रहावयाचे असते. सवयीने ते शक्य होते. जर तुम्ही साधक असाल तर ह्या गोष्टी चांगल्या लक्षात ठेवावयाच्या असतात. ते नसतील तर हा काम चांगला आहे त्यापासून कोणताही धोका नसतो. येथे दिलेल्या प्रतिक्रीया पापकारक असतात. जर तुमच्यात उत्पन्न झाल्या तर त्या स्वताला लागू होतात व दुसर्याने केले तर त्या त्याला लागू होतात. ती पाप जीवाला

बाधक असतात जरी आत्म्याला त्याचा त्रास होत नाही. म्हणून नेत्रकाम आत्म्यासाठी चांगला असतो. सुख देणारे हा काम आहे.

श्रवण काम – हा काम नेत्रकामासारखाच आत्म्यासाठी चांगला असतो व जीवालासुद्धा त्रास नसतो म्हणून तो निष्पाप काम समजला जातो. ही कांहीं श्रवणीय ऐकण्याची इच्छा असते. सुख देणारा हा काम आहे.

गंध काम – हासुद्धा नाकाशी संबंधित आहे. सुख देणारे हे काम आहेत. त्यामुळे कोणताही दोष लागत नाही.

रुची काम – ही चांगले खाण्याशा संबंधित आहे. सुख देणारे हे काम आहेत. त्यात कोणतेही दोष नसतात. काही प्रकारच्या चुकीच्या सवयी त्याच्याशी संबंधित असतात. नशा करण्याच्या व्यसनाचा त्याच्याशी थोडा संबंध असतो पण साधारणपणे एरवी तो त्रासदायक नसतो.

हे पांच काम दिसायला निष्पाप असले तरी त्या माणसाच्या मृत्यूनंतर ते त्याच्या पिशाच्चाला त्रासदायक असतात. मेल्यानंतर त्याला जर अशा इच्छा असतील तर त्या त्याला ते पिशाच्च जीवन शांतपणे जगू देत नाहीत. माणसाने त्याच्या त्या जीवनाचासुद्धा विचार करावयाचा असतो. त्याचे कारण जरी शरीर गेले तरी त्याच्या लिंगदेहात त्या वासना उत्तेजित असतात व त्या पिशाच्चाला शांतपणे राहू देत नाहीत. त्याकरता त्याच्या वंशजाना त्याला त्या सगळ्या गोष्टी श्राद्धात अथवा पिंडदानात द्याव्या लागतात. नाहीतर तो आत्मा त्या अवस्थेत तडफडत असतो अनेक वर्षे. म्हणून हे साधे वाटणारे काम पुढील जीवनासाठी त्रासदायक होऊ नयेत म्हणून त्यांचे जीवंत असतानाच नियंत्रण करावयाचे असते. दारू पिणारा, धुम्रपान करणारे त्याची भूतं अतिशय वाईट अवस्थेत त्या दशेत जगत असतात. म्हणून निदान मरण्याच्या आधी कांहीं काळ मनुष्य पूर्णतया निर्व्यसनी असला पाहिजे. जो व्यसनी असतांना मेला तर त्याचे पिशाच्च अतिशय दुःखमय अवस्थेत रहात असते. शरीर नसल्यामुळे त्या वासना तो पुर्या करू कत नाही. म्हणून त्याचे पिशाच्च सदोदीत बेचैन असते. म्हणजे, दूरागामी परिणामाच्या दृष्टीने ते काम भयंकर असतात हे लक्षात घ्यावे.

स्पर्श सुखाचा काम – त्याचा संबंध प्रामुख्याने त्वचेशी संबंधित असतो. हा मोठा प्रभावकारक काम आहे. अध्यात्म साधनेत ह्या व लिंग कामालाच काम म्हणून समजले जाते. त्यात विविध प्रकारची स्पर्श

सुखं माणसाला मिळत असतात. योग्य संयम धरला नाही तर हा काम माणसाचे अध्यात्मिक कार्य भ्रष्ट करू शकतो. त्याच्यातून लिंग काम उत्पन्न होत असतो. म्हणून तो पाहू.

**लिंगकाम** – लैंगिक सुखाचा हा काम असतो. त्यातून मिळणारे सुख जरी क्षणिक असले तरी ते माणसाला जबरदस्त धरून ठेवणारे असते. त्याचे जर व्यसन लागले तर ते त्याचे अध्यात्मिक जीवन बरबाद करत असते. धर्मांच्या बहुतेक अभ्यासात ह्यासच काम म्हणून समजले जाते व जे इतर गौण काम आपण आधी पाहिले त्यांची चर्चासुद्धा होत नाही.

काम दोषानंतर येतो क्रोध त्याचा विचार करू.

**क्रोध** – जेव्हां इच्छा पूर्ण होतात तेव्हां आनंद ही प्रतिक्रीया असते व जेव्हां त्या पूर्ण होत नाहीत तेव्हां क्रोध अथवा निराशा, दुःख अशा प्रतिक्रीया उत्पन्न होत असतात. त्यातून प्रेम, द्वेष, क्रोध, दुःख, दुर्दैव, सुख, तिरस्कार, भीती, गर्व अशा पापकारक प्रतिक्रीया उत्पन्न होण्याचा संभव असतो. म्हणून हा दोष मोठा धोक्याचा असतो. क्रोध आवरणे सोपे नसले तरी ते आवश्यक असते. शक्तीमान मनुष्य इच्छा पूर्ण न झाल्याने क्रोधी होतो व कमजोर दुःखी होत असतो. त्यासाठी माणसाने त्याच्या इच्छांवर नियंत्रण ठेवणे हांच एकमेव उपाय असे समजले जाते. इच्छा पूर्ती न झाल्याने येणारा क्रोध नुकसान करणारा असला तरी जर तो केवळ क्रोधाचे नाटक करत असेल कांहीं साध्य करणासाठी तर तो एक महत्वाचे शस्त्र म्हणून उपयोगाचा असतो. म्हणून क्रोधाचे योग्य व्यवस्थापन करणे अनेक कामांसाठी चांगले असल्याचे सिद्ध होते. क्रोध जीवाला बाधक असतो. तसेंच त्याची नोंद लिंगदेहात होत असल्याने मृत्यूनंतर तो आणखीन तापदायक ठरण्याची शक्यता असते. आपल्या कुवतीपेक्षा मोठी इच्छा धरल्याने ती पूर्ण होत नाही म्हणून माणसाने त्याच्या कुवतीत येतील अशाच इच्छा ठेवाव्यात.

**लोभ** – जेव्हां इच्छा पूर्ण होते तेव्हां दुसरी इच्छा उत्पन्न होत असते. ह्यात लिंगदेहाचा मोठा अंतर्भाग असतो. इच्छा पूर्ती व त्यानंतर पुन्हा नवीन इच्छा ही प्रक्रीया सतत चालू रहाण्याची भयंकर शक्यता असते व तसे होत गेले तर तो त्या आत्म्याच्या अध्यात्मिक उद्धाराच्या कामात मोठा अडसर होतो. त्याची अध्यात्मिक उन्नती थांबते. लोभ, त्यातून क्रोध अशीसुद्धा प्रक्रिया सुरू होत असते. त्यात आत्मा गुंतला तर ते जास्त धोक्याचे असते. हिंदूसाठी त्याची अध्यात्मिक उन्नती सर्वात महत्वाची असते त्या दृष्टीने लोभाचे नियंत्रण महत्वाचे असते. औदासिन्याच्या मदतीने लोभ कमी करता येतो.

**मोह -** लोभ इच्छेचा प्रकार दाखवतो व मोह इच्छेची तीव्रता दाखवतो. एकाद्या गोष्टीत आकर्षण मोहामुळे

निर्माण होत असते. निरनिराळी व्यसने त्यामुळे लागत असतात. ह्यात चांगली व वाईट अशी दोनही असतात. मोह नेहमीच वाईट नसतो पण जेव्हा तो वाईट असतो तो फार नुकसान करत असतो. आत्म्याच्या उद्धारात मोहामुळे बाधा येऊ शकते. म्हणून त्याचे नियंत्रण आवश्यक असते. शरीराच्या गरजेपेक्षा त्याची वासना मोहामुळे होत असते. म्हणून त्याला दोष समजले आहे. हिंदूंच्या सहा दोषांच्या रचनेत त्यांच्या घातकतेनुसार ते दाखवले आहेत म्हणजे काम सर्वात जास्त घातक त्यानंतर क्रोध असे देत मोहाचा क्रम चौथा दाखवला आहे. परंतु, तीव्रतेच्या दृष्टीने पहाता मोहाचा क्रम पहिला घेतला पाहिजे असे वाटते इतका तो तीव्र आहे. त्यासाठी तीव्रतेच्या दृष्टीने पहाता सहा दोषांचे क्रम असे असले पाहिजेत असे मला वाटते, मोह, क्रोध, लोभ, मद आणि मत्सर. कामाचा मी उल्लेख करत नाही कारण तो दोष नाही ती प्राथमिक प्रेरणा आहे म्हणून तिला दोष कसे समजावयाचे असा प्रश्न होतो. त्यातील मद व मत्सर सर्वात सोपे आहेत संयमनासाठी म्हणून ते शेवटी असतात.

**मद –** इच्छा एका मागोमाग एक पूर्ण होत गेल्याने त्या माणसाचा अहंकार वाढतो त्याचा परिणाम स्वरुप हा दोष उत्पन्न होते. त्याला कांहींजण गर्व म्हणतात. इतरांशी तुलना करण्याने आपण जास्त आहोत अशा समजामुळें हा दोष माणसात सुरू होतो, त्यातून उद्धटपणा, बेपर्वाई, इतराबद्दल तूच्छता असे चुकीचे वागणे सुरू होते. हा दोष उत्पन्न होऊ नये म्हणून स्वताची दुसर्याशी तुलना करावयाची नसते. जर कोणाशीही तुलना न करता जगत असाल तर तुमच्यात हा दोष निर्माण होणार नाही. म्हणजे त्याचे निराकरण तुलनेने सोपे असते. त्याला मदभाव असेसुद्धा म्हणतात. असुरीसंपदा ह्यातून तयार होत असते ज्याचा उल्लेख भगवद्गीतेत आहे.

**मत्सर** – हा मदाचा  विरुद्ध भाव आहे. तुलनेने जर समजले कीं, आपण इतरांपेक्षा कमी आहोत तर हा दोष उत्पन्न होतो. आपली इतराशी तुलना न करण्याने व स्वताच्याच मध्ये संतुष्ट रहाण्याने हे दोन दोष मनुष्य टाळू शकतो. स्वताच्या सुरक्षिततेसाठी हे दोन सुरू होतात परंतु, त्याचे दोषात रुपांतर होत असते.

आतापर्यंत आपण सहा दोषांची माहिती पहात आहोत ते टाळणे हिंदू माणसाचे त्याचे जीवन पुण्यवंत होण्यासाठी आवश्यक असते. त्यासाठी माणसात सूज्ञपणा आणि सद्सद्विवेक बुद्धी असावी लागते. सतत सावध राहून आपल्या मनात येणार्या विचारांचे निरिक्षण करण्याच्या सवयीने ते साध्य होते त्यासाठी त्याची शिपाईबुद्धी मदत करत असते.

प्रापंचिकाच्या अध्यात्म साधनेचा उद्देश प्रामुख्याने पापमुक्त व पुण्यकारक जीवन जगण्याचा असतो. जेणे

कारण पुढचे जीवन सुखमय होवो. मोक्षार्थीचा उद्देश लिंगदेहा पासून आत्म्याची मुक्ती मिळवणे असा असतो. तरीसुद्धा दोघांच्या साधनांत बरेच साम्य असते.

## १४. मनांची माहिती –

**७०.** अध्यात्म साधनेत आपल्याला आपल्या मनाबद्दल विशेष माहिती करून घ्यावी लागेल. आपण आधी पाहिले आहे किं, देह, जीव, लिंगदेह व आत्माराम अशा चार घटकांनी आपण बनलो आहोत. त्यातील देह जीवाबरोबर असतो. उरलेल्या पैकी जीव व लिंगदेह ह्याना मन असते आणि आत्म्यास बुद्धि असते. मन म्हणजे विचार करण्याची क्षमता. म्हणजे आपल्यामध्ये दोन मने असतात. ह्या दोन मनांचे नियमन करणे ह्यालाच माणसाची अध्यात्म साधना असे म्हणता येईल. जीवाचे मन देहाच्या चार गरजांचे व्यवस्थापन करण्यासाठी त्यात असलेल्या उपजत बुद्धीने विचार करीत असते. त्यासाठी साधारणपणे त्याचे विचार हितकारक असतात. परंतु, त्यात जेव्हां लिंगदेहाचे मन हस्तक्षेप करू लागते तेव्हां गडबड होऊ लागते. सामान्य माणसाच्या जीवनातील बेचैनी ह्या जुगलबंदीशी निगडीत असते. अशा परिस्थितीत आत्म्याची बुद्धि हस्तक्षेप करून जीवाच्या मनांस ताकद देऊन त्याची क्षमता सुधारू शकते. आत्म्याची बुद्धि जीव व लिंगदेह ह्यांच्या मनांच्या कामाचे नियमन करण्यासाठी असते. लिंगदेहाचे मन त्यात साठवलेल्या पूर्व जन्माचा अनुभव वापरून त्यानुसार सुचवत असते. आत्म्याच्या बुद्धीला त्याचा सारासार विवेक करून त्यानुसार काय करावे ते ठरवावयाचे असते. जीवाचे मन देहाच्या गरजेप्रमाणे तेवढेच काम देहा कडून करण्याचे सुचवत असते, त्या उलट लिंगदेहाचे मन पूर्वजन्मांच्या वासनांनी प्रेरीत होऊन कांहीं जास्त करून घेण्याचा आग्रह करीत असते. येथे ही जुगलबंदी चालू रहात असते. खरा साधक तो, जो ह्या दोन मनांचे संतुलन योग्य रीत्या करुन आपली अध्यात्म साधना यशस्वी करतो. सामान्य माणूस (म्हणजे त्याचा आत्मा) मात्र बर्याच वेळा लिंगदेहाच्या आग्रहास बळी पडून जीवावर नको त्या गोष्टी करण्यासाठी दबाव आणतो असें दिसते आणि असें झाले किं, असा माणूस त्यात अडकून जातो. बर्याच प्रयत्नानंतर आत्मा जीवाची बाजू कशी घ्यावयाची व लिंगदेहाच्या मनांस कसें आवरावयाचे ते शिकतो. ते करीत असतांना लिंगदेहाकडून कांहीं उपयुक्त सुचनासुद्धा तो स्वीकारत असतो. बुद्धि म्हणजे तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्याची क्षमता. तिचा वापर करून तो आत्मा हे सर्व साध्य करीत असतो. जीव व लिंगदेह ह्याची दोन मनं व आत्म्याची बुद्धि ह्यातील विचारांची आंदोलने कशी नियंत्रित करावयाची हे हिंदूंच्या योगशास्त्रात आपण शिकतो. वासनांचे दमन करावयाचे कीं, त्यांबद्दलची उदासिनता वाढवावयाची हे बुद्धि ठरवत असते. मनांतील विचार व बुद्धिचे विचार ह्यात

फरक असतो. मनाचे विचार जास्त करून भावनांवर आधारित असतात म्हणून तर्कविसंगत असतात. त्या उलट बुद्धिचे विचार तर्कावर आधारित असतात. सामान्य माणूस व साधक ह्यांतील फरक असा किं, सामान्य माणूस जास्त करून भावनाविवशतेंने प्रेरीत होतो त्या उलट साधक सातत्यांने तर्कांने प्रेरीत होत असतो. भावना व तर्क ह्यांचे संतुलन साधकाला साधावयाचे असते. हा विषय मोठा असून ह्या लेखाच्या आवाक्या बाहेरचा आहे म्हणून ह्या विषयावरील अधिक माहिती तंत्रांतील योगशास्त्राच्या ग्रंथांत असते ती पहावी. ह्या लेखात आपण फक्त प्रत्येक मुद्याचा परिचय करून घेणार आहोत.

योगशास्त्राप्रमाणे माणसाच्या चार वाणी असतात. त्या अशा, परा, पश्वंति, मध्यमा व वैखरी. आपण जे बोलतो व जी यंत्रात नोंदली जाते ती वैखरी वाणी आहे. इतर तीन वाणी अधिकाधिक सुक्ष्म होत जातात. परा वाणी सर्वात जास्त सुक्ष्म असते व देवतांचे आदेश त्या वाणीत येतात. ती वाणी माणसाला ऐकायला येते पण तीची यंत्रात नोंद होऊ शकत नाही. पश्वंति हृदयातून उत्पन्न होते असे समजतात व मध्यमा कंठातून उत्पन्न होते असें समजतात. पश्वंति, मध्यमा ह्यांची नोंद साधारण यंत्रात होत नाही. अध्यात्म साधना करतांना जप पश्वंति, मध्यमा ह्या वाणींत करावा. विशेष म्हणजे परा वाणी सर्व प्राणिमात्रांसाठी एकच असते. तान्हे बाळ आपल्या आईशी परा वाणीत संभाषण करत असते व आईसुद्धा त्याच वाणीत त्याला साथ देत असते. पिशाच्च, देवता गण, पितर, असें सर्वच माणसाशी परा वाणीत संपर्क करतात. असें सांगतात किं, परा वाणी सर्व भाषांचे मूळ आहे. ह्या सर्व वाणींचा संबंध मनाशी असतो कारण त्यांचे नियंत्रण मनाकडून होत असते. अंतरज्ञान, सुक्ष्म ज्ञान ह्यांचा संबंध परा वाणीशी असतो. आपण विचार परा वाणीत करतो व नंतर त्याची अभिव्यक्ती वैखरीमध्ये होत असते. स्वप्नात आपण परा वाणीत संभाषण करत असतो.

## १५. सत्त्व, रजस् व तमस् गुणांची माहिती –

**७१.** जेव्हां प्रापंचिक हिंदू माणसाला आत्मशुद्धिची साधना करण्याची इच्छा होते तेव्हां, त्याला ज्या गोष्टी माहीत असणे आवश्यक असतें त्या आता समजून घेऊ. प्रथम त्याला त्याची अध्यात्मिक अवस्था काय आहे ते समजणे जरुरीचे असते. अशा तीन अवस्था मान्य आहेत, त्या तामसी, राजस व सात्त्विक अशा असतात. त्यांना गीतेत त्रिगुण असें सांगितले आहे. त्यांची माहिती थोडक्यात पहावयाची आहे. तामसी माणसे कशी असतात तें प्रथम पाहिले पाहिजे. तम म्हणजे अंधार, तामसी म्हणजे अंधकारमय. ह्याठिकाणी अध्यात्मिक जागृतीचा अंधार असा अर्थ घ्यावयाचा आहे. जो माणूस आत्मशुद्धिच्या जागृती पासून दूर आहे व त्यामुळे अध्यात्मिक शुद्धीच्या विरुद्ध असलेल्या गोष्टींत (पापमय) तो रमतो अशा

माणसास तामसी माणूस असें समजले जाते. कदाचित् असा माणूस जगाच्या दृष्टीने सुशिक्षित, विद्वान, असू शकतो. परंतु, असा इसम आत्मशुद्धीच्या दृष्टीने जागृत नसल्यास तो हिंदू मान्यतेनुसार तामसीच समजला पाहिजे. त्या उलट, एकादा इसम जगाच्या दृष्टीने अडाणी, अशिक्षित असला तरी अध्यात्मिक दृष्टीने जागृत असेल तर तो तामसी समजला जात नाही. एकादा खूप शिकलेला वकिल, इंजिनीयर, डॉक्टर, वैज्ञानिक असा कोणीही माणूस अध्यात्मिक दृष्ट्या जागृत नसल्यास हिंदू मान्यतेनुसार तामसी समजला पाहिजे. अध्यात्मिक जागृतीच्या अभावामुळे तो आपल्यातील षड्रिपूंच्या बाबत सावध नसतो. म्हणजे एकापरीने अध्यात्मिक जागृती व षड्रिपूंच्या बाबतची सावधानता ह्या एकच असतात. अशी सावधानता नसल्यानें तो षड्रिपूंच्या प्रभावाखाली रहातो. पाश्चात्य जीवन पद्धती ह्या दृष्टीने पहाता, तामसी ठरते. त्यांची जीवन रहाणी कितीही रुबाबदार, देखणी व म्हणून आकर्षक असली तरी ती अध्यात्मिक शुद्धीच्या दृष्टीने अयोग्य ठरते. तामसी लोकांची साधारण लक्षणे कोणती असतात ते पहावे लागेल. तामसी माणूस वासनामय जीवनात जास्त रमतो.

तामसी माणसे व्यसनाधीन रहाण्यात धन्यता मानतात. तसेंच त्यांना त्यांच्या व्यसनाधीनतेचे कौतुक असते. मी हे मानत नाही, ते मानत नाही, अशा वल्गना करून अध्यात्मिक गोष्टींची निर्भत्सना करण्यात धन्यता मानतात. त्यांना मर्यादा तत्त्वाचे महत्व नसते. वासनामय जीवन जगणे हेंच जीवन असा त्यांचा ठाम विश्वास असतो. लैंगिक स्वैराचार हा जीवनाचा मुख्य गाभा आहे असें ते मानतात. समलिंगी संभोग घेण्याचा कल असतो. सर्व प्रकारच्या लैंगिक विकृतीचे तो समर्थन करतो. तामसी लोक आत्मा वगैरे मानत नाहीत व त्या अनुषंगाने सांगितलेल्या कोणत्याही गोष्टी ते हसण्यावर नेतात. असे लोक वास्तविक प्रगती भरपूर करूनही नेहमी असंतुष्ट व म्हणून आतल्या आत दुःखी असतात. असे दुःख विसरण्यासाठी ते अधिकाधिक व्यसनाधीन होत जाऊन अखेरीस बरबाद होतात. कारण ते त्यांचा आत्मा विसरलेले असतात. वैज्ञानिक वास्तविक प्रगती म्हणजेंच प्रगती असा गैरसमज त्यांच्यात दिसतो व ते अध्यात्म सोडून वैज्ञानिक गोष्टींत अडकून घेतात. जनावराप्रमाणे ते आपले लैंगिक व्यवहार उघड्यावर करण्यात हुशारी समजतात. त्यांच्यात काम, क्रोध, मद व मत्सर विशेष तीव्र असतात व त्यानुसार ते त्यांचावर अवलंबून असणार्यांचा अपमान करून व्यवहार करण्यात धन्यता मानतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, आसुरीसंपदा मध्ये दिलेली बरीच लक्षणे त्याच्यात कमी जास्त प्रमाणांत आढळून येतात. शमन प्रवृत्ती म्हणजे लज्जा अथवा मर्यादा, त्यांच्यात कमी असते कारण ते आत्म्याचे लक्षण असते. शोधन प्रवृत्ती म्हणजे भोगीपणा त्यांच्यात जास्त असतो. अशा दोषांमुळे तामसी लोक अध्यात्मिक विकास करण्याचा विचारसुद्धा करीत नाहीत. ते पापमय जीवन जगत रहातात.

तामसीपणा सर्वच माणसांत सारखाच नसतो. तो निरनिराळ्या माणसांत निरनिराळ्या अवस्थेत असतो. तामसी माणसे ईश्वराची किंवा एकाद्या देवतेची पुजा करतांना दिसतात. त्यांच्या सर्व पुजा आराधना सकाम असतात म्हणजे त्यांना मोक्ष नको असतो. त्या शिवाय देवभक्तीचा देखावा करून सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्याचा सुद्धा उद्देश असू शकतो. पुजा करून जर फायदा झाला तर देवावर विश्वास ठेवू नाहीतर नाही अशी भाषा असते. तामसी माणसे आप्त मित्रांसाठी चांगली असतात. इतरांशी मतलबाने चांगली असतात. तरीसुद्धा जर कांहीं कारणांनी त्यांना असा अनुभव आला कीं, आपल्यात आत्मा म्हणून कांहीं आहे तर ते त्याचा पाठपुरावा करून त्याची प्रचिती घेण्याचा प्रयास करतात व जेव्हां त्यांना त्याची प्रचिती येते तेव्हां, तो तामसी माणूस तमो अवस्थेतून रजो अवस्थाकडे जाऊ लागतो. त्याच्यातील आसुरीसंपदेचा प्रभाव कमी होऊ लागतो.

**७२.** राजस अवस्था ही तामस व सात्त्विक ह्या दोन अवस्थांच्या मधील अवस्था असते. आसुरीसंपदांची लक्षणे त्यांत कमी तीव्रवेची असतात. त्याच्या मध्ये अध्यात्मिक जागृती सुरू झालेली असते. जीवनात येणार्या बर्या वाईट अनुभवांकडे त्या दृष्टीने राजसी लोक पाहू लागलेले असतात. आसुरीसंपदा कमी तीव्रतेच्या असतांना त्यांच्या वागण्यात दैवीसंपदांचा मोठा भाग असल्याचे आढळून येते. राजसी अवस्था असलेला इसम अध्यात्माकडे बर्यापैकी झुकलेला असतो परंतु, तो तरीसुद्धा आसुरीसंपदां पासून फार दूर गेलेला नसतो. त्यांचा त्याला अजून मोह पडलेला असतो. कधी दैवी तर कधी आसुरी अशा दोलायमान अवस्थेत असे लोक असतात. अशा अवस्थेतील इसम जर अध्यात्माकडे जास्त झुकू लागला कीं, तो यथावकाश सात्त्विक अवस्थेकडे सरकू लागतो. त्याच्यातील आसुरीसंपदा कमी होत असते व दैवी संपदा वाढत असते. असें जर होत गेले तर अशी एक वेळ येते कीं, त्या माणसात दैवीसंपदा जास्त होऊन आसुरीसंपदा किमान पातळीला येते. तेव्हां तो सात्त्विक अवस्थेत गेला असे समजले पाहिजे. सात्त्विक माणसांत दैवीसंपदा विशेष आढळते व आसुरीसंपदा किमान पातळीला असते.

**७३.** शाक्तांतील तंत्रामधील मार्ग तत्त्वज्ञानानुसार सात्त्विक माणूस आणखीन सुधारून जेव्हां त्याच्यातील आसुरीसंपदा पूर्णपणे नष्ट झालेली असते तेव्हां त्याला संत अवस्था प्राप्त झाली असे समजतात. त्या उलट, तामसी माणूस अधिक आसुरीसंपदांकडे वळला तर तो दुर्जन अवस्थेत गेला असें समजले जाते. संत अवस्थेत गेलेला इसम अध्यात्म साधना करण्यास योग्य असतो. जर अशारितीने संत अवस्था प्राप्त झालेली नसतांना बळेच कोणी अध्यात्म साधना करू लागला तर तो भ्रष्ट साधक होऊन तो कायमचा बरबाद होतो. म्हणून हिंदू माणसांनी आपली अध्यात्मिक पातळी ओळखून त्यात आवश्यक ती सुधारणा करून मगच तपस्या वगैरे अध्यात्मिक कामे करावीत. समर्थ रामादासांनी दासबोधात लक्षण चिकीत्सा

दिली आहे ती पहावी. त्यात तमोगुणीची लक्षणं, रजोगुणीची लक्षणं व सत्त्वगुणीची लक्षणं दिली आहेत. त्या पाहून आपल्यामध्ये कोणत्या आहेत ते समजते. त्यावरून तुमचा गुण कोणता ते समजेल.

**७४.** सत्त्व, रजस् व तमस् अवस्थांबद्दल हिंदूंच्या इतर परंपरात काय दिले आहे ते सुद्धा पहावे लागेल. माणसामध्ये तीन प्रवृत्ती असतात. त्या अशा, देविक, पाशवी व राक्षसी. हिंदू माणसाने ह्यातील कोणत्या प्रवृत्तीला वाढवावयाचे ते ठरवावे लागते. ज्या प्रवृत्तीला तो वाढवतो त्या प्रमाणे तो होतो. म्हणजे जर दैविक प्रवृत्ती (म्हणजे चांगुलपणा, माणूसकी व भूतदया) वाढवली तर तो सात्त्विक होतो, पाशवी (जीवाच्या मुलभूत प्रवृत्ती) अवस्थेत रहाणे पसंद केले तर तो रजस् अवस्थेत रहातो आणि राक्षसी प्रवृत्तीकडे झुकला तर तो तामसी व पुढे दुर्जन अवस्थेत जात असतो. आपण सात्त्विक, राजसी व तामसी अवस्थांची माहिती थोडक्यात पाहिली. त्या वरून तुमचा अध्यात्मिक पत्ता काय ते समजते. सामान्य हिंदूला एवढी माहिती पुरेशी असते.

## १६. मृत्यू नंतर चे जीवन –

**७५.** माणसाला त्याचा मृत्यू काळ समीप आल्याचे समजू शकते. साधारणपणे पन्नाशी नंतर त्याने आपल्या मृत्यूची व्यवस्था करणे श्रेयस्कर असते. मृत्यूच्या अवस्थेची व्यवस्था म्हणजे काय ते पहावे लागेल. माणसाला बहुधा कांहीं न कांहीं व्यसन अथवा वाईट सवयी असतात. त्या सर्व व्यसनांचा व वाईट सवयींचा त्याने पूर्णपणे त्याग करावयाचा असतो. असे करण्याचे कारण, मृत्यूनंतर त्याला देह रहात नाही व ही सर्व व्यसने व वाईट सवयी ह्या देहाच्या माध्मानेच होत असतात, ते पहाता मृत्यूनंतर देह नष्ट झाल्यामुळे त्या सर्व गोष्टी त्याच्या प्रेतात्म्यास फार पिडा देऊ लागतात. मेल्यानंतरसुद्धा त्या वासना त्याच्या आत्म्याला सोडत नाहीत. कारण, हि सर्व लिंगदेहात नोंदलेली असतात. जीव व देह दोन्ही नसतात व लिंगदेह त्या वासनांची आत्म्याला सतत आठवण करून देत रहातो. देह नसल्यामुळे वासनांचे उपशमनसुद्धा होऊ शकत नाही व त्या वासना त्या प्रेतात्म्यास नरक यातना भोगावयास लावतात. मृत्येनंतर पुढील जन्म केव्हां मिळेल त्याची शाश्वती नसते. त्यामुळे अशा यातनामय अवस्थेत तो प्रेतात्मा त्या नरक यातना भोगत अनेक वर्षे तडफडत रहातो. हे टाळण्यासाठी माणसांने जीवनाच्या अंतकाळी तरी निदान निर्व्यसनी असणे त्याच्या मृत्यू नंतरच्या आयुष्यासाठी आवश्यक असते. दैहिक व्यसनांत, दारु, वीडी सिगरेट, गांजा, अफु, तंबाखू, सुपारी, जुगार खेळणे, वेश्यागमन अथवा संभोगाचे व्यसन इत्यादि येतात. अशा व्यसनांमुळे ते पुरुष अशुद्ध ठरतात. स्त्रीस ही दैहिक व्यसने बहुधा नसतात. ह्यांबाबत त्या बहुधा शुद्ध असतात. मानसिक व्यसनांत मात्र पुरुषांपेक्षा स्त्री जास्त अडकलेली असल्याचे

आढळून येते. मानसिक व्यसने अशी, सतत काळजी करीत रहाणे, दुःखी रहाणे, संशय घेत रहाणे, काल्पनिक चिंतेत रमणे, रडणे, भांडखोरपणा, मत्सर करणे, जर स्त्री ह्या मानसिक व्यसनातून मुक्त झालेली नसेल तर त्या स्त्रीचे मृत्यूनंतरचे जीवन नरकासमान असेल. पुरुषाला ही मानसिक व्यसनेसुद्धा सतावत असतात. वस्तुतः जीवनाच्या सुरुवातीपासूनच माणसांने कोणत्याही व्यसनांत स्वताला गुंतवून ठेवू नये. हे साध्य होण्यासाठी वयाच्या चाळीशीपासूनच स्वताची व्यसनमुक्ति करण्यास सुरुवात करावी. ज्यांना असें कोणतेही व्यसन नाही असें लोक मृत्यूनंतर शांत व आरामशीर राहू शकतात. त्यांचे मृत्यूनंतरचे जीवन सुखकर रहाते. भावनाविवश होणारी माणसे व्यसनात सांपडतात.

छंद व व्यसन ह्यातील फरक समजून घ्यावा लागेल. छंद माणसाला त्याचा काळ मजेत घालवण्यास मदत करतात. त्यांचा नाद मात्र नसावा. छंदात अनेक चांगल्या गोष्टी येतात. वाचन, लिखाण करणे, विविध खेळ खेळणे, प्रवास करणे, कांहीं वस्तु जमवणे असें विविध छंद माणूस आपल्या जीवनात वाढवतो. तेसुद्धा जर नाद झाले तर तेसुद्धा मृत्यूनंतर त्रासदायक ठरू शकतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, माणसांनी आपल्या सर्व सवयी मर्यादीत अवस्थेत ठेवाव्यात. कारण, अशा अवस्थेत अडकलेल्या माणसाच्या प्रेतात्म्यास कोणीही मदत करू शकत नाही. ध्यान-जप करण्याचा छंद मात्र ह्याला अपवाद आहे.

**७६.** प्रत्येक माणसाचा जीवनाच्या अखेर मृत्यू येणे क्रमप्राप्त असते. हिंदू परंपरेनुसार मेल्यानंतर ते शरीर अग्निसंस्कार करून नष्ट करायाचे असते. असे करण्या मागील कारण समजून घेऊ या. मृत्यूनंतर त्याचा आत्मा शरीराबाहेर त्या शरीराभोवती घुटमळत असतो. असे समजतात किं, एका सुक्ष्म तंतूनी त्याचा लिंगदेह त्याच्या उरस्थीस पकडून रहातो. जर तो देह जाळून टाकला तर तो बंध संपुष्टात येऊन तो आत्मा त्या देहाच्या बंधनातून मुक्त होतो. परंतु जर तो देह तसांच कुजत ठेवला तर तो देह पूर्णपणे कुजून नष्ट होईस्तोवर तो आत्मा व त्याचा लिंगदेह तसांच तेथे तडफडत रहातो. कुजल्या नंतर सुद्धा जोपर्यंत त्याची उरस्थी शाबूत आहे तोवर तो आत्मा त्या ठिकाणी तडफडत रहातो. त्यामुळे त्या प्रेतात्म्याचा उद्धार होत नाही. म्हणून हिंदूंत मृत्यूनंतर देहास अग्निसंस्कार करणे आवश्यक समजले जाते. जारण मारण विद्येत मृताची उरस्थी वापरून त्यात अडकलेला प्रेतात्मा पकडून त्याला गुलाम करण्याची पद्धत आहे. म्हणून जितक्या लवकर मृत देह नष्ट करता येईल तितक्या लवकर तो जाळून नष्ट करावयाचा असतो. जर प्राण्याने तो देह खाल्ला तर अग्निसंस्काराप्रमाणे होते.

हिंदू मान्यतेनुसार माणूस मेल्यावर त्याचा प्रेतयोनीत प्रवेश होत असतो. म्हणजे मेल्या बरोबर त्याचा आत्मा लिंगदेहासह प्रेतात रुपांतरीत होतो. देह नुकताच सोडलेला असल्यामुळे तो आत्मा

संभ्रामावस्थेत असतो. त्याच्या भोवती आधीच मेलेल्या माणसांची भूतं जमा होतात व त्याचे मुल्यमापन करू लागतात. हे असें होते जसें विद्यापीठात नव्याने जाणार्या विद्यार्थ्याचे मुल्यमापन जुने विद्यार्थी करतात. मला म्हणावयाचे किं, ती जुनी भूतं त्या नवीन प्रेताचे मानव योनीतील स्थान अजमावण्याचा प्रयत्न करतात. हे सर्व मृत्यूनंतर दहा दिवसानंतर सुरु होत असते. म्हणजे मृत्यूनंतर ताबडतोबचे दहा दिवस तो मजेत असतो. ह्या दहा दिवसांत तो संभ्रमावस्थेतून बाहेर आलेला असतो. जेव्हां अशी चाचपणी सुरु होते तेव्हां त्या मृतात्म्याची खरी परीक्षा सुरु होत असते. हल्ली आपण जे रॅगिंग (छळ) म्हणतो तो जाच त्या नवीन प्रेताचा सुरु होतो. हा काळ त्या भूतासाठी नवीन व मोठा त्रासदायक असतो. ज्या मृतात्म्याचे पृथ्वीवरील आप्त त्याला त्याच्या मृत्यूनंतर आठवून त्याला प्रेमांने आणि सन्मानपूर्वकपणे अर्घ्य देतात त्या मृतात्म्याचा जाच होत नाही पण ज्याचे आप्त त्याला विसरतात अशा मृतात्म्याचा फार जाच होतो. त्यामुळे तो मृतात्मा आपल्या पृथ्वीवरील आप्तांस शाप देतो. अशा शापामुळे त्या आप्तांना अनेकप्रकारचे त्रास भोगावे लागतात. ते कुटुंब अनेक प्रकारच्या अडचणीत पडते कारण, मेलेला माणूस म्हणजे त्याचे प्रेत फार शक्तिमान असते असें समजले जाते. त्यात जर तो मृत माणूस असंतुष्ट आत्मा असेल तर त्याचा शाप विशेष त्रासदायक असतो. हे सर्व टाळण्यासाठी हिंदूंच्या शास्त्रात मृतात्म्याचे श्राद्ध चांगल्या रितीने सन्मानपूर्वक असे करावे असें सांगितले आहे. मग तो मृत इसम जीवंतपणी कितीही मामुली असो. कांहीं हिंदू त्याची शांति करतात व ते योग्य असते. त्या मृत इसमाकडे त्याच्या जीवंतपणी आप्त मंडळींनी दुर्लक्ष केले असेल तर, ती व्यक्ति मेल्यावर मात्र असें दुर्लक्ष करणे कुटुंबास हानिकरक ठरू शकते. हिंदूंनी शक्यतर कोणाचाही कधीही अवमान करू नये. अशारितीने, जेव्हां मृत व्यक्ति त्याला सन्मानपूर्वक वागणूक मिळाल्याने संतुष्ट होते तेव्हां ती आप्तांस आशिर्वाद देते, तो आशिर्वाद त्या आप्तांस त्यांच्या दैनंदिन जीवनात महत्वपूर्ण असतो. ह्यासाठी हिंदूंमध्ये मृतांचे श्राद्ध करणे आवश्यक समजले जाते. मृत व्यक्ति केव्हा मेली त्या दिनांकानुसार श्राद्ध करणे चांगले पण ते शक्य नसेल तर पितृपक्षात न विसरता श्राद्ध करावे. जस जसे काळ सरकतो व मृत व्यक्तिचे पिशाच्च बनते तसें कदाचित श्राद्ध न करतां फक्त शिधा अथवा पिंडदान करून आपला आदर व्यक्त केला तरी ते पुरेसे असते. कारण आता तो मृतात्मा जुना झालेला असतो, त्याला इतर पिशाच्च सतावू शकत नाहीत. त्यातसुद्धा जर ती व्यक्ति सात्त्विक होती असे असेल तर त्याच्या पिशाच्चास विशेष अधिकार प्राप्त झालेले असण्याची शक्यता असते. जसा काळ सरकतो तसें त्या पिशाच्चास आप्तांची गरज उरत नाही व बहुतेक वेळा असे पिशाच्च त्या कुटुंबास विसरून जाते. कांहींवेळा त्याचा पुनर्जन्म होत असतो, असें झाले किं, त्याचे श्राद्ध करणे अथवा पिंडदान करणे निरर्थक असते. कांहीं वेळा मृतात्मा एकाद्याच्या

स्वप्नात येऊन कांहीं मामुली इच्छा सांगतो, तसें झाले तर मात्र ती इच्छा त्वरीत पूर्ण करावी. येथे आप्त म्हणजे केवळ नातेवाईक असे नाही तर त्या व्यक्तिचे मित्रसुद्धा समजावेत. येथे माझे कांहीं अनुभव नमुद करतो त्यामुळे हा विषय समजणे अधिक सोपे होईल,

**७७.** माझी आई १९९० मध्ये दिवंगत झाली. त्या नंतर कांही महिन्यानंतर ती एकदा माझ्या स्वप्नात आली व म्हणाली, "अशोक मी येथे सुखरुप आहे परंतु एक अडचण आहे किं, येथे मला जेवणात मीठ मिळत नाही. तर तू मला मीठ दे." असें स्वप्न पडल्यावर मला जाग आली व ते स्वप्न मी चांगले आठवू शकलो. त्यानंतर मला झोप आली नाही. जागेपणी विचार करीत होतो किं, आता ह्या मृत आईस मीठ कसें द्यावयाचे? ह्या विषयाचा माझा अभ्यास बर्यापैकी असल्यामुळे माझ्या लक्षात आलें किं, जर मृतात्म्यास कांहीं द्यावयाचे असेल तर ते घराच्या खिडकीबाहेरील पट्टीवर ठेवावयाचे असते. कारण, भुते खिडकीच्या बारीवर बसून घरात डोकावून बघत असतात. ती सहसा घरात शिरत नाहीत. हे लक्षात आल्यावर दिवस उजाडण्याची वाट पहात तसांच पडून राहीलो. दिवस उजाडल्यावर मी प्रथम एक चमचा मीठ घेऊन स्वयंपाकघराची खिडकी उघडली, तो काय पहातो, खिडकीच्या बरोबर समोर असलेल्या एका मातीच्या ढिगार्यावर एक मोठा कावळा जणूकाय माझी वाट पहात बसल्या सारखा तयार होता. मी खिडकीच्या बाहेरील पट्टीवर मीठ ठेवतांच तो कावळा झपकन तेथे आला व ते मीठ चोंचेत घेऊन उडून गेला. त्यानंतर दररोज मी मीठ तेथे ठेवत होतो पण ते मीठ घेण्यासाठी कोणी कावळा आला नाही. त्यानंतर मी मीठ ठेवणे बंद केले. ह्याचा अर्थ एकदांच मीठ देण्यांने तिची गरज भागली होती, ह्याचा अर्थ हे मीठ मांगणे माझी मीठ देण्याची दानत पहाण्यासाठी होते. अशारितीने आपले पूर्वज आपली परीक्षा पहात असतात. त्यानंतर कोणी मला सांगितले किं, कावळा मीठ बिलकूल खात नाही म्हणून श्राद्धाच्या पिंडात मीठ जास्त असेल तर त्या पिंडाला कावळा शिवत नाही. म्हणून श्राद्धाच्या जेवणात मीठ घालू नये.

माझ्या मातोश्रीची आणखीन एक आठवण सांगतो, आई गेल्यानंतर कांहीं महीन्यानंतरची गोष्ट आहे. आमच्या घराचा पुढचा दरवाजा पावसाळ्याच्या कारणाने उघडणे अवघड झाले होते म्हणून मी तो बंदच ठेवून मागच्या दरवाजाने ये जा करू लागलो. तो दरवाचा मी केवळ ओढून घेत असे कारण त्याला बाहेरून टाळे लावण्याची सोय नव्हती. तसे बरेच दिवस होत होते. एके दिवशी माझी आई माझ्या स्वप्नात आली व बोलली कीं, अशोक तू पुढचा दरवाजा नीट कर आणि तोंच वापर, ह्या मागच्या दरवाज्याने ये जा करणे बंद कर. ते तिचे सांगणे मी मनावर घेतले व मी पुढील दरवाजा दुरूस्त करून तो वापरू लागलो. त्यानंतर ती परत कधी आली नाही. ह्याचा अर्थ मृतात्मे सगळे पहात असतात. त्याने

ते त्यांच्या मनचक्षूने दिसत असावे.

**७८.** श्राद्धाबाबतचे आणखीन एक उदाहरण पाहू या.

आमच्या घरी एक तरुण मुलगा नेहमी येत असें. तो माझ्या भावाशी विशेष जवळचा होता. माझा भाऊ व त्याची पत्नी त्या मुलाला पुत्रवत माया देत असत. एकदा तो लिंगायत जातीचा तरुण त्याच्या गावी गेला व तेथे नदीत बुडून मेला. त्याच्या घरच्या मंडळींनी त्याचे दिवसवार त्यांच्या रितीरीवाजानुसार केले हे सर्व आम्हाला समजले. असेंच कांहीं दिवस गेले व एके रात्री माझ्या भावाच्या बायकोच्या स्वप्नात तो मुलगा आला. तो अतिशय उदास, खिन्न व ज्या चड्डीत तो मेला त्या पेहेरावात भिजलेल्या अंगाने तिच्या पुढे उभा राहिला. नेहमी हसरा आनंदी असणारा तो खेळकर स्वभावाचा मुलगा अशा अवस्थेत पाहून तिला आश्चर्य आणि वाईट वाटले. तो कांहींही बोलला नाही फक्त उभा होता. दुसर्या दिवशी तिने हे तिचे स्वप्न घरात सांगितले. आम्हा सर्वांना त्या स्वप्नांने वाईट वाटले. मी भावजयीला सुचवलें किं, तिने दुसर्या दिवशी काऊ घास त्याच्या नांवाने द्यावा. ते लक्षात घेऊन तिने त्या मुलाला आवडणार्या पदार्थांचा शिधा तयार केला व कावळ्याला वाढला. त्यानंतर कांहीं दिवसानंतर तो मुलगा तिच्या स्वप्नांत पुन्हा आला. मात्र ह्यावेळी तो त्याच्या नेहमीच्या रुबाबदार कपड्यात आणि त्याच्या नेहमीच्या आनंदी मुद्रेत आला होता. खूप हसत होता जणूकाय त्याला तो शिधा पोहोचला होता. त्यानंतर तो पुन्हा कधीच आला नाही.

ह्याचा अर्थ असा होतो किं, मृतात्म्यास शिधा त्याला प्रिय असणार्या मांणसांनी देणे आवश्यक असते. म्हणून हिंदू लोकांनी हे लक्षात घ्यावे किं, आपला कोणी प्रिय माणूस दिवंगत झाला तर त्याच्या नांवांने एकवेळ काऊघास जरूर द्यावा म्हणजे त्याच्या आत्म्यास शांति मिळेल. त्याच्या कुटुंबियाने सर्व वार दिवस केले असतील आपल्याला काय करावयाचे, असा विचार करून त्या गोष्टींकडे दुर्लक्ष करू नये.

**७९.** ह्या संदर्भात आणखीन एक उदाहरण पाहू या. बर्याच वर्षापूर्वीची ही सत्य घटना आहे. एक वृद्ध महिला तिच्या नातवाच्या घरात रहात होती. तिचा तेथे वेळोवेळी अपमान होत होता. ती बिचारी असहायपणे ते सर्व गुपचुप सहन करीत रहात होती. अखेरीस तिचा मृत्यू झाला व तिचे दिवसवार केले गेले. तिला शिधा वाढला गेला. एका केळ्याच्या पानावर ते जेवण वाढले होते. एका अशा जागी ते ठेवले किं, कावळे तेथे येतील. पण आश्चर्याची बाब अशी किं, एकही कावळा आला नाही. असे बरेच दिवस ते तेथे होते पण कावळाच काय त्याच्या आजूबाजूनी फिरणारे उंदीर, घुशीसुद्धा त्याला स्पर्श करीत नव्हते. त्यावर धुळ जमू लागली व कालांतराने ते त्या धुळीत झाकले गेले. शेवटी पावसाच्या पाण्याने ते वाहून गेले. हा प्रकार वरकरणी सामान्य वाटला तरी हा तितका साधा प्रकार नाही हे संशोधकांच्या लक्षात

येईल. स्वाभाविकपणे कोणी जीवजिवाणू ते खाववयास पाहिजे होते परंतु, तसें झाले नाही. साधी माशी, झुरळ असें कोणतेही त्याला कां नाही लागले? ह्याचे कारण काय? त्याचे स्पष्टीकरण असें सांगतात किं, भूताला दिलेले जेवण त्याचा हक्क असतो व कोणताही प्राणी तो हक्क टाळत नाही. ह्या उदाहरणातील म्हातारीच्या भूतानी ते जेवण राखून ठेवले व त्याद्वारा आपला तिरस्कार तिने व्यक्त केला.

**८०.** आपण पाहिले किं, मृतात्म्यास आपल्याला संपर्क करण्याला वेळ लागतो. माझ्या आईस मला सांगण्यास कांही महिने कां लागले? त्या मुलास सुद्धा पुन्हा स्वप्नात येण्यास कांही महिने लागले असें कां? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे माहीत नाहीत. एवढे मात्र हिंदूंनी लक्षात ठेवले पाहिजे किं, पिशाच्चांस व देवतांस संपर्क करण्यासाठी वेळ लागतो. म्हणून जर तो कांही साधना करीत असेल तर त्याचे त्वरीत परिणाम मिळावेत अशी अपेक्षा करू नये. अधीर न होता आपली साधना चालू ठेवावी.

**८१.** मृतात्मा पिशाच्च अवस्थेत असतांना इतर प्राण्यांत प्रवेश करू शकतात. त्याला पछाडणे असें म्हणतात. माणसांत फक्त मनुष्य गणात असणार्या व्यक्तिलाच पिशाच्च पछाडू शकते (जन्म पत्रिकेतील अबकहडा चक्रात तो गण दिलेला असतो) पण इतर प्राण्यात कोणत्याही जीवांस, विषेशकरून कावळ्याला, पछाडू शकते. इतर प्राण्यांत आत्मा सुप्त असतो तरी पिशाच्च त्याच्या मेंदूवर प्रभाव करू शकते. विशेषकरून जो मृतात्मा असंतुष्ट असतो तोंच अशारितीने प्राण्यावर बसतो. कुत्रा अशी असंतुष्ट पिशाच्च पाहू शकतो असें समजतात. अशी भूत दिसली का कुत्री रडू लागतात.

आणखीन कांहीं गोष्टी लक्षात घ्यावयाच्या असतात. त्या अशा किं, साधारणपणे माणसे पिशाच्च, भूत असें म्हंटले किं, ताबडतोब घाबरून जातात ते बरोबर नसते. बर्याच वेळा ही पिशाच्चे कांहीं सांगण्याचा प्रयत्न करीत असतात त्या वेळी माणसांने घाबरून कांहीं अयोग्य कारवाई केली तर ती त्याला त्रासदायक ठरू शकते. बर्याच वेळा ही पिशाच्चे अतिशय अडचणीत असतात, त्यांना माणसाच्या मदतीची गरज असतें अशा वेळी माणसांने त्यांना मदत करणे श्रेयस्कर असते. जर पिशाच्च संपर्क झाला तर प्रथम न घाबरतां त्या पिशाच्चास काऊ घास (भात व दूधाचे पिंड) द्यावा व त्याला शांत होण्यास सांगावे. असें केल्याने ते अडचणीत असलेले भूत शांत होते व मग यथावकाश ते कांहीं संदेश देऊ शकते. यथावकाश असें सांगण्याचे कारण, भूत व माणूस ह्याच्यात संपर्क होण्यास कांहीं अज्ञात कारणांमुळे विलंब लागत असतो. त्यांच्याकडे आत्मियतेने पहावे. असें वागल्यास ती भूतं माणसांस पुढे सहायक होतात. भूतं नेहमीच वाईट नसतात. बर्याच वेळा ती उपयोगी येणारी असतात. पूर्वज भूत असेल तर विशेष आदरपूर्वक वागावे, ते चांगले असते. बिलकूल घाबरू नये. पिशाच्च्यांच्या अस्तित्वाची लक्षणे निश्चितच भयावह असतात तरी मन शांत ठेवून त्यांना सामोरी जावे. तूर्त एवढेच पुरे कारण, "पिशाच्च

साधना", हा मोठा विषय आहे. शाक्त, अघोर व तंत्रविद्येची परंपरा जपणार्या हिंदूंच्या जीवनात ही साधना महत्वाची आहे, म्हणून ही माहिती दिली आहे.

## १७. विवाहा बाबात सुचना –

**८२.** हिंदूंतील लग्न आणि इतर धर्मातील, ह्यात मोठा फरक असा आहे किं, हिंदूंत लग्न हा संस्कार मानलेला आहे व इतर धर्मांत तो एक करार असतो. हिंदूंत तो संस्कार मानलेला असल्यामुळे सर्व समाजाची बांधिलकी त्यात अभिप्रेत असते. कारण लग्नाचा संबंध पुढील पिढीशी असतो, तो केवळ दोन जीवांपुरता मर्यादीत नसतो. इतर धर्मांत तो करार असल्यामुळे तेथे घटस्फोट, काडीमोड शक्य असते. म्हणून हिंदूंत घटस्फोटची तरतुद नाही. तरीसुद्धा पाश्चात्य संस्कारामुळे तो विधी आपल्यात रुळला आहे. मनुस्मृतीत सुद्धा घटस्फोटा बाबत कांहींही लिहीलेले नाही.

परंपरेने हिंदू लग्न कुटुंबाकडून जमवून करतात. परंतु, हल्ली मात्र प्रेम विवाहाचे प्रस्थ वाढलेले आहे. हिंदू परंपरेनुसार लग्न एकदाच करावयाचे असते व ते यशस्वी करणे हे दोघांचे काम असते. त्यात त्यांच्या आप्त, मित्रानी मदत करावयाची असते. कुटुंबाकडून जमवून केलेल्या लग्नास यशस्वी करण्याची जबाबदारी त्या सर्वांची असते. असें लग्न बहुधा यशस्वी होतात. परंतु, हल्ली जे प्रेम विवाह होतात ते मात्र मोठ्या प्रमाणात अयशस्वी होत असल्याचे दिसते. एका माहितीनुसार घटस्फोटाच्या एकंदर प्रकरणांतील ८० टक्के लग्न प्रेमविवाहाचे असतात. मनुस्मृतीत घटस्फोटाची तरतुद नाही.

कोणतेही लग्न, यशस्वी होण्यासाठी ज्या गोष्टी असणे जरुरीचे असते त्या कोणत्या ते पहावे लागेल. लैंगिक साधर्म्य, मानसिक साधर्म्य, बौद्धीक साधर्म्य, सहनशिलता, भावनिक एकरूपता, आर्थिक स्वास्थ्य. ह्यातील फक्त लैंगिक साधर्म्य प्रेम विवाहात साध्य करण्याचा प्रयत्न होत असतो. इतर साधर्म्यांकडे बहुधा संपूर्णपणे दुर्लक्ष झालेले असते. प्रचलित पद्धतीनुसार उभयांच्या पत्रिका जुळवून पाहिल्या जातात व जर त्यात निदान २० गुण जुळतात असें दिसले तर ते लग्न केले जाते. हे चांगले आहे. परंतु, जर त्यांच्या पत्रिका चुकीच्या असतील तर मात्र त्या जुळूनही ते लग्न अयशस्वी होते.

ज्या विवाहास उभयतांच्या नातेवाईकांचा अथवा ज्येष्ठ मित्रांचा पाठिंबा असतो ते लग्न अनेक अडचणींवर मात करून टिकते असा अनुभव आहे. माझ्यामते प्रेम विवाह शक्यतर टाळावेत कारण त्याला समाजात नैतिक स्थान नसते. असे लग्न सुकाणू तुटलेल्या नावेप्रमाणे भवसागरात भरकटत रहाते व शेवटी घटस्फोटाच्या खडकावर आदळून नष्ट होते. अशा लग्नाला वाली नसतो. त्याला तिसर्या पक्षाचा (नातेवाईकांचा अथवा ज्येष्ठ मित्रांचा) पाठिंबा नसतो. त्यासाठी प्रथम नातेवाईकांचा अथवा ज्येष्ठ मित्रांचा पाठिंबा मिळेल असे लग्न जळवून करावे व नंतर प्रेम करावे. म्हणजे, आधी लग्न व नंतर प्रेम असे असावे.

प्रेम विवाहाचे समर्थक जो युक्तिवाद त्याच्या बाजूंने मांडतात तो असा, जुळवलेल्या विवाहात बिलकूल अनोळखी दोन जीव एकदम एकत्र येणे दोघांनाही त्रासदायक असते त्या उलट प्रेम करणारे दोघे एकत्र आल्यास ते जास्त चांगले कारण, ते दोघे एकमेकांस चांगले ओळखत असतात. ह्या युक्तिवादात ते दोघे एकमेकांस चांगले ओळखत असतात हा मुद्दा खोटा असतो असें मानसशास्त्र सांगते. कारण, खऱ्या अर्थांने कोणत्याही दोन व्यक्तींना एकमेकांस चांगल्या प्रकारे ओळखण्यासाठी तब्बल दहा वर्षे एवढा काळ जावा लागतो. म्हणजे प्रेम विवाह करणारे एकमेकांस फक्त लैंगिक आकर्षणांने एकमेकांकडे खेचले जात असतात व जसें हे आकर्षण लग्नानंतर लवकरच संपुष्टात येते तसें त्यांच्यातील इतर साधर्म्यांची तपासणी सुरु होते व जर त्यात कांही कमी झाले कीं वादांस सुरुवात होऊन त्यात प्रतिष्ठेचा प्रश्न उद्भवतो व अखेरीस घटस्फोट होत असतो. जुळवलेल्या विवाहात तिसरा पक्ष त्यांच्यात कांहीं मतभेद उद्भवले तर मध्यस्थी करून मामला निकालात काढू शकतो. ते प्रेम विवाहात शक्य नसते. तेथे ताबडतोब प्रतिष्ठेचा प्रश्न उत्पन्न होत असतो आणि एकदा का प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला किं, सर्वच संपते. एकेकाळी जिवापाड प्रेम करणारे एकमेकांचे उभे दुष्मन होतात. प्रेम विवाहाच्या समर्थकांकडे ह्याचे उत्तर नसते. घटस्फोटाच्या प्रकरणांतील ८० टक्के प्रकरणे प्रेमविवाहाची कां असतात? ह्या प्रश्नाला त्यांच्याकडे उत्तर नसते. पाश्चात्यांच्या वासनिक संस्कृतिच्या प्रभावात आल्यामुळे आज हिंदूंमध्ये प्रेमविवाहासारख्या अपरिपक्व विचारांचे महत्व वाढलेले आहे. बर्याच तरूण मंडळींना हे आवडणार नाही पण आयुष्य कायम दुःखात टाकण्यापेक्षा जुळवून लग्न करणे जास्त श्रेयस्कर आहे हे मान्य करावे. लग्न झाल्यानंतर जोडप्याने प्रेम करावे असें प्रेम जास्त शाश्वत असते. लग्न यशस्वी होण्यासाठी प्रेमापेक्षा परस्पर आदरभाव, आपुलकी हे जास्त आवश्यक असते. म्हणून शहाणा हिंदू प्रेम विवाह करणार नाही. घटस्फोटामुळे त्यांच्या अपत्याचे जे नुकसान होते ते विचारात घेतले पाहिजे. लग्न जुळवतांना कोणत्या गोष्टी पहावयाच्या ते पाहुया. मुलीला कोणतेही मानसिक व्यसन नाही ते पहावे कारण अशा व्यसनात अडकलेली मुलगी विवाह यशस्वी करू शकत नाही. त्याच प्रमाणे मुलगा पहातांना त्यास कोणतेही दैहीक व्यसन नाही ह्याची खात्री करून घ्यावी. त्यासाठी हिंदू पुरुष व स्त्री पूर्णतः नेहमीच निर्व्यसनी असावीत. त्याशिवाय आर्थिक शाश्वती महत्वाची असतेच जसें हे सर्व जुळते तसें लग्न जुळले असे समजता येईल. हिंदूंचे अनेक समाज असतात त्यांच्या चालीरिती भिन्न असतात त्यासाठी शक्यतर ते पाहून लग्न जुळवावे. माणसाला व्यसने कां लागतात ते पहावे लागेल. ज्या व्यक्ति भावूक असतात अशाच व्यक्ति कोणत्या ना कोणत्या व्यसनात अडकतात. आत्मविश्वासाचा अभाव हे आणखीन एक कारण माणसे व्यसनात अडकण्याचे असते.

आयुर्वेदाच्या माहितीनुसार पती व पत्नी ह्याच्या वयांत निदान दहा वर्षाचे अंतर असावे. म्हणजे पती पत्नीपेक्षा दहा वर्षांनी मोठा असावा. परंतु, जर मुलगी प्रौढ असेल (३५ पेक्षा जास्त) तर तिने तिच्या पेक्षा दहा वर्षानी लहान असणार्या तरुणाशी लग्न करवे. लग्न कसेही करा समाजाच्या मदतीनेच तो यशस्वी होत असतो म्हणून गृहस्थाश्रमात जाणार्या सर्व लोकांनी आपले समाज संबंध चांगले ठेवावेत. सर्वच हिंदूंच्या रितीभातीत पत्नीने नवर्याच्या नांवांने मंगलसुत्र घालण्याचा रिवाज आहे. माझ्यामते त्याप्रमाणे नवर्याने सुद्धा आपल्या पत्नीच्या नांवांने एक मंगलसुत्र घातले पाहिजे. नवर्याच्या मंगलसुत्रात पत्नीची प्रतिमा (फोटो) असलेले तबक असावे. असें केल्यामुळे नवर्यावर आपल्या जबाबदारीची जाणीव राहील अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे नवर्याच्या मृत्यूनंतर मंगलसुत्र उतरून टाकण्याची प्रथा आहे ती बंद करून विधवेने आपल्या मृत पतीच्या नांवांचे मंगलसुत्र घालणे तसेंच चालू ठेवावे.

कुमारीमाता हा आणखीन एक नवा प्रकार समाजात उत्पन्न झाला आहे. स्त्री सुशिक्षित व स्वावलंबी झाल्यामुळे हा विषय उभा राहीला आहे. त्यात त्या बाईस एकट्याने आपल्या अपत्यास सांभाळावे लागते. ह्यात व घटस्फोटीत अथवा विधवा अथवा परित्यक्ता बाईच्यात बरेच साम्य आहे. त्या बायकांना सुद्धा एकट्याने आपली मुलं सांभाळावी लागतात. कुमारीमाता त्यातील एक प्रकार असे धरून तिला न तिच्या अपत्यांस समाजाने स्वीकारले पाहिजे. त्यांच्या मुलांनी आईचे नांव व आडनांव वापरून समाजात आपले स्थान मिळवावे.

महाभारतात उच्च व नीच पुरूष व त्याचे समाज ह्यांच्या व्याख्या दिल्या आहेत त्याप्रमाणे जे पुरूष त्यांच्या स्त्रीला घाबरवतात, बडवतात, इतरप्रकारे त्रास देतात ते नीच व अशा पुरूषांचा समाजसुद्धा नीच समजावा. तसेंच जे पुरूष त्यांच्या स्त्रीचा सन्मान करतात, त्याना महत्व देतात ते पुरूष उच्च व अशा पुरूषांचा समाज सुद्धा उच्च असतो. आपल्या महाराष्ट्रातील ब्राह्मण, मराठा आणि महार हे समाज ह्या व्याख्येनुसार नीच ठरतात त्यांच्या महिला सतत दबलेल्या अवस्थेत जगत असतात. कोळी, कुणबी, आग्री, भंडारी, कायस्थ, क्षत्रिय, सारस्वत, गौड सारस्वत, दैवेज्ञ, असे बरेच समाज त्यांच्या बायकांशी नीट वागतात म्हणून ते उच्च ठरतात. त्यांच्या स्त्रिया मोकळ्या मनाने रहात असतात. विवाह संबंध प्रेमावर नसावेत असे त्यात पुढे जनक राजा सांगतो. ते सांगतात कोणतेही नाते परस्पर सन्मानाच्या, आपुलकीच्या जोरावर असावे. प्रेम हा एक व्यवहार असतो त्यात खोट झाली कीं, ते संपुष्टात येते. तसे सन्मानाच्या आपुलकीच्या नात्याचे नसते म्हणून विवाह संबंध अथवा व्यापारी भागीदारी असे संबंध परस्पर सन्मानाच्या नात्याने असावेत.

## १८. अमरत्वा बद्दल –

**८३.** अमरत्व म्हणजे मरणापासून मुक्ति. मरण देहास प्राप्त होते, आत्म्यास नाही म्हणून हिंदू मान्यतेनुसार ते तत्त्वतः अशक्य आहे. कारण, देह हा नश्वर असतो. आत्मा नेहमीच शाश्वत असतो म्हणजे अमरच असतो. अमरत्वाचा संबंध मोक्षाशी आहे. म्हणजे मोक्ष प्राप्त झाल्याने खर्या अर्थाने अमरत्व सुद्धा प्राप्त होत असते. त्यासाठी ज्याला अमरत्वाची अभिलाषा आहे त्यांने मोक्ष साधना करावी. सदेह अमरत्व शक्य नसते. संत तुकारामांच्या उक्तिप्रमाणे असा मुक्त आत्मा पुनः जन्म घेतो ते उपकारा करता. साईबाबा, गजानन महाराज असें अनेक लोक अशाकरतां पुन्हा मृत्यूलोकात येतात ते इतर लोकांना मदत करण्यासाठी. हे पाहिले कीं, एक गोष्ट स्पष्ट होते कीं, तुम्ही जरी मोक्ष प्राप्त केला तरी ह्या सृष्टीच्या कामा निमित्त तुम्हाला पुन्हा पुन्हा पृथ्वीतलावर जन्म घ्यावा लागणार. अज्ञानी असतांना ज्ञानी होण्यासाठी आपण पुन्हा पुन्हा जन्म घेत असतो व ज्ञानी झाल्यानंतर इतरांचे भले करण्यासाठी पुन्हा पुन्हा आपण अवतारी म्हणून जन्म घेत रहाणार असतो. ह्याचा अर्थ पुनर्जन्म कोणालाही टाळता येत नाही. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ह्या जगाच्या शाळेत तुम्ही विद्यार्थी म्हणून अथवा शिक्षक म्हणून पण परत परत येत रहाणारच. त्यासाठी अशा गोष्टींचा जास्त विचार करू नये.

## १९. गाई बद्दल –

**८४.** जैन–ब्राह्मणांच्या प्रभावाखालील हिंदू, गाय ह्या प्राण्याला जरुरीपेक्षा जास्त महत्व देतात असं आढळते. गाय हे एक इतर अनेक प्राण्यांबरोबर माणसासाठी उपयुक्त जनावर आहे. तिच्यातून मिळणार्या कांहीं गोष्टी माणसास विशेषकरून शेतकर्यांस उपयुक्त असतात पण तेवढ्यासाठी अशा जनावरांस देवत्व देण्याचा मूर्खपणा कोणीही सुबुद्ध इसम कधीही करणार नाही. उपयोगी आहे एवढेच समजले पाहिजे असें असतांना ह्या गाईस एवढे अवास्तव महत्व कां बरे दिले गेले हे पाहिले पाहिजे. त्यासाठी थोडे इतिहासात जावे लागेल.

गाय हे एक धन म्हणजे संपत्ती आहे असे पूर्वीपासून समजले जात होते. त्यासाठी तिचे संरक्षण करणे आवश्यक समजले जाई. विशेषकरून ब्राह्मणांना गाय सांभाळणे संपत्ती म्हणून जरुरीचे असें. कारण, निरनिराळ्या धार्मिक यज्ञादि विधींच्या प्रसंगी यजमान ब्राह्मणांना गाय दान करीत असत कारण वैदिक परंपरेनुसार ब्राह्मणाच्या आहारात गाईचा समावेश होता. अशारितीने ब्राह्मणांकडे हे गोधन विपुल असें. त्याच्या चोर्या होत असत व त्या चोरलेल्या गाई हिंदू लोक खात असत कारण, गाय खाणे ही एक नित्याची बाब होती. जनक राजाने त्याच्या आदेशांत सांगितले आहे कीं, मोठी जनावरं जसे गाय, घोडा,

डुक्कर माणसाने खावेत. हे असें फार झाले तेव्हां ह्यावर उपाय म्हणून कांहीं युक्ति करणे जरुरीचे झाले. त्यावर उत्तम तोडगा ब्राह्मणांनी एकत्रितपणे शोधून काढला तो असा किं, गाईला देवतेचे स्थान द्यावयाचे म्हणजे ह्या गोष्टी थांबतील. त्यानंतर गाईला सर्व देवांची माता ठरविण्यात आले! तेवढ्याने काम होईना म्हणून तिच्या पोटात सर्व देव घातले. वस्तुतः गाईच्या पोटात तिचा मळ म्हणजे शेण असते, आमचे देव शेणाचे आहेत असा ब्राह्मणाचा दावा आहे त्याच्या सारखा नीचपणा दुसरा नाही. हिंदूंचे देव त्यांच्या हृदयात असतात कोणत्याही पशूच्या पोटात नसतात. परंतु, भोळसट हिंदू त्या खोट्या बातांवर विश्वास ठेवतात, ते थांबले पाहिजे. असे सर्व प्रकार करून शेवटी गाय खाण्यावर बंदी घातली, जेणे करून ही गाईची चोरी बंद व्हावी. अशारितीने गाईला देवत्व प्राप्त झाले. अनेक अघोरी साधनांत ज्या आगमाच्या शास्त्रात दिल्या आहेत त्यात पंचगव्याचा वापर करण्याचे सांगितले जाते. त्यात गाईचे शेण आणि मुत्र असते ह्या दोनही गोष्टी तमोगुणी असतात त्यामुळे त्यांचा उपयोग करून जे केले जाते ते पापशक्तींच्या आराधनेचा भाग असतात. म्हणून अशा सगळ्या साधनांपासून हिंदूनी सावध राहीले पाहिजे. आज हे ब्राह्मण गाई पाळत नाहीत आणि त्या गाईवर ते अवलंबूनही नाहीत तरी तो डाव अजूनही चालू ठेवला आहे. हे बंद झाले पाहिजे. बदलत्या परिस्थितीत ह्या कालबाह्य गोष्टी चालू ठेवणे अव्यवहार्य झाले आहे. आज गायींचा व्यापार हा एक महत्वाचा आर्थिक भाग असतांना त्याच्या व्यवहारात अडचण होईल असें कांहीं करणे योग्य नाही. उत्क्रांत हिंदू ही कालबाह्य व म्हणून मागासलेली विचारसरणी बंद करील. स्वातंत्र्यवीर सावरकरसुद्धा ह्याच मताचे होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

गाय व तिच्या वंशाच्या प्राण्यांच्या मांसाहाराने माणसाची वीर्यशक्ति सुधारते म्हणून तिचे मांस अशक्त माणसांस खाण्यास दिले पाहिजे. त्या करतां तिची जोपासना गोपालन उद्योग सुरु करून वाढवली पाहिजे. शुक्ल यजुर्वेदाचे लेखक याज्ञवल्क्य गाईच्या मांसाचे विशेष चाहते होते. विश्वामित्राने सांगितले आहे किं, जो ब्राह्मण गाईचे मांस खाणार नाही तो ब्राह्मण रहात नाही. म्हणजे सनातन धर्मानुसार सुद्धा गाय खाणे वैध ठरते. गाईला संरक्षण मिळावे म्हणून आकांडतांडव करणारे तिचे दुध काढण्यासाठी तिच्या वासरास ठार मारण्यात कांहीं गैर समजत नाहीत हे विशेष आहे. ह्यावरून ह्या गोवंश संरक्षकांचा दुटप्पीपणा उघड होतो. दुसर्या शब्दात सांगावयाचे असें किं, उत्क्रांत हिंदूंनी गोमांस खाण्यात कांहींही गैर नाही. त्यावर बंदी घालणे हे धर्मविरोधी कृत्य ठरते. शेतकर्याची अर्थव्यवस्था त्याच्या गाई बैल वासरे विकण्यावर अवलंबून असते जर गाई खाल्या गेल्या नाहीत तर त्यांची विक्री होणार नाही व शेतकर्याचे नुकसान होईल. हे आपल्या अर्थव्यवस्थेस हानिकारक आहे. म्हणून हिंदूंनी बिनधास्तपणे गोमांस खावे व शेतकर्याची अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत करावी व अशा फालतू विचारांपासून दूर

रहावे. ब्राह्मण हे खरेतर आम्हा हिंदूंचे दुश्मन आहेत त्यांचे व आम्हा सामान्य हिंदूंचे हितसंबंध परस्पर विरोधी आहेत असे दिसते. मुळांत ते हिंदू नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे ते जैनधर्मी असतात. जैन धर्मातसुद्धा गाय खाऊ नका असे कोठेही दिलेले नाही.

## २०. पुराणातील कथांवर विश्वास ठेवण्या बाबत –

**८५.** पुराण म्हणजे अति प्राचीन काळ असें समजले जाते. म्हणून पुराणातील कथा म्हणजे अतिप्राचीन काळातील कथा असा अर्थ होतो. वेदाचा अर्थ समजणे सोपे जावे म्हणून महाभारत, रामायण अशा रचना गौतम बुद्धाच्या नंतर उदयांस आल्या. त्यांना पहिली पुराणे समजतात. त्यात नंतर आणखीन अनेक पुराणांची भर पडली, जसें शीवपुराण, विष्णूपुराण, स्कंधपुराण, गणेश पुराण वगैरे वगैरे. पुराणं ही धर्माचा भाग नाहीत. ते संस्कृतीचा भाग आहेत. त्यासर्वच काल्पनिक कथा असतात हे सर्व जाणतात. महाभारत लिहीणारे कृष्ण द्वैपायन व्यास स्वतः सांगतात की, त्यांनी ही रचना वेद समजणे सोपे जावे म्हणून केली असून ती पूर्णतया काल्पनिक कथांवर आधारीत आहे. तेंच रामायण सांगणारे वाल्मिकी ऋषी सांगतात, किं, रामायण ही एक काल्पनिक रचना आहे. त्यासाठी ज्या पात्रांचा उपयोग केला आहे ती मात्र खरी आहेत. म्हणजे खर्या होऊन गेलेल्या राजे रजवाडे व त्यांच्या परिवारांच्या नांवाचा उपयोग करून ह्या रचना केल्या आहेत. आजही अशाप्रकारे शिवाजी महाराज, संभाजी महाराज, पहिले बाजीराव, टीपू सुलतान अशा इतिहासात होऊन गेलेल्या माणसांच्या नांवांचा उपयोग करून काल्पनिक कथांनी भरलेली पुस्तके, नाटके व चित्रपट तयार होत आहेत तसेंच हे आहे. म्हणून पुराणांचा संबंध हिंदू धर्माशी जोडणे श्रेयस्कर नाही. जगातील बहुतेक संस्कृतीत अशा पुराणातील कथा असतात त्यांना इंग्रजीत मायथॉलॉजी असें म्हणतात. पुढे कल्पक ब्राह्मणांनी देव देवींच्या नांवांनी खोट्यानाट्या कथा लिहून त्यात भर घातली. खर्या हिंदूंनी ह्यासर्व कथा केवळ करमणूक म्हणून वाचाव्यात त्यांना अवास्तव महत्व देऊ नये. विशेष म्हणजे अशा कथांवर भाबडेपणे विश्वास ठेवण्याची चूक करू नये.

वेदाचा अर्थ काढणे शक्य नसते कारण वेद हे ब्रह्माच्या निर्मित केलेल्या ऋषीने दिले आहेत माणसाला मदत करण्यासाठी असे कीं, देवता त्याला प्रसन्न करता याव्यात. वेद कोण्या एका ऋषींने दिलेले नाहीत. त्यात ऋचा व साम असतात जे गुढ मंत्र असतात. ते समजण्यासाठी किल म्हणून एक तंत्र विकसित केले गेले तरी ते मंत्र कोणत्याही शाब्दिक अर्थाने समजण्या सारखे नसतात. म्हणून जसे इतर साहित्याचा अर्थ काढता येतो म्हणजे भाषांतर करता येते, तसा वेदाच्या ऋचांचा अथवा सामांचे अर्थ काढता येत नाहीत. म्हणून पाश्चात्य विद्वान जसे मॅंक्षमुल्लर वेदातील ऋचांना व साम हास्यास्पद आहेत

असे बोलत होते. एका प्रकारे ते योग्य आहे कारण, ते तशा प्रकारे समजणे शक्य नसते. परंतु, जेव्हां आगम तंत्राचे ज्ञान उपलब्ध झाले तेव्हां ते समजू लागले कीं, वेदातील ऋचा व सामवेदातील साम हे एक एक मंत्र आहेत व ते विशिष्ट पद्धतीने जपले तर त्या त्या विविध देवता प्रसन्न करता येतात.

## २१. चौथ्या आवृत्तीचा समारोप -

**८६.** पहिल्या भागाचा समारोप करण्यानिमित्त आपण काय समजलो ते थोडक्यात पहाणे योग्य ठरेल. हिंदू कोणाला समजावयाचे ते पहावे लागेल.

जी व्यक्ति पापमुलक जीवनाचा त्याग करून आपले जीवन व्यतीत करते ती हिंदू व्यक्ति अशी व्याख्या करता येईल. स्वताला हिंदू समजण्यासाठी त्यांने कोणत्या नियमांचे पालन कसोशीने करण्याचे व्रत स्वीकारले पाहिजे, जेणे करून तो पापमुक्त जीवन जगू शकेल ते नियम देतो.

पाप न करता जगणे. त्यासाठी काय करावयाचे ते नियम असें,

- गीतेतील सोळावा अध्याय नियमितपणे वाचून त्यातील दैवीसंपदा आपल्या मध्ये किती आहेत ते पारखणे, तसेंच आसुरी संपदा किती आहेत वा नाहीत ते पारखणे, प्रामाणिकपणे हे केले पाहिजे. दैवी संपदा वाढवणे व आसुरी कमी करणे असें प्रयत्न करावेत.
- काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर अशा सहा विकारांच्या अतिआहारी जाणे म्हणजे पाप.
- त्या उलट अर्थात् पुण्यमय म्हणजे, ह्या सहा विकारांच्यापासून आत्मारामाने मुक्त रहाणे. ही झाली तात्त्विक व्याख्या.
- जेव्हां ते सहा विकार सुरक्षित मर्यादा ओलांडतात तेव्हांच ते दोष अथवा रिपु (रिपु म्हणजे शत्रू) म्हणजे पापकारक ठरतात. क्रोध, मद व मत्सर हे तीन माणसास स्वसंरक्षणासाठी आवश्यक असतात. परंतु जेव्हां ते स्वसंरक्षणा ऐवजी इतर कारणांसाठी उत्तेजित होतात तेव्हां ते दोष अथवा रिपु म्हणजे पापकारक ठरतात सुरक्षित मर्यादेत जर ते कार्यरत असतील तर त्यांच्यामुळे पाप होत नाही.
- अतिदुःखी अथवा अतिक्रोधी होणे तसेंच स्वामित्वाची भावना (हे माझे, ते माझे अशी विचारसरणी) बाळगणे पापकारक असते.
- खर्या हिंदूंनी आपला आत्माराम, देहाच्या व्यवहारांपासून दूर ठेवण्यात यश मिळवले पाहिजे अशी अपेक्षा असते. म्हणजे प्रत्येक हिंदू एकापरीने साधकच असला पाहिजे अशी अपेक्षा असते.

- पापाचे आणखीन एक कारण सांगितले आहे ते हिंसेशी संबंधित असते. हिंसा म्हणजे दुख, वेदना निर्माण करणे, वेदना देणे. तीन प्रकारच्या हिंसा सांगितल्या आहेत. शरीराचे दुःख, मनाचे दुःख व तिसरे आहे, हितद्वेषाचे दुःख. हितद्वेषांत आर्थिक फसवणूक, विश्वासघात, खोटी आश्वासने देणे वगैरे तत्सम कृती येतात. शरीराचे दुःख ह्यात शारिरीक त्रास, वेदना देणे (स्वताला अथवा दुसर्याला) अशी कृत्ये पापकारक समजली आहेत. अपमान करणे, खिजवणे, टोमणे मारणे, दुर्लक्ष करणे, खोटे आरोप करणे, ज्या गोष्टींमुळे एकाद्याच्या मनांस वेदना होतात अशी सर्व कृत्ये पापकारक समजली जातात.
- जर विनावेदना हत्या केली तर ते पाप ठरत नाही.
- ह्या ठिकाणी पाप करण्या मागील उद्वेश महत्वाचा असतो. प्रत्यक्ष कृतीपेक्षा त्या मागीत उद्वेश त्यात पाप आहे कां नाही ते ठरवत असतो. उद्वेश नसतांना जर पाप सदृष्य कृत्य अपघाताने झाले तर ते पाप समजले जात नाहीत. ह्या ठिकाणी पाप व पुण्य म्हणजे काय ते समजणे जरूरीचे आहे. त्यासाठी आत्मा म्हणजे काय ते प्रथम समजले पाहिजे. आत्मा स्वयंभूचा अंश असतो व अध्यात्मिक उर्जा हे त्याचे खरे स्वरुप असते. जेव्हां आत्मा शरीर धारण करतो तेव्हां त्या शरीराला धारण करण्यासाठी त्याची अध्यात्मिक उर्जा खर्च होत असते. त्यामुळें आत्म्याची ताकद कमी होत असते. त्याला पाप समजले जाते. परंतु, जेव्हां चांगुलपणा, माणूसकी व भूतदया आचरणात असते तेव्हां पुण्य म्हणजे अध्यात्मिक उर्जा वाढत असते. आत्म्याच्या ताकदीच्या मजबूतीसाठी अशी अध्यात्मिक उर्जा वाढणे आवश्यक असते. अध्यात्मिक उर्जा वाढवणे म्हणजे पुण्य व कमी होणे म्हणजे पाप समजले जाते. ज्या प्रकारच्या विचारांमुळे आणि कृतीमुळें अध्यात्मिक उर्जा वाढते त्या सगळ्या पुण्यकारक असतात व कमी करतात त्या पापकारक असतात. हिंदू मान्यतेनुसार माणसाने त्याच्या आत्म्याची अध्यात्मिक उर्जा सतत वाढवत ठेवावयाची असते. वेदातील देवता तसेंच आगमात दिलेल्या देवता त्यांना प्रसन्न केले तर त्या साधकाची अध्यात्मिक उर्जा वाढण्यात मदत करतात असे समजले जाते. त्यासाठी विविध प्रकारचे जप करण्याची प्रथा प्रचारात आली आहे. इतर पद्धती आहेत त्याची माहिती पुढे आपण पहात आहोत.
- "जीवोजीवस्य जीवनम्" ह्या नियमानुसार, खाण्यासाठी प्राणी मारण्याची परवानगी हिंदूंना आहे. तसेंच स्वसंरक्षणासाठी, उपद्रवकारक असेल तर (उंदीर, डांस, रोगजंतु वगैरे) मारण्याची मुभा असते त्यामुळे पाप लागत नाही. मजेसाठी अथवा खाण्याव्यतिरीक्त इतर कारणांसाठी जसें,

शिकार करणे पापकारक असते.

- विशेष म्हणजे, हिंसा करण्याचा उद्देश आहे व मनांने ती हिंसा केलीसुद्धा परंतु, प्रत्यक्ष हिंसा जरी झाली नसली तरी ते पाप ठरते. कारण, पाप मनांने प्रथम होत असते.
- जेव्हां दोन पापांतून निवड करण्याची वेळ येते तेव्हां कमी वाईट पाप निवडावे व जास्त वाईट पाप टाळावयाचे असते. पाप करण्याशिवाय गत्यंतर नाही अशी परिस्थिती असेल तर त्यातल्या त्यात कमी वाईट पाप निवडावे, पाप क्षालनासाठी सत्पात्र दान, सत्पात्र सेवा (वृद्ध, लहान बालकं, अपंग इत्यादी), दुसर्यांना मदत करणे, प्रायश्चित्त (परमेश्वराकडे याचना करणे किं, मी पुन्हा असें पाप करणार नाही व ते वचन पाळावे.) करून घेणे व ध्यान साधना करणे असें उपाय सांगितलेले आहेत, ते सर्व करावे लागतात.
- निसर्गाच्या नियमानुसार न वागणे हेसुद्धा पाप समजले जाते हे एक आणखीन पापाचे कारण आहे. अनैसर्गिक लैंगिक संबंध पापकारक असतात. समलिंगी व्यवहार दोन पुरुषांतील असेल तर तो पापकारक असतो, परंतु, दोन स्त्रियांतील असेल तर तो पापकारक ठरत नाही. असे संबंध लग्नविधी न करता सांभाळावेत.
- गीतेच्या शिकवणूकी विरूद्ध वागणे पापकारक आहे कारण त्यामुळे पुण्यक्षय होतो. म्हणजे दुर्जनांना माफ करणे व त्यांना दया दाखवून त्यांच्या दुष्कृत्यास उत्तेजन देणे पाप आहे.
- दया, माफी, क्षमा ह्यांचा अयोग्य रीत्या वापर करणे पाप आहे.
- सर्व प्रकारची व्यसने, मानसिक आणि दैहिक, पापकारक असतात. ह्या व्यसनाबद्दलची चर्चा लेखात आधी दिली आहे.
- मदभाव (superiority complex) आणि मत्सरभाव (inferiority complex) व त्यामुळे जे कृत्य केले जाते ते पापकारक असू शकते. म्हणजे, स्वताला अति उच्च अथवा अतिनीच समजणे पापकारक असते. अशी कांहीं पापाबद्दलची कारणे दिली आहेत. ती सर्व टाळणे म्हणजे पुण्य करणे असें समजता येईल.
- आरोग्य व आहार अशांसाठीच्या बर्याच तरतुदी धर्माच्या पवित्र नियमांत केल्या जातात कारण, त्या धर्मात करण्याचे सांगितले किं, त्यांचे पालन इमाने इतबारे होत असते. एरवी माणसे त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. ह्यासाठी धर्मातील विविध तरतुदीं मागील उद्देश समजून काम करणे चांगले असते.
- निसर्गाचे नियम न पाळणे हे पाप असें समजले तर निव्वळ शाकाहार करणे किंवा निव्वळ

मांसाहार करणे हेसुद्धा पापकर्म ठरते. आपण पृथ्वीच्या समशितोष्ण कटीबंधात असल्यामुळे आयुर्वेदाप्रमाणे आहार उभय रहाण्यासाठी शाकाहाराचा भाग ७० ते ८० टक्के ठेवावा व उरलेला मांसाहार असावा असें आहे. असे धोरण आहाराबाबत ठेवले तर माणसाची प्रकृती उत्तम रहाते असें समजले जाते. परंतु, शीत कटीबंधातील लोकांनी आहार ५० टक्के प्रती ठेवावा.

- हिंदू सर्व प्रकारच्या हिंसांना पाप समजत नाहीत हेसुद्धा लक्षात घेतले पाहिजे. कारण, हिंदूंच्या विचारानुसार जर हिंसा अध्यात्मिक र्हासास कारण होत नसेल तर ती हिंसा पाप ठरत नाही व म्हणून ती हिंसा करण्यास हरकत नसते.
- हिंसा करण्याची इच्छा नसतांना इतर कारणांमुळे हिंसा झाली तर ती हिंसासुद्धा पाप ठरत नाही.
- ज्यांत हिंसा करण्याचा उद्देश नसतो पण हिंसा झाली तर त्यांमुळे पाप लागत नाही.
- जर पाप होत नसेल तर ती हिंसा वैध ठरते हे लक्षात घेतले पाहिजे.
- हिंसात्मक हत्या जीव करतो किं, आत्मा करतो? जर त्या क्रियेत जीवाबरोबर आत्मा सामील असेल तरच ते कृत्य आत्म्यास बाधते, एरवी नाही कारण, जीवाला पाप व पुण्य दोन्हीही लागू होत नाहीत कारण जीव हे एक रासायनिक तत्त्व आहे. पापाची बाधा फक्त आत्म्यालाच होत असते.
- खाण्याशिवाय इतर कारणांने जर त्यांने प्राणी मारले तर ते मात्र पाप ठरेत. खाण्यासाठी विनावेदना मारले तर ते पाप ठरत नाही.
- निसर्गांने म्हणजेंच परमेश्वराने घालून दिलेले पवित्र नियम पाळणे (हे ह्या यादीत आहेत) माणसाचे कर्तव्य असते.
- मत्सर, द्वेष ह्यांच्या आहारी जाऊन जे करतो त्यामुळे पाप होते.
- हिंदूंना खाण्याबाबत पांच नियम आयुर्वेदात सांगितले आहेत ते असें,
  जे आवडते ते खावे,
  जे पचेल ते खावे,
  पोटापुरते खावे,
  जे आरोग्यास घातक ते खाऊ नये.
  दुसर्यास खाण्याचा आग्रह करू नये.

ह्या नियमांचे पालन करण्यामुळे पापविहीन जीवन तो हिंदू जगतो. पाप केल्याने माणसाचा आध्यत्मिक र्हास होतो म्हणून पाप करावयाचे नसते कारण, माणसाचा जन्म अखेरीस मोक्ष प्राप्त करण्यासाठी असतो. तरीसुद्धा प्रापंचिकास सुद्धा पापविरहीत जीवन जगल्यामुळे सुखी जीवन प्राप्त होते त्याचे नशीब सुधारते, म्हणून अशा माणसांनेसुद्धा पाप करणे टाळणे श्रेयस्कर असते.

पापकृत्ये न केल्याने पुण्यमय जीवन मिळते परंतु, खरे पुण्य जमवण्यासाठी माणसांने ध्यान साधना कराव्यात. जसें, देव न मानणार्यांसाठी, विचारहीन अवस्थेत सोऽहम् अथवा विपश्यना करणे व देव मानणार्यांसाठी, आराध्य देवतेचा जप, एकचित्ताने ईश-स्मरण करणे अशा साधना कराव्यात. केवळ सोऽहम् अथवा विपश्यना अथवा ध्यान साधना करणे, पुण्य जमा करण्यासाठी पुरेसे नसते. त्याशिवाय वागण्यात व विचार करण्यातसुद्धा खरा चांगुलपणा, माणूसकी व भूतदया असणे आवश्यक असते. निष्पाप लोकांना मदत करणे, सभोवार चांगुलपणा वाढवणे, दुष्कृतांना विरोध करणे, शक्य असल्यास दुष्कृतांस नाउमेद करणे अशी कृत्ये पुण्यकारक असतात. त्याशिवाय पापकृत्य न करण्यांने पुण्य प्राप्त होते.

**८७.** माणसाच्या तीन प्रवृत्ति असतात, दैविक, पाशवी आणि राक्षसी. सामान्य माणूस पाशवी प्रवृत्तिचा असतो. पाशवी प्रवृत्तिमुळे तो विविध वासनांत (काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर ह्यांमुळे उत्पन्न होणार्या) रममाण होत असतो. ह्या वासना कमी केल्याने तो दैविक प्रवृत्ति कडे सरकतो व जर तो ह्या वासनांत अधिकाधिक रममाण होत गेला तर तो राक्षसी प्रवृत्तिच्या आहारी जात असतो. हे तत्त्व समजून जो सावधपणे आपले जीवन जगतो तो खरा हिंदू असतो. पाश्चात्य संस्कृतीत पाशवी प्रवृत्तीकडे कल असतो. त्यातच रमावे अशी भूमिका तेथे असते. त्यामुळे वासनामयतेचे समर्थन ते करतात. आपल्या येथे दैविक प्रवृत्तिचा आग्रह असतो. हा मुख्य फरक त्याच्या व हिंदूंच्या वैचारिक भूमिकेंत असतो. पाशवी कडून अतिरेक झाल्यास त्यातून राक्षसी प्रवृत्तीकडे ते नकळत वळतात.

**८८.** सकाम अथवा निष्काम भक्ति दैवतांची करणे हे ऐच्छीक आहे. अशी भक्ति करणे हिंदूंस बंधनकारक नाही पण पापविरहीत जीवन मात्र बंधनकारक आहे. म्हणजे देवांची पुजा करणे अथवा न करणे हे त्या माणसाच्या इच्छेनुसार असेल. पुण्य जमवण्यासाठी ध्यान साधना करणे बंधनकारक आहे कारण, त्याने माणसाचे जीवन सुखी होते व पुढील जन्मी तो अधिक चांगल्या जीवनाचा हक्कदार ठरतो. अशा कारणांने होणार्या इतर गोष्टी जसें, तीर्थयात्रा, पुजापाठ, देशाटन, उपवास वगैरे हे सर्व ऐच्छीक आहे. हिंदूंतील जे देव मानतात त्यांनी दररोज आपल्या आराध्य देवतेची पुजा मनापासून करावी. दैवतांना

फसवता येत नाही ह्याची पूर्ण जाणीव ठेवून आणाभाका कराव्यात. सात्त्विक पुजा एकट्याने एकांतात करावी. राजसी व तामसी पुजा मात्र धुमधडाक्यात सर्वांना दिसेल अशी करून सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करावी अशा पुजेसाठी पुरोहीत बोलावून ती थाटामाटात करावी. समाज घडवण्यासाठी अशा प्रयोजनांची आवश्यकता असते. पुजेसाठी दैवत निवडतांना ते मोक्षार्थी आहे कां प्रापंचिकाचे आहे ते पाहून हिंदूंनी आपल्या प्रवृत्तीनुसार आहे कां नाही ते पाहून घ्यावे. चुकीचे दैवत पुजल्यास त्यामुळे नुकसान होऊ शकते.

**८९.** गौतम बुद्धाने दुःखाचे कारण शोधण्यासाठी तपस्या केली व तो अशा निर्णयाप्रत आला किं, दुःखांचे कारण इच्छा आहे व म्हणून माणसांने इच्छा सोडाव्यात असें त्यांने त्याच्या अनुयायांना सांगितले. परंतु, हे फार जुने ज्ञान झाले. आज उपलब्ध असलेल्या प्रगत ज्ञानानुसार सर्वच इच्छांमुळे दुःख प्राप्त होते असें समजणे चुकीचे ठरते. अशा बर्याच इच्छा माणसाला केवळ आनंद देतात. कोणत्या इच्छांमुळे दुःख प्राप्त होते व कोणत्यांमुळे आनंद मिळतो ते पहावे लागेल. जीवाच्या इच्छा (काम) देहाच्या हितासाठी असतांत व त्यांच्या पूर्ततेने आनंद मिळतो परंतु, आत्म्याच्या इच्छा ज्या लिंगदेहाच्या दबावाखाली उत्पन्न होतात व त्या बिनकामाच्या व अमर्याद असतात, त्या इच्छा माणसांस दुःख देत असतात. ह्यासाठी हिंदू माणसांने आपल्या इच्छांचा उगम कशात आहे ते नीट तपासून त्यानुसार त्यांचा पाठपुरावा करावयाचा असतो. हे जर पहाण्याची सवय ठेवली तर तो कधीही दुःखी होणार नाही. ह्यासाठी शिपाई बुद्धिचा उपयोग करावा. ह्या बद्दलची काही चर्चा आधी झाली आहे.

दुःखाचे मुख्य कारण आपण करीत असलेली पापं हे समजून माणसांने पापकर्म टाळून आपले जीवन व्यतीत करावे. जी पांच गृहीत तत्त्वे हिंदूंनी लक्षात ठेवून जगले पाहिजे ती पाहूया.

पहिले गृहीत तत्त्व आहे, आपल्याला पुनर्जन्म प्राप्त होणार आहे व त्यात आपल्या ह्या जन्माच्या चांगल्या वाईट कर्मांची फळे भोगावी लागणार आहेत.

दुसरे गृहीत तत्त्व आहे, अद्वैत, त्यानुसार हे जग काम करते असे समजले जाते. त्याप्रमाणे दुसर्याचे वाईट चिंतीले अथवा केले तर पुढच्या जन्मी स्वताचेच वाईट होते व जर दुसर्याचे चांगले चिंतीले व केले तर पुढच्या जन्मी स्वताचे चांगले होत असते. म्हणून नेहमी इतरांचे चांगले चिंतावे व करावे. ह्याला अद्वैत तत्त्व समजले आहे कारण मी व दुसरा हे तत्त्वतः एकच असतो.

तिसरे गृहीत तत्त्व आहे कर्मविपाक, त्यानुसार ह्या जन्मी आपण केलेले कर्म आपल्याकडे फलरुपांने पुढच्या जन्मी नशीब बनून परत येते. चांगल्या कामाची चांगली फळे व वाईट कामाची वाईट फळे मिळतात.

चौथे गृहीत तत्त्व आहे, शक्तिसातत्य. त्यानुसार कर्मविपाकाचे फळ जेवढ्यास तेवढे असें पुढच्या जन्मी नशीबाच्या रुपांने मिळते.

पांचवे गृहीत तत्त्व आहे इच्छापूर्ती. ह्यानुसार ह्या जन्मात आपण जी इच्छा तीव्रतेने आयुष्यभर जोपासतो ती इच्छा जर आपला पुण्यसंच पुरेसा योग्य असेल तर पुढच्या जन्मी पूर्ण होते. समजा ह्या जन्मी तुम्ही कुरुप आहात व आपण सुंदर दिसण्याचे इच्छित असाल तर पुढच्या जन्मी तुम्ही सुंदर होता. श्रीमंत होण्याची इच्छा आहे व पुण्यसंच पुरेसा आहे तर श्रीमंत घरात जन्म घेता. ह्यासाठी माणसांने आपला पुण्यप्रभाव वाढवण्याच्या दृष्टीने सर्व जीवन निष्पाप जगले पाहिजे. त्याशिवाय ध्यान साधनेला वेळ द्यावा. माणसे पैसा कमावण्यात व त्याचा संचय करण्याच्या मागे जेवढे असतात तितके जर ते पुण्यसंच करण्यात लक्ष घालतील तर ते जास्त सुखी व यशस्वी होतील. हा हिंदूंसाठी मूलमंत्र आहे. माणसाची खरी लक्ष्मी असते त्याचा पुण्यसंच, पैसा नाही, हे जो ओळखतो तो खरा हिंदू. पैसा फक्त ह्या जन्मी उपयोगी असतो पण पुण्यसंच अनेक जन्मात उपयोगी रहातो. कांही लोक पैशासाठी पाप करतात ते अतिमूर्ख समजावेत. आज परिस्थिती अशी आहे किं, ब्राह्मण (छुपे)जैन झाले असल्यामुळे हिंदूंचा पुरोहित वर्ग नष्ट झालेला आहे म्हणून, हिंदूंनी स्वताच्या पुजा स्वताच कराव्यात.

शेवटी आपण धर्म व संस्कृती ह्यातील भेद समजून घेतला पाहिजे. धर्म माणसाला त्याच्या अध्यात्मिक प्रगती बाबत मार्गदर्शन करण्यासाठी असतो. संस्कृती माणसाचे त्याच्या समाजातील कार्य काय त्याबद्दलच्या रितीभाती बद्दलचे मार्गदर्शन करते. अध्यात्म साधनेत येणार्या गोष्टी अशा, सात्त्विक पुजा, सोऽहम् साधना, विपश्यना, पापरहीत जीवन जगणे, सत्कर्मात रमणे, दुष्कृतांना विरोध करणे. संस्कृतीत येणार्या गोष्टी अशा, रजोगुणी व तमोगुणी पुजा, सणसूद साजरे करणे, नांच गाणे, पुराणातील कथा, समाज घडवणार्या बर्याच गोष्टी संस्कृतिच्या क्षेत्रात येतात. संस्कृती सांभाळतांना धर्म बुडणार नाही ह्याची दक्षता हिंदूंनी ठेवावयाची असते.

## २२ महाभारतात भिष्म आणि युधिष्ठीर ह्यांच्यात झालेले प्रश्नोत्तरं येथे अधिक अभ्यासाठी दिले आहेत –

९०. युधिष्ठीर विचारतात, मला सांगा पाप कशातून उद्भवते व कशामुळे ते वाढते.

भिष्म सांगतात, मी तुला सांगतो पापाचे मूळ कशात असते. लोभ हे पापाचे मूळ आहे. त्यामुळे चांगुलपणा, माणूसकी व बर्याचवेळा भूतदया संपुष्टात येते. लोभातून खोटेपणा, कपट कारस्थानं उत्पन्न होतात. ते संपन्न न झाल्याने त्यातून क्रोध उत्पन्न होतो. विविध प्रकारच्या माणसाच्या वासना

त्या लोभाच्या मुळांशी असतात. अति लोभामुळें माणसं पाप करण्यास प्रवृत्त होतात. त्यांचे विवेक संपतात. गर्व, उर्मटपणा, नीचपणा, दुष्टपणा, निर्लज्जपणा असे दोष त्यांच्या स्वभावात उत्पन्न होतात. अशा दोषांच्या वाढण्यामुळे इतर विकृत्या त्यात येतात जसे, विवंचना, कंजूषपणा, बदनामी, वासनांधपणा, संशयीपणा, सत्तेचा उन्माद, व्यभिचार, असे विविध दोष त्याच्यात उत्पन्न होतात. त्या सर्वांमुळे पाप वाढत जाते. त्यातून सर्व प्रकारचे पाप तो करू लागतो. त्यात तो अडकत जातो. जे सहा दोष सांगितले आहेत त्यात लोभाचा क्रम तिसरा आहे. पहिला आहे काम जो जरी दोष असला तरी तो शरीराच्या विविध कार्यांसाठी आवश्यक असतो. त्यानंतर क्रोध सांगितला आहे तो लोभाची पूर्तता झाली नाही तर उत्पन्न होतो. ज्यांचे मन अस्वस्थ असते त्यांच्या मनात शंकाखोरपणा घुसतो व त्यानंतर हे सगळे एका मागोमाग एक त्याच्या मनात घर करू लागतात. ते न व्हावे ह्यासाठी माणसाने मनाची शुद्धी करावयाची असते. लोभात अडकलेला कितीही मोठा विद्वान ब्राह्मण असला तरी तो शुद्राहूनही नीच ठरतो. दुसर्याचे भले झालेले त्याला रुचत नाही. त्यातून मत्सर व आसुया त्यांच्या मनात उत्पन्न होते व मोठ्या पापाला जन्म देते. पाप म्हणजे काय ते समजून घे. ज्या कृत्यामुळे अथवा ज्या विचारां मुळे आत्म्याची अध्यात्मिक उर्जा खर्च होते ते पाप असे समजले जाते आणि ज्यामुळे आत्म्याची अध्यात्मिक उर्जा वाढते त्याला पुण्य समजले जाते. ह्या अध्यात्मिक उर्जेच्या उच्च निचतेवर त्या माणसाचे तीन गुण सत्त्व, रजो आणि तमो ठरत असतात. ज्याची उर्जा उच्च ते सात्त्विक असतात. त्यापेक्षा कमी ते रजोगुणी असतात व त्याहीपेक्षा कमी असेल तर तो तमोगुणी ठरतो. त्यासाठी गुणांची त्रिसुत्री दिली आहे चांगुलपणा, माणूसकी व भूतदया त्यांच्या प्रामाणिक पालनाने पुण्य वाढते व पाप कमी होते. म्हणून अरे युधिष्ठीरा, तू ह्या त्रिसुत्रीचे पालन कर व जे त्याप्रमाणे जगतात त्यांच्या बरोबर तुझे राज्य चालव.

तसे पाहिले तर पापाच्या नागाला असंख्य फणे असतात. वर दिलेले व न दिलेले असे अनेक दोष हे त्याचे फणे असतात. त्यांतून ते फुत्कार करत असतात व असंख्य प्रकारच्या विकृत्यांचे वीष ओकत असतात. आता मी तुला सांगतो जे लोभाच्या व त्याप्रमाणे दोषात अडकत नाहीत त्यांचे वळण कसे असते. जे उपकार प्रामाणिकपणे फेडतात, जे चांगले काम करतांना घाबरत नाहीत, ज्याना कोणतेही व्यसन नाही, ज्यांच्या वागण्यात, बोलण्यात संयम असतो, ज्यांच्यासाठी सुख व दुःख समान असते, जे ब्रह्माच्या कृपेसाठी वचनबद्ध असतात, जे निष्काम मदत करतात, जे जास्त देण्याचे पहातात व घेण्याबाबत संकुचित असतात, ज्यांच्या स्वभावात दयाबुद्धी आहे, जे आपल्या पितरांचे ऋण फेडण्याचा प्रयत्न करतात. ज्यांच्यात पापपुण्याची भावना असते, जे संहितेत दिलेले

सगळे नियम प्रामाणिकपणे आचरणात आणतात, जे सत्यासाठी (ज्यामुळे पुण्य प्राप्त होते ते सगळे असा अर्थ सत्याचा आहे ह्या ठिकाणी) प्राण द्यावयाला तयार असतात, जे सत्यवाद्यांच्या परंपरेने जातात, ते सत्यासाठी निर्भयपणे काम करतात, ज्यांची मति स्थिर आहे, जे सत्पात्र लोकांसाठी मृदू असतात व विकृतांशी कठोर असतात, ज्यांच्या वासना संयमित असतात, जे निगर्वी असतात, जे प्रसिद्धीच्या मोहाने बद्ध होत नाहीत, जे दिलेला शब्द पाळतात, अशा लोकांना सात्त्विक माणसे असे समजले जाते. अशांना भिती, क्रोध आणि दुःख बाधत नाही. त्यांच्यात दंभ नसतो. दाखवायचे एक व करावयाचे दुसरे असे त्यांचे वागणे नसते. ते सामान्यतः समाधानी असतात, ते लोभात अडकत नसल्याने त्यांच्या सगळ्या प्रेरणा नेमस्त असतात. अशा लोकांचा तू तुझ्या राज्यात संग्रह करून त्यांच्या मदतीने तुझे राज्य करशिल तर तुझा उदंड उत्कर्ष होईल. फायदा व तोटा, आनंद व खेद, पसंत व नापसंत, जीवन व मृत्यू, अशा लोकांना प्रभावित करत नाहीत. कारण साधारणपणे असे लोक कळत अथवा नकळतपणे ब्रह्माच्या शोधात असतात. ज्यांच्यात तसे गुण नसतात ते मार्गभ्रष्ट होणारे असतात म्हणून तू त्यांच्या पासून नेहमी सावध असशिल.

९१. सगळ्या वासनिक गोष्टींचा त्याग करण्याला त्याग म्हणतात.

९२. शरपंजरी झोपलेले भिष्म नकुलाला सांगू लागतात. "माद्रीच्या मुला, तुला माहिती देण्याच्यावेळी माझ्या जखमांतून रक्त वाहू लागले आहे. आता जे सांगतो ते नीट ऐक, प्राचीन काळी विचार रुपी पाण्याचा अथांग सागर होता. त्यात शांतता होती. तेथे कांहींच नव्हते. सगळीकडे अंधार होता. त्यात कोणतेही वस्तूमात्र नव्हते. त्यात स्वयंभूने ब्रह्माला त्यांच्या विचारशक्तीतून उत्पन्न केले होते. त्यातून शीव आणि विष्णू उत्पन्न झाले. त्यांच्यातून नंतर ऋषी उत्पन्न झाले. ऋषींतून रचना परिमाण उत्पन्न झाले. ज्याला गणिती मुल्य नव्हते. त्यानंतर शीवातून तीन वास्तविक परिमाण जसे भार, काळ, गती (वास्तविक उर्जा, त्यात उष्णता, ध्वनी, विद्युत आणि प्रकाश) आणि अंतर उत्पन्न झाली त्यांना गणिती मुल्य होते. त्यानंतर त्यातून आकाश, वायुदेव, अग्नीदेव, जलदेव (वरुण) असे उत्पन्न झाले. त्यानंतर तीन जग (स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ) त्यांतून उत्पन्न झाली. त्यानंतर इतर सगळे त्यातून उत्पन्न होत गेले जे एकमेकांशी संबंधित होते. त्यात तारका, सुर्य, चंद्र, धुम्रकेतू, ग्रह, नक्षत्र असे होते. त्यानंतर काळाच्या माध्यामातून मोसम, ऋतू, महिने, दिवस, वर्षे, पंधरवडे, आठवडे असे तयार झाले. त्यातून प्रकाश आणि कळोख दिसू लागले. त्या सगळ्या संसाराच्या कारभाराचे सूत्र ब्राह्माचे ऋषी होते. त्यांची नांवे आहेत, मिरिची, अत्री, पुलस्त्य, पुलह, कृतू, वसिष्ठ, अंगिरस असे सात होते. त्यांना मदत करणार्यात होते रुद्र,

स्कंध, प्रचेता. ब्रह्माच्या अनेक कन्या उत्पन्न झाल्या त्यातून पापाचा मार्ग सुरू झाला. तो पर्यंत फक्त पुण्य मार्ग होता. ब्रह्माच्या कन्यांबरोबर ज्या मानस कन्या होत्या मानस ऋषी ह्यांच्या संपर्कातून अनेक देवी व देवता निर्माण झाल्या असा ह्या सृष्टीचा क्रम आहे. त्यासगळ्या अमानवी शक्ति होत्या. त्याचवेळी पितर, गंधर्व, अप्सरा, यक्ष, राक्षस ह्या आणखीन शक्ती तयार होत होत्या ज्यांच्याकडे ह्या सृष्टीचा कारभार होता. त्यानंतर पृथ्वीवर सर्वप्रकारचे प्राणी, वनस्पती उत्पन्न होत होते. त्याची गरज उत्पन्न झाली कारण पाप व पुण्य ह्यांचे संतुलन हा मोठा प्रश्न होता. त्यासुमारास ऋषींनी वेद सांगितले. त्यात सनातन धर्माचा आराखडा होता. त्यात नैतिकतेचे नियम, अध्यात्मिक उर्जाची व देवतांना प्रसन्न करण्यासाठी जे आगम आहेत ते दिले गेले. त्यात कर्मकांडाचा विकास झाला ज्यातून पुढे यज्ञविधींचे महत्व वाढत गेले. यज्ञांत वेदांतील ऋचा आणि सांम जे प्रथमदर्शनी निरर्थक आहेत त्यांचा उपयोग विविध देवतांना आवाहन करण्यासाठी होऊ लागला. त्या मध्ये आदित्य, वसू, रुद्र, साध्य, काश्यप, वसिष्ठ, गौतम, अगस्त्य, नारद, पर्वत, वालखिल्य असे ऋषी आहेत जे सृष्टीच्या कारभाराचे व्यस्थापन करत असतात. ते आणखीन ब्राह्मण म्हणून ओळखले जात होते. त्यांची थोर परंपरा राखणार्यांना ब्राह्मण समजले जाऊ लागले. त्याना ऋषींच्या अनेक शुद्धतेच्या परंपरा आचरण्याचे काम होते. त्यातून ब्राह्मण वर्ण सुरू झाला. त्याच वेळी ब्रह्माच्या कन्याने ज्या पापाचा विकास केला त्यातून दैत्य, दानव, राक्षस तयार झाले होते. ते चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या पुण्याच्या मार्गांच्या विरुद्ध प्रवृत्ती माणसात व इतर प्राण्यांमध्ये उत्पन्न करत असतात. त्यातून सगळे वाद सुरू होतात. त्यामुळे राजाची नियुक्ती माणसाच्या समाजात सुरू झाली. त्यातून न्यायदंड तयार करावा लागला. त्याचे नैतिकतेचे व आपद्धर्माचे नैतिक नियम तयार झाले त्याची अंमलबजावणी करू लागला मनुष्य प्राणी. त्यातून न्याय व्यवस्था विकसित झाली.

९३. युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा पितामहा, जगाच्या सुरूवातीला पुण्य होते त्यानंतर ब्रह्माच्या मानसकन्यांच्या अपत्यांतून पाप करणारे दैत्य, दानव, असूर, राक्षस असे अनेक उत्पन्न झाले ही पापाची निर्मिती होण्याची काय आवश्यकता होती? जे होते सुरूवातीला तेंच योग्य असतांना ही गुंतागुंत उत्पन्न कां केली ब्रह्माने"?

भिष्म सांगतात, जे मला समजले ते सांगतो. अघमर्शन ऋषींनी ते त्यांचा शिष्य गुणी ह्याला सांगितले होते. ते असे, स्वयंभूने इच्छा केली व म्हणून हा संसार सुरू झाला. स्वयंभूचे खरे स्वरुप आहे अध्यात्मिक उर्जा. हि प्राथमिक उर्जा आहे. त्याआधी कांहीं नव्हते. स्वयंभूने प्रथम आकाश उत्पन्न केले

त्याच्या विचारातून व त्यात तो अध्यात्म स्वरुप स्वयंभू पसरला. परंतु, ते होतांना सगळ्या भागात ती उर्जा समान पसरली नाही. कांहीं ठिकाणी जास्त व कांहीं ठिकाणी कमी अशी ती पसरली. त्यामुळे त्या मूळभूत उर्जेचा प्रवास जास्त कडून कमी कडे होणे आवश्यक होते ज्याने ती सगळीकडे सारखी पसरेल. त्यासाठी जास्त भागाला पुण्य प्रदेश अथवा तीर्थक्षेत्र आणि कमी भागांना पापक्षेत्र असे समजले जाऊ लागले. ते पापाच्या उत्पत्तीचे कारण आहे. ज्याप्रमाणे पुण्याची अभिव्यक्ती चराचरांच्या अस्तित्वाने साध्य झाली तशी पापाची होणे शक्य नव्हते म्हणून ब्रह्माने त्याच्या कन्यांच्या द्वारा अनेक पापकारक शक्तीस्थानं तयार केली त्यातून दैत्य, दानव, राक्षस आणि असूर असे उत्पन्न झाले ज्यांचे कार्य पुण्याचा र्हास करणे एकढेच होते. म्हणजे ती सारखी पसरेल. ते कार्य अजून पुरे झालेले नाही व जोवर ते पूर्ण होत नाही तोवर हा पाप व पुण्याचा खेळ असांच चालू असेल.

९४. भिष्म पुढे सांगतात, ह्या जगाचे तीन भाग तयार झाले, त्यांना स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ अशी नांव आहेत. त्यातील स्वर्ग व पाताळ हे अदृष्य आहेत माणसाला त्याच्या चर्मचक्षूना ते दिसत नाहीत. पृथ्वी मात्र दृष्य असते. स्वर्गात पुण्यवंत असतात व पाताळात पापवंत असतात आणि मनुष्य पृथ्वीवर असतात. स्वर्गाचे अनेक लोक आहेत व त्यात पुण्यवंत त्यांच्या पुण्याच्या शक्तीनुसार ते रहात असतात. पाताळात पापवंत रहातात. त्याचेसुद्धा अनेक लोक आहेत. गुणी अघमर्शन ऋषीला विचारतो, आकाशात ते तीन नेमके कोठे असतात. तेव्हां अघमर्शन सांगतात की, आकाशात ते एकाच जागी असतात पण कारण ते अदृष्य आहेत मनुष्य ते पाहू शकत नाही. गुणी विचारतो, पाप व पुण्य ह्यांच्या इतर कोणत्या अभिव्यक्ती आपण सांगू शकाल त्या मला सांगा. अघमर्शन सांगतात की, सृष्टीच्या सगळ्या गोष्टी ज्या तीन गुणात विभागलेल्या आहेत ते सत्त्व, रज आणि तम हे गुण पाप पुण्याच्या कमी जास्त होण्यामुळे असतात. जेथे अध्यात्मिक उर्जा उच्चतेची असते ते सात्त्विक समजले जाते व ते अधिकाधिक सात्त्विक होत जाऊ शकते. त्यात कमी होत गेली कीं, त्यातून प्रथम रजोगुण व्यक्त होत असतो व त्यात क्रमाक्रमाने कमी होत गेली कीं, एका अवस्थेला आपण तमो अवस्था असे सांगत असतो. त्याही पेक्षा कमी झाल्याने अखेरी, ते पूर्ण पापमय होते तेव्हां त्याला असुरीसंपदा असे समजले जात असते. अध्यात्मिक उर्जेचे गणिती मुल्यमापन म्हणजे आकड्यात करता येत नाही. म्हणून कमी व जास्त अशा संज्ञा वापरावयाच्या असतात. गुणी त्याच्या गुरूला अघमर्शन ऋषींना विचारतो, मला सांगा, अहो गुरूवर्य, मनुष्याने पुण्य का कमावत रहावयाचे असते ते सांगा. तो पाप करत राहीला तर काय बिघडते ते सुद्धा सांगा.

अघमर्शन सांगतात, सृष्टीतील चराचराचे विभाजन त्याप्रमाणे करण्यात आले आहे त्याची माहिती मी तुला सांगतो. मनुष्य पुण्यकारक प्राणी अशी विधात्याची रचना असल्यांमुळे त्याने पुण्य कमवावयाचे असते तरच त्याची मुक्ती होऊ शकते. तो पाप करत राहीला तर त्याची मुक्ती होत नाही. सर्वच मोठे प्राणी त्यात सगळे पशू, पक्षी आणि मासे येतात ते पुण्यकारक सांगितले आहेत. त्याउलट सगळे सुक्ष्म जीव जे रोगराई उत्पन्न करतात ते, कुजवणारे, सडवणारे, दुर्गंध पसरवणारे असे जीव पापकारक समजले जातात. आपल्याला रोग होतात त्याच्या मागे असे पापकारक जीव असतात. म्हणून असें सांगतात कीं, पाप करणारा त्याचा पुढील जन्म किड्या मुंगीत घेईल ते बर्याच अंशी सत्य असते.
गुणी विचारतो, अहो गुरूवर्य मला सांगा जर सगळे मोठे प्राणी पुण्यकारक असे सांगितले आहे तर ते सगळे मोक्षापर्यंत जाऊ शकतात कां?

अघमर्शन सांगतात, सगळे मोठे प्राणी कृत युगात मोक्षाला जाऊ शकत होते. त्यानंतर पापाचे प्रमाणे वाढले व त्रेता युगात मनुष्य, वानर आणि सुग्रीव (अस्वलं) मोक्षाकडे जाऊ शकत होते. त्यापुढे जसे पापाचे प्रमाण आणखीन वाढेल तसे द्वापार युगात फक्त मनुष्य मोक्षाला जाऊ शकेल. त्याही पुढे कलीयुगात जे पापाचे युग समजले जाते, मनुष्यातील फक्त सात्त्विक माणसेच मोक्षाकडे जाऊ शकतील. त्या प्रमाणे कलीयुगात कित्येक मोठे प्राणीसुद्धा पापमय जीवन जगत असतील कारण पुण्याचे प्रमाण पृथ्वीवर फार कमी झालेले असेल.

९५. गुणी विचारतो, मला सांगा, वेद कोणी व कां सांगितले"?
अघमर्शन सांगतात, वेद ब्रह्माने उत्पन्न केलेल्या अनेक ऋषींनी गाईले आहे. त्याचे कारण सांगतो, जसे कृतयुगात पापाचे प्रमाण वाढू लागले व कर्माने पुण्य मिळवणे सोपे राहीले नाही तसे ब्रह्माच्या आज्ञेने ते ऋषी कांहीं मंत्र रचू लागले ज्याच्या जपाने व सात्त्विक जीवन जगण्याने पुण्य कमावणे म्हणजे अध्यात्मिक उर्जा वाढवण्याचे काम होत असते. कारण ते मंत्र कांहीं देवतांना प्रसंन्न करण्यात साधकाला मदत करत असतात. त्या देवता अध्यात्मिक उर्जा वाढवण्याचे काम करत असतात. अशारितीने जपाच्या माध्यमाने मनुष्य त्याचे पुण्य वाढवू शकत होता व तोंच उद्देश आहे वेदांचा. ते मंत्र ऋचा आणि साम ह्या रुपात आहेत. वेदांच्या शब्दांचे अर्थ काढण्याचे व्यर्थ प्रयत्न करू नये कारण ते सामान्य काव्य नाही. तसेंच त्या शब्दांचे उद्देश त्या देवतांप्रती असतात. म्हणून अज्ञानी लोकांना वेद समजत नाहीत. परंतु, पुढे ते जपण्याची परंपरा विसरली गेली. तेव्हां कांहीं ऋषी जसें याज्ञवलक्य झाले त्यांनी यजू सांगण्यास सुरूवात केली जे सामांच्या पेक्षा वेगळे होते. त्यातून यजूर्वेद आला. त्याच्या मदतीने यज्ञ

करणे सोपे झाले. तरी ब्राह्मणांच्या शंका कमी होत नव्हत्या. त्यांचे समाधान करण्यासाठी ऋषी अंगिरसाने अथर्ववेद रचला त्यातून सगळ्या वास्तविक जगाचे ज्ञान सांगण्याचा प्रयत्न पुन्हा तशांच प्रकारच्या मंत्राने झाला. अशारितीने माणसाच्या उद्धारासाठी ब्रह्माने चार वेद दिले आहेत. यज्ञ करतांना त्या विविध देवतांना आळवणी केली जात असते त्या ऋचा व सामांच्या गायनाने, ज्याचे अर्थ फक्त त्या देवता समजता व जर सर्व कांहीं योग्य असेल तर त्या देवतां यजमानावर प्रसन्न होतात. त्यांची रचना करण्यासाठी अधिक मार्गदर्शन व्हावे म्हणून स्कंधाने व क्षुपाने पुढे आगम शास्त्र तयार केले ज्याच्या मदतीने ऋद्विक, पुरोहित इत्यादी, कर्मकांड उत्तम प्रकारे करू शकतात. सनातन परंपरेत कर्मकांडाचे महत्व अनन्यसाधारण आहे. माणसाला त्याचे पुण्य वाढवण्याच्या कामात ज्या देवतां मदत करण्यासाठी नेमलेल्या आहेत त्या प्रसन्न करण्यासाठी कर्मकांडाचा उदय झाला. एवढे सांगून ऋषी अघमर्शन शांत झाले.

९६. तेवढ्याने समाधान न झालेले युधिष्ठीर भिष्माला विचारतात, देवतांमध्ये अनेक प्रकार आहेत त्यांची माहिती मला सांगा,

भिष्म सांगतात, देवतांचे प्रामुख्याने तीन प्रकार सांगितले आहेत. पुण्यकारक देवता, पापकारक अथवा अघोरी देवता आणि पितर देवता अर्थात् पिशाच्च देवता. ब्रह्माने ज्या ऋषींच्या मदतीने माणसाला मत करण्यासाठी देवता उत्पन्न केल्या त्या पुण्यकारक देवता आहेत व त्यांची संख्या खूप आहे. आगम शास्त्रात ज्या दिल्या आहेत त्या देवता बहुधा पापकारक असतात. त्याच्या साधनेचे नियम अघोर योगविद्येत आहेत. त्याच प्रमाणे पितर देवता आहेत त्या मेलेल्या माणसांच्या पिशाच्चांतून तयार झाल्या आहेत. ब्रह्माच्या कृपेने उत्पन्न झालेल्या देवता नित्य असतात म्हणजे त्या युगाच्या अंतापर्यंत कार्यरत असतात. पापकारक देवता तशा नित्य नसतात. त्यांना निश्चित समयाच्या मर्यादा असतात. तसेंच पिशाच्च देवता ज्याना आपण सामान्य भाषेत भुत प्रेत म्हणून बोलतो त्यांच्या काल मर्यादा फार कमी असते त्यानंतर त्या पुन्हा जन्म घेऊन येत असतात. वेदांत पुण्य देवतांच्या सिद्धतेचे मार्गदर्शन दिले आहे. त्यांच प्रमाणे आगम शास्त्रात पापकारक देवतांचे व पुण्यकारक अशा दोनही प्रकारच्या देवतांच्या सिद्धतेचे मार्गदर्शन आहे. पिशाच्च देवतांकडून काम करण्यासाठी त्यांना श्राद्धविधीच्या मदतीने प्रसन्न करणे सोपे असते. त्याची माहीतीसुद्धा आगम शस्त्रात आहे. देवता विज्ञान हा कर्मकांडाचा गाभा असतो. एवढे सांगून ते गप्प झाले. सगळ्या देवता अदृष्य जगात असतात, त्यांचे लक्ष असते दृष्य जागावर व

त्यातील ज्या ब्रह्माने नियुक्त केलेल्या असतात त्या जगरहाटीचे नियंत्रण करत असतात. ह्या स्पष्टीकरणाने त्याचे समाधान होते.

## इस्लाम बद्दलची माहिती –

हिंदू देशात इस्लाम कसा आला व ज्याना आपण मुसलमान समजतो ते खरोखरच मुसलमान आहेत कां? ह्याची माहीती घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे. त्यासाठी इस्लामच्या निर्मात्याचे काय सांगणे आहे ते पहावे लागेल. आपल्याला इस्लामच्या इतिहासात जाण्याची त्याकरतां आवश्यकता नाही. महंमदाने त्याच्या देवदूताने सांगितलेला धर्म त्याच्या अरब लोकांसाठी सांगितला आहे व त्यांचा देव म्हणजे अल्लाह हासुद्धा फक्त त्याच्या अरब लोकांसाठीच आहे. असे सांगण्याचे कारण दोन आदेश (फतवे) महमदाने दिले आहेत. परंतु, ते जाणून बुजून लोकांपासून दूर ठेवलेले आहेत त्या दोन आदेशांच्या बद्दल आपण पहाणार आहोत. इस्लामचा शोध महमदाने लावला तेव्हां त्याचा प्रचार तलवारीच्या जोरावर त्याने सगळ्या अरब देशात केला हे सर्वश्रूत आहे. ते करत असतांना ज्या अरबानी त्याला विरोध केला त्यांना महमद काफर म्हणाला होता. म्हणजे काफर फक्त अरब असू शकतो. कारण महमदाच्या आदेशाप्रमाणे इस्लाम फक्त अरबांसाठी आहे व त्यांचा अल्लाह सुद्धा फक्त आणि फक्त अरबांसाठी आहे. महमदाच्या हयातीत त्याला अनेक इतर लोकांनी जसे आर्मेनियन, अरेमियन, हबशी, असरियन जे त्याच भागात रहात होते त्याने त्या नवीन धर्माची दिक्षा देण्याची विनंति केली होती परंतु, महमदाने त्यांना निक्षून सांगितले कीं, देवदूत जिब्रालच्या आदेशानुसार तो काम करतो व तो आदेश देतो कीं, इस्लाम फक्त अरबांसाठी आहे व अल्लाह सुद्धा फक्त अरबांचेच कल्याण करण्यासाठी आहे. त्यामुळें महमदाच्या हयातीत इस्लाम अरबस्थाना बाहेर गेला नव्हता. स्वतः महमदसुद्धा त्याच्या चढाया अरब आखात प्रदेशापुरता करत होता. तो कधी त्या सीमा ओलांडून गेला नाही कारण तसे त्याला जिब्रालचे आदेश होते. जेव्हां एक अरब फौज ती मर्यादा ओलांडून गेली तेव्हां महमदाने नाराजी व्यक्त केली होती. महमदाचे कट्टर साथीदार त्याच्या आदेशाप्रमाणे इस्लाम फक्त अरबांपुरता ठेवत होते. परंतु, पुढे महमदाचा खून त्याच्या पत्नीने आयेशाने त्याला आरसेनिक वीष जेवणातून खाण्याला घालून केला त्यानंतर महमदाचा सासरा आणि पट्ट शिष्य अबू बक्र ज्याच्या मुलीने आयेशांने, त्याच्या सांगण्यावरून महमदाला वीष खायला घातले होते तो खलिफा म्हणजे अरबांचा मुख्या झाला. अबू बक्र मोठा श्रीमंत होता व महत्वाकांक्षी सुद्धा

होता. त्याने इस्लामचा प्रचार अरबांच्या बाहेर करण्याचे ठरवले कारण तशी मागणी त्या इतर लोकांची होती. एका दृष्टीने ते सहाजिक होते. परंतु, त्याला महमदाचे कट्टर साथीदार विरोध करतात व जिब्रालच्या आदेशा बाहेर न जाण्याची ताकीद अबू बक्रला करतात. ते मदमदाचा पहिला फतवा कीं, इस्लाम फक्त अरबांसाठी आहे व अल्लाहसुद्धा फक्त अरबांसाठी आहे त्याची आठवण केली पण महत्वाकांक्षी अबू बक्र ते ऐकावयाला तयार नव्हता ते तो मानत नाही. तो इस्लामचा प्रसार अरब देशां बाहेर करण्याचे प्रयत्न करू लागतो. तेव्हां त्यांच्यात म्हणजे महमदाच्या सच्च्या साथीदारात व अबू बक्रच्या सैनिकांत चकमकी होतात त्यात महमदाचे अनेक साथीदार अबू बक्र मारतो. त्यानंतर ते त्याला फार जास्त त्रासदायक होऊ लागते. तेव्हां कांहीं तोडगा काढण्याचे ठरवतो व तो त्या महमदाच्या सच्च्या साथीदारांना सांगतो एका फतव्या द्वारा कीं, तो महमदाच्या आदेशाबाहेर नव्हता. तो फक्त अरबांसाठी गुलाम तयार करण्यासाठी इस्लामचा उपयोग करणार आहे. म्हणजे जे अरबेतर तो इस्लामच्या प्रचारात आणत आहे ते अरबांच्या योग्यतेचे मुसलमान नसतील पण ते अरबांचे गुलाम असतील. ते समजण्यासाठी त्या बाटवलेल्या लोकांना एक वाटीच्या आकाराची टोपी घालण्याचे बंधन होते. अशारितीने अबू बक्रने इस्लामच्या मदतीने अरबांसाठी फुकटचे गुलाम तयार करण्यासाठी इस्लामचा प्रचार जबरदस्तीने करण्यास सुरूवात केली. त्यासाठी अनेक युक्त्या तो वापत होता. जसें ज्या इतर (अरब नसलेले) लोकांना दमास्कस, बगदाद अशा व्यापारी ठिकाणी त्यांचा धंदा करावयाचा आहे त्याना इस्लाम मान्य करावा लागेल, त्यामुळें जे व्यापारी तेथे धंदा करण्यासाठी जात अशा सगळ्यांना इस्लाम मान्य करावा लागत असे. निदान त्या भागात तरी ते लोक आपण मुसलमान असल्याचे मान्य करत होते. हिंदूस्थानातील कित्येक व्यापारी समाज जसे लोहाणा, भाटीया, अफगाणिस्थानातील पठाण व्यापारी हे ह्या प्रकारे बाटवले गेले त्यासाठी अबू बक्रला कोणतीही मारामारी करावी लागत नव्हती. भाटीया स्वताला खोजा सांगत होते व लोहाणा त्यांना मेमन सांगत होते. जेव्हां अरबांना इराण बाटवल्यानंतर हिंदूस्थानात प्रवेश करता आला नाही कारण बलाढ्य प्रतिहारा राजांनी त्याना बलुचिस्थानात थांबवले तेव्हां त्यांनी पठाण गुलामांना चिथवून उत्तरेकडून हिंदूस्थानात शिरण्यास सांगितले ते त्यात यशस्वी झाले कारण ब्राह्मणांनी तेथील क्षत्रियांचा नाश केला होता त्यांना शुद्र ठरवून तो आपल्या इतिहासाचा एक दुर्दैवजनक भाग आहे. त्यानंतर अरबांसाठी मोठ्या प्रमाणात गुलाम तयार करण्याचे काम मोगलानी कसे केले ते आपण आपल्या इतिहासात वाचत असतो.

आता पाहू अरबांच्या गुलामांचे काय स्वरुप असते. तो अरबांची म्हणजे त्यांची सगळ्या बाबत नक्कल करणार म्हणजे त्यांच्या धर्माची नक्कल करणार जरी त्याला अल्लाह कधीच प्रसन्न होणार नसला तरी ते तसे करत रहाणार. नमाज पढणार, तसे कपडे घालणार, त्यांची बोली बोलणार, मशिदी बांधणार व त्यात त्यांच्या मालकासाठी (अरब मालक) नमाज पढणार. ते त्यांच्या बायका अरबांना मजा करण्यासाठी देणार, त्यापासून जी पिलावळ जन्माला येईल ते आणखीन गुलाम असतील. त्यात विशेष म्हणजे गुलाम कुराणाचा अभ्यास करून त्यातून मुल्ला, मौलवी, मुफ्ती, इमाम असे कोणीही होणार नाही कारण गुलाम त्या पदाला जाऊ शकत नाहीत. तसेंच मदरसा सुद्धा चालवणार नाहीत. ते अरबांसाठी फुकट लढतील आणि मरतील. ते गुलामाची टोपी घालतील. त्या टोपीचा आकार यहूदी लोकांच्या प्रार्थनेच्या टोपीसारखा असतो तसे करण्याचे कारण अरब यहुदींचा तिटकारा करत असतं. एका प्रकारे ते त्या टोपीच्या द्वारा दाखवत होते कीं, यहुदी त्यांचे गुलाम आहेत. आज त्या वाटीच्या आकाराच्या टोपीची अनेक बदललेली रुप पहावयाला मिळतात. अरब कधी तशी टोपी घालत नाहीत हे लक्षात घेण्यासारखे आहे कारण असा गैरसमज आहे कीं, ती नमाजाची टोपी आहे तो खोटा बनाव आहे. ह्या संशोधनावरून एक गोष्ट स्पष्ट होते कीं, हिंदूस्थानात जे आहेत ते मुसलमान नाहीत ते अरबांचे गुलाम आहेत व म्हणून ते वंदे मातरम म्हणण्यास तयार नाहीत. कांहीं हिंदूस्थान त्यांचा देश म्हणून मानत नाहीत. ते अरबांसाठी लढणार व अरबांची सेवा करण्यासाठी आहेत. अरबस्ताना बाहेर कोणीही मुसलमान नाहीत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. सगळ्या जगातील हे बाटगे अरबांचे गुलाम आहेत. हे आपल्याला बदलावयाचे आहे. त्यासाठी प्रथम ब्राह्मण धर्माचा नाश करावा लागेल ते कां ते पाहू.

आता महाराष्ट्रात हिंदू कसे अरबांचे गुलाम झाले ते पहावे लागेल. मी बर्याच वर्षापूर्वी सातारा शहरात रहात होतो. तेथे संध्याकाळी त्या शहरातील निरनिराळ्या भागात फिरत असें, मुसलमान आळीतून जातांना एक अजब गोष्ट माझ्या नजरेत आली ती अशी कीं, प्रत्येक मुसलमानाच्या घराच्या मुख्य दरवाजाच्यावर गणपतीची मूर्ती असे. असं एकही घर नव्हते कीं, त्या घराच्या दरवाज्यावर गणपतीची प्रतिमा नाही. मी ते पाहून चक्रावून गेलो. मी तेथे रहाणार्या लोकांना त्याबद्दल विचारले तेव्हां जे समजले ते ऐकल्यावर मला फार वाईट वाटले तो इतिहास असा. शिवाजी महाराजांच्या काळात तेथून मराठा योद्धे लढण्यास जात होते. जर त्यापैकी कोणी सुलतानाच्या कैदेत सापडला तर तो सुटल्यावर परत येत असे व पुन्हा लढण्यास जात असे परंतु. जशी पेशवाई आली तसे चित्र बदलले. कैदेत

सापडलेला वीर मुसलमान झाला असे पेशव्यांचे पुरोहित जाहीर करत व त्यांना बहिष्कृत करत असत. त्यामुळे त्यांना मुसलमानासारखे रहाण्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. त्यामुळे ते मुसलमान झाले पण ते अरबांचे गुलाम नाहीत असे म्हणाले. म्हणजे ब्राह्मणाच्या अतिरेकामुळे सुद्धा कांहीं नाईलाज म्हणून मुसलमान असले तरी ते खरे तसे नसल्याचे त्यांनी मला सांगितले. त्याना त्यांच्या घरावरील गणपतीच्या कृपेने पुन्हा त्याच्या खर्या हिंदूधर्मात येण्याचा मार्ग मोकळा झाला पाहिजे. अशा बर्याच ब्राह्मणी अत्याचाराच्या गोष्टी सांगता येतील पण त्यात वेळ न दवडता आपण सगळ्यानी खर्या हिंदू तत्त्वांचे आचरण करण्यास सुरूवात केली म्हणजे सगळे यथावकाश सुधरत जाईल.

आता महमदाचा दुसरा फतवा काय ते पाहू.
महमदाने त्याच्या देवदूताला विचारले होते कीं, इस्लाम किती काळ अरबांचे कल्याण करणार आहे? जिब्राल त्याला सांगतो कीं, त्याला पहिला संदेश झाला त्यापुढे एक हजार चारशे पन्नास वर्षे तो असेल त्यानंतर अरब लोक नष्ट होतील एकमेकांत लढून. त्याप्रमाणे इसवीसन २०४० पर्यंत इस्लाम अरबांचे संरक्षण करणार आहे. त्यानंतर इस्लाम नाहीसा होणार आहे. आता पाहू ते कितपत खरे होते. अजून बराच काळ इस्लाम रहाणार आहे.

कांहीं वाचकांचा गैरसमज होण्याची शक्यता आहे ह्या व इतर निवेदनामुळे कीं, मी ब्राह्मणद्वेष्टा आहे पण तसे नाही. माझ्या ह्या संशोधनात मला मदत करणारे सगळे ब्राह्मण जातीचेच आहेत. हा एक लहानसा भाग आहे ब्राह्मणांतील ज्यांच्या मूर्खपणामुळे हिंदू समाजाचे नुकसान होत आहे. ते बहुधा पुरोहित वर्गाचे आहेत. ब्राह्मण समाज ही महाराष्ट्राची ताकद आहे. त्यांचा मी कधीच द्वेष करत नाही. आणखीन सांगावयाचे कीं, बरेच प्रश्न आहेत त्यात ख्रिस्ती धर्म, जैन धर्म ह्यांचा विचार करावयाचा आहे कारण त्या बद्दल पुष्कळ प्रश्न आले आहेत, येत आहेत. ते सगळे करण्यासाठी मला सहाय्य करणारे त्यांचा मोबदला घेत असतात त्यासाठी अर्थ बळ लागते त्यासाठी मी सुरूवातीच्या निवेदनात तशी विनंती केली आहे. जर पुरेसे अर्थसहाय्य प्राप्त झाले तर पांचव्या प्रश्नोत्तरीत ते घेता येतील.

## । सर्व हिंदूंना ही चौथी प्रश्नोत्तरी अर्पण ।

विघ्नहर्ता विनायका । अरिहंतो नमो नमः ।।

हि प्रार्थना करून मी हिंदू कोण? ह्या पुस्तकाची ही चौथी आवृत्ती येथे संपवतो.

# ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,